BROWEN BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192738
UNIVERSAL LIBRARY

OUP—831—5-8-74—15,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M83 S26A Accession No. M2753

Author सावरकर, वि. दा.

Title अठराशे सत्तावनचें स्वातंत्र्य समर.

This book should be returned on or before the date last marked below.

विनायक दामोदर सावरकर

# १८५७ चें
# स्वातंत्र्यसमर

संक्षिप्त आवृत्ति

भाषान्तर, संक्षिप्तीकरण } वि. वि. पटवर्धन
एम्. ए., बी. टी.

: प्रस्तावना :

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

प्रकाशन क्रमांक १०९

: अेकमेव विक्रेते :

चित्रशाळा प्रेस, प्रकाशन विभाग, पुणें २

मूल्य दोन रुपये

प्रकाशक :
ग. पां. परचुरे
'ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर'
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुंबअी ४

आवृत्ति पहिली
१।१२।१९५४

महत्त्वाची जाणीव

संक्षिप्त आवृत्तीचे
सत्त्वाधिकार
श्री. ग. पां. परचुरे
यांचे स्वाधीन

सजावट :
'रघुवीर मुळगांवकर

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगांव
मुंबअी ४

# कृतज्ञ समर्पण

'दंतच्छेदो हि नागानां श्लाघ्यो गिरिविदारणे।'

'स्वधर्म नि स्वराज्य यांकरितां झुंजतां झुंजतां धारातीर्थी पतन पावलेल्या सहस्रावधि अज्ञात हुतात्म्यांनो! ही अितिहासकृति तुमच्या वीरकृतीला समर्पित असो! सहस्रावधि हुतात्म्यांचें—देशवीरांचें—रक्त! हा अितिहासहि त्या रक्तालाच अर्पण! स्वदेशाकरितां लढण्यासाटीं सिद्ध झालेल्या हे वीरांनो! तुम्ही कुठले कोण? तुमचीं नांवें तरी काय? तत्त्वाची अग्निज्वाला तुमच्या हृदयांत केव्हां पेटून अुठली?

'...परंतु मानव्याची सेवा करण्याच्या अिच्छेनें ज्या तुम्हीं आपलें देहार्पण नि प्राणार्पण केलेंत त्या तुमच्या नांवाचा अुच्चार करण्याचें भाग्यहि दुर्दैवानें आमच्या वांट्याला आलें नाहीं! तर मग ही अितिहासकृति तुमच्या त्या अनामिक स्मृतीलाच समर्पित असो!

'...विजय जरी हातचा गेला तरी तुम्हीं आपल्या कीर्तीला कलंक लागूं दिला नाहींत! तुमच्या पराक्रमाने भूतकाळाचा कलक धुअून निघून तो अधिक अुज्ज्वल होवो नि तुमचा तोच पराक्रम भविष्याचें स्फूर्तिस्थान नि चैतन्यनिधान होअून राहो!'

—वि. दा. सावरकर

# भारतीय क्रांतीचा महान् वेद

कोणत्याहि राष्ट्राचें स्वातंत्र्य हरण केल्यानंतर त्यानें चिरकाल आपल्या दास्यांत राहावें म्हणून त्याच्या भूतकालीन पराक्रमांचा अितिहास नष्ट करून किंवा त्याला विकृत स्वरूप देअून त्याचें पौरुष आणि स्वाभिमान खच्ची करण्याचा जुलमी जेते प्रयत्न करीत असतात. भारताच्या बाबतींत अिंग्रज राज्य-कर्त्यांनीं आपल्या भाडोत्री अितिहासकारांच्या मदतीनें हीच कारवाअी मोठ्या कौशल्यानें केली. अिंग्रजी साम्राज्यसत्तेविरुद्ध पहिला धाडसी अुठाव भारतीय जनशक्तीनें १८५७ सालीं केला. पण दुर्दैवानें तो अपेशी ठरल्यामुळें त्या स्वातंत्र्यसंग्रामाला 'शिपायांच्या बंडा'चें स्वरूप येअून त्यांतील क्रांतीचा प्रक्षोभक नि स्फूर्तिदायक अंगारच विझवून टाकण्याची अिंग्रजांच्या पक्षपाती अितिहास कारांनीं पराकाष्ठा केली. सत्तेच्या नि हुकमांच्या जोरावर वाटेल त्या कल्पनांचा नि विचारसरणीचा प्रचार राज्यकर्त्यांना जनतेमध्यें करतां येतो. परतंत्र भारता-मधील शाळेंतल्या मुलांना वर्षानुवर्षें जो सरकारमंजूर अितिहास शिकवला जात होता, त्यांत सत्तावन्न सालीं अिंग्रजांच्या दास्यांतून मुक्त होण्याचा हिंदी जनतेनें जो अचाट प्रयत्न केला, त्याची त्यांना गंधवार्ताहि न लागेल अशी काळजी घेण्यांत आली. गाअीच्या नि डुकराच्या चरबीनें माखलेलीं काडतुसें तोंडानें तोडावयास लावण्याची सक्ति करण्यांत आल्यामुळें संतापलेल्या हिंदु-मुसल्मान शिपायांनीं सत्तावन्न सालीं बंड केलें अेवढाच अितिहास ते घोकत बसले. आणि सत्तावन्न सालच्या क्रांतियुद्धाचे अस्सल कागदपत्र आणि साधनें शेहेचाळीस वर्षांपूर्वी इंग्लंडमध्यें प्रत्यक्ष पाहण्याची संधि वीर सावरकरांसारख्या अलौकिक प्रतिभेच्या कवीला नि क्रांतिकारकाला जर मिळाली नसती तर अद्यापपर्यंत आम्हांला भारतीय स्वातंत्र्याच्या अितिहासांतील या तेजस्वी कालखंडाची मुळीं ओळखच होअूं शकली नसती.

सहा सालीं सावरकर अिंग्लंडला गेले. अिंग्लंडच्या स्वतंत्र वातावरणांत सावरकरांच्या प्रतिभेला आणि स्वातंत्र्यप्रेमाला विलक्षण बहर आला हें सांगा-वयास पाहिजे काय ? मॅझिनी, गॅरिबाल्डी, काव्हूर अित्यादि इटॅलियन देश-

भक्तांच्या चरित्रांकडे नि क्रांतिप्रयत्नांकडे आपोआपच त्यांचें लक्ष वेधलें. परतंत्र राष्ट्रानें स्वातंत्र्यसंपादनाच्या कामीं कोणत्या मार्गाचा अवलंब करावयास हवा ह्याचा तेजस्वी आदर्श भारतीयांपुढें ठेवावा या हेतूनें त्यांनीं मॅझिनीच्या मूळ आत्मचरित्राचें मराठीमध्यें अत्युत्कृष्ट भाषांतर केलें आणि त्याला अेक अत्यंत स्फूर्तिदायक अशी प्रस्तावना लिहिली. त्यानंतर पुढल्याच वर्षी—म्हणजे सात सालीं सत्तावन्न सालच्या 'बंडा'ला पन्नास वर्षे पूर्ण होणार होतीं. त्या काळांत हिंदुस्थानामध्यें राजकीय असंतोषाची लाट देशभर पसरत चालली होती. सत्तावन सालच्या राष्ट्रीय आंदोलनाची स्मृति जागृत करण्यास ती स्फोटक वेळ अनुकूल आहे हें ओळखून सावरकरांनीं सत्तावनी क्रांतियुद्धावर अेक स्वतंत्र विवेचनपर ग्रंथ लिहिण्याचें ठरविलें आणि त्याचीं साधनें जमविण्यास सुरुवात केली. तपूर्वी ह्याच विषयावर अिंग्रजी आणि हिंदी अितिहासकारांनीं अिंग्रजी भाषेमध्यें कमींतकमी तीस-बत्तीस ग्रंथ लिहिले होते. पण सत्तावन सालीं घडलेली घटना हें अेक राष्ट्रीय अुत्थान होतें ह्या दृष्टिकोनानें तिच्याकडे बघण्याचा त्यांपैकीं कोणींहि प्रयत्न केला नव्हता. जवळ जवळ वर्ष-सव्वा वर्षाच्या परिशीलनानंतर आठ सालच्या पूर्वार्धात 'सत्तावन्नचें स्वातंत्र्य समर' हा साडेपांचशें पानांचा अपूर्व ग्रंथ सावरकरांनीं मराठी भाषेंत लिहून पूर्ण केला. त्या वेळीं त्यांचें वय अवघें तेवीस वर्षांचें होतें.

ह्या ग्रंथ लिहून झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं 'दहा मे' हा सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धाचा वाढदिवस येत होता. तेव्हां तो लंडन येथें जाहीरपणें साजरा करण्याचें सावरकरांनीं ठरविलें. तत्पूर्वी स्वातंत्र्ययुद्धांत ज्या ज्या हुतात्म्यांनीं बलिदान केलें त्यांच्या स्फूर्तिदायक चरित्रावर सावरकर आणि त्यांचे सहकारी ह्यांनीं पत्रकें काढून आणि लंडनच्या मोहल्ल्यामोहल्ल्यांत व्याख्यानें देअून त्या अुत्सवाला खूपच प्रसिद्धि दिली. हा अुत्सव अशा कांहीं टोलेजंग थाटानें साजरा करण्यांत आला कीं त्याचे पडसाद अिंग्लंडमध्यें सर्वत्र अुठले आणि विलायतेंतील हिंदी विद्यार्थ्यांकडे ब्रिटिश सरकार भयभीत दृष्टीनें बघूं लागलें. सत्तावन सालच्या स्वातंत्र्ययुद्धाकडे भारतीय जनतेचें लक्ष वेधल्यावांचून सशस्त्र क्रांतीची प्रभावी अुठावणी पुन्हा या देशांत होणें अशक्य आहे ही खूणगांठ त्याच वेळीं सावरकरांनीं आपल्या मनाशीं पक्की बांधली आणि केवळ त्या दृष्टीनें त्यांनीं आपल्या ह्या तेजस्वी ग्रंथाची रचना केली. रोमहर्षण पराक्रमांच्या

काव्यमय वर्णनांनीं, अलौकिक बलिदानांच्या प्रक्षोभक कथांनीं आणि अुदात्त ध्येयवादाच्या अुन्मादक स्वातंत्र्यसूक्तांनीं 'सत्तावनचें स्वातंत्र्यसमर' हा सावरकरांचा ग्रंथ आमूलाग्र ओथंबून गेलेला असल्यामुळें, तो 'भारतीय क्रांतीचा वेद' किंवा 'सशस्त्र क्रांतीच्या तत्त्वज्ञानाची गीता' म्हणून संबोधला जातो.

मूळ मराठी ग्रंथाचें हस्तलिखित अत्यंत गुप्तपणें हिंदुस्थानांतील त्या वेळच्या अधिकाऱ्यांचा डोळा चुकवून विलायतेमधून महाराष्ट्रांत पाठविण्यांत आलें. पण सरकारच्या भयामुळें आणि पोलिसांच्या छळामुळे महाराष्ट्रामध्यें तें कोणीहि छापून देण्यास तयार होअीना. म्हणून शेवटीं तें परत अिंग्लंडमध्यें न पाठविता पॅरिसमध्यें पाठविण्यांत आलें. अन् तेथून तें पुन्हा सावरकरांच्या हातीं सुखरूपपणें जाअून पोहोचलें. त्यानंतर त्याचें अिंग्रजी भाषांतर करवून तें युरोपमध्यें प्रसिद्ध करावें अशी कल्पना निघाली. अिंग्लंडमधल्या गुप्त पोलिसाच्या जागरूकतेमुळें तें त्या देशांत छापणें अशक्यच होतें. फ्रान्समधले पोलिसहि अिंग्रज पोलिसांशीं सहकार्यानें वागत असल्यामुळें त्याहि देशांत तें काम होण्यासारखें नव्हतें. शेवटीं हॉलंडमध्यें तें पुस्तक छापवून घेअून त्या अिंग्रजी भाषांतराच्या हजारों प्रती निरनिराळ्या मार्गांनीं केवळ हिंदुस्थानांतच नव्हेत तर साऱ्या जगांत पाठवून देण्यांत आल्या. अमेरिकेंत स्थापन झालेल्या क्रांतिकारक 'गदर' पक्षानें तर ह्या ग्रंथाची द्वितीय आवृत्ति छापून प्रसिद्ध केली. जगामधल्या सर्व क्रांतिकारकांनीं ह्या ग्रंथाचें सहर्ष स्वागत केलें. तथापि, दहा सालीं वीर सावरकरांना अिंग्लंडमध्यें पकडण्यांत आल्यानंतर या ग्रंथाचें मूळ मराठी हस्तलिखित पॅरिसला पाठवून देण्यांत आलें. पुढें जर्मनीनें फ्रान्सवर स्वारी केली. त्या गडबडींत हें हस्तलिखित दुर्दैवानें गहाळ झालें. आणि मराठी साहित्याची कधींहि न भरून येणारी अशी अपरंपार हानि झाली!

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं ह्या शतकाच्या पूर्वार्धांत जे जे म्हणून सशस्त्र क्रांतीचे प्रयत्न ह्या देशांत आणि देशाबाहेर झाले त्यांना वीर सावरकरांच्या ह्या 'सत्तावनी स्वातंत्र्यसमरा'नें स्फूर्ति दिलेली आहे. आठ-नअू सालानंतर ह्या देशांत राजकीय असंतोषाचा जो प्रचंड भडका अुठला त्यांत तेल घालण्याचें पुष्कळच काम ह्या ग्रंथानें केलें. क्रांतिवीर भगतसिंग तर ह्या ग्रंथाचें अेकाद्या धार्मिक ग्रंथाप्रमाणें नित्य नियमानें पठन करीत असत. सत्तावीस-

अठ्ठावीस सालीं त्यांनीं या ग्रंथाचें गुप्तपणें पुनर्मुद्रण करवून त्याचा क्रांतिकारकांमध्यें प्रसार केला.

'आझाद हिंद फौजे'चे संस्थापक नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांनीं तर हा ग्रंथ आपल्या फौजेंतील सैनिकांसाठीं 'पाठ्य पुस्तक' म्हणूनच नेमला होता. 'चलो दिल्ली' ही त्यांच्या फौजेची क्रांतिकारी घोषणा त्यांनीं ह्या ग्रंथामधून घेतली (पान ५८). ब्रिटिश साम्राज्याचा कट्टर पुरस्कर्ता सर व्हॅलेंटाअीन चिरोल ह्यानें ह्या ग्रंथाला 'ज्वालाग्राही वाङ्मय' ह्या विशेषणानें संबोधलें आहे. तो म्हणतो, "बंडाचा हा अेक अत्यंत अुत्कृष्ट अितिहास आहे ह्यांत शंका नाहीं. वस्तुस्थितीचा त्यांत भयानक विपर्यास असला तरी त्याच्या मुळाशीं गहन संशोधन आहे. श्रेष्ठ साहित्यिक शक्ति आणि क्रूर सूडबुद्धि ह्यांचें ह्या पुस्तकांत प्रभावी मिश्रण केलेलें आहे." श्री राजगोपालाचारियर किंवा श्री विनोबा ह्यांच्यासारख्या निष्ठावंत अहिंसावाद्यांच्या मनावर तरुण वयांत ह्या ग्रंथानें विलक्षण परिणाम केला असल्याचें नमूद आहे.

सत्तावन सालच्या बंडाचा अभिनव अर्थ जगाला ह्या ग्रंथानें प्रथम सांगितला, हें त्याचें वैशिष्ट्य होय. पहिल्या प्रकरणांत वीर सावरकर म्हणतात, "क्रांतीचा अितिहास लिहावयाचा म्हणजे तिच्या मागील हेतु, ती घडविणाऱ्या लोकांच्या मनांतील भावना अित्यादींचा विचार करूनच त्या क्रांतींत घडलेल्या घटनांचें मूल्यमापन करणें अवश्य ठरतें." या शास्त्रीय भूमिकेला धरून अेकाहि देशी वा विदेशी लेखकानें वीर सावरकरांच्या आधींच्या सत्तावनच्या प्रचंड क्रांतीचा अितिहास लिहिलेला नव्हता.

ह्या क्रांतीच्या मुळाशीं 'स्वधर्म आणि स्वराज्य' हीं दोन तत्त्वें होतीं. देशाचें आणि धर्माचें रक्षण हीच ज्वलंत भावना ह्या क्रांतीचें बीज होती. हिंदुस्थानांत पाअूल टाकल्यापासून येथील हिंदु-मुसलमान जनतेच्या अंतःकरणांतली धर्मनिष्ठा आणि स्वदेशभक्ति नष्ट करून टाकण्याचा अिंग्रजांनीं पद्धतशीर प्रयत्न चालविला होता. जनतेच्या धार्मिक आणि राष्ट्रीय भावना चिरडून टाकल्या कीं तिचें स्वत्व मेलें; मग अशा मेलेल्या राष्ट्रावर राज्य करणें आपल्याला फार सोपें, असा अिंग्रजांचा युक्तिवाद होता.

पारतंत्र्याच्या वातावरणांत खरा धर्म मुळीं जिवंत राहूंच शकत नाहीं ही जाणीव त्या काळीं लोकांना हळूहळू होअूं लागली. पारतंत्र्यांत पिचणाऱ्या

किड्यांना कसला आला आहे धर्म ? धर्माची पहिली खूण म्हणजे स्वतंत्र राष्ट्राचा स्वतंत्र मनुष्य होणें हीच होय. स्वातंत्र्याचा सर्वोच्च विकास हाच परमेश्वर ! पारतंत्र्याच्या नरकांत किड्यामुंग्यांप्रमाणें जगण्यापेक्षां आपल्या माणुसकीला शोभेल असा मरणाचा मार्ग पत्करलेला बरा असें प्रत्येकाला वाटूं लागलें.

त्या वेळीं हिंदुस्थान हें आपणां दोघांचेंहि राष्ट्र आहे अशीच हिंदु आणि मुसल्मान जनतेची भावना होती. मुसल्मानांची सत्ता लयाला गेली होती. म्हणून आपण राज्यकर्ते नि हिंदु प्रजा आपली गुलाम ही भावना त्यांच्या अंतःकरणांत त्या वेळीं नव्हती. हिंदु-मुसल्मान आपापसांतलें वैर विसरून परस्परांना भाअूभाअू म्हणून मानूं लागले. म्हणूनच सत्तावनी क्रांतींत नानासाहेब पेशवे, कुंवारसिंह, बहादुरशहा, मौलवी अहमदशहा, खान बहादुरखान हे सर्व हिंदु-मुसल्मान पुढारी अेका स्वदेशाच्या झेंड्याखालीं गोळा झाले. स्वातंत्र्याकरितां प्रथम सर्वांनीं खांद्याला खांदा लावून लढावयाचें व स्वातंत्र्य मिळतांच सर्वांनीं मिळून सर्वांचें असें अेक संयुक्त हिंदी संघराज्य स्थापावयाचें हीच दृष्टि त्या वेळीं होती. सत्तावनी क्रांतीचें हें देदीप्यमान स्वरूप वीर सावरकरांनीं प्रथम प्रकट केलें. ह्यामध्येंच ह्या ग्रंथाची अपूर्वता आहे.

'सत्तावनी क्रांतियुद्ध' हें महाभारतांतल्या अेकाद्या पर्वासारखें किंवा रामायणांतल्या अेकाद्या कांडासारखें वाटतें. त्याचा अितिहास लिहिणाऱ्याच्या अंगीं व्यास-वाल्मीकींचीच काव्यप्रतिभा असावयास पाहिजे. वीर सावरकरांना ती दिव्य देणगी उपजतच मिळाली असल्यामुळें क्रांतिरसानें ओथंबलेलें हें प्रखर महाकाव्य ते अेवढ्या प्रभावी शैलीनें लिहूं शकले. क्रांतीवर आणि स्वातंत्र्यावर जगामध्यें आजपर्यंत अनेकांनीं काव्यें लिहिलीं असतील, पण त्यावर लिहिलेलें जिवंत आणि ज्वलंत असें महाकाव्य हें अेकच. हें वाचीत असतांना आपण अेकाद्या जळत्या ज्वालामुखीच्या अंतर्भागामधून वावरतों आहोंत असें वाटतें.

रसवंतीवर अग्निपुष्पांचा बहर यावा असा या ग्रंथांतील भाषेचा आणि कल्पनांचा दिमाख आहे. हे त्यांचे नमुने पाहा :

(१) चपात्यांनो, चला धाअी करा. भारतांतील सर्व जनतेला हा संदेश द्या कीं, 'सर्वांना स्वतंत्र करण्यासाठीं राष्ट्रानें रक्तयुद्ध पुकारलें आहे. तेव्हां अुठा, सारे अुठा, आणि मातृभूमीला वांचवा.' अरण्यें, पर्वत, नद्या, तुटके कडे या सर्वांना ओलांडून वाऱ्यालाहि मागें टाकणाऱ्या वेगानें, हे चपात्यांनो, तुम्ही आतां

पल्ला मारा. सर्वांना या वेळीं बोलवा. पति-पत्नी, आया-मुलें, बहीणभाऊ, झाडून साऱ्यांना येऊं द्या. मराठ्यांच्या भाल्यांना, रजपुतांच्या तरवारींना, शीखांच्या कृपाणांना, मुसलमानांच्या चांदाला—सर्वांना बोलवा ! (पान ४८)

(२) हें आगी लावण्याचें काम अितक्या गुपचुप होअी कीं प्रत्यक्ष अग्निनारायणच त्या गुप्त संघटनेचा सभासद झाला होता असेंच कोणालाहि वाटावें. (पान ५६)

(३) क्राति हा अेक विलक्षण पक्षी आहे. पिंजऱ्यांतून बाहेर सुटताच हा पक्षी प्रथम मोकाटपणें भराऱ्या घेत आकाशांत हिंडतो. या पक्ष्याच्या पाठीवर बसणाऱ्यांनीं या वेळीं आपली बैठक त्याच्या पाठीवर पक्की रोवली पाहिजे. अेकदा या पक्ष्याच्या पहिल्या मोकाट भराऱ्या संपल्या कीं मग मात्र तो पक्षी संथपणें आकाशांत फिरूं लागतो. मग त्याच्या पाठीवर टिकून राहिलेले स्वारच तेवढे त्याला वाटेल तसा फिरवूं शकतात. (पान ६९)

(४) प्रत्येक हिरण्यकश्यपूला त्याचा नरसिंह, प्रत्येक दुःशासनाला त्याचा भीम भेटत असल्यामुळेंच थोडी तरी सत्याची आणि सुखाची आशा जगाला वाटत आहे. (पान ८७)

(५) जे खरे शूर असतात आणि देशाकरितां हातीं शिर घेऊन लढतात त्यांना 'बहादुरशहा पदक' नाहीं तरी त्याहिपेक्षां महत्त्वाचें असें कर्तव्यनिष्ठचें पदक प्रत्यक्ष मृत्यूच्या हस्तेंच मिळत असतें. (पान ९७)

(६) दोन हजार हुतात्म्यांचें रक्त! क्रांतीचा हा अितिहासहि त्या रक्तालाच अर्पण! विजय जरी हातचा गेला तरी हुतात्म्यांनो, तुम्हीं शरण जाऊन आपल्या नांवाला काळोखी नाहीं फासलीत! हे वीरांनो, तुम्ही कुठले कोण? तुमचीं नांवें तरी काय? तुमचा नेता कोण? ही तुमची साधी माहिती मिळण्याचेंहि भाग्य आमच्या वाट्याला आलें नाहीं. ठीक, तर तुमच्या त्या अज्ञात स्मृतीलाच हा क्रांतीचा इतिहास समर्पित असो! (पान ११७)

क्रांतियुद्धाच्या आघाडीला फासावर चढणारा भारताचा पहिला हुतात्मा मंगल पांडे, बंदुकीच्या गोळीनें जायबंदी झालेला आपला सबंध तरवारीनें हात छाटून गंगामातेला अर्पण करणारा जगदीशपूरचा ऐशी वर्षांचा तरणाबांड म्हातारा कुमारसिंह, स्वधर्मीयांच्या दुष्ट फितुरीला बळी पडलेला फैजाबादचा शूर नेता मौलवी अहमदशहा, सत्तावनी स्वातंत्र्ययुद्धाच्या ज्वालामुखींत उघड्या डोळ्यांनीं स्वतःची आहुति देणारी झांशीची वाघीण राणी लक्ष्मीबाअी, 'हिंदुस्थानामध्यें

परकीय लुटारू हे राजे आणि हिंदुस्थानचे खरे वारस जे आम्ही ते मात्र चोर!' असें दुःखानें म्हणत नेपाळच्या जंगलांत नाहींसा झालेला क्रांतिसिंह नानासाहेब पेशवे, अिंग्रजांच्या मोठमोठ्या सेनापतींना आपल्या युद्धकौशल्यानें खडे चारणारा पण शेवटीं विश्वासघातानें शत्रूच्या हातीं सांपडून फाशीं गेलेला क्रांतीचा सेनापति तात्या टोपे ह्यांचीं अत्यंत तेजस्वी आणि हृदयस्पर्शी शब्दचित्रें अविस्मरणीय भाषेंत वीर सावरकरांनीं रंगविलेलीं आहेत.

तथापि हें प्रतिभाशाली काव्य लिहितांना इतिहासकाराची शास्त्रीय आणि विधायक दृष्टि यत्किंचित्‌हि कुठें सुटलेली नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सत्तावनी क्रांतियुद्ध अपेशी का ठरलें ह्याचें वीर सावरकरांनीं फारच मार्मिक विश्लेषण केलेलें आहे. वस्तुतः सत्तावनी क्रांतीचा पहिला भाग फारच यशस्वीपणें पार पडला. पण परकीय सत्तेच्या शृंखला अेकदा तोडून टाकल्यावर मग शिपायांना कोणतेंच बंधन नकोसें वाटूं लागलें. म्हणून वीर सावरकर म्हणतात कीं, "परकीय सत्तेचा द्वेष करण्याअितकेंच आपली सत्ता शिरसावंद्य मानण्याचें शिक्षणहि पहिल्यापासून लोकांना दिलें गेलें पाहिजे. बाहेर जरी क्रांतीची धामधूम असली तरी आंतून व्यवस्थित राज्ययंत्र काम करीत असावें. बाहेर तरवार अन् आंत न्याय हेंच पथ्य सदैव पाळलें गेलें पाहिजे."

पण तसें झालें नाहीं. विध्वंसनाचा पहिला भाग पार पाडल्यानंतर जेव्हां रचनात्मक म्हणजे विधायक भागाला सुरुवात झाली, तेव्हां परस्परमतभेद, परस्परभीति, अविश्वास ह्यांचें वातावरण माजलें. या वेळीं सर्वांना आकर्षक होअील असें नवीन ध्येय सुस्पष्टपणें लोकांपुढें मांडण्यात आलें असतें तर क्रांतीचा शेवट तिच्या प्रगतीप्रमाणेंच यशस्वी झाला असता. त्यांत ओबडधोबड स्वराज्यापेक्षां परकी राजसत्ता अधिक वाअीट हें तत्त्व समजण्याची अक्कल नसलेल्या लोकांनीं स्वदेशद्रोह केला. म्हणून अेवढी देशव्यापी क्रांति होअूनहि ती निष्फळ ठरली. असें असूनहि 'सत्तावनी क्रांति म्हणजे हिंदुस्थानच्या अैक्याच्या, स्वातंत्र्याच्या आणि जनतेच्या जागृतीच्या दिशेनें कितपत प्रगति झाली आहे हें पारखून पाहण्याची कसोटीच होती' हा वीर सावरकरांचा निष्कर्ष सर्व स्वातंत्र्यभक्तांना मान्यच होण्यासारखा आहे.

या ग्रंथाची मूळ मराठी प्रत गहाळ झाल्यामुळें त्याच्या इंग्रजी भाषांतरावरूनच हा मराठी अनुवाद श्री. वि. वि. पटवर्धन ह्यांनीं सात वर्षांपूर्वी केला. जवळ-

जवळ चाळीस वर्षेंपर्यंत या ग्रंथावर सरकारनें बंदी घातलेली होती. ती कॉंग्रेसच्या राजवटींत निघाली. मूळ ग्रंथ जवळ जवळ सहाशें पानांचा आहे. म्हणून विद्यार्थ्यांसाठीं स्वतः श्री. पटवर्धन ह्यांनींच त्याची ही संक्षिप्त आवृत्ति तयार केली. मुळांतलें सर्व तेज आणि सौंदर्य ह्यांना कुठेंहि धक्का न लागेल अशीच ह्या संक्षिप्तीकरणांत श्री. पटवर्धन ह्यांनीं सावधगिरी बाळगली आहे.

भारताच्या स्वातंत्र्येतिहासांतील हें ऊर्जस्वल काव्य तरुण विद्यार्थ्यांच्या हृदयांत स्वातंत्र्यप्रीतीचा आणि देशभक्तीचा अंगार सदैव फुलवो !

प्रल्हाद केशव अत्रे

संक्षिप्त

# सत्तावनचें स्वातंत्र्य-समर

## (INDIAN WAR OF INDEPENDENCE)

'ज्ञानेश्वरीनंतर अितक्या तोलाचें पुस्तक मराठी वाङ्मयांत दुसरें नाहीं' असें ज्याचें यथार्थ वर्णन आचार्य अत्रे यांनीं केलें आहे तें पुस्तक म्हणजे **स्वातंत्र्यवीर सावरकरलिखित 'सत्तावनचें स्वातंत्र्य-समर'** हें होय.

मूळ पुस्तक मराठींत लिहिलें असतांहि, प्रचारासाठीं व परदेशांत छापण्याच्या सोयीसाठीं त्याचें अिंग्रजींत भाषांतर करण्यांत आलें. स्वातंत्र्याची ज्वलज्जहाल भावना चेतविणाऱ्या या प्रक्षोभक पुस्तकावर अर्थातच अिंग्रजी राजवटींत बंदी घालण्यांत आली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या क्रांतिगीतेवरील बंदी अुठली. परंतु त्या वेळीं मूळ मराठी हस्तलिखितच नष्ट झाल्याचें आढळलें. त्यामुळें स्वा. वी. सावरकराच्या अिच्छेवरून त्या अिंग्रजी भाषांतरावरून मराठी भाषांतर करण्याचें काम मीं पत्करलें. भाषांतर स्वतः सावरकर व साहित्यसम्राट् कै. केळकर आदि मान्यवर साहित्यिकांनाहि आवडल्यामुळें माझ्या भाषांतराच्या श्रमांचें साफल्य झालेंसें मला वाटतें.

अितिहासाच्या कसोटीस अुतरलेल्या व साहित्यिक सौंदर्यानें नटलेल्या या असामान्य ग्रंथाचा परिचय शालेय विद्यार्थ्यांना करून देतां आल्यास पहावा या हेतूनें या सहाशें पानांच्या प्रचंड ग्रंथाची अेक संक्षिप्त आवृत्ति बनविण्याचा मीं संकल्प केला व कामास लागलों.

मोठ्या पुस्तकांतील भाषा प्रौढ, संस्कृतप्रचुर आणि पल्लेदार असल्यामुळें विषयाचा ओघ कायम ठेवून त्यांतील ओज व आवेश शक्य तो तसाच राखून सोपे शब्द व छोटीं वाक्यें योजून या आवृत्तीचें लेखन केलें आहे. त्याच-प्रमाणें मूळ ग्रंथांतील सुदीर्घ व सूक्ष्म विवेचन व अन्य तपशीलहि गाळून टाकून अितिहास-सूत्र व त्याची फलश्रुति यांचा धागा मात्र अतूट राखला आहे.

साहित्य व अितिहास यांचा अपूर्व संगम ज्यांत पहावयास मिळतो, असें हें

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामावर स्वतः स्वातंत्र्यसंग्रामांत भाग घेणाऱ्या स्वातंत्र्य-वीरानें लिहिलेलें पुस्तक, म्हणजे स्वतंत्र भारतांतील विद्यार्थ्यांना अेक सदैवचें स्फूर्तिस्थानच होअून राहण्यासारखे आहे!

त्या दृष्टीनें ही **शालेय संक्षिप्त आवृत्ति** विद्यार्थी-जगतांत लोकप्रिय होअील अशी आशा आहे.

पुणें
दि. १०-९-५४

**विश्वनाथ वि. पटवर्धन**
भाषांतरकार व संक्षिप्त आवृत्तीचे संपादक

# अनुक्रमणिका


कृतज्ञ समर्पण ... ... ... ... ...

प्रस्तावना ... ... ... ... ...

अनुक्रमणिका ... ... ... ... ...

प्रथम खंड–ज्वालामुखी

प्रकरण १ लें स्वधर्म आणि स्वराज्य ... ... १९

,, २ रें नानासाहेब आणि लक्ष्मीबाऑी ... ... २४

,, ३ रें आगींत तेल ... ... ... ... ३०

,, ४ थें चेतवा तें यज्ञकुंड ... ... ... ३७

,, ५ वें गुप्त संघटना ... ... ... ... ४०

द्वितीय खंड–प्रस्फोट

प्रकरण १ लें हुतात्मा मंगल पांडे ... ... ... ५३

,, २ रें दिल्ली ... ... ... ... ५९

,, ३ रें बनारस आणि अलाहाबाद ... ... ७०

,, ४ थें कानपूर आणि झाशी ... ... ... ७६

,, ५ वें अयोध्या ... ... ... ... ८३

तृतीय खंड–अग्निप्रलय

प्रकरण १ लें दिल्लीचा संग्राम ... ... ... ... ९३

,, २ रें बिहार ... ... ... ... १०१

प्रकरण ३ रें लखनौ ... ... ... ... ११०

,, ४ थें तात्या टोपे ... ... ... ... ११८

,, ५ वें कुमारसिंह आणि अमरसिंह ... ... १२६

,, ६ वें राणी लक्ष्मीबाऑी ... ... ... १३४

चतुर्थ खंड–तात्पुरती शांतता

प्रकरण १ लें विहंगमावलोकन ... ... ... १४५

,, २ रें पूर्णाहुति ... ... ... ... १५२

परिशिष्ट : सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराचा कालपट ... ... १५७

# १

# ज्वालामुखी

"हिंदुस्थानचा हा जागृत ज्वालामुखी आतां धगधगूं लागला आहे. लाव्हाचे भयानक लोट आतां त्याचे अुदरांत रसरसूं लागले आहेत. स्फोटक रसायनांचीं भयानक मिश्रणें अस्तित्वांत येत आहेत; नि स्वातंत्र्यप्रेमाचा अग्निस्फुलिंग त्यावर कोसळून पडत आहे. जुलमी राजसत्ते! अजून वेळ गेली नाहीं तोंपर्यंत याचा विचार कर!

"आणि यामध्यें जर तिळमात्र चालढकल केली जाअील तर हे अुद्दट आणि पीडक राजसत्ते! तुला ज्वालामुखीसारखा धगधगणारा सूड म्हणजे काय असतो याची कल्पना प्रस्फोटाच्या प्रचंड धक्क्यांनींच आणून दिली जाअील हें निश्चित!"

# १ स्वधर्म आणि स्वराज्य

कितीहि जरी लहानसें घर बांधावयाचें झालें तरी त्याचें बांधकाम पक्क्या पायावरच अुभारावें लागतें, ही अगदीं अेखाद्या खेडवळालासुद्धां कळणारी साधी गोष्ट आहे. परंतु ५७ च्या क्रांतीच्या भव्य मंदिराची अुभारणी मात्र पोंचट आणि काडतुसाच्या सारख्या फुसक्या कारणाच्या आधारावर झाली होती, असें दडपून सांगणारे अितिहासकार हे अेक मूर्ख, नाहीं तर ढोंगी तरी असले पाहिजेत. खरा अितिहास लिहिण्यास असले लोक मुळींच अुपयोगाचे नाहींत.

जगांत घडलेल्या मोठमोठ्या धार्मिक नि राजकीय क्रांत्यांच्या बुडाशीं असलेलीं खरीं कारणें प्रथमतः समजून घेतलीं पाहिजेत. क्रांतिकालांत घडून येणाऱ्या थरारक प्रसंगांनीं मन कितीहि दिपलें तरी, क्रांतीच्या खऱ्या गाभ्याचें दर्शन घ्यावयाचें असेल तर क्रांतीच्या मागील अनेक गुप्त कारणांचा आपणांला शोध घेतला पाहिजे. अर्थात् या कारणांचा शोध करतांना त्यांची गल्लत करून चालणार नाहीं. नाहीं तर, दुय्यम कारणांनाच प्रमुख कारणें समजण्याची चूक होअून खरें सत्य आपणांला समजणारच नाहीं. केवळ क्रांतींतील प्रसंगांचीं वर्णनें चितारणें व अेखाद्या फालतू कारणाचा त्यांच्याशीं संबंध जोडून देणें हें सर्वस्वीं अैतिहासिक सत्याला सोडून होअील.

सर्वांच्या हृदयास शल्यासारख्या खुपणाऱ्या दारुण दुःखाच्या किंवा असंतोषाच्या पोटींच क्रांति जन्म घेते. आणि तसें असतें म्हणूनच हजारों माणसें आपलें स्वतःचें रक्त सांडण्यास आनंदानें पुढें सरसावतात. राजमुकुटांचा चुराडा होतो, सिंहासनें नि राज्यें कोलमडून पडतात, आणि अेक नवें वारेंच जनतेच्या अंतःकरणाची, अशा क्रांतिकालांत पकड घेतें. ज्या मानानें क्रांतीच्या मागें असलेलें तत्त्व कल्याणकारक किंवा हानिकारक असेल त्या मानानें क्रांति ही पवित्र किंवा अपवित्र ठरत असते. म्हणून क्रांतीचा अितिहास लिहावयाचा म्हणजे तिच्या मागील हेतु, ती घडविणाऱ्या लोकांच्या मनांतील भावना, अित्यादींचा विचार करूनच त्या क्रांतींत घडलेल्या घटनांचें मूल्यमापन करणें अवश्य ठरतें.

परंतु अशा प्रकारच्या शास्त्रीय भूमिकेला धरून अेकाहि देशी किंवा विदेशी लेखकानें ५७ च्या प्रचंड क्रांतीचा अितिहास लिहिलेला नाहीं. आणि म्हणून तिजविषयीं अतिशय विक्षिप्त, चुकीच्या आणि अन्याय्य समजुती जगभर रूढ होअून बसल्या आहेत. अिंग्रज अितिहासकारांनीं जाणूनबुजून पक्षपातीपणानें आणि दुष्ट बुद्धीनेंच ह्या क्रांतीचा अितिहास लिहिलेला आहे.

अेखाद्या लहानश्या खेड्यांतला बाजारहि कांहीं हेतु असल्यावांचून भरत नाहीं! मग ज्या बाजाराचीं दुकानें पेशावरपासून कलकत्त्यापर्यंत पसरलेल्या रण-भूमीवर हारीनें थाटून राहिलीं होतीं; जेथें राज्यें आणि साम्राज्यें यांचा विक्रा मांडला होता व जेथील चलनी नाणें हें केवळ रक्तच होतें तो प्रचंड बाजार अुगीचच कांहीं कारणावांचून भरला आणि मोडला हें शक्य तरी आहे का?

चरबी माखलेलीं काडतुसें हेंच या क्रांतीमागील खरें मुख्य कारण असें अट्टाहासानें सांगण्याचा प्रयत्न अिंग्रज अितिहासकारांनीं आणि त्यांच्या लाळ-घोट्या हिंदी लेखकांनीं केलेला आढळतो. आतां केवळ काडतुसांमुळें क्रांति घडली म्हणावी, तर मग श्रीमंत नानासाहेब, झांशीची राणी, दिल्लीचा बाद-शाह हे क्रांतिनेते तिला कसे मिळाले? हे कांहीं अिंग्रजांच्या सैन्यांत कधीं केव्हां शिपाअीहि नव्हते आणि म्हणून, तीं काडतुसें तोडण्याची त्यांच्यावर कधीं सक्तीहि झालेली नव्हती! बरें, पुढें गव्हर्नर-जनरलनें तीं बंद करण्याचें आश्वासन दिल्यानंतरहि, सैन्यांतल्या नोकरीलाच रामराम ठोकण्याचें सोडून, शिपाअी अेकदम इंग्रजी सत्तेशीं लढाअीचेंच आव्हान देअून कां अुठले? शिपाअीच काय, पण सैन्याशीं ज्यांचा मुळींच संबंध नव्हता असे लक्षावधि शांतताप्रिय नागरिक, राजे आणि महाराजे अुठले! अयोध्या प्रांत खालसा केला म्हणून क्रांतीनें पेट घेतला हें म्हणणेंहि काडतुसाच्या कारणाप्रमाणेंच खोटें आहे, कारण हीं दोन्हीहि अगदीं वरवरचीं अशींच कारणें होतीं!

५७ च्या क्रांतीच्या बुडाशीं असलेलीं खरीं दोन मूलभूत तत्त्वें म्हणजे **स्वधर्म आणि स्वराज्य** हीं होत. अितिहासकालापासून हिंदुस्थानच्या सुपुत्रांच्या हाडींमासींच स्वधर्माचें नि स्वराज्याचें प्रेम खोलखोल रुजलेलें दिसून येअील. दिल्लीच्या सिंहासनावरून घोषणा करून बादशहानें लोकांना त्या वेळीं सांगितलें

कीं, "शत्रूचा नायनाट अुडवून आपल्या प्राणापेक्षांहि प्रिय असलेल्या स्वधर्माला आणि स्वदेशाला भयापासून सोडवूं या."

**देशाचें नि धर्माचें रक्षण या स्वच्छ, स्पष्ट आणि स्फूर्तिदायी घोषणेंतच ५७ च्या प्रचंड क्रांतीचें बीज सांपडतें.** स्वधर्माची आमची कल्पना ही स्वराज्याच्या कल्पनेशीं मुळींच विरोधी नाहीं. स्वधर्मावांचून स्वराज्य हें जसें कवडीकिमतीचें आणि तुच्छ, त्याचप्रमाणें स्वराज्यावांचून स्वधर्म हाहि तसाच दुबळा आणि पंगु!

कुठें गेली ती सुवर्णभूमींतील संपत्ति? कुठें गेला तो स्वदेश? कुठें लोपली ती स्वसत्ता आणि स्वराज्य?—पारतंत्र्याच्या प्लेगामध्यें हें स्वर्गीय स्वातंत्र्य मृतप्राय होअून गेलेलें दिसत होतें.

## 'धर्माकरितां अुठा, नि स्वराज्य संपादा!'

हिंदुस्थानच्या अितिहासात या तत्त्वामुळें घडून आलेले किती तरी महान् प्रसंग आपणांला सांपडतील. संत कवि रामदासांनीं २५० वर्षांपूर्वी हाच मंत्र राष्ट्राला दिला. "**धर्माकरितां मरावें। मरोनि अवघ्यासि मारावें। मारितां मारितां घ्यावें। राज्य आपुलें॥**" ५७ च्या क्रांतीमागे हेंच तत्त्व होतें. तिच्यामागचें मानसशास्त्र तें हेंच!

जस्टिस मॅकार्थी ह्या इंग्रज ग्रंथकारानें लिहिलें आहे: "५७ ची अुठावणी हें अेक केवळ सैन्यांतील बंड होतें असें नाहीं, तर त्यामध्यें सैन्यांतील असंतोष, राष्ट्रीय द्वेष आणि येथील अिंग्रजी राज्याविरुद्धचा धर्मनिष्ठ पिसाट सूड यांचा मिलाफ झालेला होता. आणि म्हणूनच या सैन्यांतल्या बंडाला खऱ्याखुऱ्या अर्थानें **धार्मिक नि राष्ट्रीय युद्धाचें स्वरूप** प्राप्त झालें."

बरोबर १०० वर्षांपूर्वीच म्हणजे अि. स. १७५७ लाच प्लासीच्या रणांगणावर या क्रांतियुद्धाचें बीज पेरलें गेलें होतें. प्लासीच्या विजयापासून वॉरन हेस्टिंग्ज, वेलस्ली अित्यादींनीं वाढते अन्याय आणि जुलूम करून लोकांच्या असंतोषांत भरच घातली. ज्या हिंदी सैन्याच्या जोरावर त्यांनीं हा देश जिंकून घेतला होता त्या सैनिका-शिपायांनाहि अिंग्रजांनीं नीट वागविलें नाहीं; मग बक्षिसें, वतनें देण्याचें तर लांबच! १८०६ तली वेलोरची बंडाळी ही सत्तावनच्या क्रांतियुद्धाची लहानशा प्रमाणांत छोटी आवृत्तीच होती.

अि. स. १७५७ च्या प्लासीच्या सूडाची, १८५७ मध्यें शंभर वर्षें लवकरच पुरीं होणार या जाणिवेनें लोकांमध्यें एक विलक्षण आशेचा किरण तळपला, आणि प्रत्यक्ष अिंग्रजांच्या सैन्यांतील शिपाअीच आपापल्यांत रागानें आणि द्वेषानें जळूं लागले. याच वेळीं व्हाअिसरॉयच्या पदावर डलहौसीची नेमणूक झालेली होती. परंतु तिचाहि कांहीं अुपयोग नव्हता. हिंदुस्थानभर आतां अेकच प्रश्न विचारण्यांत येत होता कीं, कंपनीची राजवट येथें राहावीच काय म्हणून? डलहौसीच्या जुल्मी राज्यकारभारामुळें तर लोकांचीं अंतःकरणें खोलवर जळत गेल्यावांचून राहिलीं नाहींत.

रणजितसिंहाच्या मृत्यूनंतर शीखांशीं युद्ध करून त्यांना कपटानें जिंकल्यावर डलहौसीनें पंजाब प्रांत खालसा केला, आणि रणजितसिंहाचा मुलगा धुलिपसिंह यास लंडनमध्यें नेअून ठेवून त्यास भिकाऱ्याप्रमाणें जीवन कंठावयास लावलें! ब्रह्मदेशाशींहि प्रेमाचे संबंध जोडण्याचें नाटक करून तोहि भाग त्यानें ब्रिटिश साम्राज्याला जोडून टाकला. हिमालयापासून रामेश्वरापर्यंत आणि सिंधूपासून अिरावतीपर्यंत भारताच्या मानचित्रावर सगळीकडे ब्रिटिशांचा तांबडा रंग फासला गेला. पण डलहौसी! लवकरच सगळीकडे याहिपेक्षां लालभडक भीषण रंग पसरणार आहे याचें तुला मुळींच कसें भय वाटत नाहीं?

नुसता पंजाबचा प्रदेश हाच पन्नास हजार चौरस मैल असून त्याची लोकसंख्या चार दशलक्षांवर आहे. असला प्रदेश जिंकून रावणाची हावसुद्धां शांत झाली असती. पण पंजाबच्या जोडीला ब्रह्मदेश गिळूनहि डलहौसीची भूक भागली नाहीं. आतां त्याची दृष्टि साताऱ्याकडे वळली.

साताऱ्याच्या मोडकळीस आलेल्या गादीखालीं एक वैभवशाली हिंदु साम्राज्य गाडलेलें होतें. म्हणून केवळ राज्य बळकवावें या हेतूनें नव्हे, तर साताऱ्याच्या याच समाधींतून कोणी हिंदु वीर पुन्हा प्रकट होईल नि आपण केलेल्या अन्यायाचा सूड घेईल या भीतीनें डलहौसीनें साताऱ्ची गादीच नष्ट करण्याचें ठरविलें; आणि महाराजांना स्वतःचा पुत्र नाहीं म्हणून १८४८ च्या एप्रिलमध्यें महाराज मरण पावतांच, त्यानें साताऱ्ची गादी खालसा करून टाकली. खेड्यांतल्या साध्या शेतकऱ्याची झोंपडीहि त्याला मूलबाळ नाहीं म्हणून सरकार काढून घेत नाहीं! अुलट ती त्याच्या वारस असलेल्या नातेवाअिकांनाच मिळत

असते. आणि या ठिकाणीं साताऱ्याची गादी ही कांहीं शेतकऱ्यांची मामुली झोंपडी नव्हती, तर अुलट अिंग्रजी सत्तेचा ती 'मित्र' होती.

महाराष्ट्रा! पहा! ज्या सिंहासनावर श्रीशिवराय आरूढ झाले होते त्याच पराक्रमी सिंहासनाचे डलहौसीनें तुकडे तुकडे केले! आतां अर्ज-विनंत्यांचा कांहींहि अुपयोग नाहीं. रंगो बापूजींच्या लंडनच्या वारींतहि आतां कांहीं अर्थ नाहीं.

नागपूरकर भोसले वयाच्या ४७ व्या वर्षी अेकाअेकीं वारले. लागलीच डलहौसीनें १८५३ मध्यें नागपूर प्रांतहि खालसा केला. कारण काय, तर रघूजी राजानें दत्तक घेतलेला नव्हता! नागपूरच्या राजांनीं दत्तक नाहीं घेतला म्हणून, तर सातारकर छत्रपतींनीं तो घेतला म्हणून, दोघांचींहि राज्यें अिंग्रजांनीं घशांत टाकलीं. येथें तर्कशास्त्रहि पंगु पडतें तें असें!

,नागपूरचा प्रदेश ७६,८३२ चौ. मैलांचा असून त्याचें अुत्पन्न पन्नास लक्ष रुपयांचें होतें. नागपूरकरांच्या राजवाड्यांत घुसून अिंग्रजांनीं तर नुसता प्रळय मांडला. राजांचे हत्ती, घोडे, दागदागिने, जडजवाहीर लुटून कवडीमोलानें बाजारामध्यें लिलावांत फुंकून टाकण्यांत आलें. राजघराण्यांतल्या स्त्रिया ढसढसा रडत होत्या. याच अपमानांत नि दुःखांत महाराणी (विधवा राजमाता) अन्नपूर्णाबाअी मरण पावली. परंतु राणी बंका हिनें मात्र फिरंग्यांशीं 'एकनिष्ठ आणि राजनिष्ठ' राहून स्वतःच्या मुलांचा आणि प्रजेचा द्रोह साधला. पापिणी बंका!

♣ ♣ ♣

# २ नानासाहेब आणि लक्ष्मीबाअी

वाचक हो! अुठा आणि मोठ्या आदरानें या वीरांचें स्वागत करा. कारण नानासाहेब पेशवे आणि झांशीची राणी या दोन तेजस्वी व्यक्ति आतां अितिहासाच्या रंगभूमीवर प्रवेश करीत आहेत! स्वतःचा देश, स्वतःचा धर्म आणि स्वतःचें राज्य यांकरितां आपल्या प्राणांचें बलिदान करणारे हेच ते दोन वीर हुतात्मे! श्रीशिवरायांना जन्म देणाऱ्या हिंदुभूमीचें रक्त अजून मेलें नाहीं हें जगाला सिद्ध करून दाखविणारे हेच ते हातांत समशेरी घेअून येत असलेले दोन वीर! हिंदमातेच्या गळ्यांत अतिशय खुलून दिसणारे हेच ते दोन पाणीदार मोती!

सृष्टिसौंदर्यानें नटलेल्या माथेरानच्या डोंगराळ प्रदेशांत वेणू नांवाचें अेक छोटें खेडेगांव आहे. त्या ठिकाणीं माधवराव नारायण भट यांचें अत्यंत घरंदाज नि सच्छील कुटुंब राहात होतें. १८२४ मध्यें माधवरावांची पत्नी गंगाबाअी हिला जें पुत्ररत्न झालें तें म्हणजेच श्रीमंत नानासाहेब पेशवे!

याच सुमारास शेवटला बाजीराव आपलें पेशवाअीचें राज्य गमावून ब्रह्मावर्तास आयुष्य कंठीत होता. त्याच्याकडे आश्रयासाठीं येथून राहण्यास गेलेल्या कुटुंबांमध्यें माधवराव भटांचेंहि कुटुंब होतें. त्यांच्या या लहान बालकाचा, म्हणजे नानाचा, सर्वांना आणि मुख्य म्हणजे बाजीरावालाच जास्त लळा लागला, आणि शेवटीं ७ जून १८२७ या दिवशीं बाजीरावानें त्याला दत्तकहि घेतलें. मराठी साम्राज्याच्या पेशवेपदाचा वारसा मिळणें ही फारच मोठी भाग्याची गोष्ट!

परंतु नाना! हे चिमण्या राजपुत्रा! तुजवर आतां केवढी जोखीम येअून पडली आहे याची कल्पना आहे का तुला? पेशव्यांच्या सिंहासनाचा वारस होणें म्हणजे त्या सिंहासनाचा मान टिकवून त्याचें सतत रक्षण करणें हाच त्याचा अर्थ आहे! अेक तर पेशव्यांच्या या गादीवर विजयाचा मुकुट तरी विराजमान झाला पाहिजे नाहीं तर चितोडच्या राजपूत स्त्रियांप्रमाणें ही गादी भडकलेल्या चितेंत वैभवानें जळून खाक तरी झाली पाहिजे! तिचा शेवट व्हावयाचाच असेल तर

तिच्या प्रारंभाप्रमाणें लढत लढतच व्हावा व अितिहासानेंहि मोठ्या अभिमानानें सांगावें कीं, ज्या गादीला पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ हा लाभला त्याच गादीचा शेवटचा वारसहि नानासाहेब हाच होता!

काशी क्षेत्रांत चिमाजीआप्पा पेशवे यांच्या पदरीं मोरोपंत तांबे नि त्यांची भागीरथीबाअी यांचें कुटुंब होतें. १८३५ मध्यें भागीरथीबाअीनें वीरकन्या राणी लक्ष्मीला जन्म दिला. लक्ष्मीबाअीचें लहानपणचें नांव मनूबाअी असें होतें. पुढें हें कुटुंब ब्रह्मावर्तास बाजीरावाच्या पदरीं येअून राहिलें. तांब्यांची तीन चार वर्षांची मनूबाअी सर्वांची आवडती झाली नि ते तिला 'छबेली' म्हणून ओळखूं लागले.

राजकुमार नानासाहेब आणि अल्लड छबेली!

नानासाहेब आणि रावसाहेब (नानासाहेबाचा चुलत भाअू) हे दोघे जेव्हां आपल्या गुरुजींच्या हाताखालीं धडे गिरवीत तेव्हां छबेलीहि ते लक्षपूर्वक पाहात असे; आणि अशीच ती चुकत माकत वाचावयालाहि शिकली. नाना आणि छबेली कधीं हत्तीवर बसण्याचेंहि शिक्षण घेत, तर कमरेला तरवारी लटकावून तीं दोघे घोडा फेकण्याचाहि अभ्यास करीत. या वेळीं नाना १८ वर्षांचा आणि लक्ष्मी ७ वर्षांची होती. या वेळीं ब्रह्मावर्तास ५७ च्या क्रांतियुद्धांतील तीन महत्त्वाच्या व्यक्ति वाढत होत्या. त्या म्हणजे नानासाहेब, लक्ष्मीबाअी आणि तात्या टोपे. असें सांगतात कीं, प्रत्येक भाअूबीजेला नाना आणि लक्ष्मी, हीं दोघें अैतिहासिक बहीणभावंडें ओवाळणीचा समारंभ साजरा करीत.

सोन्याच्या तबकांत निरांजनें लावून आपल्या हातांनीं नानाला ओवाळणाऱ्या त्या मोहक पण तेजस्वी छबेलीचें चित्र सहजच आपल्या डोळयांपुढें नाचूं लागतें. आपण सर्वच भाअू नि बहिणी आहोत; प्रत्येक क्षण हा आपल्याला दिव्य भाअू-बीजेप्रमाणें आहे. लक्ष्मीबाअी नानासाहेबाला आरति ओवाळीत आहे, अशा प्रकारचे दिव्य प्रसंग अितर राष्ट्राच्या अितिहासांत क्वचित् सांपडतील! हे भारतमाते, जोपर्यंत असलीं बहीणभावंडें तुझ्या कुशींत जन्म घेत आहेत तोंपर्यंत तुला कळिकाळाचेंहि भय नाहीं; तोंपर्यंत तुझ्याकडे वाकड्या डोळयानें पाहण्याचें सामर्थ्य कुणातहि नाहीं.

आणि तसा दुष्ट प्रयत्न जर कोणीं केला तर लक्षांत ठेव कीं, हा कानपूरचा

भाअू आणि त्याची ती झांशीची बहीण हीं दोघें फिरून तो भाअूबीजेचा सण चालू करतील !

१८४२ मध्यें झांशीच्या गंगाधरराव बाबासाहेब महाराजांशीं छबेलीचा विवाह करण्यांत आला आणि अशा रीतीनें ती झांशीची '**महाराणी लक्ष्मीबाअी**' झाली.

१८५१ मध्यें दुसरा बाजीराव मरण पावला. परंतु त्याच्याकरितां शोकाचा अेकहि अश्रु ढाळण्याचें आपणांला काम नाहीं. कारण १८१८ त स्वतःचें राज्य बुडवून, हा पेशवे घराण्याचा कुलकलंक, दुसऱ्यांचीं राज्यें बुडविण्यास साहाय्य देत जगत होता. इंग्रजांचें पंजाबच्या शीखांशीं युद्ध चालू झालें त्या वेळीं, या बाजीनें स्वतःच्या पदराला चाट लावून इंग्रजांना अेक हजार घोडदळ आणि अेक हजार पायदळ देअून साहाय्य केलें. स्वतःच्या शनिवारवाड्याच्या रक्षणाला याजजवळ सैन्य नव्हतें पण गुरु गोविंदसिंहाची पवित्र भूमि भ्रष्टविण्यास मात्र याला सैन्य मिळालें.

दुर्दैवी राष्ट्रा, मराठ्यांनीं शीखांचें राज्य घ्यावें आणि शीखांनीं मराठ्यांचें घ्यावें—आणि हें सर्व कशासाठीं? तर दोघांच्या प्रेतांवर अिंग्रजांनीं आनदानें नाचावें म्हणून! बरें झालें! हा स्वदेशद्रोही बाजी ५७ पूर्वीच आटपला!

बाजीरावाच्या मृत्युपत्राप्रमाणें, वारस म्हणून पेशवाअीचे सर्व अधिकार जरी नानाकडे येणेंच अुचित होतें तरी आठ लाख रुपयांच्या पेन्शनशीं आतां त्याचा कांहींहि संबंध नसल्याचें अिंग्रजांनीं त्यास कळविलें. त्यासरशीं त्यानें कंपनीला अेक रोखठोक पत्र लिहून सांगितलें कीं, "कंपनीचें हें वर्तन सर्वस्वीं अन्यायाचें आणि थिल्लरपणाचें आहे. बाजीरावसाहेबांनीं जें आपलें राज्य सोडून दिलें त्याच्या बदल्यामध्यें ही पेन्शन मिळत होती. पेन्शन बंद होणार असेल तर राज्य तरी तुमच्या हातांत कसें राहूं शकेल?" या सर्व गोष्टींचा निर्णय लावून घेण्यासाठीं नानासाहेबानें आपला विश्वासू मंत्री अझीमुल्लाखान यास अिंग्लंडला पाठविलें.

५७ च्या क्रांतीच्या संबंधांत अझीमुल्लाखानाचें नांव अधिक लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अझीमुल्लाचा जन्म अगदीं गरिबींत झाला. स्वतःच्या गुणांच्या जोरावर तो हळूहळू पुढें आला आणि शेवटीं नानासाहेबाचा विश्वासू मंत्री झाला.

त्याचा चेहरा अुमदा असून दिसावयासहि तो चांगला रुबाबदार होता. अिंग्रजांच्या रीतिरिवाजांची त्याला चांगलीच माहिती असल्यामुळें लंडनच्या लोकांत तो चांगलाच लोकप्रिय झाला. परंतु ज्या कामासाठीं तो अिंग्लंडला गेला त्यांत मात्र त्याला यश आलें नाहीं. अीस्ट अिंडिया कंपनीच्या तेथील डायरेक्टरांनीं (चालकांनीं) त्यास कळविलें कीं, "बापाच्या पेन्शनींत बाजीरावाचा कांहीं अधिकार पोंचत नसल्याचें, गव्हर्नर-जनरलप्रमाणें आमचेंहि मत आहे." याच वेळीं सातारकरांचे प्रतिनिधि म्हणून आलेले रंगो बापूजी हेहि तेथेंच आलेले होते. अर्ज-विनंत्या नि प्रार्थना करून जें पदरांत पडत नाहीं तें कोणत्या अुपायानें मिळवावें याच विचारानें त्या दोघांनाहि घेरलें होतें.

श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचा विवाह सांगलीकर महाराजांच्या मामेबहिणीशीं झाला होता. बाजीराव वारल्यानंतरहि नानासाहेब ब्रह्मावर्तालाच राहात होते. ब्रह्मावर्त हें नगर फारच सुंदर नि प्रेक्षणीय होतें. त्यामध्यें नानांच्या राजवाड्याची शोभा तर काय वर्णावी? सर्व वैभव आणि सर्व विलास तेथें नांदावयास आले होते. नानाला घोड्यांची आवड फार होती आणि असें म्हणतात कीं, अश्वविद्येमध्यें लक्ष्मीबाअी किंवा नानासाहेब यांचा हात धरणारा त्या वेळीं कोणीहि नव्हता. त्याचें प्राणिसंग्रहालयहि फार मोठें होतें.

तरी पण या सर्वांपेक्षां युद्धाचीं विविध प्रकारचीं असंख्य हत्यारें सांठविलेल्या आपल्या शस्त्रागाराचाच त्यास जास्त अभिमान वाटे.

राजवाड्यांत राजसभेच्या ठिकाणीं (दरबारांत), छत्रपति श्रीशिवराय, पहिले बाजीराव, पानिपतचे भाअू, माधवराव, नाना फडणवीस यांचीं भव्य चित्रें टांगण्यांत आलीं होतीं. या चित्रांकडे पाहून नानाच्या मनांत कोणत्या भावना अुसळून येत असतील बरें? साम्राज्याची पेन्शन शत्रूकडे अर्ज-विनंत्या करून मागत बसणें ही त्याच्या मनाला अत्यंत अपमानकारक गोष्ट वाटली असली पाहिजे. परंतु त्याजबरोबर हेंहि खरें कीं, शिवरायांच्या अितिहासानें आणि स्मरणानें त्याच्या मनांत सूडाचा अग्नि मात्र निःसंशय पेटूं लागला होता.

नाना हा मनाचा अत्यंत मानी होता. त्याची अंगकाठी थोडीशी स्थूल होती. त्याचे डोळे वाघासारखे गरगर फिरणारे आणि अतिशय तेजस्वी होते. आपल्या अुदारपणानें त्यानें प्रजेचेंहि प्रेम संपादन केलें होतें; अितकेंच नव्हे तर,

शत्रु असलेल्या अिंग्रजांशींहि तो मोठ्या औदार्यानें वागत असे. कानपूरचे किती तरी गोरे अधिकारी ब्रह्मावर्तास भेट देत व परत जातांना नानाकडून अुंची शाली, मौल्यवान मोतीं आणि रत्नें देणग्या म्हणून घेऊन जात. परंतु जोंपर्यंत नानाच्या वाड्यांत मेजवान्या झोडतां येत होत्या तोंपर्यंत हे अिंग्लिश अधिकारी आणि त्यांच्या बायका नानाची, 'मित्र' म्हणून तोंडभर स्तुति करीत होते.

पण तोच नाना जेव्हां स्वदेशाकरितां आणि स्वराज्याकरितां हातीं तरवार घेऊन अुठला तेव्हां याच अिंग्लिशांनीं त्याजवर अत्यंत हीन आणि असभ्य आरोप केले, हें विसरून चालणार नाहीं.

श्रीमंत नाना हे चांगले शिकलेले आणि शिष्टाचारसंपन्न होते. राजकारण नि राजकीय घडामोडी यांत ते फार लक्ष घालीत. टॉड नावाच्या अिंग्रज माणसाकडून ते प्रत्येक दिवशीं दैनिक वर्तमानपत्रें वाचून घेत. अयोध्या प्रांत खालसा करण्यांत आला त्या वेळीं अिंग्रजांच्या या करण्यानें त्यांनीं युद्धालाच आमंत्रण दिलें आहे, असें नानांनीं आपलें स्पष्ट मत दिलें होतें.

निरुपाय म्हणून अगदीं कांहीं थोड्या प्रसंगीं अिंग्रज अितिहासकारांनीं जरी नानांच्या सद्‌गुणांची प्रशंसा केली असली तरी एकंदरींत, नानाला 'बदमाष', 'वाटमाऱ्या', 'राक्षस' अि. विशेषणें लावतांना अिंग्रजांच्या विषारी लेखणीला सैतानी आनंदाचे कढ येत असल्याचें दिसतें. परंतु श्रीमंत नानासाहेब आपल्या स्वदेशाकरितां लढले आणि रक्तांत न्हाअून निघाले, ही अेकच अेक गोष्ट हिंदवासीयांच्या अंतःकरणांत त्यांची स्मृति सदैव तेवत ठेवण्यास पुरेशी आहे.

हिंदुस्थानचें स्वातंत्र्य लुबाडून घेण्याचें पाप जे करतात त्यांचा आज नाहीं तर अुद्या, अुशिरां अथवा लवकर, पण भयंकर असा सूड घेतला जातो हें जगाला अेकदां माहिती व्हावयास पाहिजेच होतें.

नाना म्हणजे हिंदभूमीचा साक्षात् क्रोधच! नानांचें बळ भीमासारखें होतें. त्यांच्या डोक्यावर मुकुट शोभून दिसे. त्यांचे तेजस्वी डोळे दुखावलेल्या स्वाभिमानामुळें लालबुंद दिसत. शत्रूच्या रक्ताला चटावलेली तीन लाख रुपये किंमतीची तरवार त्यांच्या कमरेला लटकत असे. स्वराज्य आणि स्वधर्म यांचा सूड अुगवण्याच्या कठोर प्रतिज्ञेनें त्यांच्या चर्येत भयंकर क्रोधाची छटा अुमट-

लेली दिसे. नानांच्या अशा या भव्य आणि आकर्षक मूर्तीपुढें कोणाचें मस्तक आदरानें नमणार नाहीं ?

पेन्शनीवर काय, पण ब्रह्मावर्ताच्या राज्यावरहि नानाचा अधिकार पोंचत नाहीं असें अुद्धट उत्तर नानाला देतांना, कंपनीनें अशी शेखी मिरविली कीं, आपण हें सर्व न्यायाला धरून करीत आहोंत.

न्याय ? आतां यापुढें हा न्याय आहे कीं अन्याय आहे याचें अुत्तर देण्याच्या भरीस कंपनीनें पडूं नये ! आतां हा प्रश्न कानपूरच्या रणांगणावरच सोडविला जाअील ! हात, पाय, डोकीं अुडविलेलीं धडें आणि कबंधें व रक्ताचे वाहणारे पाट हेच या प्रश्नाचा निर्णय देतील ! हा ! आणि कानपूरच्या विहिरीवर बसलेलीं गिधाडें ही सर्व चर्चा अैकतील आणि हा न्याय कीं अन्याय याचें तींच उत्तर देतील !

न्याय कीं अन्याय? १८५३ मध्यें आपले पतिदेव मरण पावल्यावर राणी लक्ष्मीबाअीनें दामोदर यास दत्तक घेतलें. परंतु तिचा दत्तक घेण्याचा अधिकार धुडकावून अिंग्रजांनीं झांशी संस्थानच खालसा केलें. त्यासरशीं ती झांशीची बिजली कडाडली आणि क्रोधानें संतप्त होअून अिंग्रजाला तिनें अुत्तर दिलें, "काय झांशी सोडूं ?—मी नाहीं सोडणार ! ज्याला धाडस असेल त्यानें पहावाच अेकदां प्रयत्न करून !"—"मेरी झांशी नहीं दूंगी !"

♣ ♣ ♣

# ३ आगींत तेल

१७६४ मध्यें प्रथमतः अयोध्येच्या नबाबाचा आणि कंपनीचा संबंध आला. तेव्हांपासून अयोध्येचा हा सुपीक प्रांत घशांत टाकण्याचा प्रयत्न कंपनीचे हितचिंतक नोकर करीत होते. आपल्या रक्षणाकरितां अिंग्लिश सैन्यच ठेवलें पाहिजे अशी अट नबाबावर लादून अिंग्रजांनीं सैन्याचा वार्षिक पगार म्हणून त्याच्यापासून सोळा लक्ष रुपये लुबाडले. त्यामुळें नबाबाचा खजिनाच रिकामा होअून गेला. पुढें जेव्हां हा पगार देण्याला पैसाच पुरा पडेना तेव्हां अिंग्रजांनीं पगाराच्या पैशाचे बदल्यांत रोहिलखंड आणि दुआब हे वार्षिक दोन कोट रुपये अुत्पन्नाचे प्रांत त्याजकडून काढून घेतले. पुढें नबाब आपल्या प्रजेला नीट वागवत नाहीं या सबबीवर त्यांनीं नबाबाच्या राज्यकारभारांत ढवळाढवळ करण्याचें आरंभिलें.

१८४७ मध्यें वाजीद अल्लीशहा गादीवर आला. या नवीन नबाबानें पहिल्यानेंच ठरवून टाकलें कीं, आपल्या स्वराज्याचा नाश करणाऱ्या या गोऱ्या विषारी किडीचा समूळ नायनाट करून टाकावयाचा! व त्या दृष्टीनें त्यानें आपल्या सैन्यांत सुधारणा करण्याचें ठरविलें. आपल्या सैन्याकरितां त्यानें नवीन शिस्तीचे नियम घालून दिले. सर्वांना रोजची कवायत ठेविली. स्वतः नबाब आठवडयांतून अेकदां त्यांचें संचलन पाही. सैनिक शिस्त मोडणारास व कामांत ढिलाअी दाखविणारास योग्य तो दंड व शिक्षाहि त्यानें ठेविली होती. परंतु नबाबाच्या ह्या हालचाली अीस्ट अिंडिया कंपनीच्या डोळ्यावर तत्काळ आल्या आणि कंपनीनें अेक नवीनच टुमणें नबाबाच्या मागें लावलें. त्यामुळें नबाबाला आपला सैन्यवाढीचा बेत सोडून देअून स्वस्थ बसावें लागलें.

परंतु अेवढ्यानें कंपनीचें समाधान होणार नव्हतें. अयोध्येच्या अत्यंत सुपीक अशा प्रदेशावर कंपनी सरकारचा मुख्यतः डोळा होता. परंतु अयोध्या खालसा करण्याला नागपूर किंवा झांशीसारखा दत्तकाचा किंवा वारसाचा प्रश्नच येथें नव्हता. म्हणून नबाबाचा राज्यकारभार वाअीट असून त्यामुळें त्याची प्रजा असंतुष्ट असल्याचा बोभाटा करून व तेंच कारण दाखवून १८५६ मध्यें अिंग्रजांनीं

अयोध्या प्रांत खालसा करण्याची आज्ञा सोडली. खरें पाहतां, ही नसती अुठाठेव करण्याचा अिंग्रजांना मुळींच अधिकार नव्हता. शेजाऱ्यानें आपल्या घरांत अव्यवस्था माजविली, तर अेकाद्यानें त्याचेच हातपाय बांधून, त्याच्याच तोंडांत बोळा कोंबून, त्याचेंच घर जसें लुबाडून आपणच घ्यावें तसाच कांहींसा हा प्रकार होता. प्रजेचा असंतोष आणि वाअीट राज्यकारभार हींच कारणें पुढें करून जर अयोध्या प्रांत खालसा करतां येतो तर हींच कारणें देअून असेंहि म्हणतां येअील कीं, हिंदुस्थानावर अेक दिवसभरसुद्धां राज्य करण्याचा अधिकार अिंग्रजांना नाहीं!

शेवटीं, नबाबाची सत्ता लाथेनें ठोकरून ब्रिटिश सैन्यें लखनौमध्यें घुसलीं. त्याचा राजवाडा त्यांनीं लुटला. बेगमांची अब्रू घेण्यांत आली. नबाबालाहि सिंहासनावरून फेंकून देण्यांत येअून ब्रिटिश सोल्जरांना राहण्याकरितां त्याच्या राजवाड्याच्या बराकी बनविण्यांत आल्या. आणि अशा रीतीनें नबाबाच्या वाअीट (!) राज्यकारभाराचा शेवट होअून अिंग्रजांच्या रामराज्याला (!) प्रारंभ झाला. अयोध्येचा नबाब जरी मुसलमान होता तरी त्याचे मोठमोठे जमीनदार हे हिंदूच होते. या जमीनदारांजवळ थोडेंफार सैन्य व किल्लेकोटहि होते. त्यामुळें कंपनीची वक्र दृष्टि त्यांच्यावरहि वळली. त्यांच्या वहिवाटींतलीं खेडीं कंपनीनें काढून घेतलीं. त्यांच्या जमिनी जप्त करून टाकण्यांत आल्या. त्यामुळें अयोध्या प्रांतांत दुःखाची अेकच किंकाळी अुठली. कालचा अमीर आजचा फकीर होअून बसला. सगळीकडेच अपमान नि दारिद्र्य यांना अूत आला आणि अेकूण अेक घरंदाज कुटुंबें धुळीस मिळविण्यांत आलीं. अयोध्येच्या नबाबापासून तों थेट साध्या खेडुतापर्यंत प्रत्येकजण भाजून निघाला होता.

मात्र हें सर्व आपण नबाबाच्या रयतेच्या कल्याणाकरितांच करीत आहों, असा अिंग्रजांचा अट्टाहासानें प्रचार चालूच होता.

या वेळीं स्वराज्य आणि परक्यांचें राज्य यांत किती अंतर असतें याची भेसूर आणि स्पष्ट कल्पना अयोध्येच्या लोकांना आली. त्यांची खात्री होअून चुकली कीं, असल्या पारतंत्र्यापेक्षां मरणसुद्धां पत्करलें. पारतंत्र्य हेंच मुळीं विषारी माशांचें मोहोळ आहे. तें जोंपर्यंत येथें आहे तोंपर्यंत डलहौसीसारखी अेखादी माशी आपल्या विषारी डंखांनीं आपणाला डसत राहणारच. तेव्हां डलहौसी-

सारखी अेखादी माशी मारून कांहीं अुपयोग नाहीं. म्हणून तें सबंध मोहोळच्या मोहोळच अुखडून, त्याचा चुराडा करून टाकण्याचा त्यांनीं निश्चय केला आणि स्वराज्य परत मिळविण्यासाठीं अयोध्येनें हातीं शिर घेऊन रणांगणांत अुडी घेतली !

अयोध्येप्रमाणें अितर प्रांतांतहि अिनाम कमिशनचा वरवंटा फिरवून, जमीनदार नि वतनदार यांचा पुरा नायनाट करण्याचा सपाटा अिंग्रजांनीं चालविला होता. दहा वर्षांच्या कालांत या इनाम कमिशननें अेकंदर ३५००० मोठमोठ्या जहागिरी व अिनामांची चौकशी केली व त्यांपैकीं सुमारें २१००० अुत्पन्नें बळकावून घेतलीं. त्यामुळें राजे-महाराजांचीं सिंहासनें, सरदारांचीं वतनें, जमीनदारांचीं अुत्पन्नें, तालुकदारांचे तालुके, नागरिकाचीं घरेंदारें— सर्वच्या सर्व नष्ट होअून गेलीं. जगणेंसुद्धां धोक्याचें होअून बसलें.

स्वराज्य आणि परकीय सत्ता, स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य, यांतील ढळढळीत विरोध मोठ्या भेसूरपणें लोकांपुढें अुभा राहिला. अशा स्थितींत किड्यामुंगी-प्रमाणें जगण्यापेक्षां माणुसकीला शोभेल असा मरणाचा मार्ग पत्करावा असें प्रत्येकाला वाटूं लागलें.

**स्वातंत्र्याचा सर्वोच्च विकास हाच परमेश्वर आणि स्वातंत्र्याचा संपूर्ण अभाव हीच गुलामगिरी.** गुलामगिरी हा सरळ नरकास नेअून सोडणारा मार्ग आहे. तर खरा धर्म हें स्वर्ग मिळविण्याचें अचूक साधन आहे. गुलामगिरींत खरा धर्मच जिवंत राहूं शकत नाहीं. म्हणून, स्वर्गाच्या मार्गानें जावयाचें असेल तर पहिल्यानें गुलामगिरीच्या बेड्या तोडून टाकल्या पाहिजेत.

श्री समर्थ रामदासांनीं शिवरायाला सांगितलेला हाच खडखडीत व्यावहारिक वेदांत आहे. धर्माचें रक्षण करण्यासाठीं प्रथम ‘ मारितां मारितां घ्यावें राज्य आपुलें ’ ह्या अडीचशें वर्षांपूर्वी समर्थांनीं दिलेल्या महामंत्राचे पडसाद १८५७ मध्यें जनतेच्या अंतःकरणांत अुठूं लागले.

हिंदुस्थानांत पाअूल ठेवल्या दिवसापासून तों १८५७ च्या क्रांतियुद्धापर्यंत हिंदुमुसल्मानांच्या धर्मांना चिरडून टाकण्याचा पद्धतशीर आणि सतत प्रयत्न फिरंगी अिंग्रजांनीं चालविला होता. आफ्रिका आणि अमेरिका येथील रानटी शिद्द्यांना ख्रिस्ती करण्यांत त्यांना चांगलेंच यश मिळाल्यामुळें, हिंदुस्थानांतहि थोड्याच

दिवसांत ख्रिस्ताचा क्रॉस फडकूं लागेल अशी आशा त्यांना वाटूं लागली. अि. स. १८३६ मध्यें जेव्हां बंगाल्यांत अिंग्रजी शिक्षणाच्या शाळा नव्यानेंच चालू करण्यांत आल्या तेव्हां मेकॉलेनेंच असें बोलून दाखविलें होतें कीं, पुढील ३० वर्षांत बंगालमध्यें अेकहि मूर्तिपूजक नांवालाहि अुरणार नाहीं. हिंदुस्थानांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याचा अट्टाहास अीस्ट अिंडिया कंपनीनें अशाचसाठीं चालविला होता कीं, अेकदां का येथील धर्म नाहींसे झाले, म्हणजे त्याबरोबर येथील राष्ट्रीय भावनाहि मरून जाअील; आणि मग अशा स्वत्व मेलेल्या राष्ट्रावर राज्य करणें सोपे जाअील.

थोडक्यांत म्हणजे मिशनऱ्यांच्या या धर्मप्रसारामागें दुष्ट राजकीय हेतूच मुख्यतः होता. औरंगजेबाच्या अितिहासावरून अिंग्लंड पुष्कळ शहाणपण शिकलें होतें. जिकलेल्या राष्ट्राचा धर्मच नाहींसा केल्यानें त्याच्यावर राज्य करणें सोपें जातें ह्या औरंगजेबाच्या शहाणपणाचें त्यांनीं अनुकरण केलें; परंतु अुघड अुघड धार्मिक छळ करण्याच्या त्याच्या चुकीच्या धोरणाचें अनुकरण मात्र त्यांनीं केलें नाहीं.

देवस्थानांना आणि दर्ग्यांना पूर्वीच्या राजांनीं दिलेली अिनामें, अुत्पन्नें अिंग्रजांनीं काढून घेतलीं. धर्माच्या पाठीशीं असलेलें राजसत्तेचें संरक्षण नाहींसें होताच हिंदु आणि मुसलमान या दोघांच्याहि छळाला प्रारंभ झाला. हिंदु-मुसलमानाना हीदन (Heathen) म्हणजे दगडधोंडे पुजणारे जंगली अशा अर्थाची शिवी अिंग्रजांनीं सर्रास रूढच केलेली होती.

सती जाण्याची प्रथा अिंग्रजांनीं बंद केल्यापासूनच अिंग्रजांच्या पापी धोरणाचा संशय लोकांना येअूं लागला. पुढें विधवाविवाहाचा म्हणजेच पुनर्विवाहाचा निर्बंध (कायदा) मान्य करून घेण्यांत आला. पुढें अनेक बायका करण्याच्या प्रथेला बंदी करण्याचा प्रयत्न स्वतः कॅनिंगनेंच चालविला. त्यामुळें सरकारचें धर्मावरचें आक्रमण कोठें थांबतें हेंच लोकांना कळेना. सरकारचे हे नवे निर्बंध चागले कीं वाअीट हा लोकांपुढें प्रश्नच नव्हता. ते म्हणत, "जो काय बदल करावयाचा तो आमच्यांतील विद्वान् पंडित बसवून आम्ही करून घेअूं. परकीय धर्माच्या सरकारला यांत सक्तीनें हात घालण्याचा मुळींचर अधिका नाहीं. तसें असेल तर औरंगजेबाच्या आणि अिंग्रजाच्या जुलमी राज्यांत फरक तो कुठें राहिला?"

आणि जेव्हां अिंग्लिशांनीं औरंगजेबाची भूमिका घेतल्याचें स्पष्ट झालें तेव्हां हिंदुस्थानालाहि शिवाजी किंवा गुरु गोविंद निर्माण करण्यावांचून गत्यंतर अुरलें नाहीं !

मिशनऱ्यांच्या शाळांना सरकारकडून हजारों रुपये देणग्यांच्या रूपानें दिले जात. खिस्ती धर्मगुरु आणि पाद्री यांचेहि लठ्ठलठ्ठ पगार हिंदुस्थानच्या पैशांतून दिले जात. सरकारी नोकरींतील अगदीं वरच्या अधिकाऱ्यापासून तों अगदीं पाद्यापर्यंत, हें लोकांना बाटविण्याचें वेड अितकें फैलावलें होतें कीं, प्रत्येक वरचा गोरा अधिकारी आपल्या हाताखालच्या 'काळ्या' नोकराला खिस्ती होण्याची सक्ति करी. पुढें हें बाटविण्याचें बंड सैन्यांतील शिपायांपर्यंत येअून पोंचलें. ह्या सैन्यांतील कर्नल, कॅप्टन हे स्वतः शिपायांचे कान फुंकीत बसत. त्यांत हिंदु-मुसलमान धर्मांची निंदा आणि त्यांसंबंधीं शिवीगाळहि असे. प्रभु रामचंद्र आणि महम्मद यांच्या नांवानें हे खिश्चन मिशनरी अगदीं गाळी व शिव्यांची लाखोली मोजीत. अेखाद्या शिपायानें संतापून विरोध दाखविला कीं, त्याची तूपरोटी तोडण्यांत येअी. बाटग्या शिपायाला मात्र हवालदारी मिळून त्याचबरोबर पगारांतहि त्यास वाढ मिळे.

आणि त्यामुळें हिंदुमुसलमानांच्या अंतःकरणांत फिरंगी अिंग्रजाविषयीं भयंकर द्वेष धुमसूं लागला. एक अिंग्रज लेखक लिहितो : "अेक मुसलमान मौलवी मरावयास टेकला असतां 'तुझी शेवटची अिच्छा काय' असें मीं त्याला विचारतांच तो दुःखी होअून मला म्हणाला कीं, सबंध आयुष्यांत दोन फिरंग्यांनाहि मी ठार मारूं शकलों नाहीं याचें मला मरतांना वाअीट वाटत आहे!" अेका विद्वान् हिंदु पंडितानें तर एका अिंग्रजाच्या तोंडावर सांगितलें कीं, "तुम्ही येथून केव्हां जाल आणि आमचें पूर्वीचें स्वराज्य येथें केव्हां चालू होअील असें आम्हांला झालें आहे."

लोकांच्या या भयंकर असंतोषाच्या आगींत जणुं तेल ओतण्याकरितांच कीं काय, सरकारनें नवीन प्रकारचीं काडतुसें वापरण्याची सैनिकांना सक्ति केली. कलकत्त्याजवळ डमडम येथें असलेल्या छावणींतील अेक ब्राह्मण आपला लोटा भरून घेअून छावणीकडे चालला असतां अेका भंग्यानें त्या लोट्यांतील पाणी पिण्यासाठीं मागितलें. तेव्हां ब्राह्मणानें आपला लोटा विटाळेल असें त्यास

सांगितलें. त्यावर भंगी म्हणाला, "महाराज, आतां तो जातीचा अभिमान गुंडाळून ठेवा. यापुढें तुम्हांला गाअीचें मांस आणि डुकराची चरबी स्वतःच्या हातांनीं तोंडांत घालण्याचा प्रसंग येणार आहे. ह्या नव्या आलेल्या काडतुसांनाच हे पदार्थ लावलेले आहेत!" हे शब्द कानीं पडतांच तो ब्राह्मण शिपाअी भुतानें झपाटल्याप्रमाणें छावणीकडे धावतच सुटला! ही नवीन खळबळ उडविणारी बातमी कानांवर येतांच सर्व शिपाअी क्रोधानें जणुं वेडे झाले, आणि सगळीकडे अेकच भीतिदायक कुजबूज चालू झाली. शिपायांच्या मनानें घेतलें कीं, आपला धर्म भ्रष्टविण्याकरितांच सरकारनें हीं नवीं काडतुसें दिलीं आहेत. पण सरकारनें तें सर्व साफ खोटें असल्याचें प्रकट केलें.

हें सर्व खोटें होतें तर ही अफवा पसरली तरी कशी? काडतुसें कशाचीं बनविलीं होतीं, त्यांना काय लावलें होतें, हें सरकारला चांगलें माहीत होतें. ज्या ठिकाणीं हीं काडतुसें बनविलीं जात होतीं तेथें काम करणाऱ्या खालच्या जातीच्या लोकांकडून ही माहिती प्रथम बाहेर फुटली व बराकपूरच्या शिपायांनीं ही बातमी साऱ्या देशभर पसरविली. सरकार कितीहि खोटें बोललें तरी काडतुसांकरितां चरबी पुरविणाऱ्या ठेकेदारानेंच आपल्या करारांत 'आपण गाअीचीच चरबी पुरवूं' असें लिहून दिलें होतें; व ही चरबी दोन आणे पौंडप्रमाणेंच पुरविली पाहिजे अशी सरकारचीहि त्याला अट होती. इतकें असूनसुद्धां काडतुसाविषयीं सर्व गोष्टी खोट्या आहेत व प्रत्येक शिपायानें तीं दांतांनीं तोडलींच पाहिजेत व तीं नाहीं तोडलीं तर त्यास शासन दिलें जाअील असें सरकारनें शिपायांना खडखडीतपणें बजावलेंच.

परंतु या धमकावण्यांना भीक न घालतां कोणत्याहि परिस्थितीला तोंड द्यावयाचा शिपायांनीं निर्धार केला होता. तेव्हां सरकारनें थोडीशी माघार घेअून चरबी लावलेल्या जागीं कागद देअून तो वापरावयास मोकळीक दिली. पण आतां शिपायांचा सरकारवरचा विश्वासच अुडाला होता. त्यांना वाटलें कीं त्या कागदालाहि कांहीं वाअीट पदार्थ सरकार लावणार नाहीं म्हणून कशावरून? काडतुसाच्या विरोधाची ही चळवळ जानेवारीच्या प्रारंभांत चालू झाली व महिना संपण्याच्या आधींच सरकारला पडतें घ्यावें लागून त्यानें, सैनिकांनीं स्वतः बनविलेलीं काडतुसें वापरण्यास मुभा दिली. वरील प्रकारचीं काडतुसें

नाकारण्यांत अेके ठिकाणीं शिपायांनीं जरा हट्टीपणा दाखविला तेव्हां त्या सबंधच्या सबंध तुकडीलाच कडक शिक्षा करण्यांत आली होती.

तेव्हां शिपायांना कळून चुकलें कीं, या सर्व आपत्तीचें मूळ कारण असलेली जी गुलामगिरी तिचाच नाश केल्यावांचून आपणाला आतां स्वस्थता मिळणार नाहीं. पारतंत्र्यांत पिचणाऱ्या किड्यांना कसला आला आहे धर्म ?

**धर्माची पहिली खूण म्हणजे स्वतंत्र राष्ट्राचा स्वतंत्र मनुष्य होणें हीच होय !**

म्हणून 'धर्माकरितां मरावें' ह्या समर्थाच्या संदेशाच्या अर्थाचा मंत्र हृदयांत गुणगुणत हिंदुस्थानांतील प्रत्येक सैनिक स्वराज्य आणि स्वधर्म याकरितां युद्ध करण्यासाठीं आपली तरवार परजूं लागला.

♣ ♣ ♣

# ४ चेतवा तें यज्ञकुंड

म्हणून आतां भारतवीरांनो! आपलें राजकीय स्वातंत्र्य परत हिसकवून घेण्यासाठीं, हातीं तरवार घेअून भीषण युद्धालाच अुभे राहणें यावांचून दुसरा मार्गच राहिलेला दिसत नाहीं. त्याकरितां प्रथमतः आपणाला अग्निनारायणाला प्रसन्न करून घेण्याची त्वरा केली पाहिजे.

अग्नीनें प्रसन्न होअून आपणाला अजिंक्य रथ द्यावा म्हणून अिंद्रजितानेंहि पूर्वी असाच अेक यज्ञ केला होता. पण अिंद्रजिताचें अुद्दिष्टच मुळीं राक्षसी नि पापी असल्यामुळें त्यांत त्याला यश आलें नाहीं. परंतु आपलें ध्येय अत्यंत न्याय्य आणि पवित्र असल्यामुळें आपल्या कार्यात विघ्नें येण्याची भीतीच नको.

आपण ज्याला सत्य म्हणतों तें मुळांत कितीहि न्याय्य आणि पवित्र असलें तरी त्याला योग्य त्या शक्तिसामर्थ्याची जोड दिल्यावांचून तें विजयी ठरतेंच असें नाहीं; तरीसुद्धां आपलें सर्व बळ अेकवटून त्या सत्याकरितां झुंजणें हासुद्धां अेक अत्यत अुच्च असा वीरानंदच आहे.

मग आतां चेतवा तें यज्ञकुंड !

या यज्ञाच्या वेदीवर प्रथम विराट् असें यज्ञकुंड खणून काढा. पहा, त्या राष्ट्रीय क्रोधाच्या ज्वाळा त्यांतून अुफाळूं लागल्या. या यज्ञाचा संकल्प आपण पूर्वीच म्हणजे १७५७ मध्येंच सोडून ठेवलेला आहे. तरी आतां या यज्ञांतील पहिल्या आहुतीचा मान म्हणून त्या प्लासीच्या रणभूमीला देअून द्या ढकलून तिला या यज्ञकुंडांत!

कुठें आहे तो पंजाबचा कोहिनूर? कोहिनुराच्या मूळ धन्यापासून—गुरु गोविंदसिंहाच्या शीख वीरांपासून—डलहौसीनें त्यास आधींच लुबाडून आणून आपणाला साहाय्य केलें आहे. हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वाचें अेकमेव प्रतीक होअून राहिलेल्या या हिऱ्यावांचून दुसरी कोणती आहुति ह्या अग्नीला अधिक चेतवील?

म्हणून ढकला तो पंजाबचा कोहिनूरहि आंत!

यानंतरची आहुति ब्रह्मदेशाची! त्याकरितां तेथील थीब्रा राजाला पदच्युत करून, हाकलून देऊन, या धडधडणाऱ्या अग्निकुंडांत द्या तें ब्रह्मदेशाचें राज्यहि आतां फेकून!

तिकडचें तें प्रत्यक्ष शिवाजीचेंच असलेलें सिंहासन तुम्ही कसें विसरलां? साताऱ्याला, तें तिकडे तसेंच सडत ठेवण्यांत काय अर्थ आहे? म्हणून हे दयाळू आंग्लसत्ते! सातारच्या गादीवरील राजपुरुषांना मातींत लोटून देअून (जेथें ते सुखानें राज्य करतील) ये घेअून तें मराठ्यांचें सिंहासन! राष्ट्रीय क्रोधाचा अग्नि अधिकाधिक भडकून अुठावा म्हणून पहिलेपणाचा मान असलेलें तें साताऱ्याचें सिंहासनहि द्या ढकलून आंत!

नागपूरच्या विधवा राण्या, हत्ती-घोडे, जडजवाहीर इतकेंच नव्हे तर त्या राण्यांच्या भेसूर विलाप-किंकाळ्या ह्या साऱ्यांसहित नागपूरची गादीहि द्या ढकलून या धगधगत्या यज्ञकुंडांत!

त्या पहा! आकाशाला चाटणाऱ्या ज्वाळा अेकमेकींवर झेपावूं लागल्या. त्या आणखीहि अुंच झेपावूं लागण्यासाठीं, ढकला ती झांशीची बिजलीहि आंत!

यज्ञकुंडांत धडधडणाऱ्या अग्नीच्या पोटांत केवढी प्रचंड खळबळ आणि अुलथापालथ माजून राहिली आहे याची कल्पना आणून देणारी भयंकर घरघर तुम्हांला अैकूं येत नाहीं का? निःसंशय, कोणती तरी भयंकर क्रांति आंत जन्म पावत असली पाहिजे. म्हणून तत्काळ भडकणारे असे हातीं येतील ते ते ज्वालाग्राही पदार्थ, द्या टाकून या अग्नीच्या मुखांत!

हां! आटपा! ढकला त्या अर्काटच्या नबाबाला आत! तंजावरची गादीहि जाअूं द्या आंत! जमीनदार, तालुकदार, जहागिरदार, वतनदार या आपल्या मागें 'दार' लावणाऱ्या सर्वांना 'नादार' करून व त्यांचीं सर्व वतनें नि अुत्पन्नें काढून घेअून ढकला त्यांनाहि आंत! ढकला! ढकला!!

आणि आतां डमडमची पाळी आली पहा! तेव्हां शत्रूंनो व मित्रांनो, हिंदुस्थानांत सांपडतील तीं सर्व लक्षावधि नवीं कोरीं काडतुसें आणा; तीं गाअीच्या रक्तानें माखून त्यांना डुकराच्या चरबींत चांगलें रटरटून शिजवा आणि द्या तीं सारीं फेकून या वखवखलेल्या अग्नीच्या जबड्यांत.

आतां मात्र ज्वाळा शिगेला पोंचल्या!

आणि त्याच ज्वाळांवर ती भयानक काली प्रकट होत आहे पहा. देवते! तुला सहस्रवार वंदन! चंडिके! ज्या तुझ्या तांडव नृत्यांत जुलमी आणि अन्यायी सत्ता जळून खाक होत आहेत, ज्या तुझ्या हातींच्या घणानें पार-तंत्र्याच्या बेड्या तटातट तुटत आहेत, देश स्वतंत्र होत आहेत आणि ज्या तुझ्या सहस्रावधि वळवळणाऱ्या जिभा रणभूमींतील रक्त पिण्यास तहानेलेल्या आहेत, त्या हे देवते, तुला वंदन असो! आमच्या पूजा-प्रार्थनेचा स्वीकार कर, प्रसन्न हो!

देवते, आमच्या तरवारीला आणखी तिखट धार देऊन तूं आम्हांला विजयाचा वर देशील का?

* * *

"विजयाचें जरी नाहीं तरी सूडाचें वरदान मी तुम्हांला देईनच देईन!"

सूड! होय सूड! अन्यायी सत्तेला पायबंद घालणारा सूड! याच निसर्गाच्या नियमाला—म्हणजेच सूडाला—जुलमी राजसत्ता मृत्यूला घाबरावें त्याप्रमाणें घाबरते आणि या दैवी शिक्षेतच पुढें उगवणाऱ्या विजयाचीं बीजें सांठवून ठेवलेलीं असतात.

♣ ♣ ♣

# ५ गुप्त संघटना

सातारकरांचे प्रतिनिधि रंगो बापूजी व नानासाहेबांचा प्रतिनिधि अझीमुल्ला-खान हे दोघेहि लंडनला गेल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. त्यांच्या तेथील एकंदर कार्यक्रमावरून एवढें निश्चित सांगतां येतें कीं, या दोघांनीं लंडन-मध्यें बसून क्रांतीच्या अुठावणीची रूपरेषा आंखली होती. लंडनहून निघून रंगो बापूजी तडक साताऱ्याला गेले. परंतु मनांत योजलेल्या स्वातंत्र्ययुद्धास युरोपांतील कोणकोणते देश प्रत्यक्ष साहाय्य किंवा निदान किती सहानुभूति देतात याचा अंदाज घेण्यासाठीं अझीमुल्लाखानानें युरोपखंडभर प्रवास केला. तुर्कस्थानच्या सुलतानालाहि त्यानें भेट दिली. पुढें तो रशियांतहि गेला. कारण याच वेळीं सेबॅस्टपूल येथें रशियानें अिंग्लंडला चांगला मार दिला होता. तेव्हां आशियामध्यें अिंग्लंडविरुद्ध अेखादी आघाडी रशिया अुघडतो कीं काय हेंहि त्यास अजमावावयाचें होतें. हिंदुस्थानांत तर अुघड अुघड लोक बोलूं लागले होते कीं, रशियाचा झार आपल्या सैन्यासह फिरंग्याबरोबर युद्ध करणार आहे. रशियाला भेट देअून आल्यावर अझीमुल्लानें अीजिप्तबरोबर कांहीं गुप्त संधान बांधलें असावें असें वाटतें.

त्यानंतर तो परत ब्रह्मावर्ताला आला. या वेळीं ब्रह्मावर्ताला क्रांतीचे सर्व पुढारी गोळा झाले होते. त्यामुळें ब्रह्मावर्ताच्या राजवाड्यांतील सर्व वातावरणच अेकदम पालटलें.

मराठ्यांचा जरीपटका आजवर मातीमोल होअून पडला होता. पेशव्यांचीं रणवाद्यें सुतकी सूर काढीत असलेलीं दिसत; आणि पेशव्यांची राजमुद्रा स्वतःच वैधव्यांत मोहोरबंद होअून पडली होती. परंतु आतां सर्वत्र अेक निराळेंच वारें खेळूं लागलें. मराठ्यांचा जरीपटका पुन्हा नवतेजानें डोलूं लागला. मराठ्यांचीं रणवाद्यें युद्धाचें संगीत घुमवूं लागलीं आणि पेशव्यांची राजमुद्रा पारतंत्र्याचा शाप पुसून टाकण्यास अुतावळी झालेली दिसली.

नानांच्या डोळ्यांतहि अेक नवीनच तेज विलसूं लागलें. 'तस्मात् युद्धाय युज्यस्व'— 'अूठ, लढाअीला अुभा राहा'—हा श्रीकृष्णानें अर्जुनाला दिलेला

मंत्र ब्रह्मावर्ताच्या कोनाकोपऱ्यांत दुमदुमून राहिला.

अुभा देश नानाच्या डोळ्यांपुढें अुभा राहिला. हिंदुस्थानच्या देशबांधवांची हलाखीची परिस्थिति आणि पिळवणूक, त्यांत पुन्हा स्वधर्मावर होत असलेलें परक्यांचें आक्रमण या सर्व गोष्टींचा विचार करून 'अेक तरवारच या सर्व गोष्टींवर योग्य तो अुपाय आहे ' असा त्यानें आपल्या मनाशीं निर्णय घेतला.

म्हणून पहिल्यानें हातांत तरवार घेअून अिंग्रजाला घालवून द्यावयाचें नि आपलें स्वातंत्र्य मिळवावयाचें, आणि नतर हिंदुस्थानातील सर्वसत्ताधीश संस्थानिक राजेमहाराजांची अेक संघटित अशी मध्यवर्ती सत्ता निर्माण करावयाची अशी नानाची योजना होती.

हिंदुस्थान म्हणजे हिंदु आणि मुसलमान या दोघांचेंहि राष्ट्र अशीच नानाची भावना होती. ज्या वेळीं मुसलमान हे येथें राज्यकर्ते म्हणून मिरवत होते, त्या वेळीं ' आम्ही तुमचे भाअू , तुम्ही-आम्ही अेकत्र नांदूं ' असें जर हिंदु त्यांना म्हणाले असते, तर तो दुबळेपणाच समजला गेला असता. आणि म्हणून त्या वेळीं मुसलमानांना शत्रूच मानणें योग्य होतें. परंतु त्या मोंगलांच्या सत्तेचा पुरा पराभव पंजाबमध्यें गुरुगोविंदांनीं, राजपुतान्यांत राणा प्रतापनें, बुंदेल-खंडांत छत्रसालानें आणि दिल्लींत मराठ्यांनीं तर त्या मोंगली सिंहासनावर प्रत्यक्ष बसून त्याचा घणानें चुराडा करून शतकाच्या झुंजीनंतर केला होता. हिंदु-पदपादशाहीनें मोंगलाच्या बादशाहीला पार धुळीस मिळविलें होतें. अशा वेळीं हिंदूंनीं मुसलमानांना मित्र म्हणून समजणें हें मुळींच लाचारीचें किंवा अपमान-कारक नव्हतें. अुलट त्यांत हिंदूचाच मोठेपणा होता.

म्हणून आतां हिंदुमुसलमानांतील वैर संपविण्यांत आलें. आतां ते राज्य-कर्ते व हिंदु हे त्यांची गुलाम प्रजा असले संबंध मुळांतच नाहींसे झाल्या-कारणानें, फक्त धर्माची गोष्ट सोडल्यास, हिंदु आणि मुसलमान हे भाअूभाअूच मानले जाअूं लागले. आणि म्हणून ५७ च्या या क्रांतींत नानासाहेब, कुंवारसिंह, बहाद्दुरशाह, मौलवी अहमदशाह, खान बहाद्दुरखान हे सर्व हिंदु-मुसलमान पुढारी अेका स्वदेशाच्या झेंड्याखालीं गोळा झाले. स्वातंत्र्याकरितां प्रथम सर्वांनीं खांद्याला खांदा लावून लढावयाचें व स्वातंत्र्य मिळतांच सर्वांनीं मिळून सर्वांचें असें एक संयुक्त हिंदी संघराज्य स्थापावयाचें हीच दृष्टि त्या वेळीं होती.

आतां हें ध्येय साध्य करून घेण्यासाठीं दोन गोष्टी करावयास पाहिजे होत्या. अेक म्हणजे सबंध देशभर अिंग्रजी राज्याविरुद्ध लोकांत विचारजागृति करावयाची व दुसरी म्हणजे अेकाच वेळीं हिंदुस्थानांत सगळीकडे क्रांतीची अुठावणी करण्याची जुळणी करावयाची. अर्थात् हें सर्व अत्यंत गुप्तपणें करावयाचें असल्यानें ब्रह्मावर्ताला अेक गुप्त संघटना स्थापण्यांत आली.

१८५६ च्या थोडें आधीं लोकांमध्यें गुप्त प्रचार करण्यासाठीं सबंध हिंदुस्थानभर नानानें आपले दूत पाठविले होते. दिल्लीपासून म्हैसूरपर्यंतच्या सर्व संस्थानिकांकडेहि त्यानें आपले निवडक लोक पाठवून क्रांतीमध्यें त्यांनींहि भाग घ्यावा अशा अर्थाचीं त्यांना पत्रेंहि लिहिलीं होतीं. संस्थानें खालसा करून हिंदुस्थानला अत्यंत हीन स्थितीला पोंचविण्याचा अिंग्रजांचा दुष्ट हेतु त्यानें याच पत्रांतून स्पष्ट करून मांडला होता. कोल्हापूर, पटवर्धनी संस्थानें, अयोध्येचा नबाब, बुंदेलखंडचे राजे, म्हैसूरकर अित्यादि अनेकांकडे अशा प्रकारचीं पत्रें गेल्याचा पुरावा मिळतो. प्रथमतः नानांच्या पत्रांचीं कोणी परत अुत्तरें पाठवीत नव्हतें. पण अयोध्या खालसा होतांच नानानें ठिकठिकाणीं पत्रांचा असा वर्षाव केला कीं अनेकांना त्याचें म्हणणें पटूं लागलें.

पुढें काडतुसाचें कारण मिळालें. लोक बिथरले. आणि मग काय ? नानाकडे पत्रांचा नुसता लोंढा लागून राहिला.

अिंग्रजांनीं दिल्लीच्या बादशाहाची नुसती बादशाहीच काढून घेतली होती असें नाहीं, तर त्याच्या वंशाची ‘ बादशाह ’ ही पदवीसुद्धां काढून घेण्याचें त्यांनीं ठरविलें. तेव्हां अेवींतेवीं मरायचेंच असेल तर दिल्लीच्या बादशाहाला आणि त्याच्या बेगमेला शोभेल अशा वैभवशाली मरणानें तरी मरावें असा निर्धार बादशाह बहाद्दुरशाहा आणि त्याची बेगम झिन्नत महाल या दोघांनीं केला. क्रांतीच्या संबंधांत बादशाहानें अिराणशींहि कांहीं सूत जोडलें होतें.

याच वेळीं दिल्लीमध्यें भिंतीभिंतीवर अुघड अुघड पत्रकें चिकटविण्यांत येअूं लागलीं. “ हिंदुस्थान स्वतंत्र करण्यास सर्वांनीं अिंग्रज फिरंग्यांशीं लढण्यास पुढें या ” हीच हाक त्या पत्रकांमधून असे. हिंदुस्थानी वर्तमानपत्रांतूनहि लोकांना प्रोत्साहन देणारे पण गुप्त भाषेंत लिहिलेले लेख प्रसिद्ध होत होते.

लोकांमध्यें अिंग्रजांविषयींचा द्वेष किती वाढत होता हें पुढील अुदाहरणावरून लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

राजा जवानबख्तच्या घोडे फिरविण्याच्या माळावर सार्जंट फ्लेमिंगचा मुलगा सहा वर्षेपर्यंत घोडा फिरवायला येअी. परंतु १८५७ च्या अेप्रिलमध्यें हाच जवानबख्त त्या अिंग्लिश पोराच्या तोंडावर थुंकला आणि म्हणाला, "येथें पाअूलसुद्धां घालूं नको. फिरंग्याचें तोंड पाहिलें कीं माझें रक्त नुसतें अुसळून येतें !"

अिंग्रजी राज्याविषयींचा असंतोष दिवसेंदिवस अितका वाढला कीं, दिल्लीच्या राजवाड्याच्या काटे दरवाज्यांत बसून मोगल नि अितर लोक अुठावणीचा खल करूं लागले.

लखनौचा नबाब आणि त्याचा वजीर अलीनख्खीखान हे कलकत्त्याजवळ जरी स्थानबद्ध होते तरी तेथूनहि ते अिंग्रजांविरुद्धच्या कटाच्या अवाढव्य आणि धाडसी योजना अगदीं गुप्तपणें आंखीत होते. शिपायांमध्यें अिंग्रजांच्या विरुद्ध असंतोष पेटविण्याकरितां फकिरांचे आणि संन्याशांचे वेष घेअून त्यांनीं धाडलेले क्रांतीचे प्रचारक काम करीत होते. हे प्रचारक शिपायांना कंपनीच्या नोकरीपेक्षां स्वराज्य कितीतरी पट कसें श्रेष्ठ आहे हें पटवून देत व अिंग्रजांनीं ह्या देश पोखरण्याचे नीच प्रयत्न कसे चालविले आहेत याचीहि स्पष्ट कल्पना देत. त्यामुळें शिपाअी खवळून जात व शेवटीं गंगेचें पाणी हातांत घेऊन किंवा कुराणावर हात ठेवून "जिवांत जीव असेपर्यंत अिंग्रजी सत्तेचा चुराडा करण्याचें ध्येय ठेवून वागूं" अशा प्रतिज्ञा घेत. अशा रीतीनें सुभेदार, सुभेदार-मेजर, जमादार हे वरचे अधिकारीच शपथबद्ध झाले कीं सबंध तुकडीच शपथ घेअून क्रांतीच्या बाजूला येअून मिळे!

या क्रांतियुद्धाची जुळणी अितक्या काळजीपूर्वक आणि जपून करण्यांत येत होती कीं, प्रत्यक्ष धडाका अुडून पेट घेअीपर्यंत धूर्त म्हणविणाऱ्या अिंग्रजांनाहि तिचा अेवढासुद्धां थांगपत्ता लागला नाहीं. जेव्हां हे प्रचारक फकीर आणि संन्यासी गांवामध्यें येत तेव्हां गांवामध्यें अेकदम असंतोषाची साथ पसरे. भिस्ती (पाणके) 'साहेबा'ला पाणीच देण्याचें बंद करीत. न कळवितांच अिंग्रज घरांतील 'अय्या' (मुलें घेणाऱ्या दाया) अेकाअेकीं निघून जात. 'बबर्जी' लोक 'मेमसाहिबाला' धुडकावून लावून चालूं लागत, तर हिंदी

चपराशी मुलें आपल्या साहेबांचीच थट्टा अुडवून पळून जात.

प्रत्येक सैन्यांत धार्मिक प्रसंगांकरितां अेक पंडित व अेक मुल्ला ठेवण्याची सरकारी पद्धत असे. ही गोष्ट ओळखून क्रांतीचे किती तरी प्रचारक पंडित व मुल्ला बनून सैन्यात नोकरीला राहिले. रात्र पडतांच आपली क्रांतीची पोथी ते शिपायांपुढें गुप्तपणें सोडीत. मोठमोठ्या तीर्थक्षेत्रांत, जेथें हजारो यात्रेकरू जमत असत तेथेंहि हा प्रचार चाले. गंगेच्या स्नानाच्या संकल्पाबरोबर हे क्रांतीचे प्रचारक बनलेले भटजी क्रांतीचाहि संकल्प सागतांना दिसत. काशींतील मंदिरांतून क्रांतीला यश मिळावें म्हणून सार्वजनिक प्रार्थनाहि होअूं लागल्या.

सर्वसाधारण जनतेनें अुठावणींत भाग घ्यावा म्हणून अगदीं साध्या आणि सोप्या भाषेंत तमाशे आणि कीर्तनें यांमधूनहि क्रांतीचा प्रचार चालू होता. यमपुरीच्या खेळांतल्या बाहुल्याहि क्रांतीचीच भाषा बोलूं लागल्या. लावण्या-पोवाड्याचे फड, झाडाखाली, चावड्यांपुढें, चौकाचौकातून झडूं लागले व त्या-मधूनहि अेक नवीनच संदेश लोकापर्यंत पोचू लागला. वीरश्रीचा संचार करणारें 'अल्ला अुदल' हें गीत तर अुत्तर हिंदुस्थानात फारच लोकप्रिय झालें होतें.

स्त्रियांमध्यें प्रचार करण्यासाठीं क्रांतिकारकांनीं वेगळयाच युक्तया काढल्या. वैदू, बहुरूपी आणि जादूटोणा करणाऱ्या व ज्योतिष सागणाऱ्या त्यांच्या भटक्या बायका यांच्याकडून स्त्रियामध्यें क्रांतीचें वारें पसरूं लागलें. हे बहुरूपी, अिंग्रजी सत्तेचा नाश लौकरच होणार आहे असें भविष्य वर्तवीत व गुलामगिरीच्या चेटकावर प्रत्यक्ष अुठावणी हाच तोडगा सुचवीत. अशा रीतीनें तीर्थक्षेत्रांत, मंदिरांत, अुत्सवयात्राप्रसंगीं शिपाई सैनिक, नागरिक जनता, स्त्रिया आणि पुरुष या सर्वांमध्ये नाटकें, तमाशे, कीर्तनें करूनहि क्रांतीचा प्रचार केला जात होता.

याच सुमाराला भावी आशेचा तारा चमकावा त्याप्रमाणें सर्व देशभर अेक भविष्यवाणी लोकांमध्यें पसरून राहिली होती. हिंदुस्थानचे अंतःकरण स्वराज्याकरितां झुरूं लागतांच या भविष्याभाकितातूनहि स्वराज्याचा अुल्लेख येअूं लागला. काशीपासून रामेश्वरापर्यंत जो तो बोलूं लागला कीं, "फार पूर्वी अेक्या पुरातन ऋषीनें असें भविष्य केलें आहे कीं, राज्य स्थापन झाल्या-पासून बरोबर शंभर वर्षांनीं फिरंगी राज्य बुडणार!" हिंदुस्थानांतील वर्तमान-पत्रांतूनहि या भविष्यवाणीला प्रसिद्धि देअून असें सूचित केलें जात होतें कीं,

"कंपनीच्या राज्याचीं आतां २३ जून १८५७ ला पुरीं शंभर वर्षें भरणार आहेत!" १८५७ हें वर्ष खरोखरच अिंग्रजी राज्याचें आणि प्लासीच्या लढाईचें शंभरावें वर्ष होतें. त्यामुळें कंपनीचें राज्य आतां नक्की बुडणार अशी प्रत्येकाची खात्री होअून चुकली. आणि त्याला धरूनच ही भविष्यवाणी खरी करून दाखविण्याच्या प्रयत्नास प्रत्येकजण लागला.

ब्रह्मावर्ताला स्थापन करण्यांत आलेली क्रांतीची गुप्त संघटना आतां जोरानें फोफावूं लागली होती. अुत्तर हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं या संघटनेच्या शाखा वाढत होत्या. कानपूरच्या सर्व हालचाली ब्रह्मावर्ताच्या राजवाड्यांत होत, तर दिल्लीला तेथील दिवाणी खासमध्येंच गुप्त संघटनेचें मुख्य केंद्र होतें. लखनौ आणि आग्रा या टापूंत मौलवी अहमदशाह क्रांतीचें नेतृत्व करीत होता तर जगदीशपूरला वीर कुमारसिंह लढाईची जुळणी करण्यांत गढला होता. पाटण्याच्या गुप्त संघटनेचा प्रमुख अेक पुस्तकविक्याच होता. कलकत्त्याला शिपायामध्येंच अयोध्येच्या नबाबानें आणि त्याच्या वजीरानें अुटावणीची ठिणगी पेरून दिली होती. कोल्हापूर, पटवर्धनी संस्थानें येथील राजे आणि जनताहि स्वदेशाच्या झेंड्याखाली लढण्यास सरसावले होते. अितकेंच काय, पण लोकांना स्वातंत्र्याच्या या धर्मयुद्धांत भाग घेण्यास सांगणारीं पत्रकेंहि भितीभितीवरून पेशावरपासून थेट मद्रासपर्यंत लावण्यांत आलेली होतीं.

स्वतत्र प्रवासी प्रचारक गुप्तपणें काम करीत असल्यामुळें शक्य तों पत्रें अशीं कमीच धाडलीं जात. पण हींहि पत्रें संशयावरून जेव्हां अिंग्लिश फोडून पाहूं लागले तेव्हा त्यापुढचा पत्रव्यवहार आंकड्याच्या आणि तुटक रेघांच्या गुप्त आणि सांकेतिक लिपींतच होअूं लागला.

अशा प्रकारची प्रचंड सिद्धता सगळीकडे पुरी होत आली असतां शिपायांच्या धार्मिक भावना दुखविण्याच्या दुष्ट बुद्धींतून जन्मलेली काडतुसांची घोडचूक अिंग्रजांनीं केली. आणि त्यांच्या पापाचा घडा कांठोकांठ भरला! रात्रीच्या वेळीं शिपायांच्या गुप्त बैठकी भरत. या बैठकींना येतांना कोणाला समजूं नये म्हणून शिपाअी बुरखे घेअून येत. कटातील नावें सांगणाऱ्या फितुराला नुसत्या संशयावरूनहि शिपाअी ठार करीत. अेकमेकांमध्यें विचारविनिमय करावयाला मिळावा म्हणून निरनिराळ्या तुकड्यांमधून सणावाराच्या निमित्तानें

दुसऱ्या तुकडयांना जेवण्यास आमंत्रणें करीत. निवडक शिपायांच्या बैठका सुभेदाराच्या घरीं भरत. प्रत्येक तुकडीला अेक तीन प्रमुखांचें मंडळ असे. अुठावणीबद्दल जें कांहीं करावयाचें असेल तें सर्व हें मंडळच ठरवी. त्यामुळें शिपायांनासुद्धां काय ठरलें आहे याची आधीं कल्पना नसे.

शेवटीं ३१ मे हा अुठावणीचा दिवस म्हणून नक्की करण्यांत आला. त्या दिवशीं रविवार येत असल्यानें पुष्कळसे गोरे अधिकारी चर्चमध्येंच अनायासें सांपडणार होते. प्रथम सरकारच्या तिजोऱ्या लुटून रोकड पैसा मिळवावयाचा, नतर तुरुंग फोडून कैद्यांना सोडून द्यावयाचें व जवळपासचीं दारूगोळ्याचीं सर्व कोठारें व शस्त्रागारें ताब्यांत घ्यावयाचीं आणि शक्य त्या ठिकाणीं किल्लेकोटहि रोखून ठेवावयाचे असा या अुठावणीचा सर्वसाधारण योजलेला कार्यक्रम होता.

शिपाअी बिथरले असल्याचा संशय जेथें जेथें अिंग्रजांना आला तेथें तेथें त्यांनीं सर्व तुकडीच्या तुकडीच शिपायांना कामावरून दूर करून नाहींशी करून टाकण्याचें घोरण अवलंबिलें. पण त्यामुळें अुठावणीला जोरच चढला. कारण कामावरून कमी झालेले बेकार शिपाअी आतां अुघडपणानें क्रांतीचा प्रचार करण्यास मोकळे झाले. सर्वसाधारण जनता क्रांतीला अनुकूल होतीच. अितकेंच काय, पण पाटील-कुलकर्ण्यांपासून वरच्या न्यायाधीशापर्यंतचे सरकारी नोकरसुद्धां क्रांतीच्या या संघटनेंत गुप्तपणें काम करीत होते. परंतु सरकारला याची मुळींच कल्पना नव्हती. कारण हे अधिकारी अुघडपणें क्रातिकारकाच्या बाजूचें असें अेकहि कृत्य करीत नसत. लखनौच्या प्रत्येक भिंतीवर निनांवी पत्रकें चिकटविण्यांत आली होतीं. पोलिसांनीं अेक फाडून टाकावें तों दुसरें लगेच तेथें चिकटलेलें दिसावयाचें. त्यामुळें पोलिसांनींहि घाअीला येअून सरकारकडे कळविलें कीं, "हीं पत्रकें कोण आणि केव्हां लावतो याचा छडा लावणें आमच्या बुद्धीपलीकडचें आहे!"

पण याचें कारण अिंग्रजांना नंतर कळून चुकलें कीं, स्वतः पोलिसच मुळीं या क्रांतिसंघटनेचे सभासद झालेले होते!

बंगालमधील गोष्ट! अेके दिवशीं अेक शिपाअी हातांत तांबडें कमळ घेअून सैन्याच्या छावणींत शिरला. तें कमळ त्यानें मुख्य हिंदी अधिकाऱ्याच्या हातांत दिलें. त्या मुख्यानें तें आपल्या खालच्या हुद्द्याच्या माणसाला दिलें. या रीतीनें

तें कमळ प्रत्येक शिपायाच्या हातांतून जात जात पुन्हा त्या मूळ आणणाऱ्या शिपायाकडे परत आलें. बस्स! अेवढ्यानें सर्व काम झालें. अेका शब्दाचीहि चाहूल न लागतां हें काम आटोपण्यात आलें. तो शिपाअी तेथून सुटला तो पुन्हा दुसऱ्या ठिकाणीं असलेल्या तुकडींत शिरला. तेथेंहि पूर्वीचाच कार्यक्रम करून तो पुढें दुसऱ्या गांवाकडे हाच तांबड्या कमळाचा संदेश पोंचविण्यास तडक बाणासारखा सुटला.

लाल कमळ! शेकडों शिपायांकडून जेव्हां हें लाल कमळ या हातांतून त्या हातामध्यें अेकमेकांकडून हाताळलें गेलें असेल तेव्हां या फुलानें त्यांना न बोलतांच फार मोठा आशादायी संदेश दिला असला पाहिजे. कारण याच रक्त कमलानें सर्वांचीं अंतःकरणें अेकत्र सांधलीं.

बंगालमध्यें शिपाअी आणि शेतकरी दोघेहि अेकच गोष्ट बोलतांना आढळून येत कीं, "सब कुछ लाल हो जायेगा!" आणि हें बोलतांना ते डोळे आणि भुवया अशा कांहीं चढवीत कीं त्यांच्या म्हणण्यांत कांहीं तरी निराळाच भयंकर अर्थ असला पाहिजे याची साक्ष पटे.

"सब कुछ लाल हो जायेगा!" सगळीकडेच लालेलाल व्हावयाचें खरें—पण कशानें?

याच वेळीं नानासाहेब, त्यांचा भाऊ बाळासाहेब व अझीमुल्लाखान हे तिघे ब्रह्मावर्त सोडून बाहेर पडले. कशाला बाहेर पडले होते हे? तीर्थयात्रेकरितां!

ही गोष्ट १८५७ मधील आहे. 'यात्रेच्या स्थळां'ना निदान एकदां तरी भेट देणें अवश्य होतें. आणि म्हणून या तिघांनीं प्रथम दिल्लीला भेट दिली. दिल्लीला ३१ मेच्या अुठावणीची सिद्धता कशा प्रकारें झाली आहे हें सर्व नीट पाहून नाना अंबाल्याला गेला. तेथून १८ अेप्रिलला तो लखनौला येअून पोंचला. लखनौला नानाची प्रचंड मिरवणूक काढण्यांत आली. आपल्या भावी सेनापतीचें दर्शन झाल्यामुळें लोकांतहि नवा अुत्साह व आत्मविश्वास संचरला. लखनौहून काल्पीस जाअून नाना परत ब्रह्मावर्तास आला. क्रांति-संघटनेच्या गांवोगांवच्या सर्व शाखांमध्यें अेकसूत्रीपणा आणणें व अुठावणीचा दिवस नक्की करणें हाच या 'तीर्थयात्रे'चा अुद्देश होता.

'त्या अुठावणीच्या दिवशीं' सर्वांनीं भाग घेण्यास पुढें यावें म्हणून अेक-

जात सर्वांना संदेश देण्यासाठीं प्रचारकांची एक नवीनच तुकडी कामाला लागली होती. ती म्हणजे 'चपात्यां'ची! या चपात्या साधारणतः गव्हाच्या पिठापासून केलेल्या असत. त्यांच्यावर कांहींहि लिहिलेलें नसे. तरीसुद्धां क्रांतीचा जळता संदेश खाणाऱ्या प्रत्येकाच्या अंतःकरणात त्या पेटवून देत. प्रत्येक गांवच्या चौकीदाराजवळ ही 'चपाती' असे. तींतील अेक तुकडा आपण मोडून खाअून बाकीचा 'प्रसाद' म्हणून तो सर्व गांवाला वांटी. पुनः तशाच आणखी काही चपात्या बनवून दुसऱ्या गांवाला धाडून देण्यांत येत. तेथील चौकीदार त्या आलेल्या चपात्या आपल्या गांवाला वांटून पुनः तसल्याच दुसऱ्या 'चपात्या' बनवून पुढच्या गावाला पाठवून देअी.

अशा रीतीनें खेड्याखेड्यातून आणि गांवागांवांतून घुसून क्रांतीची ही जळती मशाल सबंध देश पेटवून देत निघाली. अिंग्रजाना संशय येअून त्यांनीं या चपात्यांचा चुरा करून त्याचें शास्त्रीय पृथक्करण करून पाहिलें; परंतु त्यांतलें मर्म त्यांना शेवटपर्यंत कळलेंच नाहीं!

चपात्यांनो! चला, धाअी करा, आणि भारतांतील सर्व जनतेला हा संदेश द्या कीं, 'सर्वांना स्वतंत्र करण्यासाठीं राष्ट्रानें रक्त-युद्ध पुकारलें आहे! तेव्हां अुठा, सारे अुठा आणि मातृभूमीला वांचवा.' अरण्यें, पर्वत, नद्या, तुटके कडे या सर्वांना ओलांडून वाऱ्यालाहि मागे टाकणाऱ्या वेगानें, हे चपात्यांनो! तुम्ही आतां पल्ला मारा. शत्रूनें तुमचा चुराडा केला तर पुनः तसलींच हजारों नवीं रूपें घेअून तुम्ही आपलें काम करण्यास पुढें चला. सर्वांना या वेळीं बोलवा. पतिपत्नी, आयामुलें, बहीणभाऊ—झाडून साऱ्याना येअूं द्या. मराठ्याच्या भाल्याना, रजपुताच्या तरवारींना, शीखाच्या कृपाणांना, मुसलमानांच्या चांदाला —सर्वांना बोलवा. सर्वांना कळू द्या कीं ती 'वेळ' जवळ आली आहे!

बंधूंनो! अुठा आणि सज्ज व्हा! आणि हे अभागी जुलमी राजसत्ते, तूहि आपली झोप झाडून जरा नीट डोळे अुघडून पहा. दुरून हिरवाचार दिसणारा हा डोंगर खरोखरीच तसा असेल असें मानणें ही फार भयंकर चूक आहे. जुलमी राजसत्ते! तूं चालच त्या डोंगरमाथ्यावरून अेकदां! आतां १८५७ चें वर्ष तळपूं लागलें आहे. अत्यंत शांतिस्वरूप असणाऱ्या तपस्व्यांच्या ठिकाणीं-सुद्धां भयंकर अग्नीचें तेज वास करीत असतें. भयंकर सोशिकपणा हा जरी

हिंदुस्थानचा गुण असला तरी, हे राजसत्ते, ध्यानांत धर कीं, याच हिंदुस्थानच्या पोटांत सूडाची आगहि तितकीच प्रखरपणें धगधगत आहे.

शंकराचा तिसरा डोळा माहीत आहे ना? अुघडलेला नाहीं तोंपर्यंतच ठीक! पण अेकदां तो अुघडला कीं ब्रह्मांडाला जाळून टाकील असें तेज त्यांतून बाहेर पडूं लागतें. ज्वालामुखीची कल्पना आहे ना? वरून पाहिलें तर सगळीकडे हिरवळच हिरवळ दिसते. पण अेकदां कां त्याचें मुख अुघडलें कीं मग त्यांतून तो सळसळणारा लाव्हारस ओकूं लागतो. अगदीं त्याचप्रमाणें हिंदुस्थानचा हा ज्वालामुखी आतां जागृत होअून धगधगूं लागला आहे. लाव्हाचे भयानक लोट आतां त्याचे पोटांत रसरसूं लागले आहेत, आणि स्वातंत्र्यप्रेमाची ठिणगीहि त्यावर कोसळून पडत आहे.

जुलमी राजसत्ते! अजूनहि वेळ गेली नाहीं तोंपर्यंत याचा विचार कर. नाहीं तर ज्वालामुखीसारखा धगधगणारा सूड म्हणजे काय असतो याची कल्पना तुला 'प्रस्फोटा'च्या प्रचंड धक्क्यांनींच आणून दिली जाअील हें निश्चित ध्यानांत ठेव!

♣ ♣ ♣

# २

# प्रस्फोट

---

“ ज्या शिपायांनीं अिंग्रजांची सत्ता आजवर वाढवून ती टिकवून धरण्यास साहाय्य केलें होतें, त्याच शिपायांच्या तरवारी आज अिंग्रजांवर अुलटल्या होत्या. ह्या दृश्यानें गर्भगळित होअुन, अिंग्रजी राजसत्ता मीरतहून दिल्लीला पळून गेली; तों तिथें बादशहानें अेका हातानें तिचा गळा दाबून, दुसऱ्या हातानें तिचा राजमुकुटहि छिनावून घेतला !

“ जिच्यावर मीरतच्या स्त्रियासुद्धां भर चव्हाठ्यांवर थुंकल्या आणि जिचे राजमुकुटादि सर्व अलंकार लोकांनीं बळानें अुतरून घेतले, ती तरवारीच्या घावांनीं रक्तबंबाळ झालेली अिंग्रजी राजसत्ता, आपले अिंग्लिश रक्तानें थबथबलेले केस घेअून, नि हाडांच्या माळा गळ्यामध्यें धारण करून, कण्हत, विव्हळत, कलकत्त्याचा मार्ग सुधारण्याच्या धडपडींत दिसली ! ”

# १ हुतात्मा मंगल पांडे

५७ च्या क्रांतीची सिद्धता अितक्या गुप्तपणें करण्यांत आली होती कीं, मोठमोठ्या चाणाक्ष अिंग्रज अधिकाऱ्यांनाहि त्या चळवळींचा अुगम कशांत झाला हें नक्की माहीत नव्हतें. क्रांतीला पुरें अेक वर्ष अुलटून गेलें होतें तेव्हांसुद्धां अिंग्रज सत्ताधाऱ्यांना, 'क्रांतीचें कारण म्हणजे चरबी माखलेलीं काडतुसें' असेंच वाटत होतें. पण आतां त्यांना समजून येअूं लागलें कीं, काडतुसाचें हें अेक अगदीं वरवरचें कारण होतें.

आणि आतां तेच आपण होअून सांगतात कीं, "स्वधर्म आणि स्वराज्य यांच्या पवित्र हेतूनेंच १८५७ चे वीरश्रेष्ठ लढले!"

क्रांतीची संघटना पुरी होत आली होती त्याच वेळीं बंगालमधल्या सैनिकांवर चरबी माखलेलीं काडतुसें लादण्याची सक्ति सरकार करीत होतें. काडतुसांचा पहिला प्रयोग १९ व्या तुकडीवर होअीलसें वाटत होतें. या वेळीं फेब्रुवारी महिना चालू होता. ह्याच सुमारास बराकपूरला असलेली ३४ वी तुकडी अुठावणी करण्याला फार आतुर झालेली होती. कारण कलकत्त्याजवळ असलेल्या अयोध्येच्या नबाबाच्या वजीरानें या सबंध तुकडीला क्रांतीचा मंत्र पढवून आधींच शपथबद्ध करून घेतलें होतें. याच ३४ व्या तुकडींतील कांहीं शिपाअी १९ व्या तुकडींत आणून ठेवल्यामुळें १९ वी तुकडीहि क्रांतीला मिळाली. अिंग्रजांनीं जेव्हां या तुकडीवर काडतुसें वापरण्याची सक्ति केली, तेव्हां सर्व तुकडीनें अिंग्रजांची आज्ञा धाब्यावर बसविली आणि वेळ पडली तर त्याकरितां तरवारीहि अुपसण्यास आपण मागेपुढें पाहणार नाहीं असें शिपायांनीं अधिकाऱ्यांना स्पष्टपणें कळविलें.

'काळ्या अदमी'वर कसलीहि दडपशाही यापूर्वी केली तरी चालत होती. पण आतां तो पूर्वीचा 'काळा अदमी' राहिलेला नव्हता हें अिंग्रजांना तरवारीच्या खणखणाटानें चांगलेंच कळून आलें! अिंग्रजांना हा अपमान मुकाट्यानें गिळणें भाग पडलें. कारण, या वेळीं त्यांच्याकडे गोऱ्या पलटणी नव्हत्या. म्हणून मार्चच्या प्रारंभीं ब्रह्मदेशाहून अेक गोरी तुकडी बोलविण्यांत आली. आणि मग १९ व्या

तुकडींतील शिपायांचीं हत्यारें काढून घेऊन त्यांना नोकरींतून हाकून देण्यांत आलें.

आतां काडतुसांचा प्रयोग ३४ व्या तुकडीवर करण्यांत यावयाचा होता. पण १९ व्या तुकडीप्रमाणें हीहि तुकडी अिंग्रजांच्या नोकरीला रामराम ठोकण्यास सज्ज झाली होतीच. पण पुढारी मंडळींनीं प्रत्यक्ष अुठावणीसाठीं अेक महिना थांबण्यास सांगितलें. परंतु मंगल पांड्याच्या तरवारीला अेवढा धीर कुठला!

मंगल पांडे हा जातीनें ब्राह्मण होता तरी सैन्यामध्यें तो अेक तरुण शूर सैनिक म्हणूनच ओळखला जाअी. स्वधर्मावर प्राणापलीकडे प्रेम करणाऱ्या या तेजस्वी ब्रह्मवीराच्या हृदयांत स्वदेशस्वातंत्र्याची कल्पना चमकून अुठतांच त्याच्या अंगांत अेक अद्‌भुत वारें संचरलें. मग अशा या वीराची तरवार स्वस्थ कशी बसावी? आणि हुतात्म्यांच्या तरवारी तर कधींच स्वस्थ बसत नाहींत! यश येवो अथवा अपयश येवो, पण हेच हुतात्मे आपल्या ध्येयाला स्वतःच्या कढत रक्ताचें स्नान घालतात. आणि या रक्तांतून यशाची मूर्ति प्रकट होत असते!

आपल्या धर्मबांधवांवर काडतुसें तोडावयास लावण्याचा अत्याचार अिंग्रज करणार हें अेकतांच तो खवळून अुठला. त्याच दिवशीं आपल्या तुकडीनें अुठावणी करावी असा तो हट्ट धरून बसला. परंतु क्रांतीचे पुढारी आपला हट्ट अेकतील्च असें त्याला न वाटल्यामुळें त्यानें अेक भरलेली बंदूक घेतली आणि तो संचलनभूमी(परेड मैदान) कडे धावत सुटला आणि ओरडूं लागला कीं, "बंधूंनो अुठा! तुम्हांला तुमच्या धर्माची शपथ आहे. आपल्या स्वातंत्र्यासाठीं या नीच शत्रूवर आपण तुटून पडूं या." सार्जंट मेजर ह्यूसननें त्याला पकडण्यास आपल्या हाताखालच्या शिपायांस सांगितलें. पण कोणीहि त्याच्या अंगास हात लावण्यास पुढें आला नाहीं. इतक्यांत मंगल पांड्यानें गोळी झाडली आणि त्यासरशीं त्या सार्जंट अधिकाऱ्याचें शरीर धाडकन् खालीं कोसळून तो ठार झालेला दिसला. याच वेळीं लेफ्टनंट बॉव्ह तेथें आला. त्याला पाहतांच मंगल पांड्यानें आणखी अेक गोळी झाडली आणि त्यामुळें स्वार आणि घोडा दोघेहि खालीं कोसळले. तरीहि त्या गोऱ्यानें पांड्यावर गोळी झाडली. पण मंगल पांड्यानें ती चुकवून आपल्या तरवारीनें त्या गोऱ्या

अधिकाऱ्याला खालीं लोळविलें. आणि आपले रक्तानें माखलेले हात वर करून तो ओरडत सुटला कीं, "बंधूंनो! अुठा! अुठा!"

हा प्रकार पाहून जनरल हिअरसी, बरोबर कांहीं युरोपियन सैनिक घेअून पांड्याला पकडण्यास आला. तेव्हां 'फिरग्यांच्या हातांत पडण्यापेक्षां मेलेलें बरें' असा विचार करून त्यानें आपली बंदूक आपल्याच छातीवर रोखून अुडवून घेतली, आणि लागलीच तो घायाळ होअून खालीं पडला. अिंग्रज अधिकाऱ्यांनीं त्याला अुचलून रुग्णालयांत नेलें व त्याच्या शौर्याचें आश्चर्य करीत ते आपापल्या तंबूकडे निघून गेले. हा प्रकार २९ मार्च १८५७ या दिवशीं घडला.

यानंतर न्यायासनासमोर मंगल पांड्याची चौकशी करण्यांत आली. गोऱ्या अधिकाऱ्यांशीं त्याचा कांहींहि व्यक्तिशः हेवादेवा नव्हता. स्वधर्म आणि स्वराज्य यांच्या रक्षणार्थच त्यानें आपली तरवार अुपसली होती. त्याच्या या धाडसी कृत्याच्या मुळाशीं असलेली त्याची देशभक्ति आणि शौर्य हीं दोन्हीहि स्तुतीला पात्र आहेत.

मंगल पांड्याला फांशीची शिक्षा देण्यांत आली. अेप्रिल ८ हा त्याच्या फांशीचा दिवस ठरविण्यांत आला. मंगल पांड्याविषयीं प्रत्येकाच्या अंतःकरणांत दिव्य प्रेम आणि भक्तिभाव निर्माण झाला होता. सबंध बराकपूरमध्यें त्याला फांशीं देण्याकरितां एकहि मांग पुढें येईना. शेवटीं त्याच्या फांशीकरितां कलकत्त्याहून चार मांग बोलण्यांत आले. दिनांक ८ ला सकाळींच त्याला फांशी देण्यांत आलें.

क्रांतियुद्धाची ही पहिली चकमक येथें झडली; आणि अशा रीतीनें हा पहिला हुतात्मा स्वर्गवासी झाला. मंगल पांडे मरून गेला, पण त्याची स्फूर्ति मात्र हिंदुस्थानभर संचरून राहिली; आणि ज्या तत्त्वाकरितां तो लढला तें तत्त्व अमर झालें! क्रांतीकरितां त्यानें आपलें रक्त दिलें, अितकेंच नव्हे तर, त्या क्रांतीला त्यानें आपलें नांवहि देअून ठेविलें. कारण ५७ च्या सर्व क्रांति-कारकांचा अिंग्रज 'पांडे' म्हणून अुल्लेख करीत असल्याचें दिसतें. क्रांतिकारक आले कीं 'पांडे' आले म्हणून ते भयभीत होत.

प्रत्येक मातेनें अत्यंत अभिमानानें या हुतात्म्याचें तेजस्वी चरित्र आपल्या मुलांना समजून सांगावें.

रात्रीच्या वेळीं गुप्त बैठका भरविण्याच्या आरोपावरून ३४ व्या तुकडीच्या सुभेदाराचें डोकें अुडविण्यांत आलें. १९ व्या, ३४ व्या तुकड्यांतील शिपायांची

हत्यारें काढून घेण्यांत आलीं व त्यांना सैन्यांतून काढून टाकण्यांत आलें. पण शिपायांना तो अेक मोठा मानच वाटला. हत्यारें काढून घेण्याच्या वेळीं शिपायांना भिववण्यासाठीं युरोपियन पलटणी सज्ज करून ठेवल्या होत्या. शिपायांनीं आपल्या तरवारी आनंदानें खालीं ठेवल्या व आपले बूट आणि सैन्यांतले कपडे ओढून फाडून काढून ते अिंग्रजांच्या नोकरीचें पाप धुअून टाकण्यासाठीं आंघोळी करण्यास नदीकडे धावले. डोक्यावरच्या टोप्या पाया-खालीं तुडवून शिपाअी त्या टोप्यांवर नाचले. हें पाहून रागानें आणि आश्चर्यानें अिंग्रज अधिकारी थिजून गेले.

मंगल पांड्याच्या रक्तानें केवळ बंगालमध्येंच खळबळ चालू झाली असें नाहीं, तर हिंदुस्थानच्या अितर भागांतहि तशीच चेतना निर्माण झाली. अंबाल्याच्या शिपायांनीं देशद्रोही फितुरांचीं आणि जुलमी सत्ताधाऱ्यांचीं घरें आणि बंगलेच पेटवून देण्याचा सपाटा चालविला.

**हें आगी लावण्याचें काम अितक्या गुपचूप होअी कीं प्रत्यक्ष अग्निनारायणच त्या गुप्त संघटनेचा सभासद झाला होता असेंच कोणालाहि वाटावें !**

मुख्य सेनापति ॲन्सन यानें अंबाल्याहून गव्हर्नर जनरलला कळविलें कीं, "या आगी कोण लावतो हें कांहीं आम्हांला शोधून काढतां येत नाहीं. कारण क्रांतिकारकाची अत्यंत अभेद्य अशी संघटना आहे. कोणी फितुरच सांपडत नाहीं. कारण फितुरीसाठीं क्रांतिकारकांकडून आपणाला भयंकर शासन होअील याची त्या फितुराला आधींच भीति आहे."

नानासाहेब आल्यापासून लखनौमध्यें थोडीशी धामधूम चालू झाली होती. आगींची साथ तेथेंहि पसरली होती. पण हा वणवा सबंध देशभर अेकाच वेळीं अुठवून देण्यासाठीं ३१ मे हा सार्वत्रिक अुठावणीचा दिवस म्हणून ठरविण्यांत आला. २ मेच्या सकाळीं लखनौला चार शिपाअी लेफ्टनंट मॅशमच्या तंबूत घुसले आणि म्हणाले, "व्यक्तिशः तुझें आमचें कांहीं अेक वाकडें नाहीं. पण ज्या अर्थी तूं फिरंगी आहेस त्याअर्थी तुला आतां मेलें हें पाहिजे!" यमदूता-प्रमाणें भयंकर भासणाऱ्या त्या शिपायांना पाहून मॅशमची बोबडीच वळली. पण ही बातमी कळतांच हेन्री लॉरेन्सनें लखनौच्या तुकडीला निःशस्त्र करून टाकलें.

मीरतला ६ मे ला एका घोडदळांतील सैनिकांवर चरबीच्या काडतुसाचा

प्रयोग करण्यांत आला. परंतु नव्वद शिपायांपैकीं अवघ्या पांच जणांनींच त्या काडतुसाला हात लावला. तत्काळ सेनापतीनें त्यांची चौकशी करून त्या पंचाऐशीं शिपायांना आठ-आठ दहा-दहा वर्षांची शिक्षा देअून तुरुंगांत डांबून ठेविलें. शिक्षा देण्याचा हा समारंभ ९ मेला झाला. त्या पंचाअैशीं जणांचे सैनिक गणवेष अुतरवून घेअून त्यांना बेडया व हातकडया घालून तुरुंगाकडे चालविण्यांत आलें. हा प्रकार पाहून अितर सर्व शिपाअी खवळले. परंतु पलीकडेच अिंग्रज तोफखाना सज्ज होअून अुभा असल्यामुळें त्यांनीं आपल्या तरवारी अुपसल्या नाहींत. हा प्रकार सकाळींच झाला. आपल्या देशबांधवांना आपल्या डोळ्यांदेखत बेडया घातल्या या अपमानानें ओशाळून पण आंतल्या आंत रागानें जळत ते शिपाअी छावणीकडे परतले.

संध्याकाळीं हेच शिपाअी सहज बाजारांतून भटकत असतां, गांवच्या बायका त्यांना तुच्छतेनें हिणवूं लागल्या कीं, "अहाहा! तुमचे देशबंधू तिकडे तुरुंगांत खितपताहेत आणि तुम्ही अिकडे माशा मारीत हिंडत आहां! थूः थूः! फुकट रे तुमचा जन्म!" रस्त्यामधल्या स्त्रियांनीं हा मर्मभेदक आहेर त्यांना दिला. अशा वेळीं कांहींहि न करतां स्वस्थ बसणें त्याना कसें शक्य होतें? ३१ मेपर्यंत थांबणें त्यांना कसेंसेंच वाटूं लागलें. छे:! नाहीं; अुद्यां तर रविवारच आहे. तेव्हां अुद्यांचा सूर्य मावळण्याच्या आधींच त्या पंचाअैशीं देशबांधवांना स्वतंत्र केलें पाहिजे आणि मायभूमीच्या बेडया तोडून स्वातंत्र्याचा झेंडा फडकविला पाहिजे! तत्काळ सर्वांच्या विचारानें "आम्ही ११ किंवा १२ मेला तेथें येत आहों" असा निरोप देअून दिल्लीला दूत पाठविण्यांत आला.

शेवटीं १० मेचा रविवार अुजाडला. शिपायाच्या गुप्त हालचालींची आणि ठरलेल्या कार्यक्रमाची अिंग्रजांना कांहीं म्हणजे कांहींच कल्पना नव्हती. अिकडे शिपायांच्या बैठकींत अिंग्रजांची सरसकट कत्तल करावी कीं काय याचा विचार चालू होता. २० व्या तुकडीचा आग्रह पडला कीं, अिंग्रज चर्चमध्यें गेले असतील त्याच वेळीं अुठावणी करावी आणि सर्वांची कत्तल करूनच दिल्लीला दौडत जावें. शेवटीं हाच बेत पक्का करण्यांत आला.

सायंकाळीं पांच वाजतां चर्चमधील प्रार्थनेच्या घंटा वाजूं लागल्या. पण अिकडे शिपायांच्या छावणींत 'मारो फिरंगीको!', 'फिरंग्यांना कापून काढा!'

असल्या भीषण आरोळ्यांचा अेकच गिल्ला अुठला. प्रथम हे शिपाअी तुरुंगाकडे धावले. आपल्या पंचाअैशीं देशबांधवांना तुरुंग फोडून बाहेर काढून ते अत्यानंदानें त्यांना मिठ्या मारून भेटले. अेव्हांपर्यंत अेका पायदळी तुकडीनें आधींच अुठावणी केली होती. मीरतच्या बाजारांतहि अेकदम गडबड चालू झाली. जेथें म्हणून अिंग्रज सांपडला तेथें त्याला कापून काढण्यांत आलें. अिंग्रजांचे बंगले, कचेऱ्या, हॉटेलें सर्व कांहीं पेटवून देण्यांत आलें.

अुठावणी होतांच दिल्लीला जोडणाऱ्या तारायंत्राच्या तारा तोडण्यांत आल्या व रेल्वेचीहि नाकेबंदी करण्यांत आली. या वेळीं काय करावें असा प्रश्न अिंग्रजांपुढें येअून पडला. अिंग्रजांपैकीं कांहीं तबेल्यांत लपले. कांहींनीं शेतकऱ्यांचा वेष घेतला. कांहींनीं सबंध रात्र झाडाखालीं काढली. अंधार पडूं लागतांच शिपाअी दिल्लीच्या रोखानें निघाले, आणि गांवांतील अिंग्रजांचा सूड घेण्याचें काम गांवच्या लोकांनींच आपणांकडे घेतलें. किती तरी स्त्रिया आणि मुलें जळत्या घरांत सांपडून मेलीं. येणाजाणारे वाटसरूहि अिंग्रजांच्या प्रेतांना लाथा मारून त्यांची विटंबना करूं लागले.

अुठावणीच्या दृष्टीनें पाहिलें तर मीरत सर्वांच्या शेवटीं खरें म्हणजे अुठावयाचें ! कारण हिंदी सैन्यापेक्षां अिंग्लिश सैन्यच त्या ठिकाणीं अधिक होतें. परंतु खरें सांगायचें म्हणजे मीरतला अचानकपणें हा अुठावणीचा डोंबाळा पेटल्यामुळें अिंग्रजांच्या तोंडचें पाणी पळून ते बावरले. मीरतच्या लोकांनीं सर्वच बाजूंनीं लूटमार आणि जाळपोळ केल्यामुळें ही अुठावणी नेमकी कोठें झाली आहे याचाच पत्ता अिंग्रजांना लागला नाहीं. पण शिपायांचा कार्यक्रम अगदीं आंखलेला होता. पहिल्यानें हिंदुस्थानची राजधानी दिल्लीच हस्तगत करावयाची आणि त्यामुळें शिपायांच्या अुठावणीला अेकदम राष्ट्रीय स्वरूप प्राप्त करून देअून अिंग्रजांचा नक्षा धुळीला मिळवावयाचा, हा पुढाऱ्यांचा मुख्य हेतु होता. आणि अशा रीतीनें अिंग्रजांना कल्पना येण्याच्या आधींच, त्यांच्या रक्ताचे पाट वाहवीत हे दोन हजार क्रांतिकारक शिपाअी अिंग्रजांच्या रक्तानें रंगलेल्या आपल्या तरवारी अुंचावून 'चलो दिल्ली, चलो दिल्ली'च्या गर्जना करीत दिल्लीच्या रोखानें चालूं लागले.

♣ ♣ ♣

# २ दिल्ली

अेकाच वेळीं ३१ मेला सर्वच्या सर्व हिंदुस्थान अुठता तर अिंग्रजी राजसत्तेचा नाश आणि भारताचें स्वातंत्र्य या गोष्टी फार दूर नव्हत्या. मीरतच्या शिपायांचा पराक्रम आणि देशभक्ति यांविषयीं जरी अभिमान वाटण्यासारखी गोष्ट असली तरी, मीरतच्या शिपायांनीं आपल्या आकस्मिक केलेल्या अुठावणीमुळें, शत्रूला ठरल्या वेळेच्या आधींच जागें करून, आपल्या अितर ठिकाणच्या देशबांधवांना त्यांनीं मोठ्या पेंचांत पाडलें. दिल्लीला सर्व शिपाअी हिंदीच होते. मंगल पांड्याच्या वीरमरणापासून तेसुद्धां अस्वस्थ झाले होते. अितक्यांत मीरतची बातमी आली व दोन हजार क्रांतिकारक शिपाअी दिल्लीकडे विजयानें येत असल्याचेंहि त्यांना कळलें.

मीरतपासून दिल्ली ३२ मैलांवर आहे. सकाळीं ८ चे सुमारास मीरतच्या सैन्यांतील कांहीं सैनिक यमुनेपर्यंत येअून थडकलेहि. यमुनेचें पवित्र जल पाहतांच त्या सैनिकांनीं 'जय यमुनाजी' म्हणून यमुनेला नमन केलें. पण यमुनेला हे सर्व शिपाअी कोणत्या कामासाठीं दौडत निघाले होते याची कल्पना होती का? मग तें तिला हें समजावून देअून तिचा आशीर्वाद नको का त्या कार्याला घ्यावयाला! मग, पहातां काय? ओढा त्या पुलावरून जाणाऱ्या अिंग्रज माणसाला खालीं; आणि द्या त्याचें रक्त यमुनेच्या पाण्यांत मिसळून! हें रक्तच शिपाअी दिल्लीला कां जात आहेत याचें कारण यमुनेला सांगेल!

मीरतचे शिपाअी दिल्लीच्या बुरुजापर्यंत येअून पोंचलेले पाहून ५४ व्या तुकडीच्या कर्नलनें आपल्या सैनिकांना एकत्र जमवून त्यांच्यापुढें 'राजनिष्ठे'वर व्याख्यान झोडण्यास आरंभ केला. तेव्हां ५४ व्या तुकडीच्या शिपायांनीं पुढें होअून सांगितलें कीं, "कुठें आहेत ते मीरतचे शिपाअी? आम्ही घेतों त्यांचा समाचार!" हें अैकून कर्नल रिप्लेनें त्यांची पाठ थोपटून त्यांना चाल करून जाण्यास सांगितलें. मीरतचें घोडदळ आणि त्याचे मागोमाग पायदळहि किल्ल्याच्या रोखानें येत होतें.

दिल्लीचे शिपाई समोर दिसतांच मीरतच्या सैन्यानें 'अिंग्रजी राज्याचा नाश

होवो ' अशी गर्जना ठोकली. आणि चमत्कार असा कीं दिल्लीच्या शिपायांनींहि 'फिरंग्यांना कापून काढा ' अशी त्यांना साथ देऊन ते अेकमेकांना प्रेमपूर्वक भेटले. हें पाहून कर्नल रिप्ले गोंधळून गेला. पण अितक्यांत बंदुकांच्या गोळ्यांनीं त्याच्या अंगाची चाळण अुडविण्यात येअून तो मृत होऊन खालीं पडला. याच वेळीं दिल्लीच्या 'काश्मीर दरवाज्या 'नें हे सर्व स्वातंत्र्यवीर दिल्लींत प्रवेश करते झाले !

मीरतच्या सैन्याची दुसरी तुकडी कलकत्ता दरवाज्यानें दिल्लींत शिरली. शिपायांनीं आपला मोर्चा दर्यागंज भागांतील अिंग्रजांच्या बंगल्यांकडे वळविला. तेथील घरें आणि बंगले आधींच आगींत जळत होते. आगींतून बचावलेले अिंग्रज तरवारींना बळी पडले. शेजारच्या ब्रिटिश अिस्पितळाचाहि शिपायांनीं चक्काचूर केला. आणि हें विजयी सैन्य पुढें चाललें. पण या सैन्याला झेंडा कुठें दिसत नाहीं? परंतु असल्या सैन्याला कापडी फडक्याचे ध्वज काय शोभणार? म्हणून जेथें कोठें अिंग्रजांचीं मुंडकीं सांपडली तींच भाल्यांवर खोचण्यात आली आणि मग तसले ते भयकर झेंडे मिरवीत हें सैन्य आपला मार्ग रेटीत पुढें चाललें !

दिल्लीच्या राजवाड्यांत शिपाअी आणि नागरिक यांची अेकच गर्दी अुसळली होती. 'बादशाहाचा विजय असो ' ह्या घोषणांनीं तो राजवाडा दुमदुमून गेला. बादशाहानें आणि बेगमेनें अुघडअुघडपणें क्रांतिकारकांना मिळण्याचें ठरविलें. कारण आतां ३१ मेपर्यंत थाबणें म्हणजे शुद्ध वेडेपणाचेंच होतें. अेवढ्या वेळात मीरतची बंडखोर तोफखाना-पलटणहि येअून थडकली. त्यांनीं नवीन येणाऱ्या स्वातंत्र्याच्या आणि बादशाहाच्या सन्मानार्थ २१ तोफा अुड-विल्या. यावर बादशाहा त्या सर्व सैनिकांना म्हणाला, "मी तुमचें पुढारीपण घेतों. पण शिपायांचे पगार देण्यासहि मजजवळ पैसा नाहीं!" तेव्हां सर्व सैन्यानें सांगितलें कीं, "खाविद, आम्ही सर्व हिंदुस्थानभर असलेला अिंग्रजांचा खजिना लुटूं आणि तो आपल्या पायांवर आणून ओतूं!"

दिल्ली नगरांत भयंकर अशी अंदाधुंदी आणि दंगल माजून राहिली होती. दिल्लींतील लोक हातीं मिळेल तें शस्त्र घेअून, कोणी अिंग्रज आपल्या शस्त्राला बळी देतां येतो कीं काय हें पहाण्यासाठीं हिंडत होते. लोकांनीं दिल्लीची बँक

सबंध चक्काचूर करून टाकली. त्यानंतर लोकांची धाड 'दिल्ली गॅझेट'च्या मुद्रणालया (छापखान्या)कडे वळली. मीरतची बातमी जुळविण्यांत जुळारी गुंग होते. अितक्यांत बाहेर 'क्रांती'ची गर्जना अैकूं आली. अेका क्षणार्धात तेथील खिळे फेकून देअून, यंत्रें मोडून टाकून आणि खिश्चनांची कत्तल करून अिंग्रजांच्या स्पर्शानें विटाळलेल्या तेथील एकूण एक गोष्टींचा नायनाट करून टाकण्यात आला. क्रांतीची ही लाट पुढें पसरत चालली.

"आपलें शिखर आकाशांत आढ्यतेनें अुंचावीत हें खिस्ताचें चर्च येथें काय म्हणून अुभें ? पाहतां काय, ओढा तो क्रूस खालीं, आणि करा त्या खिस्त-पीठाचा चुराडा !"

अिंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांत चिरकाल नांदावें म्हणून याच देवळांतून आकाशांतल्या बापाला प्रार्थना करण्यांत आल्या होत्या ना ? चर्चच्या या धर्म-संस्थेनें जुलमानें हिंदुस्थानावर राज्य करणें हें पातक आहे असें चुकून तरी कधीं अिंग्रजांना सागितलें होतें का ? अुलट अिंग्रजांचें आसन हिंदुस्थानांत कसें स्थिर होअील हीच काळजी या खिस्ती पाद्र्यांनीं केली.

हीं चर्चें नव्हत. सैतानाचे अड्डेच हे ! भर वस्तींत आपण हे अड्डे राहूं दिले त्याचेंच फळ (बक्षीस) आपल्याला चरबीच्या काडतुसाच्या रूपानें मिळत आहे.

घंटाबुरजांवर चढून क्रांतिकारकांनीं घंटाचे दोर कापले तेव्हां त्या खालीं कोसळणाऱ्या घंटांची घणघण फारच भेसूर होती ! पण ह्या सर्व प्रकारात क्राति-कारकांच्या इतका आनंद यापूर्वी मात्र कधींच कुणाला झाला नसेल !

राजवाडयाजवळ अिंग्लिश सैन्याचें एक मोठें दारूगोळ्याचें कोठार होतें. कमींत कमी ९ लक्ष काडतुसें, १० हजार रायफली व सुरुंगाच्या माळा इतका अफाट दारुगोळा तेथें होता. क्रांतिकारकांनीं तें कोठार आपल्या हातीं घ्याव-याचें ठरविलें. पण तें काम वाटलें तेवढें सोपे नव्हतें. दारूकोठारात नऊच अिंग्लिश लोक होते. परंतु दारूकोठाराचा अधिकारी लेफ्टनंट विलोबी पक्का निर्धाराचा होता. क्रांतिकारकांच्या हातीं सर्व दारूगोळा देण्यापेक्षा तो सर्व अेका काडीनें पेटवून देअून अुडवून देण्याचा त्यानें बेत योजला. शिपायांनाहि याची पूर्ण कल्पना होती. तरीहि त्यांनीं कोठारावर हल्ला केला. हजारों शिपाअी असेंनलच्या (दारूकोठार) तटावर चढले. इतक्यांत हजारों तोफा अेकदम

अुडाल्यात त्याप्रमाणें गडगडाट होअून प्रचंड स्फोट झाला. ते नअूहि अिंग्लिश त्यांत आपण होअून जळून मेले. त्या स्फोटाच्या दणक्यानें ३०० माणसांच्या शरीराच्या अक्षरशः चिंध्या अुडाल्या, व त्याचा हादरा सबंध दिल्लीला बसला !

अितक्या माणसांचा बळी देअूनहि क्रांतिकारकांचा प्रयत्न अगदींच फुकट गेला नाहीं. प्रत्येक शिपायाला ४–४ बंदुका वांटणीला येतील असा बंदुकींचा अेक चांगलाच सांठा त्यांच्या हातीं पडला. या वेळपर्यंत दिल्लीच्या छावणी-तळावरील सर्व शिपाअी अुठले होते. 'मारो फिरंगीको' अशा आरोळ्या ठोकीत ते अिंग्रजांवर तुटून पडले. हातीं सांपडला तो तो अिंग्रज त्यांनीं कापून काढला. राजवाड्यांत पकडून ठेवण्यांत आलेल्या ५० अिंग्रजांना १६ मेला अुघड्या माळावर नेअून तेथें त्यांचीं डोकीं अुडवण्यांत आलीं. अशा रीतीनें ही दिल्लीची कत्तल ११ ते १६ मेपर्यंत चालू होती. या कत्तलींतून जीव बचावून पळण्यासाठीं अिंग्रजांनीं अनेक युक्त्या केल्या. कांहींनीं तोंडाला काळें चोपडून काळ्या अदमींचा वेष घेतला. कांहींनीं कबिराचे दोहे पाठ केले व ते गोसावी बनून हिंडूं लागले. कांहीं रानावनांत भटकतांना प्रखर अुन्हाचे चटके खाअून भाजून मेले.

दिल्लीला झालेल्या या सर्व प्रकारांत अेकाहि अिंग्रज स्त्रीच्या शीलाला धक्का लावण्यांत आलेला नाहीं. हें सत्य अिंग्रज माणसानींच मान्य केलें आहे. कांहीं अिंग्लिश मिशनरी पाद्र्यांनीं तशा प्रकारच्या खोट्या कंड्या पसरविल्या होत्या. पण त्यांचे मुळाशीं द्वेषच होता. १८५७ ची क्रांति ही, हिंदी लोकांना गोऱ्या स्त्रिया पाहिजे होत्या म्हणून कांहीं घडविलेली नव्हती. गोऱ्या स्त्रियाच येथून नाहींशा करून टाकण्याकरितां ही क्रांति झाली होती.

मीरतच्या स्त्रियांपासून ते दिल्लीच्या बादशाहापर्यंत प्रत्येकाला स्वधर्मरक्षणाची आणि स्वराज्य मिळविण्याची तळमळ लागली होती. आणि या तळमळीला गुप्त क्रांतिकारक संघटनांनीं योग्य तो आकार देअून ठेविला होता. म्हणूनच अवघ्या पांच दिवसांत स्वराज्याचें निशाण हिंदुस्थानच्या राजधानीवर—दिल्ली-वर—फडकूं लागलें. अिंग्रजी राज्याची अेवढी खूण म्हणून तेथें राहिली नाहीं. युनियन जॅकच्या चिंध्या रस्त्यांमध्यें लोक तुडवीत होते.

हे पांच दिवस हिंदुस्थानच्या अितिहासांत फार महत्त्वाचे आहेत. कारण

याच पांच दिवसांत कित्येक शतकांचें हिंदु-मुसलमानांचें वैर कांहीं अंशीं तरी संपलें होतें. हिंदु-मुसलमान हे बंधु बंधु म्हणून अेकत्र आले होते.

दिल्ली स्वतंत्र झाल्याचें अैकून सर्वांचेच डोळे दिपले. अिंग्रज तर भांबावूनच गेले. कॅनिंगच्यासुद्धां या बातमीवर विश्वासच बसेना. पण जसे अिंग्रज गडबडले तसे आपलेहि लोक या अचानक अुठावणीमुळें गोंधळले. त्यामुळें गुप्त संघटन संस्थांच्या अनेक योजना धुळीस मिळाल्या. पूर्वी ठरल्याप्रमाणें ३१ मेला सर्व ठिकाणीं अेकाच वेळेला क्रांतीचा डोंबाळा अुठता तर अवघ्या अेका दिवसांतच पुष्कळसें साधलें असतें. दिल्लीची अुठावणी यशस्वी झाली होती हें खरें, परंतु त्यासरशीं आतां सर्वांनीं अुठायचें का थांबायचें ही अडचण अितर ठिकाणच्या पुढाऱ्यांपुढें अुभी राहिली.

अशी चलबिचलच खरोखर क्रांतीला मारक ठरते. क्रांति जितकी झटपट आणि चौफेर पसरते, तितकी ती अधिक यशस्वी होण्यासारखी परिस्थिति निर्माण होते. परंतु पहिल्या अुठावणीनंतर मध्यें खंड पडून कांहीं काळपर्यंत जर सर्वच थंड थंड राहील, तर तेवढ्या मधल्या काळांत शत्रूला दम घ्यावयास व सज्ज होण्यास वेळ दिल्यासारखें होतें. बरें, आधीं जे अुठलेले असतात त्यांचा, आपल्या मागून कोणी अुठत नाहींत असें पाहून, धीर खचतो व अशा वेळीं शत्रु सावध होअून, नवीन अुठणाऱ्यांना दडपून टाकतो.

ज्या शिपायांच्या बळावर अिंग्रजांनीं येथील साम्राज्य मिळविलें त्याच शिपायांच्या तरवारी आतां अिंग्रजांवर अुलटल्या होत्या, व त्या महिन्यांत आग्र्यापासून बराकपूरपर्यंतच्या ७५० मैलांच्या टापूंत गोऱ्या सैन्याची एकहि तुकडी जागेवर नव्हती. अशा वेळीं तो सर्व टापू अेकदम अुठता तर अेकच काय पण अशीं दहा अिंग्लंडें आलीं असतीं तरी हिंदुस्थान हातीं राखणें अिंग्रजांना अशक्य होतें. म्हणून अशा या आणीबाणीच्या वेळीं जास्तींत जास्त गोरें लष्कर अेकत्र आणण्याची लार्ड कॅनिंगनें पराकाष्ठा केली. अिराणविरुद्धचें युद्ध संपल्यामुळें तेथील अिंग्लिशहि हिंदुस्थानांत येअूं शकले. चीनवर पाठविलेल्या पलटणीहि कॅनिंगनें कलकत्त्यालाच थोपवून धरल्या, व मद्रासच्या गव्हर्नरलाहि तेथील सैन्य पाठवून देण्याची त्यानें आज्ञा दिली.

याच वेळीं शिपायांचा असंतोष शांत करण्यासाठीं कॅनिंगनें अेक पत्रक प्रसिद्ध

केलें व तें सर्व खेड्यापाड्यांत चिकटविण्यांत आलें. पण असल्या पत्रकांना कोण कुत्रें धूप घालणार होतें! प्रश्नच मुळीं हा होता कीं, असलीं पत्रकें काढण्याचा अिंग्लिशांना या देशांत अधिकारच कां असावा? हिंदुस्थानला असलीं भुक्कड पत्रकें वाचण्याला वेळच नव्हता. कारण याच वेळीं बादशाहाचें घोषणा-पत्रहि प्रसिद्ध झालें होतें. शेवटीं पत्रकावर भिस्त न ठेवतां कॅनिंगनें आपली लेखणी टाकून देअून दिल्लीवर तोफा डागण्याची आज्ञा सेनापतीला दिली.

बंडाच्या बातमीमुळें सगळीकडे अितका घबराट पसरला होता कीं, नुसत्या अफवा-हुलीनेंसुद्धां अिंग्रज बायका-मुलें वाट फुटेल तिकडे पळूं लागत. कलकत्त्याला तर काहींनीं अिंग्लंडच्या बोटीचीं तिकिटेंहि काढून ठेविलीं. कांहींनीं आपला बाडबिस्तरा आवळून किल्ल्यांत जाण्याची तयारी करून ठेविली तर कांहींनीं कचेऱ्यांमध्येंच कोपऱ्यांत दडून बसण्याचा शूरपणा दाखविला!

कॅनिंगच्या आज्ञेप्रमाणें मुख्य सेनापति अ‍ॅन्सननें अंबाल्याला येअून दिल्लीच्या वेढ्याकरितां तोफा, सैन्य अित्यादीची जुळणी करण्यास आरंभ केला. कामाची भराभर अुठावणी करतांना अ‍ॅन्सन घाअीला आला. कारण कामाला हिंदी माणसेंच मिळेनात. आतांपर्यंत हिंदी शिपायांना आज्ञा देण्याचें अेवढेंच काम अिंग्लिश अधिकाऱ्यांचें होतें. पण सर्वच स्वतःला करावयाची पाळी आली. हिंदुस्थानच्या लोकांवांचून अिंग्रजांचें राज्य खरोखरीच दुबळें आणि परावलंबी होतें. खरोखर आतापर्यंत हिंदी लोक असे तटस्थ राहाते तर अिंग्रजी राजवट अेका दिवसांत धुळीला मिळाली असती. पण तो भाग्यशाली दिवस १८५७ ला अुगवूं शकला नाहीं.

पतियाळा, नाभा आणि झिंद या तीन शीख संस्थानांनीं नुसतें तटस्थसुद्धां न राहातां अुलट अिंग्रजांनाच साहाय्य दिलें; आणि क्रांति पुरी मारून टाकण्याचाच विडा अुचलला. यामुळें दिल्ली आणि पंजाब येथील क्रांतीचें दळणवळणच मोडून पडलें.

मे २७ ला सरसेनापति अ‍ॅन्सन मेला व त्याच्या जागीं हेन्री बर्नार्ड आला. दिल्लीवर चढाअी करण्यासाटीं अंबाल्याहून सैन्य निघालें. या सैन्यानें अंबाला ते दिल्ली या रस्त्यावर गरीब खेडुतांवर इतके भयंकर अत्याचार केले कीं, त्याचें वर्णन करणेंसुद्धां कठीण आहे. हातीं सांपडेल त्या माणसाला फांशीची शिक्षा

देअून अत्यंत राक्षसीपणानें आणि रानटी सूडानें त्याला ते ठार करीत. धर्मा-करितां प्राणहि देणाऱ्या गरीब लोकांच्या धर्मभावना दुखविण्याकरितां, हे गोरे सैनिक त्यांना ठार मारण्यापूर्वी संगिनीनें त्यांच्या तोंडांत गाअीचें मांस कोंबीत. शेकडों गरीब शेतकरी गुरांप्रमाणें अेकत्र बसवून त्यांचा 'न्याय' करण्यांत येअी. 'न्याय' म्हणजे—सर्वांना सरसकट फांशी!

अिंग्लिश सैन्य दिल्लीजवळच अलीपूर येथें आल्याचें समजतांच क्रांतिकारक सैन्यहि दिल्लींतून बाहेर पडलें, आणि बुंदेलकी सराअी येथें त्यांनीं अिंग्लिशांशीं सामना दिला. या वेळीं गुरख्यांच्या आणि शीखांच्या पलटणी त्यांचे साहाय्याला आल्यामुळें अिंग्रजांचें सैन्य चांगलें सुसज्ज होतें. अुलट क्रांतिकारकांच्या बाजूला खऱ्या सैनिकांपेक्षां बाजारबुणग्यांचीच भरती अधिक होती. तरीहि या लढाअींत दिल्लीचा तोफखाना अितका जोरदार ठरला कीं, त्यापुढें अिंग्लिशांचा तोफखाना पंगु ठरला. तेव्हां अिंग्रज सैन्यानें तोफखान्यावरच चाल केली. तरीहि क्रांतिकारक अेक गहूभरहि मागें सरकले नाहींत. अिंग्लिशांच्या संगिनी शरीरांत आरपार घुसेपर्यंत ते जाग्यावरून न हालतां स्वधर्म आणि स्वराज्य यांकरितां झुंजत अुभे होते. परंतु या वीरांना यश आलें नाहीं. कारण तोफेच्या पहिल्या गडगडाटासरशीं त्यांच्या सेनापतीनें युद्धांतून पलायन केलें होतें! शेवटीं लढून थकलेलें हें सैन्य, पराजय खाअून पांगलेल्या स्थितींत दिल्लींत परत आलें. त्यामुळें अिंग्रजांना प्रत्यक्ष दिल्लीवर चढाअी करतां येअील अशी सोयीस्कर रणभूमि मिळाली. बुंदेलकी सराअीची लढाअी अिंग्रजांनीं गुरख्यांच्या साहाय्यानेंच जिंकली.

८ जूनला संध्याकाळीं, अिंग्रजी सैन्याचा वेढा दिल्लीच्या तटाभोंवतीं पडला.

शीखांचें साम्राज्य नष्ट झाल्यावर पंजाब प्रांत जेव्हां अिंग्रजांच्या हातीं पडला तेव्हां तेथील शीखांच्या शौर्यगुणाची खच्ची करून टाकण्यासाठीं अिंग्रजांनीं अशी कांहीं कारवाअी केली कीं, त्यामुळें शीखांना केवळ शेतीचाच अुद्योग करून जगणें भाग पडलें. राष्ट्रांतील लोक जसजसे शेतीप्रधान होअूं लागतात तसतशी त्यांची लढाअू वृत्तीहि कमी कमी होअूं लागते असा अनुभव आहे. त्यांना शांततेचा काळच आवडूं लागतो. आपल्या शेतीचे अुद्योग खोळंबतील म्हणून ते क्रांति किंवा युद्धें ह्यात भाग घेण्यास पुढें येअीनासे होतात. याच

दृष्टीनें बहुसंख्य शीख समाज आपल्या तरवारी विसरून हातीं नांगर धरून बसला होता. आणि ज्या थोड्या शीखांच्या हातीं अद्याप शस्त्र होतें त्यांनीं तें आपल्याच लोकांवर चालविण्यासाठीं अिंग्रजांच्या पायांवर वाहिलें होतें. त्यामुळें पंजाबमध्यें क्रांतीची विशेष अशी कांहींच गडबड झाली नाहीं. त्यामुळें अिंग्रजांना तें आयतें बरेंच झालें.

३० मेच्या सकाळीं, सर जॉन लॉरेन्सच्या सल्ल्यानें रॉबर्ट मॉंटगॉमेरीनें, लाहोरजवळच्या मियांमीर येथील छावणींतील सैनिकांचीं शस्त्रे काढून घेतलीं; व लाहोरचा किल्लाहि अेक अिंग्लिश पलटण पाठवून आपल्या ताब्यांत घेतला. वास्तविक मियांमीरचे शिपाअी लाहोरवर चालून जाअून तेथील किल्ला केव्हां सर करतात याची वाट पेशावर, अमृतसर, पिल्हुर, जालंदर येथील हिंदी शिपायांच्या तुकड्या मोठ्या आतुरतेनें पाहात होत्या. परंतु मियांमीरच्या तुकडीची बातमी समजतांच इतर ठिकाणचे शिपाअीहि आपोआप गारठले; आणि त्यामुळें पंजाबांत सर्व सामसूम झालें. या परिस्थितीचा फायदा घेअून सर जॉन लॉरेन्सनें दिल्लीच्या वेढ्याकरितां आपल्या प्रांतांतील तुकड्या निर्धोकपणें पाठवून दिल्या.

ज्या शीखांनीं पुरीं शंभर वर्षे मुसलमानांशीं अतिशय कडवट लढा दिला, त्याच शीखांनीं अिंग्रज हा आपला शत्रु आहे हें पुरतेपणीं मुळीं ओळखलेंच नाहीं. आणि हें न समजल्यामुळेंच त्यांनीं हिंदुस्थानच्या क्रांतियुद्धांत देशाचे शत्रु असलेल्या अिंग्रजालाच साहाय्य दिलें. १८५७ चा काळच असा कांहीं क्रांतीचा होता कीं, त्या वेळीं पूर्वीचीं वैरें, मतभेद, सर्व कांहीं विसरून सबंध भारतीय राष्ट्र अेका अैक्यगंगेत मिसळून अेकजीव होत चाललें होतें. कारण अिंग्रजांच्या पारतंत्र्याच्या वरवंट्याखालीं सर्वजण सारखेच चिरडले जात असल्यामुळें हिंदुस्थानांतील दुहीहि पार ठेचून गेली व अिंग्रजांची जुलमी राजसत्ता अुलथून पाडण्यासाठीं सर्वजण अेकत्र आले. परंतु शीख व जाट यांनीं अिंग्रजांशींच सलगी जोडली. त्यामुळें या सर्व क्रांतींतून जें अेक सर्वांचेंच संयुक्त भारतीय राष्ट्र निर्माण होणार होतें, तेंच मुळींच अशक्य होअून बसलें.

शीखांचा मुसलमानांविषयींचा द्वेष अधिकच भडकवून देण्याला अिंग्रजांनीं अेक नवीनच दुष्ट युक्ति काढली. शीखांमध्यें अशी अेक जुनी भविष्यवाणी होती कीं, "ज्या ठिकाणीं मुसलमान बादशाहांनीं शीखांच्या गुरूंना ठार मारलें

त्याच दिल्लीची आणि त्या मोगल तख्ताची खालसा शीख हे राखरांगोळी अुडवितील." अिंग्रजांनीं शीखांना या भविष्यवाणीची आठवण करून देअून सांगितलें कीं, 'ती भविष्यवाणी खरी ठरण्याची वेळ आतां आली आहे.' परंतु गंमत अशी कीं, या भविष्यवाणीप्रमाणें जरी दिल्लीचें सिंहासन खरोखरच धुळीला मिळालें तरी त्या वेळीं अिंग्रज हेच त्या दिल्लीचे राजे झाले. शीख गुलाम ते गुलामच राहिले. पण शीखांच्या लक्षांत अिंग्रजांचा हा कावा मुळींच आला नाहीं.

हिंदुस्थानच्या सीमेवरील रानटी क्रूर टोळया आपणांविरुद्ध अुठूं नयेत म्हणून त्यांना लांचलुचपत देअून अिंग्रजांनीं आपल्या सैन्यांत भरती करून घेतलें, व क्रांतिकारकांचेंच अुलट पारिपत्य करण्याकरितां त्यांच्या फिरत्या पलटणी बनविल्या. त्यामुळें अुठावणी न होण्याच्या दृष्टीनें पंजाब आपोआपच सुरक्षित झाला.

पेशावरच्या शिपायांना निःशस्त्र केल्यानंतर होतिमर्दन येथील ५५ व्या तुकडीलाहि निःशस्त्र करण्याची आज्ञा सुटली. हें कळतांच होतिमर्दनच्या शूर शिपायांनीं 'आम्ही लढत लढत मरणार' असा निर्धार बोलून दाखवून अुठावणी केली. शेकडों शिपाअी या लढाअींत मारले गेले. निकलसन्‌नें त्यांचा भयंकर पाठलाग केल्यामुळें त्यांच्यापैकीं काहीं सीमाप्रांतापलीकडे पळून गेले. परंतु सरहद्दीवरच्या मुसलमान टोळयानीं त्याचा छळ आरंभून त्यांना धर्मांतर करावयास लावलें. शेवटीं हे अुपासानें, थंडीनें हैराण झालेले शिपाअी काश्मीरच्या हिंदु राजाकडे आश्रय मागण्यासाटीं आले.

परंतु काश्मीरच्या राजानें त्यांना आपल्या राज्यांत पाअूलहि घालूं दिलें तर नाहींच, पण त्याना दिसल्यास ठार मारण्याची आज्ञा आपल्या सैन्याला दिली. या क्रांतिकारक शिपायांची, जेथें सांपडतील तेथें, अिंग्रजांनीं क्रूर कत्तल केली, व राहिलेल्यांना सरसहा फांशीं दिलें. या क्रातिकारकांच्या स्वाभिमानाचें कौतुक म्हणून अिंग्लिश अितिहासकार लिहितो कीं, "'आपणास कुत्र्यासारखें फांसाला लोंबकळून मारू नका, वीराप्रमाणें तोफेच्या तोडीं बांधून मारा' अशी विनंती हे वीर स्वतः आपण होऊन आपल्या मारेकरी अिंग्रजांना करीत!"

क्रांतिकारकांनीं अिंग्रजांच्या ज्या कांहीं थोडया कत्तली केल्या त्यांचीं भडक

वर्णनें रंगविणारे अिंग्रज अितिहासकार अिंग्लिशांनीं केलेल्या अत्याचारांविषयीं व क्रूर कत्तलींविषयीं अेक अक्षरहि लिहीत नाहींत. 'के' हा ग्रंथकार तर स्वच्छच सांगतो कीं, " अिंग्रजांच्या क्रूर कृत्यांचा भरपूर पुरावा देणारे शेकडोंशः कागद-पत्र जरी मजजवळ असले तरी, त्यांतलें जगाला कांहींच समजूं नये म्हणून त्यासंबंधीं मी अेक अक्षरहि बोलणार नाहीं!"

वाहवा! हा खरा अितिहासकार!

कलकत्त्याच्या अंधारकोठडीची गप्प अिंग्रजांनींच खोटेपणानें व दुष्टपणानें पिकवली होती. पण अज्नाल्याला मात्र याच अिंग्रजांनीं खरी अंधारकोठडी (ब्लॅक होल) काय असते हें जगाला चांगल्या रीतीनें दाखविलें. बंड करून पळून गेलेल्या २८२ शिपायांना कूपरनें अज्नाल्याला पकडून आणलें व कोठडींत कोंडून ठेवलें. त्यांपैकीं २१६ लोकांना त्यानें गोळ्या घालून ठार मारलें, व राहिलेल्या ६६ नाहि तो तसाच मारणार होता. परंतु कोठडीचीं दारें व खिडक्या पूर्ण बंद असल्यानें या ६६ पैकीं ४५ लोकांचीं केवळ प्रेतेंच हातीं लागलीं व राहिलेल्या २१ ना पुन्हा गोळ्या घालून ठार मारण्यांत आलें. हा प्रकार १ ऑगस्ट १८५७ ला घडला.

मीरतच्या अुठावणीनंतर जवळजवळ तीन आठवडे क्रांतीचे वारें थंड पडल्यामुळें त्याचा पुरा फायदा पंजाबमधील अिंग्रजी सत्तेनें करून घेतला. पंजाबमध्यें अिंग्रजी पलटणी असल्यामुळें, तेथील सर्व हिंदी शिपायांचीं त्यांनीं तत्काळ हत्यारें काढून घेतलीं व क्रांतिकारक शिपायांचा व जनतेचाहि पुरेपूर बंदोबस्त केला. शीख संस्थानिक आणि शीख जमातहि त्यांच्याच बाजूला असल्यामुळें पंजाब संपूर्ण सुरक्षित झाला आणि म्हणूनच त्यांना अिंग्रजी सैन्यें दिल्लीला पाठवितां आली. सारांश, शीखांच्या देशद्रोहामुळें व मीरतच्या आकस्मिक अुठावणीमुळें पंजाबमधील क्रांतीचीं पाळेंमुळेंच अुखडून टाकल्या-सारखें झालें. आणि पंजाब म्हणजे दिल्लीचा कणाच असल्यानें दिल्लीचे क्रांतिकारकहि पंजाबच्या बातमीनें खचले.

तरी पण याहि कठीण परिस्थितींतून क्रांतीच्या ज्वाळा पुनः वाढत्या जोरानें भडकून अुठल्या. कारण ठराविक नियमांनीं क्रांति थोडीच चालते? क्रांति म्हणजे कांहीं घड्याळाप्रमाणें बिनचूक चालणारें यंत्र नव्हे! तिच्या प्रगतीची अेक

स्वतंत्रच तऱ्हा असते. क्रांतीच्या खुणेचा शब्द अेकच असतो आणि तो म्हणजे "थांबूं नका!" "सारखे पुढें रेटा!!" केव्हां केव्हां अगदीं नवीन आणि अनपेक्षित गोष्टीच क्रांतींत घडतात, पण तरी कोणी थांबतां कामा नये.

क्रांति हा अेक विलक्षण पक्षी आहे. पिंजऱ्यांतून बाहेर सुटतांच हा पक्षी प्रथम मोकाटपणें भराऱ्या घेत आकाशांत हिंडतो. या पक्ष्याच्या पाठीवर बसणाऱ्यांनीं या वेळीं आपली बैठक त्याच्या पाठीवर पक्की रोवली पाहिजे. अेकदां या पक्ष्याच्या पहिल्या मोकाट भराऱ्या संपल्या, कीं मग मात्र तो पक्षी संथपणानें आकाशांत फिरूं लागतो. आणि मग त्याच्या पाठीवर आतांपर्यंत टिकून राहिलेले स्वारच तेवढे त्याला वाटेल तसा फिरवूं शकतात. मीरतच्या लोकांनीं या पक्ष्याला ठरल्या वेळेच्या आधींच पिंजऱ्यांतून सोडलें. तरीहि नानासाहेब, लक्ष्मीबाई इत्यादि पुढाऱ्यांनीं त्याची पाठ पकडलीच.

परंतु अितरांनीं त्याला तसें घट्ट न पकडल्यामुळें तो तसाच आकाशांत उडून गेला, व शेवटीं क्रांति अयशस्वी झाली!

♣ ♣ ♣

# ३ बनारस आणि अलाहाबाद

दिल्लीच्या खालीं अलिगड अथें ९ वी हिंदी पायदळी तुकडी होती. बोलंदच्या सैन्यांत क्रांतीचा प्रसार करण्याच्या आरोपावरून अिंग्रजांनीं अेका ब्राह्मणाला अलिगडला फांशीं दिलें. त्या ब्राह्मणाचें फांसावर लटकणारें प्रेत पाहून शिपायांनीं अिंग्रजांविरुद्ध आपल्या तरवारी अुपसल्या. ‘ज्यांना प्राण वांचवावयाचे असतील त्यांनीं रातोरात अलिगड सोडून चालूं लागावें’ अशी सूचना त्यांनीं तेथील अिंग्रजांना दिली. त्याप्रमाणें सर्व अिंग्लिश अधिकारी, बायकामुलें अलिगड सोडून चालते झाले व अलिगड स्वतंत्र झालें. अलिगडप्रमाणें बोलंद, मिनपूर, अिटावा येथील शिपाअीहि उठले. अुठावणी करून अिंग्रजांना जीवदान देणें व शस्त्रास्त्रे आणि धान्यसामग्री घेअून दिल्लीकडे विजयानें चालूं लागणें हाच ठराविक आणि यशस्वी कार्यक्रम सगळीकडे यथासांग पार पाडण्यांत आला. अिटाव्याचा कलेक्टर मि. ह्यूम (आजच्या कॉंग्रेसचा संस्थापक) हिंदी स्त्रीच्या वेषांत पळून गेला. अजमीरपासून १२ मैलांवर असलेल्या नासिराबादचीहि ३० वी हिंदी पायदळी तुकडी अुठली. तेथील अिंग्रजांचीं घरेंदारें पेटवून देण्यांत आलीं व आपलीं शस्त्रें पाजळीत शिपाअी दिल्लीकडे चालते झाले.

बरेली हें रोहिलखंडच्या राजधानीचें नगर. अिंग्रजांनीं हा प्रांत रोहिले-पठाणांकडून बळकावून घेतला होता. बरेलीमध्यें ८ वें फालतू घोडदळ, १८ वी आणि ६८ वी या दोन पायदळी तुकड्या आणि हिंदी तोफखान्याचें एक पथक अितकें सैन्य होतें. दिल्ली स्वतंत्र झाल्यावर बादशाहाच्या सरसेनापतीनें बरेलीच्या सेनापतीला अुठावणी करून दिल्लीला सर्व सैन्यासह येण्याविषयीं मोठ्या आग्रहाची विनंती केली होती. त्यानें लिहिलें होतें कीं, “अशा आणीबाणीचे वेळीं तुम्ही जेवीत असाल तर हात धुवायला दिल्लीस या. तत्काळ निघा.”

हाफिज रहमतच्या वंशांतील रोहिल्यांचा शेवटचा नायक खान बहाद्दुरखान हा गुप्त क्रांतिकारक संस्थेचें जाळें बरेलींत विणण्यांत गढलेला होता. तो अिंग्लिशांच्या न्यायाधीशाचें काम करीत होता. ३० मेपर्यंत बरेलींत संपूर्ण

शांतता आणि शिस्त होती. अिंग्रजांनींहि आपल्या हातांखालील शिपायांच्या राजनिष्ठेचें कौतुक केलें. ३१ मेचा दिवस शेवटीं अुजाडला. तरीसुद्धां दिवसभर सर्व व्यवहार सुरळीत चालले होते.

परंतु रात्रीं ११ चे ठोके पडतांच शिपायांच्या सैनिक तळावरून तोफांचा गडगडाट अैकूं आला. बरेलीची अुठावणी अितक्या बारकाअीनें आंखण्यांत आली होती कीं, कोणीं कोणत्या अिंग्रजाला मारावयाचें हेंहि आधींच ठरवून दिलेलें होतें. अवघ्या सहा तासांत बरेलीमध्यें अिंग्रजांची राजसत्ता संपुष्टांत आली.

बादशाहाचा सुभेदार या नात्यानें रोहिलखंडाचा अधिपति म्हणून जनतेनें खान बहाद्दुरखानाचा जयजयकार केला. सुभेदार बख्तखान यानें सैन्याचें आधिपत्य स्वीकारलें. बहाद्दुरखानानें अिंग्रज बंद्यांना आरोपींच्या पिंजऱ्यांत अुभे करून त्यांना राजद्रोहाचे आरोपी ठरवून फांशीं दिलें! बरेलीप्रमाणेंच शहाजहानपूर, मुरादाबाद, बदाअूं या गांवांतूनहि सैनिक, पोलिस आणि नागरिक यानीं अवघ्या कांहीं तासांचे अवधींत तेथील अिंग्रजी राजसत्तेचा धुव्वा अुडविला आणि त्या ठिकाणीं स्वदेशी राजसत्ता स्थापिली.

आतां राज्यकर्त्यांची भूमिका हिंदुस्थाननें घेतली होती आणि आरोपीच्या पिंजऱ्यांत आज अिंग्लंडला अुभें करण्यांत आलें होतें. आश्चर्य हें कीं, रक्ताचा अेक थेंबसुद्धां न सांडतां सबंध रोहिलखंड स्वतंत्र झाला! स्वतः बहाद्दुरखानानें रोहिलखंडाची बातमी बादशाहाला पाठवून दिली व सर्व जनतेकरितां त्यानें अेक घोषणाहि प्रसिद्ध केली. त्यांत त्यानें हिंदुमुसलमानांना अेकत्र येअून लढण्यास विनंति केली होती आणि हिंदूंच्या भावना दुखविल्या जाअूं नयेत म्हणून गोवधहि बंद केला जाअील असें आश्वासन त्यानें हिंदूंना दिलें होतें.

अझिमगड हें ठिकाण बनारसपासून ६० मैलांच्या अंतरावर असून त्या ठिकाणीं १७ वी हिंदी तुकडी तळ ठोकून होती. मे ३१ पासूनच या तुकडींत क्रांतीच्या गर्जना अुसळून राहिल्या होत्या. ३ जूनच्या संध्याकाळीं अेकदम सगळीकडे धावाधाव चालू झाली. "शिपाअी अुठले आहेत!" ही कुजबुज नुसती ओझरती अैकून मीरतचें चित्र डोळ्यांपुढें येअून गोरा तेवढा सारा आपला प्यारा जीव बचावण्यासाठीं पळत सुटला. अधिकारी, स्त्रिया आणि मुलें यांनीं तर जिवाची आशाच सोडली. त्या हतभागी बापड्यांची ती केविलवाणी स्थिति पाहून

शिपायांनींहि सूडाचे विचार डोक्यांतून काढून टाकून अिंग्रजांना अझिमगड सोडून जाण्यास मोकळीक दिली. अितकेंच नव्हे तर गाड्या आणून देअून, इंग्रज स्त्री-पुरुषांना त्यांत बसवून व कांहीं शिपायांचें संरक्षण बरोबर देअून, त्यांनीं त्यांची बनारसकडे पाठवणी केली. शिपायांनीं अझिमगडचा ७ लाखाचा खजिना व दारूगोळ्याचें कोठार हस्तगत करून विजयानंदानें ते फैजबादेकडे चालते झाले.

अझिमगड स्वतंत्र झाल्याची बातमी बनारसला ४ जूनला येअून पोंचली व त्याच दिवशीं तेथील शिपायांना निःशस्त्र करण्याचें ठरविण्यांत आलें. त्याकरितां अिंग्रजांनीं तोफखाना सज्ज ठेअून संचलनाच्या (परेड ग्राअुंड) माळावर शिपायांना दुपारीं बोलावलें. परंतु शिपायांनीं हा डाव ओळखून तेथील दारू-कोठारावरच हल्ला चढविला. या वेळीं तेथील शीख पलटणींनीं अिंग्रजांच्याच बाजूनें आपल्या देशबांधवांविरुद्ध पराक्रम गाजविला! राज्याला मुकलेल्या शीखांच्या राणीचें मौल्यवान जडजवाहिरहि अिंग्लिश खजिन्याबरोबर शीखांच्या पहाऱ्यांत होतें! तें शीखांना सहज परत मिळवितां आलें असतें. परंतु राजनिष्ठ शीखांनीं तो सर्व खजिना अिंग्रजांच्या पहाऱ्याकडे सोपवून दिला. काशीच्या राजानेंहि अिंग्रजांनाच तनमनधन अर्पून साहाय्य केलें. त्यामुळें शिपाअी तोफखान्याची आग चुकवीत माघार घेअून साऱ्या प्रांतभर पांगले.

जवानपूरला भेटेल त्या अिंग्रजाला ठार करण्याची प्रत्येकानें प्रतिज्ञाच घेतली होती. अेक वृद्ध डेप्युटी कलेक्टर रस्त्यानें चालला असतां कांहीं स्वार त्याला मारण्याकरितां धावले. तेव्हां कोणी तरी 'तो म्हातारा आहे, सोडा त्याला!' अशी विनंती केली. तेव्हां शिपायांनीं अुत्तर दिलें, "नाहीं, तो अिंग्रज आहे ना! मग त्यानें मेलें हें पाहिजेच!!" तत्काळ त्याला कंठस्नान घालण्यांत आलें. जवानपूरचा खजिना लुटून शिपाअी दिल्लीच्या रोखानें तडक निघाले.

दुर्दैवानें प्रांताची राजधानी बनारस ही शिपायांच्या हातीं राहिली नाहीं. तरी त्यामुळें खचून न जातां त्यांनीं प्रांतांत अितर ठिकाणीं पांगून अुठावण्या केल्या. प्रांताचें मुख्य ठिकाण शत्रूच्या हातीं पडल्यामुळें क्रांतीचा जोर अितरत्र मंदावतो हा नियम त्यांनीं खोटा पाडला. मॅझिनीनें म्हटल्याप्रमाणें "जेथें आपला झेंडा फडकतो, तेंच आपल्या राजधानीचें ठिकाण!" याचें बरोबर प्रत्यंतर शिपायांनीं या वेळीं आणून दिलें. बनारस प्रांतांतल्या अुठावणींत क्रांतिकारकांनीं

अिंग्रजांची कत्तल केली नाहीं. एकाहि अिंग्लिश स्त्रीला मारलें नाहीं, इतकेंच काय पण स्वतः गाड्या जुंपून त्यांनीं अिंग्रजांची सुखरूपपणें पाठवणी करून दिली. परंतु शिपायांच्या अुठावणीचा सूड घेण्यासाठीं जनरल नीलनें जे अत्याचार बनारस प्रांतांत केले ते वाचल्यावर अंगावर शहारेच येतील.

नीलचे सैनिक खेड्यांतून शिरत. त्यांना जो कोणी भेटेल त्याला ते एक कापीत तरी, नाहीं तर फाशीं देत. फांसाचे खांब कमी पडल्यामुळें अिंग्रजांनीं लोकांना झाडांच्या फांद्याफांद्यांना टांगून फांशीं देण्याचा सपाटा चालविला. फांशीं द्यावयाच्या माणसाला हत्तीवर बसवून त्याच्या गळ्यांतील दोर झाडाच्या फांदीला आवळून, खालून हत्ती काढून घ्यावयाचा, कीं तत्काळ त्या मनुष्याची जीभ हिसडली जाअून त्याचें प्रेत फांदीला लोंबकळूं लागावयाचें! अिंग्रज सोल्जर यांतहि आणखी थोडी क्रूर विनोदाची मजा लुटीत. अिंग्रजी 8 व 9 च्या आंकड्यांप्रमाणें लोंबकळणाऱ्या प्रेतांची आकृति दिसावी अशा कौशल्यानें ते फांद्यांवर प्रेतें टांगून ठेवीत!

खेडींच्या खेडीं पेटवून देअून त्यांत गरीब शेतकऱ्यांना जाळून काढण्याचीहि अिंग्रज सैनिकांना अेक करमणूकच वाटे. अेक सोल्जर लिहितो, "माणसांनीं गजबजलेल्या खेड्याला आम्ही आगी लावून देत असूं. त्या वेळीं सबंध खेड्याला आमचा वेढा असे. आगींतून बाहेर पडण्यासाठीं धडपडत कोणी बाहेर पडूं लागला तर आम्ही त्यास गोळ्या घालून ठार करीत होतों." अशीं असंख्य खेडीं अिंग्रजांनीं अक्षरशः भाजून काढलीं!

जून ५ ला बनारसची बातमी अलाहाबादला येअून पोंचली. अलाहाबादला असलेली ६ वी तुकडी म्हणजे अिंग्रजांना राजनिष्ठेचा मूर्तिमंत अवतार वाटे. परंतु तीच तुकडी पहिल्यानें अुठली. युद्धाच्या दृष्टीनें अलाहाबादला असलेला बळकट किल्ला अतिशय महत्त्वाचा मानला जाअी. कलकत्त्यापासून पंजाबकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्यांचें अलाहाबाद हें नाक असल्यामुळें क्रांतिकारकांनीं तो किल्ला हातीं घेण्याचें ठरविलें. परंतु किल्ल्यांत असलेल्या देशद्रोही शीखांनीं विश्वासघात केला. अलाहाबादला अुठावणी झाल्याचें कळतांच जनरल नील बनारसहून ससैन्य निघाला व राजनिष्ठ शीखांच्या साहाय्यानें त्यानें अलाहाबादचा किल्ला हातीं घेतला.

परंतु अलाहाबादनें झुज थांबविली नाहीं. शेतकरी, तालुकदार, वृद्ध स्त्री-पुरुष—सारे प्रतिकाराला अुभे राहिले. प्रांतांतील सर्व खेड्यांतूनहि प्रतिकार चालू झाला. १८५७ च्या क्रांतीचा विशेष हा कीं, आतांपर्यंत कोणत्याहि राजकीय आंदोलनांत भाग न घेतलेल्या शेतकऱ्यानींहि यात प्रामुख्यानें भाग घेतला होता. हिंदुस्थानच्या अितिहासांत अशा प्रकारची, अितकी थरारक, अितकी वेगवान् आणि अितकी देशव्यापी अशी दुसरी क्रांतीच सापडणें अशक्य आहे.

तत्त्वाकरितां लढलें गेलेलें हें युद्ध होतें. अिंग्रजांना काहींहि मिळूं द्यावयाचें नाहीं असें ठरवून त्यांनीं अिंग्रजांवर सशस्त्र बहिष्कार टाकला. अेका पाव-वाल्यानें साहेबाला पाव विकले म्हणून त्याचे हात तोडण्यांत आले. या सशस्त्र बहिष्कारामुळें अिंग्रजांना गाड्या-बैल, औषधपाणी, धान्यधुन्य कांहींहि मिळेनासें झालें. अुन्हाळा तर मी म्हणत होता. हिंदुस्थानांतील नुसत्या प्रखर अुन्हानें अिंग्रज भाजून मरावा, हाच मुळीं भर जूनमध्यें अुठावणी करण्याचा अुद्देश होता. तेव्हां अशा प्रकारच्या अुन्हाळ्यांत आणि अुपासमारींत जुलै १ पर्यंत नीलसारख्या दणकेबाज सेनापतीलाहि अलाहाबादेंतच अडकून पडावें लागलें.

परंतु याचा भयंकर सूड नीलनें अलाहाबादेंत घेतला. १२–१४ वर्षांचीं चिमुरडीं पोरें क्रांतीचें निशाण घेअून अेक लुटुपुटीची मिरवणूक काढीत गल्लीं-तून चालली होतीं. त्या सर्व लहान बालकांना पकडून नीलनें गोळ्या घालून ठार मारलें. नीलनें म्हातारा म्हणून कोणाची गय केली नाहीं. तरुण आणि पोर काय, पण पाळण्यांतलें आणि आअीच्या मांडीवरचें पितें मूलसुद्धां त्यानें जिवंत सोडलें नाहीं! अितका भयंकर सूड त्यानें घेतला. अिंग्रज अितिहास-कार 'के' यानेंच लिहिलें आहे कीं, "नीलनें अलाहाबादेंत ६ हजार लोकांना ठार मारलें. शेकडों स्त्रिया, कोवळया बालिका, माता, मुली यांना त्यांची साधी मोजदादसुद्धां न करता नीलनें जिवंत जाळून काढलें!"

आणि हे सर्व अत्याचार नीलनें लोकांच्या कोणत्या अपराधाकरितां केले, तर स्वदेशाच्या स्वातंत्र्याकरितां लोक कांहींहि सहन करायला सिद्ध झाले होते याच अपराधाकरितां!

५७ च्या क्रांतींत सबंध हिंदुस्थानांत जितकीं अिंग्रज बायकामुलें मारलीं

गेलीं, तितकीं मुलेंमाणसें एकट्या नीलनें अलाहाबादेंत मारलीं; आणि असले कित्येक नील हिंदुस्थानांत असल्या किती तरी कत्तली करीत फिरत होते. मारलेल्या प्रत्येक अिंग्रजाकरितां अुभे खेडेंच्या खेडें जाळून काढण्यात आलें! या गोष्टी अीश्वर कधींहि विसरणार नाहीं आणि आम्ही तर नाहींच नाहीं!

परंतु याविषयीं नील स्वतः लिहितो, "मी जरा जास्त क्रूरपणानें वागलों, पण मीं जें कांहीं केलें तें माझ्या देशाच्या कल्याणासाठींच केलें!" देशभक्तीची अिंग्लंडची व्याख्या ही खरोखर असामान्यच आहे!

♣ ♣ ♣

# ४ कानपूर आणि झांशी

१८५७ च्या क्रांतीच्या मूळ कल्पनेचा जन्म ब्रह्मावर्ताच्या राजवाड्यांतच पहिल्यानें झाला; आणि या क्रांतीला जो प्रचंड आकार येत चालला होता त्याच्याहि मागें ब्रह्मावर्ताच्याच राजवाड्यांतील कर्ती पुढारी मंडळी होती; व याच सर्व पुढाऱ्यांचा मेळावा आतां तेथें पुढील विचारविनिमय करण्यासाठीं जमला होता. त्यांत नानासाहेब, रावसाहेब (नानांचे पुतणे), बाबासाहेब (नानांचे बंधु) अझीमुल्लाखान, झांशीची बिजली महाराणी लक्ष्मी, ही मंडळी प्रामुख्यानें दिसत होती. पण अजून अेका वीर पुढाऱ्याची आपणांला ओळख झालेली नाहीं. तो वीर म्हणजे प्रख्यात मराठा तात्या टोपे! शिवरायाच्या परंपरेंत कसलेला हाच तो मराठ्यांचा शेवटचा झुंझार सेनापति! तात्या टोपेचा जन्म १८१४ तला. ब्रह्मावर्तास बाजीरावाच्या पदरीं याचे वडील पांडुरंगराव भट हे धर्मादाय खात्याचे अधिकारी म्हणून काम करीत होते. तात्याचें मूळ नांव रघुनाथ. नाना, तात्या, लक्ष्मी या तीनहि मुलांनीं आपलें बालपण अेकमेकांशीं लुटुपुटीचे खेळ खेळत, भारत-रामायणादि पुराणें वाचीत आणि शस्त्रास्त्रांचे पाठ घेत ब्रह्मावर्तालाच घालविलें.

कानपूर हें अिंग्लिशांचें अेक महत्त्वाचें सैनिकी ठाणें होतें. त्या ठिकाणीं पायदळ व घोडदळ मिळून तीन हजार हिंदी सैनिक होते. मीरतची बातमी अैकून १५ मेच्या सुमारास येथील सैन्यांतहि अेकच खळबळ अुसळून राहिली. मीरतची बातमी येथील अिंग्रज अधिकाऱ्यांना अुशिरां म्हणजे १८ मेला कळली. कारण दिल्लीचें तारायंत्राचें दळणवळण तोडलें गेलेलें होतें. आश्चर्याची गोष्ट ही कीं, तारायंत्र, आगगाड्या अित्यादि साधनें सुसज्ज असूनहि ज्या बातम्या अिंग्रजांना मिळत नसत त्या क्रांतिकारकांना कांहींहि साधनें नसतांनाहि त्यांच्या आधीं मिळत. कानपूरला अुठावणीच्या भाषा लोक अुघड बोलूं लागले.

बाजारामध्यें अेक अिंग्रज बाअी आपल्या नेहमींच्या ताठ्यांत चालली असतां तिला हटकून अेक माणूस तिजवर खेकसून म्हणाला, "बये, हा तुझा ताठा आतां पुरे! आतां यापुढें अिथल्याच नव्हे तर हिंदुस्थानच्याच बाजारांतून

तुम्हांला बाहेर हाकलून काढण्यांत येणार आहे, हें खूप समजून राहा!"

कानपूरला गडबड होणार हें ओळखून सर व्हीलरनें कानपूरचें रक्षण करण्यासाठीं ब्रह्मावर्ताच्या नानासाहेबालाच विनंती केली! वास्तविक याच नानाचें राज्य लुबाडून व त्याच्या वडिलांची ८ लक्षांची पेन्शन बंद करून अिंग्रजांनीं त्याला दुखविलें होतें. परंतु आज त्याच नानाचे पाय धरण्याची अिंग्रजांना पाळी आली. नानानेंहि श्री शिवाजीचा अितिहास नीट अभ्यासलेला असल्यानें, मराठी कावा लढवून तो दि. २२ ला बरोबर दोन तोफा, तीनशें शिपाअी, कांहीं पायदळ व घोडदळ घेअून कानपुरास गेला आणि अिंग्रजांच्या छावणींत तळ ठोकून राहिला. अिंग्लिशांनीं आपला खजिना रक्षणासाठीं नानाच्या स्वाधीन केला.

नाना जरी क्रांतीचा पहिला आणि प्रमुख नेता होता तरी अिंग्रजांना त्याच्याविषयीं अेवढासुद्धां संशय कधींच आला नाहीं. क्रांतीच्या सर्वच गोष्टी अितक्या गुप्त होत्या कीं, अिंग्लिशांनाच काय, परंतु प्रत्यक्ष क्रांतिकारकांनाहि त्यांची यत्किंचितहि कल्पना नव्हती. स्वातंत्र्य हें अेकच ध्येय व त्याकरितां सशस्त्र युद्ध हें अेकच साधन अेवढी गोष्ट मात्र सर्वांच्या हृदयांत पक्की बिंबलेली होती.

सर व्हीलरच्या साहाय्याला लखनौहून जेव्हां थोडें सैन्य येअून पोंचलें तेव्हां त्याचा जीव कांहींसा खालीं पडला. २४ मे हा अीदच्या सणाचा दिवस असल्यानें त्या दिवशीं कांहीं गडबड होअील म्हणून अिंग्रजांना वाटत होतें. परंतु अुठावणी होअील अशा अंदाजानें शत्रु जेव्हां सावध असतो तेव्हां अुठावणी करण्याअितके क्रांतिकारक पुढारी मूर्ख नव्हते. शत्रु असावध असतांनाच क्रांतीचा धडाका अुडविण्यांत खरें यश असतें.

याच वेळीं अेका अिंग्रज सोल्जरनें दारूच्या धुंदींत एका शिपायाला गोळी घालून ठार केलें. परंतु गोळी आपोआप उडली अशी सारवासारवी करून न्यायाधीशानें त्याला निर्दोषी म्हणून सोडून दिलें.

तेव्हां सर्व शिपाअी आपापल्यांत कुजबुजूं लागले, " ठीक आहे, आमच्याहि बंदुका आपोआपच अुडतील म्हणावें!" जेव्हां शिपाअी अेकमेकाना भेटत तेव्हां 'रामराम' म्हणण्याचें सोडून " ठीक आहे, आमच्याहि बंदुका आपोआपच अुडणार आहेत, नाहीं का?" हाच भेटीचा 'रामराम' सगळीकडे त्यांनीं चालू केला!

जून ४ ला रात्रीं या सगळ्या असंतोषाचा स्फोट होअून क्रांतीच्या ज्वाळांत कानपूर पेटूं लागलें. सर्व शिपाअी, सुभेदार टिक्कासिंगाच्या नेतृत्वाखालीं अुठले. अिंग्रजांचे बंगले पेटवून देण्याचे नेहमींचे कार्यक्रम पार पडल्यानंतर, हे तीन हजार शिपाअी श्रीमंत नानासाहेबांचें दर्शन घेण्यासाठीं नबाबगंज येथें आले. याच ठिकाणीं नानाच्या ताब्यांत आपला खजिना अिंग्रजानीं दिला होता. शिपाअी दिल्लीला न जातां कानपूरलाच राहिले हेंच फार चांगलें झालें. कारण सर्वांनींच दिल्लीमध्यें गोळा न होतां, अिंग्रजांना बाहेरच्या प्रांतांतहि शह देणें अवश्य होतें; आणि पुन्हा दिल्ली, पंजाब आणि कलकत्ता यांचें दळणवळणाचें केंद्रच कानपूर असल्यामुळें कानपूर क्रांतिकारकांच्या हातींच असणें महत्त्वाचें होतें. सर्व शिपायांनीं जयजयकार करून नानासाहेबालाच आपला 'राजा' म्हणून निवडलें. सुभेदार टिक्कासिंगाला 'सरसेनापति' नेमण्यांत आलें. आणि अशा रीतीनें नानाची राजवट चालू झाल्याचें दुंदुभी वाजवून घोषित करण्यांत आलें.

शिपाअी क्रांति करून दिल्लीला न जातां येथेंच थांबले आहेत असें अिंग्रजांना समजतांच, त्यांनीं नव्या बनविलेल्या सुरक्षित गढींत जाअून आश्रय घेतला. स्त्रिया, पुरुष व मुलें मिळून अेक हजार अिंग्रज तेथें होते. गढीवर चालून जाण्यासाठीं शिपाअी आतुर झाले होते. परंतु प्रत्यक्ष हल्ल्याच्या आधीं १२ तास नानानें आपण गढीवर हल्ला चढवीत असल्याची पूर्वसूचना सर व्हीलरला लखोटा पाठवून दिली. नानाच्या जागीं अिंग्रज असते तर त्यांनीं अितका मनाचा मोठेपणा मुळींच दाखविला नसता. नानाच्या क्रूरपणाचा खोटा आणि नीच प्रचार करणाऱ्या अिंग्रजांनीं त्याच्या या मनाच्या अुदारपणाविषयीं लाजेनें खरोखर मान खालींच घातली पाहिजे.

जून ६ ला सायंकाळपर्यंत अिंग्रजांच्या गढीला क्रांतिकारकांचा चौफेर वेढा बसला व गढीच्या तटावर तोफा डागण्यास प्रारंभ झाला. अिंग्रजांजवळ ८ तोफा असून किल्ल्यांत पुरलेला दारूगोळ्याचा सांठाहि त्यांच्याजवळ प्रचंड होता. क्रांतिकारकांकडेहि दारूगोळ्याची मुळींच टंचाअी नव्हती. भयंकर अुन्हाळा आणि त्यांत दोनच दिवसांत गढींतला पाण्याचा सांठा संपण्याची भीति निर्माण झाल्यामुळें अिंग्रजांची भयंकर दुर्दशा झाली. अिंग्रजांना अुन्हांत

भाजून मरण्याची पाळी आली. दुधाचे अभावीं पोरें मेलीं आणि त्याच्या दुःखानें आयांनीं प्राण सोडले. सर व्हीलरच्या मुलाचें डोकेंच स्फोटानें उडून गेलें व तो ठार झाला. अेका बॉंबच्या स्फोटानें सात स्त्रिया व दारूच्या धुंदींत हिंदी शिपायाला मारून निर्दोषी सुटलेला सोल्जर हे सर्व ठार झाले.

अशा रीतीनें शेवटीं शिपायांच्या बंदुकाहि आपोआपच अुडाल्या; आणि त्याहि अशा धडाक्यानें कीं, पुढच्या पिढीच्या अिंग्रज सोल्जरांनाहि ते दारूच्या धुंदींत असले तरी त्याचें विस्मरण न व्हावें!

लखनौ किंवा अलाहाबाद येथून साहाय्य येअील अशी अिंग्रजाना खूप आशा होती. परंतु क्रांतिकारकाचें हेरखातें इतकें दक्ष होतें कीं, अिंग्रजांना पत्रव्यवहार चालू ठेवणें अशक्य झालें. आतां नानाच्या हाताखालीं चार हजार सैन्य होतें. नानाच्या तोफखान्यांत अचूक नेम मारणारे म्हातारे शिपाअी होते. किल्ल्यांतील अिमारती पेटवून देण्यासाठीं ते तोफा डागीत होते. स्त्रिया आणि वृद्ध लोकहि तरुण सैनिकांना साहाय्य देण्यास येत होते. स्वदेशाची सेवा न करणें हें त्या वेळीं, तरुणांप्रमाणेंच तरुणींनाहि कमीपणाचें वाटे; आणि झनाना फेकून कानपूरच्या स्त्रियांनींहि रणभूमीकडे धाव घेतली होती. सौंदर्यतारका नर्तकी अझीजान घोड्यावर बसून रणांगणावर शिपायांना अुत्साह देत तळपत होती.

अशा रीतीनें युद्धाची धुमश्चक्री चालली असतानाहि अंतर्गत राज्यकारभारा-विषयींच्या सर्व बारीकसारीक गोष्टींची शिस्त लावून देण्याचा विचार करण्यांत नाना गुंतलेला होता. नानानें सर्वांना सारखा न्याय व संरक्षण मिळेल अशी व्यवस्था केली. चोरीसाठीं अेका अट्टल चोराचे व गाय मारली म्हणून एका मुसलमानाचे हात तोडून टाकण्याची शिक्षा देण्यांत आली होती.

अिंग्रजांच्या गढीवर अेकदम चौफेर हल्ला चढवून ती सर करण्यापेक्षां तोफांच्या माऱ्यानेंच शत्रूला घाअीला आणण्याचा क्रांतिकारकांचा बेत होता. परंतु आज २३ जूनचा दिवस असल्यानें इंग्रजांच्या गढीवर भयंकर हल्ला चढविण्याचा क्रांति-कारकांनीं बेत योजला. कारण १०० वर्षांपूर्वी याच २३ जूनच्या अशुभ दिवशीं भारतभूमीच्या स्वातंत्र्याचें मंगळसूत्र तुटून हिंदुस्थानमध्यें अिंग्रजाना फार मोठा विजय प्लासीला मिळालेला होता. त्या दिवसाचा सूड घेण्यासाठीं आज शंभर वर्षें अुलटलीं तरी हिंदुस्थान आसुसलेला होता. "आज आपण अेक तर स्वतंत्रता

तरी मिळवूं नाहीं तर मारीत मारीत मरून तरी जाअूं" अशा प्रतिज्ञा सर्वांनीं अेकत्र जमून केल्या. क्रांतिकारकांची ही चढाअी कांहीं फुकट गेली नाहीं. कारण २३ ला नाहीं तरी २५ ला मात्र अिंग्रजांनीं लढाई थांबवून शरण आल्याचें निशाण किल्ल्यावर अुभारलें. त्याबरोबर नानानेंहि 'शरण येतील त्यांना आपण अलाहाबादला सुखरूप नेअून पोचवूं' असा संदेश पत्रानें सर व्हीलरकडे धाडला. त्याप्रमाणें ज्वालाप्रसाद व अझीमुल्लाखान या दोघांनीं व्हीलरच्या माणसाकडून संधिपत्र (तह) लिहून घेतलें व स्वाक्षऱ्या केल्या. त्याच दिवशीं संध्याकाळीं अिंग्रजांनीं शस्त्रें खालीं ठेवलीं आणि सर्व तोफा नानासाहेबाच्या स्वाधीन केल्या.

त्याच रात्रीं तात्या टोपेनें धान्यधुन्य भरून, वर छपऱ्या बांधून ४० नावा गंगेच्या किनाऱ्यावर सुसज्ज करून ठेवल्या.

नानानें कानपूरला क्रांतीचें निशाण रोवल्याच्या बातम्या जेव्हां चहूंकडे पसरल्या तेव्हा बनारस, अलाहाबाद अित्यादि ठिकाणांहून हजारो क्रांतिकारक तेथें गोळा झाले होते. ज्याचीं घरेंदारें अिंग्रजानीं क्रूरपणानें आगी लावून भस्मसात् केलीं होतीं, ज्यांच्या बायका नि पाळण्यांतील मुलेंहि नीलनें जाळून टाकलीं होतीं, आणि ज्यांना अिंग्रजांच्या पारतंत्र्याचा अगदीं वीट आला होता असे लक्षावधि लोक क्रांतीच्या निशाणाखालीं कानपूरला गोळा होअून 'सूड सूड' म्हणून हलकल्लोळ अुसळवून देत होते. परंतु अिंग्रजांना अलाहाबादला सुखरूपपणें पोंचतें करून देण्यांत येणार असल्याचें जेव्हां त्यांना कळलें तेव्हां दातओठ खात ते आपापल्यांतच 'कत्तलीची' भाषा कुजबुजूं लागले.

अशा बिघडलेल्या परिस्थितींत शेवटीं २७ जूनचा दिवस अुगवला. सतीचौरा घाटावरून अिंग्रजांना बसवून द्यावयाचें होतें. घोडदळ, पायदळ व तोफखाना हें सारें घाटाभोवतीं फेर धरून सज्ज होतें. तात्या टोपे, अझीमुल्ला, बाळासाहेब हे अेका देवालयाच्या गच्चीवर अुभे होते. कानपूरचे हजारों नागरिकहि सकाळपासून गंगेवर गोळा झाले होते. शेवटीं किल्ल्यावरचें अिंग्रजांचें निशाण खालीं अुतरविण्यांत येअून अिंग्रजांचें सर्व लटांबर काहीं पालख्यांतून, कांहीं डोल्यांतून तर कांहीं पायीं असें गंगेच्या वाळवंटींत येअून पोंचलें. अिंग्रज पाण्यांतून चालत जाअून नावांवर चढले. सर्वत्र चूपचाप आणि शांत होतें. बहुतेक सर्व नावा भरून गेल्या.

नावा सोडण्याची खूण म्हणून हात हालवून तात्या टोपेनें सूचना दिली अितक्यांत बिगुलाचा कर्कश आवाज कानांवर येअून थडकला. त्यासरशीं बंदुका, तरवारी, कुकऱ्या, संगिनी, यांचा अेकच खणखणाट अुडाला. शिपायांनीं पाण्यात अुड्या घेतल्या व 'मारो फिरंगीको' याच आरोळ्यांनीं गंगाकिनार दणदणून गेला.

नावांना आगी लावून देण्यांत आल्यामुळें अिंग्रज बायकामुलांनीं गंगेंत अुड्या घेतल्या. त्यांच्यापैकीं कांहीं बुडलीं, कांहीं जळून मेलीं, तर कांहीं बंदुकींच्या गोळ्यांना बळी पडलीं. मांसाचे लचके, कापले छाटलेले शरीराचे अवयव आणि रक्ताचे पाट! हेंच दृश्य सगळीकडे दिसत होतें. सबंध भागीरथी लाल भडक होअून गेली.

या वेळीं सकाळचे १० वाजले होते. ब्रह्मावर्ताच्या राजवाड्यांत नानासाहेबाल जेव्हां ही बातमी कळली तेव्हां नानानें अशी खडसावून आज्ञा शिपायांन पाठविली कीं, "केवळ अिंग्रज पुरुषांना फार तर मारा, बायकामुलांना अेवढाहि त्रास देअू नका."

नानाची आज्ञा पोंचतांच १२५ बायकामुलांना पाण्याबाहेर सुखरूप काढण्यांत आलें व त्यांना सावदा कोठीकडे पाठवून दिलें. राहिलेल्या अिंग्रजांना ओळींत अुभे करून त्यांचीं डोकीं अुडवण्यांत आलीं. मरतांना बायबलमधल्या प्रार्थना म्हणण्याची मोकळीक त्यांना देण्यांत आली होती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अशा रीतीनें ७ जूनला कानपूरला जिवंत असलेल्या अेक हजार अिंग्रजांपैकीं अवघे ४०० पुरुष आणि १२५ बायकामुलें जून २८ ला वांचलेलीं दिसलीं. अिंग्रज बायकामुलांना नानाच्या तुरुंगांत फार चांगल्या प्रकारची वागणूक देण्यांत येत होती.

कानपूरच्या सामुदायिक कत्तलींतून अिंग्रज बायकामुलांना वांचविणाऱ्या नानानें आपल्या अुदारपणानें नील, रेनॉल्ड, हॅवेलॉक याना लाजेनें खालीं मान घालावयास लाविली आहे.

२८ जूनला सायंकाळीं ५ वाजतां नानासाहेबानें अेक मोठा दरबार भरविला. या वेळीं सर्व सैनिक, क्रांतिकारक स्वयंसैनिक, तोफखाना हे सर्व आपापलीं निशाणें फडकावीत गोळा झाले होते. क्रांतीचे पुढारी नानासाहेब, बहादुरशाह,

सेनापति तात्या टोपे यांच्या सन्मानासाठीं तोफांच्या सलाम्या झडल्या. कानपूरच्या विजयाकरितां आनंदीआनंद करण्यासाठीं म्हणून अेक लक्ष रुपये शिपायांत वांटण्यासाठीं देण्यांत आले.

कानपूरहून नाना ब्रह्मावर्तास आले; व १ जुलैला पेशव्यांच्या अैतिहासिक सिंहासनावर त्यांना समारंभानें राज्याभिषेक करण्यांत आला. मराठ्यांचें जें सिंहासन अिंग्रजांनीं रायगडावरून अुखडून टाकलें होतें, तें पुनः ब्रह्मावर्ताला अिंग्रजांच्या रक्तावरच प्रस्थापित करण्यांत आलें!

नानानें कानपूरला पेशव्यांच्या सिंहासनावर राज्याभिषेक करून घेतला त्या वेळीं त्याची बाळपणींची मैत्रीण 'छबेली' हीहि कांहीं स्वस्थ बसली नव्हती. तीहि 'झांशीची महाराणी' म्हणून आपल्या राज्याची स्वामिनी झाली होती. ४ जूनला झांशी येथें अुठावणी झाली. क्रांतिकारकांनीं ७ जूनला झांशीचा किल्ला सर करून क्रांतीचा झेंडा फडकाविला. अिंग्रजांनीं पांढरें निशाण अुभारलें व शरण येअून आपलीं हत्यारें खालीं ठेवली. ८ जूनला या सर्व बंदिवान अिंग्रजांची गांवांतून मिरवणूक काढण्यांत आली व जोगनबागेजवळ येतांच स्त्रिया, पुरुष, मुलें यांच्या तीन ओळी करून त्या सर्व अिंग्रज बंदिवानांचीं डोकीं अुडविण्यांत आलीं. सुमारें ७५ पुरुष, १२ स्त्रिया व २३ मुलें या प्रसंगीं ठार झालीं.

अशा रीतीनें झांशीला असलेल्या अिंग्रजांच्या राज्यावर वारसा सांगण्यास कोणी अिंग्रजच झांशींत न अुरल्यानें क्रांतिकारकांनीं (डलहौसीप्रमाणें!) अिंग्रजाकडे असलेलें झांशीचें राज्य खालसा करून त्यावर राणीची स्थापना केली, व महाराणी लक्ष्मीबाअीचें राज्य चालू झाल्याची घोषणा केली.

♣ ♣ ♣

# ५ अयोध्या

अयोध्या प्रांत डलहौसीनें खालसा करून टाकल्यापासून तेथील प्रजा दिवसें-दिवस अधिकाधिकच दुःखी होत गेली. सर्व वरिष्ठ जागांवर अिंग्रज अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यांत आल्या. नबाबाचें सैन्य नष्ट करण्यांत येअून त्याच्या सरदारांनाहि सरकारनें कंगाल बनविलें. शेतसाऱ्यांत वाढ झाल्यामुळें शेतकरीहि असंतुष्ट झाले. अयोध्येचे मोठमोठे जमीनदार रजपूत हिंदु होते. अिंग्रजांनीं त्यांना गोंजारून आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु या बाणेदार लोकांनीं अिंग्रजांस साफ सांगितलें कीं, "आम्हीं स्वराज्याचें अन्न खाल्लें आहे. परकीयांचे तुकडे चघळण्यास आम्ही केव्हांहि राजी नाहीं."

लोकांना गोडीगुलाबीनें वश करून घेण्यासाठीं सर हेन्री लॉरेन्सनें अयोध्येची राजधानी लखनौ येथें एक मोठा दरबार १२ मेला भरविला; व लांबलचक व्याख्यान देअून राजनिष्ठ शिपायांना तरवारी, शाली, पागोटीं देणग्या म्हणून दिल्या. परंतु १३ लाच मीरत अुठल्याची व १४ ला दिल्ली स्वतंत्र झाल्याची बातमी आली. त्यामुळें येथेंहि कांहीं गडबड झाली तर संरक्षणाच्या दृष्टीनें सर हेन्रीनें लखनौजवळ माचीभवन आणि रेसिडेन्सी येथें सर्व अिंग्रज बायका-मुलांना नेअून ठेविलें आणि पांढरपेशा अिंग्रजांचें अेक कामचलाअू सैन्यदल त्यानें निर्माण केलें. नेपाळच्या जंगबहादुराकडेहि त्यानें सैन्य पाठवून देण्या-साठीं विनंती केली.

मे ३० ला रात्रीं नअू वाजतां लखनौला ठिणगी पडली आणि ७१ व्या तुकडीच्या बंदुकांचा कडकडाट कानांवर पडला. मे ३१ ला सकाळीं ७ वी घोडदळी तुकडी, संध्याकाळीं ४८ वी पायदळी तुकडी यांनींहि अुठून स्वातंत्र्याचें निशाण फडकविलें. अुठावणीची ही साथ लागलीच आसपासच्या जिल्ह्यांतहि वेगानें पसरली. सितापूर, महम्दी, बऱ्हेच अित्यादि जिल्ह्यांत व सिकोरा, गोंडा, मेळापूर अित्यादि तालुक्यांच्या ठिकाणींहि क्रांतीच्या ज्वाळा पेटून अुठल्या.

फैजाबाद हें अयोध्येच्या पूर्वविभागांतलें प्रमुख गांव असून त्याहि ठिकाणीं २२ वी पायदळी तुकडी, घोडदळ व कांहीं तोफखाना अितकें सैन्य होतें.

फैजाबाद जिल्ह्यांत अिंग्रज सरकारचा जुलूम कळसाला पोंचला होता. या सर्वांचा बदला घेण्यासाठीं, क्रांतीची मशाल घेअून अिंग्रजांविरुद्ध असंतोष पेटवून देत निघालेला अेक मोठा क्रांतिकारक पुढारी याच फैजाबादेंतून निघाला. त्याचें नांव मौलवी अहमदशहा. अयोध्या प्रांतांत त्याचें फार वजन होतें. आग्र्याला आणि लखनौला गुप्त संस्थांचें आणि राज्ययंत्र अुलथून पाडण्याच्या कटाचेंहि पुढारीपण त्यानें केलें होतें. तो अुत्तम वक्ता आणि खंदा लेखक असल्यामुळें तो जहाल क्रांतिपत्रकेंहि लिहीत असे. अशा या भयंकर व्यक्तीला पकडण्यात अिंग्रजांना यश आलें व त्यास फाशीची शिक्षा सांगून त्यांनीं त्याला फैजाबादच्या तुरुंगांत डांबलें. परंतु मौलवीच्या अटकेमुळें फैजाबादचे शिपाअी खवळले व त्यांनीं अुठवणी करून मौलवीला प्रथमतः तुरुंगांतून सोडविलें. जी अिंग्रजी राजसत्ता मौलवीला फासावर चढविणार होती तिलाच फांसावर चढविण्यासाठीं मौलवीनें फैजाबादच्या क्रांतीचें नेतृत्व स्वीकारलें आणि ९ जूनला तेथील सर्व अिंग्रजांना हद्दपार करून फैजाबादला पुन्हा वाजिदअल्लीशहाची राजवट चालू करण्यांत आली.

फैजाबादेबरोबर प्रांतांतील सुलतानपूर, सालोनी हेहि जिल्हे क्रमाक्रमानें अुठले. ३१ मेपासून जूनच्या पहिल्या आठवड्याच्या शेवटापर्यंत सबंध अयोध्या प्रांत खडबडून अुठला. अवघ्या १० दिवसांत लोकांनीं वाजिदअल्लीशहाला पुनः गादीवर बसविलें. 'लोकांच्या कल्याणाकरितां आम्हीं वाजिदअल्लीला पदच्युत केलें' या डलहौसीच्या कांगाव्याला खोटें पाडणारें हें किती रोखठोक आणि मुत्सद्दीपणाचें अुत्तर अयोध्येच्या जनतेनें दिलें! मात्र हें करतांना त्यांनीं अिंग्रजांविषयीं यत्किंचित् सूडाची किंवा द्वेषाची भावना दाखविली नाहीं. अिंग्रज अितिहासकार फॉरेस्ट लिहितो, "अयोध्येच्या लोकांनीं आपणांवर दुःखाचे डोंगर लादणाऱ्या अिंग्रजांनाहि मोठ्या अुदारपणानें वागवून जीवदान दिलें. अयोध्येच्या क्रांतिकारकांनीं अिंग्रज अधिकाऱ्यांना जर ठार करून टाकलें असतें तर अयोध्येवर पुन्हा अिंग्रजी राज्यच स्थापन झालें नसतें. अनुभवी अिंग्लिश अधिकारी नसते तर नवशिक्या अिंग्रज पोरांसोरांकडून कांहीं अयोध्या अिंग्रजांना परत मिळाली नसती."

कानपूरचा सूड घेण्यासाठीं सर हेन्रीनें बरोबर एक हजार सैन्य व दहा तोफा

घेअून क्रांतिकारकांवर २९ जूनला चढाअी केली. परंतु छिन्नतला क्रांतिकारकांनीं त्या दिवशीं अिंग्रजांना असा मार दिला कीं, आपल्या तोफा रणांगणावर सोडून अिंग्लिश सैन्य रेसिडेन्सीच्या रोखानें पळत सुटलें. तरीहि क्रांतिकारकांनीं पाठलाग केला आणि रेसिडेन्सीलाच वेढा घातला; व अशा रीतीनें एक हजार अिंग्लिश व ८०० हिंदी शिपाअी अितकें सैन्य लखनौच्या रेसिडेन्सींत कोंडून टाकण्यांत आलें.

अुत्तर हिंदुस्थानांत अुसळलेल्या या स्वातंत्र्यलालसेनें दिल्ली, कानपूर, लखनौ आणि बरेली येथील मृत सिंहासनांना फिरून जिवंत करून अुठविलें. परंतु अद्याप थोड्याफार प्रमाणांत जिवंत असलेल्या देशी संस्थानांवर या स्वातंत्र्य-भावनेचा पाहिजे तेवढा पगडा बसला नाहीं. ग्वाल्हेरच्या शिंद्यानें देशाशीं नव्हे, तर अिंग्रजाशीं मैत्री टिकवून धरण्याचा निश्चय केला. हें अैकून ग्वाल्हेरची जनताच खवळली. "शिंदे लढाअीला येत नसतील तर आम्ही लढतों," असें म्हणून १४ जूनला ग्वाल्हेरच्या सैन्यानें अुठावणी करून गोऱ्या अधिकाऱ्यांना कापून काढलें. अिंग्रज स्त्रीपुरुषांची हकालपट्टी करून ग्वाल्हेर स्वतंत्र करण्यांत आलें. यानंतर शिंद्यानें स्वतः पुढारीपण घेऊन दिल्ली, आग्रा, कानपूर येथें चाललेल्या स्वातंत्र्ययुद्धांत भाग घ्यावा म्हणून शिपायांनीं शिंद्याला सांगितलें. परंतु शिंद्यानें थापा मारून त्या क्रांतिकारक सैन्याला थोपवून धरलें; व त्यामुळें आग्र्याच्या सैन्यानें अुठावणी करूनहि आग्र्याच्या किल्ल्यावरचें अिंग्रजांचें निशाण टिकलेलें दिसलें.

ग्वाल्हेरप्रमाणें अिंदूरलाहि १ जुलैला अुठावणी होअून होळकरांच्या सैन्यानें रेसिडेन्सींतील अिंग्रज सैन्यावर चाल केली. तेव्हां अिंग्रजांनीं आपलें चंबूगवाळें आटपून अिंदूरकडे पळ काढला. १८५७ च्या या क्रांतिकालांत बहुतेक संस्था-निकांनीं गुळमुळीत असेंच धोरण स्वीकारलेलें दिसून येअील. क्रांतिकारकांना किंवा अिंग्रजानाहि कोणालाच विशेष असें साहाय्य त्यांनीं दिलें नाहीं. कारण कोणाचाहि विजय झाला तरी आपलें आसन स्थिर राहावें अेवढीच त्यांची अिच्छा होती. यासाठींच ते अिंग्रजांबरोबरच्या मैत्रीचें तुणतुणें वाजवत राहिले.

परंतु आपण क्रांतिकारकांनां मिळालों तर अिंग्रजांचा नक्कीच पराभव होअील ही त्या महामूर्खांना कल्पनाच नव्हती. केवळ स्वार्थीपणामुळें ते हा दुटप्पीपणाचा

डाव खेळत होते. कच्छ, ग्वाल्हेर, अिंदूर, बुंदेलखंड, राजपुताना अित्यादि ठिकाणच्या संस्थानिकांनीं नाभा, पतियाळा येथील शीख संस्थानिकांप्रमाणें जरी स्वदेशाचें अुघड शत्रुत्व स्वीकारलें नव्हतें तरी क्रांतीचा पाठपुरावा करून ती यशस्वी करण्याला ठामपणें ते कोणी पुढें आले नाहींत.

हिंदुस्थानच्या जनतेनें मात्र अेकाकी अुठून, स्वातंत्र्यप्रेमानें निःस्वार्थी झुंज देअून, कांहीं काळपर्यंत कां होअीना, पण अिंग्लिश राजसत्ता अुलथून पाडली.

खरें पाहतां, हिंदुस्थानांत पेटलेल्या या प्रचंड असंतोषाची पुरी कल्पनाच हिंदुस्थानच्या राजधानींतल्या म्हणजे कलकत्त्यांतल्या किंवा अिंग्लंडमधल्या अिंग्रज राज्यकर्त्यांना आली नाहीं. १० मेपासून ३१ मेपर्यंत क्रांतीची अेकहि लाट न अुसळल्यानें हिंदुस्थानांत विशेष गडबड नसल्याचें त्यांचें पूर्वीचेंच मत कायम राहिलें. परंतु तो 'थोडा काळ' केव्हांच संपला.

मे ३१ अुजाडली. हिंदुस्थानभर अिंग्रजी राज्याविरुद्ध असंतोषाची आणि संहाराची अेकच लाट अुसळली. रक्ताच्या नद्यानाल्यांतून अिंग्रजांचीं प्रेतें वाहूं लागलीं. तेव्हां कोठें १२ जूनला सरकार जागें झालें. क्रांतीचा अग्नि फुलविणाऱ्या वर्तमानपत्रांविरुद्ध लॉर्ड कॅनिंगनें याच वेळीं अेक वटहुकूम काढली.

कानपूरच्या कत्तलीची बातमी १४ ऑगस्ट १८५७ ला अिंग्लंडच्या कानांवर जाअून पडली. या झालेल्या नाचक्कीनें सारें अिंग्लंड त्वेषानें आणि सूडानें वेडें झालें; आणि हा वेडाचा झटका आणि अकांडतांडव आजपावेतों चालूच आहे. आजसुद्धां अिंग्लंड आपल्या अितिहासाच्या ओळीओळींतून लिहीत आहे कीं, "क्रांतिकारकांनीं केलेल्या कत्तली राक्षसी आणि माणुसकीला न शोभणाऱ्या होत्या!" अिंग्लंडच्या या खोट्या प्रचारानें परकीय राष्ट्रांतले लोकच नव्हेत तर ज्यांच्याकरितां क्रांतिकारकांनीं रक्त सांडलें ते स्वतःच्या देशांतील बांधवहि क्रांतिकारकांना 'सैतान, राक्षस, पिशाच्चें' म्हणून संबोधूं लागले!

हाय रे जगता! हा भ्रम, हा खोटा प्रचार केव्हां तुझ्या डोक्यांतून जाअील आणि खरें सत्य तुला केव्हां कळेल!

माथेफिरूपणानें अुगीच माणसांचे मुडदे पाडीत सुटायचें हें केव्हांहि पापच. संतमहात्म्यांनीं सांगितलेलें रामराज्य ज्या वेळीं या पृथ्वीवर चालू होअील, सर्व मानवांना समान न्याय आणि समान सुखशांतीचा विपुल लाभ ज्या वेळीं

होअील, आणि पहिल्याच गालावर मारणारा कोणी दुष्ट या जगांत न राहिल्यानें ख्रिस्ताच्या अुपदेशाप्रमाणें दुसरा गाल पुढें करण्याची पाळीच कुणावर ज्या वेळीं येणार नाहीं, त्या वेळीं तशा त्या खऱ्याखुऱ्या रामराज्यांत बंडें, खून, कत्तली, सूड या गोष्टी खरोखरच पातकांत गणल्या जाव्यात.

परंतु जोंपर्यंत तसलें दैवी रामराज्य या पृथ्वीवर अद्याप आलेलें नाहीं आणि जोंपर्यंत या पृथ्वीवर शक्तीच्या जोरावर दुसऱ्याला लुबाडण्याची आणि गुलाम करण्याची सैतानी हाव मनुष्यास पछाडीत आहे तोंपर्यंत रक्तपात आणि सूड यांचा निषेध करण्याचें कांहींच कारण नाहीं. ‘सत्ता’ हा शब्द जोंपर्यंत रूढ आहे आणि त्याप्रमाणें तशी सत्ता दुसऱ्यावर चालविण्याची लालसा जोंपर्यंत कोणी अेखादा धरीत आहे तोंपर्यंत त्या ‘सत्ते’च्या मागोमाग येणारा दुसरा शब्द ‘बंड’ हाहि तितकाच रूढ राहणार; बंडेंहि होणारच! जगावर थैमान घालणारा अन्याय नाहींसा करण्यासाठींच क्रांति, सूड, रक्तपात असलीं साधनें स्वतः निसर्गच निर्माण करीत असतो, वापरीत असतो; आणि म्हणून त्याचें पाप सूड घेणाऱ्यांना लागत नसून पहिल्यानें अन्याय करून लोकांना सूड घ्यावयास लावण्याची पाळीं आणणाऱ्या दुष्टांच्याच माथीं बसतें.

आणि म्हणूनच शिवरायांचीं वाघनखें क्रूर किंवा दुष्ट नसून वंदनीय होत!

आणि या जगांत रक्तपात, सूड, क्रांत्या यांचें भयच दुष्टांना नसतें तर सगळीकडेच सैतानांचा नंगानाच सुरू झाला असता. प्रत्येक हिरण्यकश्यपूला त्याचा नरसिंह, प्रत्येक दुःशासनाला त्याचा भीम भेटत असल्यामुळेंच थोडी तरी सत्याची आणि सुखाची आशा जगाला वाटत आहे. १८५७ मध्यें हिंदुस्थानांतहि प्रत्येकाच्या अंतःकरणांत सूडाचा अग्नि पेटून राहिला. हिंदी सिंहासनें आणि राजमुकुट यांचा चुराडा झाला होता. अुत्पन्नें जप्त करून येथील सर्व मालमत्ता अिंग्रजांनीं लुटून नेली होती; आणि अपमान आणि नंगे अत्याचार यांना नुसता अूत आलेला होता. अर्ज, विनंत्या, तक्रारी, रडणेंभेकणें यांचा कांहीं अुपयोग होत नाहीं हें सिद्ध झालें होतें.

अशा वेळीं नैसर्गिक प्रतिक्रिया होअूनच ‘सूडा’ची कुजबूज सर्वत्र अैकूं येअूं लागली. अितक्यांतहि नंतर हिंदुस्थानांत क्रांति झाली नसती तर ‘हिंदुस्थान मेला’ असें म्हणावें लागलें असतें. परंतु सबंध राष्ट्र क्रोधानें संतप्त

होअून अुठलें अशा वेळीं हिंदुस्थानांत असल्या कत्तली प्रत्येक ठिकाणीं न होतां चारदोन ठिकाणींच फक्त झाल्या ह्या गोष्टीचेंच आश्चर्य वाटूं लागतें.

अिंग्रज बायकामुलांना ठार मारणाऱ्या शिपायांना फांशीं देतांना जेव्हां अिंग्रजांनीं त्यांना विचारलें तेव्हां त्यांनीं साफ अुत्तर दिलें कीं, "साहेब, सापाला मारून त्याच्या पिलांना कोणी मोकळें सोडून देतें का?"

सबंध राष्ट्राचें म्हणून अेखादें युद्ध जेव्हां पेट घेतें तेव्हां त्या राष्ट्रीय अन्यायाचा सूड नेहमीं शत्रुराष्ट्रातील लोकांच्या रक्तपातानेंच घेतला जातो. स्पॅनिश लोकांनीं मूरांच्या स्त्रीपुरुष मुलामाणसांची नाहीं का निर्दयपणें कत्तल केली? १८२१ मध्यें ग्रीक लोकांनीं नाहीं का एकवीस हजार तुर्की शेतकऱ्यांची कत्तल केली? साप मारून त्याच्या पिलांना सोडून द्यावयाचें तर सापाला मारण्यांत काय शहाणपणा हाच प्रश्न ग्रीकांनींहि त्यावेळीं केला होता. म्हणून सापाच्या हत्येचें पाप साप मारणाराला लागत नसतें, त्याचा सर्व दोष प्राण घेणाऱ्या सापाच्या विषाकडेच येत असतो.

तसें पाहतां हिंदुस्थाननें आपल्यावर जुलूम-अन्याय करणाऱ्या अिंग्रजांना फार थोडी शिक्षा दिली असें म्हणावेंसें वाटतें. ह्याच अिंग्लंडच्या क्रॉम्बेलनें देश बळकावण्याच्या दुष्ट हेतूनें आयर्लंडातील निरपराध गरीब जनतेचीहि कत्तल करून आपले हात रक्तांत रंगविले नव्हते काय? परंतु हिंदुस्थानांतील क्रांतीचे पुढारी नानासाहेब, लक्ष्मीबाअी यांनीं असंख्य अिंग्रज मुलाबायकांची सुटका, भयंकर त्वेषानें चवताळलेल्या शिपायांच्या हातून केली!

जीव बचावण्यासाटीं पळत सुटलेल्या कित्येक अिंग्रजांचे प्राण शेतकऱ्यांच्या गरीब झोपड्यांनीं वांचविले आहेत. अिंग्रज स्त्रियांना व मुलांना काळा रंग चोपडून व त्यांना हिंदी वेष देअून त्याच शेतकऱ्यांच्या बायकांनीं त्यांचे प्राण वांचविले. हिंदी मनुष्य स्वाभाविकपणेंच अितका कनवाळू आणि मनाचा मोठा असतो; आणि अशा दयाळू बुद्धीच्या हिंदी माणसाच्या मनांत चीड येअून जर त्यानें अिंग्रजांची कत्तल केली असेल तर त्यामुळेंच अिंग्रजांनीं किती क्रूरपणाचे दुष्ट अन्याय हिंदुस्थानावर त्यापूर्वी केले असतील हेंच सिद्ध होतें. कारण मेकॉलेनेंच असा सिद्धांत सांगितला आहे कीं, 'जुलूम जितका भयंकर तितका त्याचा बदलाहि तसाच भयंकर असणार हें अुघडच आहे.'

आणि हिंदुस्थाननें ज्या कांहीं अगदीं थोड्या चारदोन कत्तली केल्या त्याकरितां हिंदुस्थानला दोषी ठरविणार कोण, तर अिंग्लंड! ज्यानें नीलला जन्म दिला तें अिंग्लंड! ज्यानें निष्पाप बायका-मुलांनीं गजबजलेलीं खेडींच्या खेडीं तरवारीनें अुध्वस्त करून आगी लावून बेचिराख करून टाकलीं तें अिंग्लंड! किंवा सांपडेल त्या शेतकऱ्याला फांसावर टांगून संगिनीनें मारतांना त्याच्या तोंडांत गाअीचें मांस ज्या अिंग्लंडनें कोंबलें तें अिंग्लंड!

अिंग्रजांच्या जुलमी अन्यायाची चीड येअून, हिंदु-मुसलमान, ब्राह्मण, शूद्र, क्षत्रिय, वैश्य, राजे, रंक, स्त्रिया, पुरुष, पंडित, मौलवी, शिपाअी, पोलिस या अशा वेगवेगळ्या धर्मांच्या, पंथांच्या आणि अुद्योगधंद्याच्या लोकांनीं अेक होअून अुठून भयानक सूडाची अेकच लाट देशामध्यें अुसळवून दिली. जो कोणी अिंग्रजांशीं 'राजनिष्ठ' राहील त्याला 'स्वदेशद्रोही' आणि 'स्वधर्मद्रोही' म्हणून मानण्यांत येअी. सरकारी नोकरी करणारांवर बहिष्कार घातला जाअून त्याच्याशीं 'रोटी-बेटी'चे व्यवहारहि केले जात नसत; ब्राह्मण त्यांच्या घरीं पूजेला जात नसत व त्यांच्या प्रेताला अुचलावयाला माणसेंहि मिळत नसत! अशा प्रकारची भयंकर वावटळ आणि प्रचंड खळबळ अुडून गेली होती.

वरून हिरव्यागार दिसणाऱ्या ह्या ज्वालामुखीच्या पोटांत केवढी अुलथापालथ होअून राहिली आहे याची कल्पना आहे का कुणाला?

आतां अेका क्षणाचाच अवकाश कीं, विजांचे आणि ज्वालांचे प्रचंड लोळ ह्यांनीं सर्व आकाश व्यापून जाअील! भेसूर किकाळ्यात तरवारीचा खणखणाट अेकूं येत आहे! भुतें नाचत आहेत! पहा ह्या ज्वालामुखीचें तोंड अुघडलें! आतां पृथ्वीप्रलयच होणार असें दिसत आहे.

काठेवाडमध्यें विठरू नांवाचा अेक विचित्र जलप्रवाह आहे. त्याच्या पाण्याचा पृष्ठभाग पाहिला तर वरून तो खडकाळ अशा खडबडीत कातळाप्रमाणें दिसतो. त्यामुळें त्यावरून चालूं लागणारा वाटसरू फसतो आणि त्या जल-प्रवाहाच्या खोल पाण्यात गटांगळ्या खाअूं लागतो.

हिंदुस्थानांत क्रांतीचा प्रवाहहि त्या वेळीं असाच गुप्तपणें वहात होता. जुलमी अन्यायाला याची कल्पना नव्हती व त्यामुळें बेदरकारपणें प्रवाह तुडवीत तो चालूं लागला. परंतु जरा सबूर!

वरून शांत आणि प्रतिकारशून्य भासणारा हिंदुस्थानच्या क्रांतिप्रवाहाचा हा पृष्ठभाग हालूं लागला पहा! आतां तेथें खडबडीत कातळ राहिलें नसून लाटांवर लाटा अुसळत असलेला रक्ताचा अथांग डोहच पसरलेला दिसत आहे!

अभागी जुलमी राजसत्ते! आतां तुला पाय टेकण्याला कोठेंच जागा नाहीं! तुला अितकें तरी—आणि तेंसुद्धां चागलें—कळूं दे कीं, (हिंदुस्थानच्या) या काळ्या पृष्ठभागाखालीं रक्ताचा लाल प्रवाह वहात आहे. आणि म्हणून शक्य असेल तर अजूनहि तो कानठळ्या बसविणाऱ्या क्रांतीच्या ज्वालामुखीच्या स्फोटाचा धडाका नीट अैक!

♣ ♣ ♣

# ३

# अग्निप्रलय

"१८५७ मध्यें ह्या हिंदभूमीच्या क्रोधानें अक्षरशः पेट घेतला; आणि अुभ्या जगताच्या कानठळ्या बसविणारा भयंकर स्फोट झाला! अेखादा अग्निबाण पेटवून आकाशांत सोडला असतां तो स्फोट पावून त्यामधून ज्याप्रमाणें चित्रविचित्र तेजाकृति बाहेर पडतात त्याप्रमाणें क्रांतीच्या या अग्निबाणांतून संतप्त रक्त, लढाया नि शस्त्रेंच बाहेर आलीं!

"केवढा प्रचंड अग्निबाण हा! मीरतपासून विंध्याद्रीपर्यंत लांब नि पेशावरपासून डमडमपर्यंत रुंद! आणि आतां तो पेटवून सोडला पहा! अग्निज्वालांचा धिंगाणा दशदिशांत चालू झाला! सहस्रशः वीर झुंजत आहेत, पतन पावत आहेत नि अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडत आहेत. प्रत्येक ठिकाणीं युद्ध नि घनघोर प्रलय! निःसंशय ज्वालामुखीचाच अग्निप्रलय हा!"

—"आणि गंगादासबुवाच्या मठीजवळ धडधडणारी झांशीच्या समरलक्ष्मीची ही चिता, त्या सत्तावनच्या समराच्या क्रुद्ध ज्वालामुखीच्या प्रलयांतील शेवटची अग्निज्वाला!"

# १ दिल्लीचा संग्राम

दिल्लीच्या सिंहासनावर बहादुरशहाची स्थापना करून स्वातंत्र्याचा लढा अखंड चालू ठेवण्याकरितां, लोकांनीं दिल्ली येथें अेक महत्त्वाचें मध्यवर्ती केंद्र निर्माण केलें. बहादुरशहाला जरी लोकांनीं बादशाहा केलें होतें, तरी मोंगली सिंहासनाचा वारसदार म्हणून कांहीं आतां तो लोकांचा बादशाहा झालेला नव्हता. कारण जुनें मोंगली साम्राज्य हें लोकांवर जुलमानें आणि शक्तीनें लादलेलें होतें; आणि अशा त्या मोंगली सिंहासनावर लोकांनीं बहादुरशहाला चढविलें असतें तर तें घातक ठरलें असतें. मग हिंदुस्थानच्या या भूमींत अिस्लामच्या त्या साम्राज्याशीं जी कठोर झुंज पांच शतकांपेक्षां अधिक कालपर्यंत हिंदु संस्कृतीनें दिली ती फुकट दिली असेंच म्हणणें भाग पडलें असतें.

पृथ्वीराजाच्या मृत्यूपासून तों थेट औरंगजेबाच्या मरणापर्यंत ही रक्ताळ झुंज सारखी चालली होती ! शेवटीं भारतवर्षाच्या पश्चिम पर्वतातून हिंदु जातीच्या गौरवार्थ अेक हिंदु-सत्ता अुदय पावली. पुण्यातून हिंदुपेशवे वीरबाहू भाअूसाहेब बाहेर पडले आणि त्यांनीं दिल्लीचें तख्त पादाक्रांत करून आजपर्यंतचा सूड अुगविला. हिंदुस्थान जिंकणाऱ्या जेत्या मुसलमानानाच जिंकल्यामुळें हिंदुस्थान पुन्हा स्वतंत्र झाला. आणि या भूमीचे पुनः हिंदूच स्वामी झाले !

म्हणून बहादुरशहा, हा कांहीं मोंगल बादशाहा म्हणून लोकांचा बादशाहा झाला नव्हता; होणें शक्य नव्हतें. स्वातंत्र्याकरितां झुंज घेणाऱ्या जनतेचा तिनेंच निवडिलेला तो पुढारी होता अितकाच त्याचा अर्थ होता. ११ मे या दिवशीं बादशाहाला सिंहासनावर बसविण्यांत आलें. हिंदुस्थानच्या सर्व भागांतून त्याजकडे अभिनंदनाचे संदेश आले. अुठावणी करून दिल्लीला गोळा झालेल्या अनेक प्रांतांतल्या शिपायांच्या तुकड्यांनीं अिंग्रजांच्या खजिन्यांतील लुटलेला सर्व पैसा बादशाहाच्या तिजोरींत आणून भरला. सिंहासनावर बसल्यानंतर जनते-करितां बादशाहानें एक घोषणा प्रसिद्ध केली. त्यांत तो म्हणतो, " सर्वांनीं आतां या धर्माच्या लढ्यांत भाग घेण्यासाठीं पुढें यावें. मरण कुणालाच चुकलें नाहीं. मग धर्मयुद्धांत मरण आलें तर त्यासारखें दुसरें भाग्यच नाहीं ! फिरंग्याला

हिंदुस्थानांतून हाकलून काढणें किंवा ठार मारणें हें प्रत्येक स्त्रीपुरुषाचें कर्तव्य आहे." गाअी मारण्याविरुद्धहि बादशाहानें अेक आज्ञा काढली. गाअी मारणाराला तोफेच्या तोंडीं देण्याची किंवा हात-पाय तोडण्याची शिक्षा देण्याचें ठरलें. कांहीं माथेफिरू मुसलमानांनीं हिंदूंविरुद्ध जिहाद (धर्मयुद्ध) पुकारलें. तेव्हां बादशाहानें स्वतः हत्तीवरून हिंडून राजधानींत प्रकट केलें कीं, "जिहाद हें केवळ फिरंग्यांविरुद्ध आहे."

बुंदेलकी सराअीच्या लढाअीनंतर अिंग्रजांनीं दिल्लीलगतच्या डोंगराच्या ओळींचा आश्रय घेऊन तेथून दिल्लीवर चढाअी करण्यास प्रारंभ केला. सैन्याच्या तळाला डोंगरांचें हें पठार फार अुपयोगी होतें. टेकड्यांच्या बाजूलाच यमुनेचा रुंद कालवा असल्यामुळें पाण्याचीहि ददात नव्हती; व पंजाबशीं दळणवळण ठेवणारे सर्व मार्ग त्याच्या हाताशींच होते. त्यामुळें, 'दिल्ली काय, अेक दिवसांत घेअूं' अशी घमेंड सेनापति बर्नार्ड याला वाटूं लागली असल्यास नवल नाहीं. म्हणून १२ जूनला दिल्लीवर चढाअी करून जाण्याचा अेक गुप्त बेत त्यानें केला. परंतु अैन वेळेला कांहीं निराळीच भानगड निघून तो बेत त्यास तसाच सोडावा लागला.

दिल्लीमध्यें दारूगोळा आणि सैनिक यांची मुळींच वाण नव्हती. क्रांतिकारकांनींहि आतांपर्यंतचें बचावाचें धोरण सोडून देअून ब्रिटिशांच्या सैन्यावर यशस्वी छापे घालण्यास सुरुवात केली होती. १२ जूनला क्रांतिकारक दलांनीं गुप्तपणें जाअून अिंग्रजांच्या बगलेवर व मागून चढाया केल्या. या वेळीं अिंग्रजांकडील अेक पायदळहि त्यांना सामील झालें, त्यामुळें अिंग्लिशांना हात चोळीतच बसावें लागलें. १३ जूनला क्रांतिकारकांनीं पुन्हा हिंदुरावच्या कोठीवर हल्ला चढविला. १७ जूनला हिंदी सैन्यानें अिदगा अिमारतीवरून अिंग्रजांच्या तळावर भडिमार करण्याकरितां तोफांचे मोर्चे बांधले. परंतु हेन्री टॉम्बस् आणि मेजर रीड यांनीं हिंदी सैन्यावर दोन्ही बगलांनीं चढाअी करून ते मोर्चे हाणून पाडले. क्रांतिकारकांनींहि आपापल्या जागीं लढतां लढतां मरून जाअीपर्यंत अिदगा अिमारतींत शत्रूला पाअूल टाकूं दिलें नाहीं.

२० जूनला नसिराबादच्या तुकड्यांनीं अिंग्रजांवर चढाअी केली. नसिराबादच्या तोफखान्यानें भयंकर आग ओकून अिंग्रजी सैन्यांना घाअीस आणलें. अिंग्रजांनीं

कशाबशा आपल्या तोफा वांचविल्या अेवढेंच. त्यामुळें अिंग्रजांना माघार घ्यावी लागून क्रांतिकारक सैन्याला आक्रमणासाठीं अेक महत्त्वाची जागा मिळाली. परंतु दारूगोळा आणि नवे सैनिक यांचा पुरवठा नसल्यानें त्यांना परत दिल्लींत यावें लागलें, व त्यामुळें अिंग्रजांनीं पुन्हा क्रांतिकारकांच्या हातीं गेलेली जागा व्यापली.

त्यांत आज २३ जूनचा प्लासीच्या सूडाचा, शंभराव्या वर्षाचा दिवस अुगवला. प्रातःकाळ होतांच क्रातिकारक सैन्यें लाहोर दरवाज्यापाशीं जमूं लागलीं. या वेळीं अिंग्रजांच्या साहाय्याला पंजाब सरकारकडून सैन्य आल्यामुळें अिंग्रजांना मनस्वी आत्मविश्वास वाटूं लागला होता. परंतु त्यामुळें क्रांतिकारकांच्या अुत्साहांत मुळींच खळ पडला नाहीं. त्यांनीं सब्जीमंडीमधून घुसून ब्रिटिशांवर गोळीबार केला. मेजर रीड लिहितो : " बंडवाल्यांनीं १२ वाजण्याचे सुमारास आम्हीं व्यापलेल्या क्षेत्रावर निकराची चढाअी केली. त्यांनीं आमचेवर अितक्या वेळां मारा केला कीं, आज कांहीं निभाव लागत नाहीं असेंहि मला अेकदां वाटलें!" अेका शूर अिंग्लिश अधिकाऱ्यानें हें लिहून ठेवलें आहे यावरून क्रांतिकारकांच्या चढाया किती जोरदार आणि भयंकर होत असतील याचा स्पष्ट पुरावा आपणांस मिळतो. परंतु दुर्दैवानें त्यांना समर्थ असा नेता पुढारी मिळाला नाहीं. अेवढ्यांत अिंग्लिशांच्या बाजूला पंजाबच्या ताज्या दमाच्या पलटणी आल्या. तरीहि क्रांतिकारकांनीं रात्र पडेपर्यंत त्यांच्याशीं झुंज दिली यांत कोणाचाच विजय किंवा पराजय झाला नाहीं.

पंजाबहून सतत येणाऱ्या सैन्यामुळें या वेळपर्यंत अिंग्रजांच्या सैन्याचा आंकडा सात हजारापर्यंत गेला. अिकडे क्रांतिकारकांच्या बाजूला रोहिलखंडांत अुठावणी केलेलें बख्तखानाच्या नेतृत्वाखालचें सैन्य नुकतेंच दिल्लीला येअून पोंचलें होतें. दिल्लीमध्यें जमलेल्या निरनिराळ्या जातींच्या आणि निरनिराळ्या पंथांच्या या शिपयांच्या सैन्यांत अेवढी संघटना जर कशानें झाली असें विचारलें तर अेका तत्त्व-प्रीतीमुळेंच असें अुत्तर द्यावें लागेल ! नाहीं तरी लूटमार, चोऱ्यामाऱ्या, धाकदपटशहानें पैसे अुकळणें अित्यादि शिपायांचा पुंडपणा दिल्लीला बाहशहानें बंदोबस्त करूनहि चालूच होता. परंतु अशी परिस्थिति असतांहि अिंग्रजी सैन्या-वर चढायांमागून चढायांचा मारा करून दिल्लीच्या सैनिकानीं अिंग्रजांना चांगलें

काबूंत ठेवलें होतें. अर्थात् अिंग्रज शत्रूला देशाबाहेर घालविण्याच्या तीव्र अिच्छेमुळेंच हें सर्व शक्य झालें.

परंतु अंतिम यश येण्याच्या दृष्टीनें अेवढ्यावर समाधान मानून चालण्यासारखे नव्हतें. कोणी तरी लायक असा नेता या शिपायांना आतां मिळणें आवश्यक होतें; आणि ही गरज रोहिलखंडच्या बख्तखानाच्या आगमनानें भरून निघाली. दिल्लीच्या क्रांतिकारक सैन्याचें सेनानीपण बादशाहानें त्याला अर्पण करून त्यानिमित्त त्यास ढाल-तरवारीची देणगी दिली. चार हजार रुपये सैन्यामध्यें मिठाअी वांटण्यासाटीं देण्यांत आले. प्रत्येक नागरिकानें शस्त्र बाळगलेंच पाहिजे अशी सक्ति करण्यांत आली; व ज्याच्याकडे शस्त्रें नव्हतीं त्यांना तीं देण्याची व्यवस्थाहि केली गेली. ३ जुलैला दिल्लीच्या सैन्यांत जवळजवळ २० हजार सैन्य होतें.

दिल्ली घेण्याची अिंग्रजाना फारच तळमळ लागून राहिली होती. परंतु दिल्ली कांहीं अद्याप ताब्यांत येत नव्हती. काळजीनें आणि अपयशाच्या अपमानानें सेनापति बर्नार्ड अगदीं टेकीस आला होता. शिपायांच्या चढाया रात्रंदिवस चालूच होत्या. ४ जुलैला बख्तखानानें अिंग्रजाना पिछाडीवरून दाबत दाबत पार अलीपूरपर्यंत मागें रेटलें. त्यामुळें अिंग्रजांची दिल्ली घेण्याची महत्त्वाकांक्षा पार ढासळत चालली, आणि त्यातच अिंग्रजाचा सेनापति बर्नार्ड हा महामारी (कॉलरा) च्या रोगानें ५ जुलैला मरण पावल्यामुळें अिंग्रजी सैन्यावर वज्राघातच झाला. दिल्लींत प्रवेश करण्याचा प्रयत्न करतां करतां शेवटीं थडग्यांत प्रवेश करणारा अिंग्रजांचा हा दुसरा सेनापति! आतां अिंग्रजांचा तिसरा सेनापति म्हणून जनरल रीडची नेमणूक करण्यात आली.

जुलै ९ आणि १४ या दिवशींच्या दोन लढायांत अिंग्रजांच्या आणि क्रांतिकारकांच्या बाजूच्या वीरांनीं पराक्रमाची शर्थ केली. पहिल्या दिवशीं घोडदळाची दाणादाण अुडून तें मागे पळालें. अिंग्लिशाचा तोफखानाहि बंद पाडण्यांत आला. अेका शूर शिपायानें हिलला घोड्यासकट खालीं लोळविलें; तरीहि आपल्याला सावरून हिलनें आपली तरवार अुपसली. तेव्हां तीन शिपाअी त्याजवर तुटून पडले. या वेळीं हिलनें दोनदां गोळया झाडण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. तेव्हां अेका शिपायानें हिलची तरवार काढून घेतली आणि त्याच्या

छातीवर पाय रोवून तो शिपाई अुभा राहिला. मेजर टॉम्बसनें हा प्रकार लांबून पाहिला व शिपायाला गोळी घालून ठार करून तो हिलला अुठवून बसवूं लागला. अितक्यांत एका शिपायानें हिलचें पडलेलें पिस्तूल अुचलून घेतलें आणि तो हिलवर धावला. त्या शिपायानें तिघां अिंग्रजांशीं लढत देऊन त्यांपैकीं अेकाला तरवारीनें घायाळ केलें, दुसऱ्याला ठार केलें व नंतर तिसऱ्याच्या तरवारीला तो स्वतःच बळी पडला. टॉम्बस आणि हिल यांना पुढें या पराक्रमी झुंजीकरितां ' व्हिक्टोरिया क्रॉस ' मिळाला. अिंग्लिश अितिहासलेखक जॉन 'के' म्हणतो कीं, याहि शिपायांना ' बहादुरशहा मेडल ' मिळावयाला पाहिजे होतें. खरें पाहतां अनेक शिपायाना ' बहादुरशहा पदक ' मिळावयाला पाहिजे होतें.

पण, हेंहि तितकेंच खरें कीं, जे खरे शूर असतात आणि देशाकरितां हातीं शिर घेअून लढतात त्यांना बहादुरशहा पदक नाहीं तरी त्याहिपेक्षां महत्त्वाचें असें कर्तव्यनिष्ठेचें पदक प्रत्यक्ष मृत्यूच्या हस्तेंच मिळत असतें !

अशा रीतीनें १५ जुलै गेली तरी दिल्लीच्या मनोऱ्यांवर स्वातंत्र्याचें निशाण डौलानें डुलतच होतें. क्रांतिकारकांच्या चढायाहि अद्याप थांबल्या नव्हत्या. अशा कठीण परिस्थितींत जेव्हां तिसरा सेनापतीहि सेनापतिपद सोडून निघून गेला, तेव्हां अिंग्रजांच्या बाजूला दिल्लीवर चढाअी करण्याविषयीं अेकंदरींत निराशाच पसरली; आणि आतां वेढा अुठवावा कीं काय अशी चर्चा प्रत्यक्ष अिंग्रजांच्या छावणींतच चालू झाली. तिसरा सेनापति रीड याच्या जागीं ब्रिगेडिअर विल्सन ह्याची आतां नेमणूक करण्यांत आली.

अलाहाबादचा किल्ला शीख शिपायांनीं अिंग्रजांना मिळवून दिल्यानंतर सैन्याच्या हालचालीला सोयीवार असा मुख्य तळ अिंग्रजांनीं अलाहाबाद येथेंच निर्माण केला. क्रांतीचा पुरा मोड होईपर्यंत येथेंच राहण्याचें ठरवून लॉर्ड कॅनिंगनें राजधानीच अलाहाबादला आणून ठेवली, व तो स्वतःहि तेथें राहण्यास आला. याच वेळीं कानपूरच्या सैन्यविभागावर जनरल नीलच्या जागीं हॅवेलॉक याची सेनापति म्हणून नेमणूक झाली. हॅवेलॉक हा चांगला नाणावलेला आणि कसलेला सेनानी होता. आपल्या जागीं हॅवेलॉकला नेमण्यांत आलें, याकरितां नील जरी मनांतून खूप चरफडला होता, तरी त्यानें आपल्या वैयक्तिक भावनेसाठीं राष्ट्रकार्याची म्हणजे अिंग्लंडच्या कार्याची कोणत्याहि प्रकारची खोटी होअूं दिली

नाहीं. हॅवेलॉक येण्यापूर्वी त्याच्याबरोबर जाणाऱ्या सैन्याची जुळणी नीलनें आधींच करून ठेविली होती.

हॅवेलॉक, बरोबर सैन्य घेअून जों कानपूरला जाण्यास निघतो तों 'सर व्हीलरचा पराभव होअून तो शरण गेल्यानें त्याच्यासकट सर्व अिंग्रजांची गंगेच्या तीरावर कत्तल करण्यांत आल्या'ची बातमी अलाहाबादला येअून थडकली. त्याबरोबर अिंग्रजांच्या कत्तलीचा सूड अुगविण्यासाठीं हॅवेलॉक कानपूरला मोठ्या जलदीनें निघाला. त्याच्याबरोबर अेक हजार अिंग्रज पायदळ, १५० शीख, एक घोडदळ व ६ तोफा अितकें सैन्य होतें. मेजर रेनॉड फत्तेपुरावर चालून येत असल्याचें कळतांच नानासाहेबानें आपलें सैन्य तिकडे धाडून दिलें. परंतु, रेनॉडच्या सैन्याला हॅवेलॉकचें सैन्य येअून मिळाल्यामुळें त्यांनीं नानाच्या सैन्यावर जोराची चढाअी केली. क्रांतिकारक सैन्येंहि जरी शौर्यानें लढलीं तरी १२ जुलैला शेवटीं रणांगणावर तोफा टाकून देअून त्यांना माघार घेणें भाग पडलें.

अिंग्रजांनीं आपल्या सैनिकाकडून प्रथम सर्व फत्तेपूर गांव लुटलें व नंतर शीखांच्याकडून तो गांव पेटवून देण्यांत आला. हॅवेलॉकच्या आणि रेनॉडच्या सैन्यानें फत्तेपूर पेटवून दिल्याची बातमी नानासाहेबापर्यंत येअून पोचली. तेव्हा या सैन्यास अटकाव करण्यासाठीं पांडू नदीवर नानाचें सैन्य धाडून देण्यात आलें.

ज्या अिंग्रज स्त्रियांना नानानें कानपूरच्या कत्तलींतून वांचवून जीवदान दिलें होतें, त्याच स्त्रियांनीं फितुरी करून नानाविरुद्ध अिंग्लिशाशीं गुप्त पत्रव्यवहार केला. ह्या स्त्रियांना या अपराधाकरिता कोणती शिक्षा द्यावी? अिंग्रजांनीं फत्तेपूर जाळलें त्याअर्थी त्याचा सूड अर्थात्च 'बिबीघर' नाहींसें करून कां घेऊ नये? ज्या ठिकाणीं या स्त्रियांना ठेवण्यांत आलें होतें त्या बंदिगृहालाच 'बिबीघर' हें नांव होतें. बिबीघरांतील सर्व कैद्यांना मारून टाकण्याची आज्ञा देण्यात आली. त्याप्रमाणें बिबीघरांतील मुख्य अधिकारी बेगम साहेबा हिनें कानपूरहून काहीं खाटीक मुद्दाम मागवून घेतले.

संध्याकाळीं हातांत नागव्या तरवारी व मोटमोठे सुरे घेअून हे खाटीक क्रूर चेहरे करीत बिबीघरात शिरले. खाटकांनीं आंत शिरतांच अुभे आडवे सुरे खुपसून आणि तरवारी चालवून सुमारें १५० स्त्रिया आणि मुलें कापून काढली.

चौकामध्यें मानवी मांसाचे मोठमोठे तुकडे पोहत असलेलें रक्ताचें अेक तळेंच माजून राहिलें! जातांना खाटीक जमिनीवरून चालत गेले होते, परंतु येतांना रक्ताच्या पाटांमधून मांसाचा चिखल तुडवीत त्यांना यावें लागलें. पहाटेच्या सुमाराला त्या सर्व मुडद्यांना शेजारच्या विहिरींत ढकलून देण्यांत आलें.

आजपर्यंत माणसें विहिरींचें पाणी पीत आलीं होतीं. पण आज विहिरीनेंच माणसाचें रक्त प्राशन केलें! अिंग्रजांनीं फत्तेपूर जाळण्याचा सूड अशा रीतीनें घेतला गेला. अेक वेळ बंगालचा अुपसागरहि कांहीं काळानें भरेल, परंतु आ वासून राहिलेली ही कानपूरची विहीर मात्र अिंग्रजांचें अितकें रक्त पिअूनहि जगाच्या अंतापर्यंत तशीच कोरडी ठणठणीत आणि वखवखलेलीच राहील!

पांडू नदीवर पाठविलेल्या नानाच्या सैन्याचा पराभव करून हॅवेलॉक पुढें घुसून येत होता. १० जुलैला अिंग्रज सैन्यें कानपुराजवळ येअून भिडलीं. कानपूर लढवावें कीं खालीं करावें, याविषयीं नानाच्या युद्धमंडळानें खल करून अिंग्रजांना प्रतिकार करीत कानपुरांतच राहावयाचें असा निर्णय ठरविला. कानपूरच्या विहिरीची बातमी हॅवेलॉकला अद्याप समजली नव्हती; त्यामुळें बिबीघरातील अिंग्रज स्त्रीकैद्यांची सुटका करण्यासाठीं अेक क्षणाचीहि विश्रांति न घेतां चाल करीत तो कानपुरावर चालून येत होता. कानपूरलाहि अिंग्रजांच्या चढाअीला तोंड देण्यासाठीं सैन्याची जुळणी पद्धतशीर केलेली होती व विशेष म्हणजे या सैन्याचें सेनापतित्व श्रीमंत नानांकडे आज होतें. पहिल्याच धडाक्याला क्रांतिकारकांच्या तोफखान्यानें अिंग्रजाच्या चढाअीला चांगलाच पायबंद घातला. पण त्यामुळेंच चिडून जाअून अिंग्रजांनींहि अशी प्रतिचढाअी केली कीं, तोफा रणांगणावर टाकून क्रांतिकारक सैन्य पळत सुटलें. तेव्हां नानानें शिपायांना आणखी अुत्साह देअून फिरून लढण्यास अुभें केलें. क्रांतिकारकांनीं चांगलीच निकराची झुंज दिली. परंतु तिचा कांहीं अुपयोग न होअून त्यांना ब्रह्मावर्ताकडे माघार घ्यावी लागली.

१७ जुलैला हॅवेलॉकचें विजयी सैन्य कानपूरमध्यें शिरलें. अिंग्लिशांची गेलेली पत परत मिळवून देणाऱ्या हॅवेलॉकला आणि त्याच्या सैन्याला हिंदुस्थानांतील व अिंग्लंडांतील अिंग्रजांनीं धन्यवाद दिले. हॅवेलॉकनें प्रथम कानपूर लुटण्याची आज्ञा दिली. बिबीघरांत भुअीवर रक्ताच्या खरपुड्या धरल्या

होत्या. तेथें कानपुरांतील बऱ्याचशा ब्राह्मणांना पकडून आणून त्यांना तें वाळलेलें रक्त चाटावयास लावलें; व नतर त्यांना फांशीं दिलें. हें करण्यांत असा अुद्देश होता कीं, त्या ब्राह्मणांना मरतांना आपण हिंदु म्हणून मरतों आहोंत अेवढेंहि समाधान लाभूं नये. कारण फिरंग्यांचें रक्त चाटल्यानें हिंदु बाटतो हीच समजूत त्यावेळीं रूढ होती.

या ठिकाणीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, क्रांतिकारकांनीं ज्या कत्तली केल्या त्यांत धार्मिक भावना दुखविणारे कोणतेहि अत्याचार त्यांनीं केले नाहींत; अुलट अिंग्रजांना मरण्यापूर्वी बायबल वाचण्याची मोकळीक त्यांनीं दिल्याचें प्रसिद्ध आहे.

कानपूरच्या सूडाचें काम संपत आलें होतें. त्याच वेळीं जनरल नील कानपूरला आला. त्याला तेथें ठेवून हॅवेलॉक अयोध्येवर चालून गेला. कानपूरला नीलनें अेक केवळ महारांचें असें सैन्य अुभारलें; व त्याच्या स्वाधीन कानपूर केलें. हिंदु-मुसलमान भेद यावेळीं संपला होता तेव्हां जातिभेदाचा नवाच राक्षस डोकेबाज नीलनें अुभा केला; व हा त्याचा डाव चांगला यशस्वीहि ठरला. कानपूरच्या पराजयानंतर नानासाहेब ब्रह्मावर्त सोडून सैन्य आणि खजिना घेअून गंगेच्या पलीकडे फत्तेगड येथें येअून थांबले. कानपूरच्या विजयानें फुरफुरलेला हॅवेलॉक हाहि बरोबर दोन हजार अिंग्रज सैन्य घेअून २५ जुलैला लखनौवर चालून जाण्यासाठीं गंगापार झाला.

♣ ♣ ♣

# २ बिहार

वायव्य सरसीमाप्रांत, अलाहाबाद आग्रा आणि बंगाल अित्यादि प्रांतांतल्या प्रमाणें बिहार प्रांत आणि त्याची राजधानी पाटणा या ठिकाणींहि ही क्रांतीची लाट पसरल्यावांचून राहिली नाहीं. या प्रांताचीं मुख्य ठाणीं म्हणजे गया, अऱ्हा, छपरा, मोतिहारी आणि मुझफ्फरपूर हीं होतीं. या प्रांताचें रक्षण करण्यासाठीं दाणापूर येथें कांहीं हिंदी व कांहीं युरोपियन तुकड्या आणि तोफखाना ठेवण्यांत आलेला होता. बिहारची राजधानी पाटणा येथें एक गुप्त क्रांतिकारक संस्था स्थापन झालेली होती. लखनौच्या गुप्त क्रांतिमंडळयांशीं आणि दाणापूरच्या शिपायांशीं या संस्थेचें दळणवळण व पत्रव्यवहार चालू होता. या संस्थेंत श्रीमंत व्यापारी, पेढीवाले सावकार आणि जमीनदार असल्यामुळें क्रांतीच्या कामाला पैशाची वाण कधींच भासली नाहीं.

दाणापूरचे शिपाअी रात्रीच्या अंधारांत झाडाखालीं अेकत्र जमून निरनिराळ्या योजना आखीत. अिंग्रज कमिशनर मि. टेलर हा मोठा चाणाक्ष माणूस होता. त्यानें पाटण्याचें संरक्षण करण्याकरितां रॅट्रेच्या हाताखालीं २०० शीख देअून तिकडे त्यास पाठविलें.

सबंध हिंदुस्थान जरी अुठला होता तरी अद्याप शीख मात्र देशद्रोहीच राहिले. त्यामुळें शीखांचा अुघड अुघड द्वेष लोक करूं लागले. हे शीख जेव्हां पाटण्यांत शिरले तेव्हां लोक त्यांच्याकडे बोट दाखवून त्यांना म्हणू लागले कीं, "तुम्ही गुरु गोविंदसिंहाचे खरे अनुयायी नव्हेत." तिथल्या शीख गुरुद्वारांतहि त्यांना कोणी येअूं देअीनात! कोणी त्याची सावली अंगावर पडून घेअीनात!

आपल्या हातांशीं हें शीखांचें पथक आल्यामुळें प्रांतांतील क्रांतिकारक हालचाली संपूर्णपणें अुखडून काढण्यासाठीं कमिशनर टेलरनें प्रांतभर धरपकडीचें आणि फांशीचें सत्र सुरू केलें. पाटण्यांतील कित्येक पुढाऱ्यांचीं नांवें त्याच्या कानावर येतांच त्यांना पकडण्यासाठीं त्यानें एक मोठा राजकारणी बेत रचून त्यांना पकडलें. पाटण्यांतील तीन मुल्लांचा तर त्याला जबरदस्त संशय होता. परंतु त्यांना जर अुघड अटक केली असती, तर त्याच वेळीं लोकांच्या असंतोषाचा

भडका अुडेल ही त्यास भीति होती. म्हणून एके दिवशीं कांहीं महत्त्वाच्या कामाचें निमित्त काढून त्यानें गांवातील निवडक मंडळींना आपणाकडे बोलावलें; व थोड्याफार संभाषणानंतर लोक जेव्हां जाण्यास निघाले तेव्हां या तीन मौलवींना बाजूला घेऊन 'तुम्हाला मोकळें सोडणें धोक्याचें आहे' असे सांगून त्यास हसत हसत अटक केली !

यानंतर पाटण्यातील सर्व हत्यारें काढून घेण्याची व रात्रीं नवानंतर कोणींहि घर सोडून बाहेर न पडण्याची, अशा एकंदर दोन आज्ञा टेलरनें काढल्या. त्यामुळें गुप्त मंडळांच्या सभा रात्रीं चालवणें कठीण होअून शस्त्रास्त्राचा साठा करणेंहि अवघड झालें. तेव्हां अशा तऱ्हेनें चिरडून जाण्यापेक्षां अेकदम अुठावणी करण्याचेंच जनतेनें ठरविलें. ३ जुलैला पीर अल्ली नांवाच्या पुढाऱ्यानें दोनशें लोकांसह चर्चवर चढाअी केली. परंतु रॅट्रेच्या हाताखालील सशस्त्र शीखानीं त्याच्यावर चालून जाअून त्या मूठभर क्रांतिकारकांना अटक केली. लायलला गोळी घालून ठार मारणारा पीर अल्ली हा त्यांचा पुढारीहि यांत होता.

पीर अल्ली हा मूळचा लखनौचा तरीहि साध्या पुस्तकविक्याचा धंदा करून त्यानें पाटण्यामध्यें आपला चागला जम बसविला होता. तो जरी अेक सामान्य पुस्तकविक्या होता तरी क्रांतिकारक पुढाऱ्यांत त्याचें चांगलेंच वजन होतें. द्रव्य जमवून बरेचसे सशस्त्र लोक अेकत्र करून, त्यानें ब्रिटिश सत्तेविरुद्ध अुठण्याचा निर्धार केला होता. तो स्वभावानें करारी, बाणेदार आणि शूर होता. रॅट्रेने त्याला पकडून फाशीची शिक्षा देअू केली. फांशीच्या फळीवर अुभा असता आपल्या मुलाच्या आठवणीनें त्याला थोडा हुंदका आला. त्यासरशीं 'तूं अितरांचीं नांवें सांग, तुला जीवदान देतों' असें अिंग्रजांनीं त्याला सांगून पाहिलें. तेव्हा त्यानें निर्भीडपणें सागितलें कीं, "कांहीं वेळीं जसें हा जीव वांचविणें अवश्य असतें तसें कांहीं वेळीं तो देण्यानेंच कार्य होत असतें. तुम्ही मला माराल पण आमचें ध्येय तुम्ही मारूं शकणार नाहीं. माझ्या रक्ताच्या थेंबाथेंबांतून हजारों वीर उत्पन्न होतील आणि तुमचें राज्य धुळीला मिळवितील!"

"माझ्या रक्तांतून हजारों वीर निर्माण होतील" हे त्या हुतात्म्याचे अुद्गार खोटे ठरणार नव्हते; ठरले नाहींत! कारण २५ जुलैला दाणापूरच्या तुकड्याहि अुठल्या; आणि अिंग्रजांच्या तोफखान्याला न जुमानतां अिंग्रजी सैनिकाचे

आपले गणवेष फाडून त्यांतले शिपाअी जगदीशपूरच्या वृद्ध पण अुत्साहानें तरुण असलेल्या वीरश्रेष्ठ कुमारसिंहाच्या झेंडयाखालीं गोळा होण्यासाठीं तिकडे निघून गेले.

शहाबाद जिल्ह्यांत जगदीशपूर येथें क्रांतिकारकांना हा योग्य असाच नेता सांपडला. अद्वितीय पराक्रमसंपन्न असलेला आणि राजपूत कुळांत जन्मलेला वृद्ध वीर कुमारसिह शहाबाद जिल्ह्यामध्यें आपल्या प्रजेला सुखी ठेवून राज्य करीत होता. परंतु अिंग्रजानीं स्वीकारलेल्या राज्यें गट्ट करण्याच्या स्वार्थी धोरणामुळें कुमारसिंहाचें राज्यहि संपुष्टांत आलें. तेव्हां आपल्या राजवंशावरील आणि देशावरील झालेल्या अपमानाचें अुट्टें काढण्याकरितां जगदीशपूरच्या आपल्या राजवाड्याच्या गच्चींत हा तरणाबांड म्हातारा आपल्या मिशांना पीळ भरीत अुभा होता!

तरणाबांड म्हातारा! होय. वयानें खरोखर म्हातारा असूनहि तो तरणाबांड वाटे. ८० वर्षांचा कुमार आणि पुन्हा सिंह! या देशाची अिंग्रजांनीं चालविलेली लूट त्याला कशी पाहवणार? तेव्हां ज्या तरवारीनें अिंग्रजानीं हा देश रसातळाला पोंचविला, त्या तरवारीचेच तुकडे तुकडे करण्याची प्रतिज्ञा कुमारसिहानें केली; आणि तत्काळ त्यानें नानासाहेबांशीं सूत जोडलें!

कुमारसिह पाटण्याच्या शिपायांशीं गुप्त संधान जोडून क्रांतीची योजना आंखीत आहे अशा बातम्या कमिशनर टेलरच्या कानांवर येत होत्या. परंतु, ८० वर्षांचा हा मनुष्य आता मरणाचीच वाट पहात बसला असेल, तो कसला रणात उडी घेतो, अशीच कल्पना टेलरची झाली; आणि त्यांत पुन्हा कुमार-सिंहानें वरून राजनिष्ठेचीं पत्रें टेलरला पाठविण्याचा परिपाठ ठेवला होता. तरीहि कपटी टेलरनें कुमारसिहाला पाहुणचाराला बोलावून अटक करण्याचें योजून कुमारला निमंत्रण दिलें. पूर्वी अफझुलखानानेंहि असेंच आमंत्रण श्रीशिवाजीला पाठविलें होतें. परंतु जगदीशपूरच्या या चाणाक्ष राजपुतानें हा डाव ओळखून टेलरला लिहिलें कीं, "पाटण्याला येण्याअितपतहि माझी प्रकृति बरी नाहीं; बरी झाल्यावर येअीन."

कुमारसिंहा! खरोखर, तुझी प्रकृति बरोबर नाहीं. फिरंग्यांचें रक्त सांडून बरें वाटल्यावरच तूं पाटण्याला जाणार आहेस. पण कशाकरितां?

याच वेळीं दाणापूरचे अुठलेले शिपाअी कुमाराला बरें करण्याकरितां औषध घेअून आले. 'आतां तरवार अुपसून रणांत अुडी घ्याच' म्हणून शिपायांनीं विनंती केली. त्याच्या ब्राह्मण कुलगुरु अुपाध्यायांनीं हाच अुपदेश त्याला केला व त्याच्या कमरेची तरवारहि त्याच्याशीं हेंच कुजबुजली! त्यासरशीं ८० वर्षांच्या या वृद्ध वीरानें खवळून अुठून थेट रणांगणावर अुडी घेतली.

शिपायांनीं जगदीशपूरहून शहाबाद जिल्ह्याचें मुख्य गांव अऱ्हा येथें येअून तेथील किल्ल्याला वेढा दिला. किल्ल्यामध्यें अिंग्रजांच्या साहाय्याला सैतानासारखे लढणारे शीख शिपाअी असल्यामुळें किल्ला क्रांतिकारकांच्या हातीं पडला नाहीं. वेढा तीन दिवस चालू होता. अेवढ्यांत दि. २९ जुलैला दाणापूरच्या सैन्यांतील २७० अिंग्रज व १०० शीख हाताखालीं घेअून वेढा अुठविण्यासाठीं डनबार शोणच्या तीरावर येअून पोंचला. शोणपार होअून रात्र पडूं लागतांच हें सैन्य अऱ्हाच्या पुलाजवळ येअून पोंचलें. परंतु, डनबारला क्रांतिकारकांचें सैन्यच कोठें दिसेना. त्याला वाटलें, 'पांडे' घाबरून पळून गेले. परंतु अऱ्हाच्या झाडीमध्यें दबा धरून बसलेले कुमाराचे काळे कपडे घातलेले काळे क्रांतिकारक रात्रीच्या काळ्या काळोखांत दिसून येणेंच शक्य नव्हतें! दाही दिशांनीं सूं सू करीत गोळ्या सुटूं लागल्या. डनबार तर पहिल्यानेंच मारला गेला. गोरे अिंग्लिश आणि काळे शीख, दोघेहि काढता पाय घेअून शोणच्या रोखानें पळत सुटले. परंतु आतां कुमाराच्या तावडींतून सुटून जाणें ही अितकी सोपी गोष्ट नव्हती!

भाला भोंसकून घायाळ केलेलें रानडुक्कर ज्याप्रमाणें दोन्ही बाजूंला वाटेवर रक्ताच्या धारा गाळीत पळत सुटतें, त्याप्रमाणें अिंग्रज सैन्य रक्तबंबाळ होऊन पळत सुटलें. परंतु कुमारानें त्यांचें पुरें कंदन केलें. पांड्यांनीं शोणवरच्या त्यांच्या नावाहि जाळून टाकल्या होत्या. गेलेल्या ४५० लोकांपैकीं अवघे ५० लोकच दाणापूरला जिवंत आले.

डनबारचें पारिपत्य झाल्यामुळें मेजर आयर अऱ्हावर चालून गेला. २ ऑगस्टला बिबीगंज खेड्याजवळ कुमाराची आणि त्याची गांठ पडली. आयरजवळ तीन अुत्कृष्ट तोफा असल्यानें त्यानें बराच टिकाव धरला. कुमाराच्या सैनिकांनीं जेव्हां या धडपडणाऱ्या तोफांवरच चाल केली तेव्हां मात्र अिंग्रजांची

अवघड परिस्थिति झाली. यावेळीं आयरनें संगिनींच्या हल्ल्याची आज्ञा दिली. या संगिनींच्या हल्ल्यांत कुमाराच्या सैनिकांचा निभाव न लागल्यामुळें त्यांनीं जगदीशपूरपर्यंत माघार घेतली.

आयरनें अऱ्हाच्या किल्ल्यावर जाऊन तेथील अिंग्रजांची सुटका केली, व कुमार अऱ्हावर येण्यापूर्वीच त्यानें जगदीशपूरवर चढाअी केली. शिस्तीच्या कसलेल्या विजयी अिंग्रज सैन्याबरोबर आपल्या आधींच खचलेल्या व थकलेल्या सैन्यासह झुंज देणें अशक्य वाटून कुमारानें जगदीशपूर सोडलें. १४ ऑगस्टला आयरनें कुमाराच्या राजवाड्यांतच आपली छावणी केली. कुमारानें मात्र शरण न जातां रणांगणावरच आपलें घर केलें.

आतां आपण मध्येंच सोडलेल्या दिल्लीच्या वेढ्याकडे वळूं. क्रांतिकारकांच्या चढायांनीं वेड लागून जाण्यापर्यंत पाळी आलेल्या अिंग्रजी सैन्यांत, निराशेनें 'आता वेढा अुठवावा कीं काय' याविषयीं गंभीर चर्चा चालू होती. अिकडे क्रांतिकारक सैन्येंहि अेकेच ठिकाणीं दिल्लींत अडकून पडल्यामुळें त्यांचीहि मोठी कुचंबणा चालली होती. यावेळीं क्रांतिकारकांनीं जर बाहेर पडून आणि प्रांतभर पांगून वेगवेगळ्या ठिकाणीं अिंग्रजांना सतावण्याचा अुद्योग केला असता तर दिल्लीच्या आसपासच्या विभागांत असलेल्या मूठभर अिंग्रजांची भंबेरी अुडती. परंतु राजधानी टिकवण्याच्या भ्रामक समजुतींत शिपाअी राहिले. याच वेळीं अिंग्रज कंटाळून जर वेढा अुठविते तर मात्र त्यांच्या दुर्दशेला पारावारच राहिला नसता, आणि अिंग्रजी सत्तेचे बारा वाजण्याची वेळ आली असती. परंतु बेर्डस्मिथ या धडाडीच्या अधिकाऱ्यानें वेढा मुळींच न अुठवण्याचा सल्ला सेनापति विल्सनला दिला. त्यानें सांगितलें, "दिल्लीचा वेढा जर आपण अुठवूं तर पंजाब हातचा जाअील, हिंदुस्थानहि जाअील आणि साम्राज्य कायमचें नष्ट होअील."

क्रांतिकारक छोट्या छोट्या टोळ्यांनीं जाअून अिंग्रजांच्या बगलेवर छापे घालीत. पाठलाग करणाऱ्या अिंग्रजी सैन्याला ते अशा हुलकावण्या देत देत चुकवीत आणीत कीं, तें सैन्य नेमकें शिपायांच्या तोफखान्याच्या टप्प्यांत येअी. या हुलकांवण्यांमुळें अितके अिंग्रज मारले गेले कीं, कांहीं झालें तरी शिपायांचा पाठलाग म्हणून करावयाचा नाहीं अशी सक्त आज्ञा विल्सननें काढली. अुत्तर हिंदुस्थानांतलें तारायंत्रें, आगगाड्या, टपाल यांचें दळणवळण शिपायांनीं

तोडून टाकल्यामुळें दिल्लीचें अिंग्रजी सैन्यहि वेढ्यांत अडकून पडल्याप्रमाणेंच होतें. त्यामुळें बाहेर काय चाललें आहे, कुठली मदत केव्हां येअील याचा अंदाजच येत नसे. कलकत्त्याहून कांहींहि साहाय्य येण्याची शक्यता नसल्यानें अिंग्रजांचा सारा भर पंजाबवरच होता. शेवटीं सर जॉन लॉरेन्सकडून निकलसनच्या हाताखालीं पाठविलेलें २ हजारांचें सैन्य अेकदांचें येअून पोंचलें. त्यामुळें अिंग्लिशाच्या जिवात जीव आला. कारण निकलसनसारखा सेनापति म्हणजे हजारों सैनिकांच्या किंमतीचा होता.

अिंग्लिशाच्या बाजूला निकलसनसारखा खंबीर नेता लाभल्यामुळें त्यांची पराभवाची भीति मावळली तर अिकडे क्रांतिकारकांना सुयोग्य नेताच नसल्यामुळें विजयाची आशा दुरावत चालली. दिल्लीला शूर शिपायांची वाण नव्हती. अिंग्रज अधिकाऱ्यांच्या हातांखालींच त्यांचेंहि शिक्षण आणि कवायती झालेल्या होत्या. अफगाणिस्थानांतहि याच शिपायांनीं पराक्रम गाजविलेला होता. परंतु दिल्लींतील या ५० हजार शिपायांनीं पुढारीच नीट मिळाला नाहीं. दिल्लीच्या बहादुरशहाला युद्धाचा कांहींच अनुभव नव्हता. म्हणून त्यानें बख्तखानाला सेनापति नेमून सैन्याच्या व्यवस्थेसाटीं आणखीहि कांहीं अधिकारी नेमले.

परंतु अेवढ्यानेंहि कांहीं सुधारणा होत नसल्याचें जेव्हां स्पष्ट दिसून आलें, तेव्हां या स्वदेशप्रेमी बादशाहानें आपल्या दोषामुळें जर क्रांतीचा नाश होत असेल तर सर्व अधिकार सोडून बादशाहीचा त्याग करण्यास आपण सिद्ध असल्याची अिच्छा प्रकट केली. "आपली बादशाही राजवट चालू असण्यापेक्षां जो कोणी समर्थ नेता हिंदुस्थानला स्वराज्य आणि स्वातंत्र्य मिळवून देअील तो सत्तारूढ झाला तर आपल्याला आनंद होअील" असे विचार त्यानें जयपूर, जोधपूर, बिकानेर, अलवार येथील संस्थानिकांना पत्रद्वारें कळविले. त्यानें पुढें असें लिहिलें होतें कीं, "शत्रूला हाकलून देण्यास सर्व संस्थानिक मिळून पुढें येणार असाल तर मीसुद्धां माझी सार्वभौम सत्ता संस्थानिकांच्या संयुक्त राजमंडळाच्या स्वाधीन करण्यास सिद्ध आहें."

अशा रीतीनें दिल्लींतील क्रांतिकारकांना मार्गदर्शक सेनापतीच न लाभल्यामुळें दिल्लीमध्यें अत्यंत निराशेचें वातावरण पसरलें. शिपाअी आपले दोष अेकमेकांवर लादूं लागले. 'जादा पगार द्या नाहीं तर लूटमार करूं' अशा

धमक्या त्यांनीं बादशाहाला दिल्या. तेव्हां अशा परिस्थितींत दिल्ली खाली करून शरण जावयाचें कीं युद्ध चालू ठेवावयाचें याचा निर्णय घेण्यासाठीं बादशाहानें सर्वांना अेकत्र बोलावलें. ‘ युद्धच चालू ठेवावयाचें ’ असाच निर्णय सर्वांनीं दिला. यानंतर नजफगडाजवळ अिंग्रजांच्या सैन्याला व तोफखान्याला चोपून काढण्यासाठीं सैन्यें पाठविण्यांत आलीं. परंतु सेनापतीची आज्ञा न मानता नीमचचें सैन्य बरेलीच्या सैन्यापासून दूरवर तळ देऊन राहिलें. त्यामुळें निकलसननें निवडक सैन्य बरोबर घेऊन या हटवादीपणामुळें आयत्याच एकट्या सापडलेल्या सैन्याला चांगलेंच फजित करून टाकलें. लढाअींत नीमचचें सर्व सैन्य धारातीर्थी पडलें. नीमचचें सैन्य जरी निकलसनबरोबर मोठ्या शौर्यानें लढलें तरी शिस्त नसलेलें शौर्य हें भ्याडपणाप्रमाणेंच निरुपयोगी कसें ठरतें हें दिसून आलें.

२५ ऑगस्टच्या या विजयानें अिंग्रजांच्या सैन्यात पुनः अुत्साहाचें वातावरण दिसूं लागलें. वेढ्याच्या कामाकरिता पंजाबहून आलेलें सैन्य आणि तोफखाना सुखरूपपणें अिंग्रजांच्या छावणींत येअून पोचला. तेव्हा तीन अिंग्लिश सेनापतींना तीन महिनेपर्यंत दाद न देणाऱ्या दिल्लीवर शेवटची जोराची चढाअी करण्याची सिद्धता करण्यांत आली. आता अिंग्रजी सैन्याची संख्या ११ हजारपर्यंत वाढली होती. सप्टेंबर चालू होतांच नवे मोर्चे अिंग्रजांनीं बांधले. त्यामुळें दिल्लीचे शिपाअी घाबरले. मौज अशी कीं, अिंग्रजांच्या नोकरींत असलेले हिंदी लोक मोठ्या शिस्तीनें आणि शांतपणानें आपआपलीं कामें करीत. पण तेच हिंदी सैन्यांतील लोक मात्र बेशिस्त, पुढाऱ्याचें न ऐकणारे असेच दिसले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आज्ञा शब्द न् शब्द पाळणें हेंच तर शिस्तीचें खरें मर्म आहे. परंतु हीच गोष्ट नेमकी दिल्लीच्या शिपायांत नव्हती.

१४ सप्टेंबर अुजाडला. अिंग्रजी सैन्याचे चार विभाग करून तीन भाग निकलसनच्या हाताखालीं व अेक भाग मेजर रीडच्या हाताखालीं देअून काबूल दरवाज्यानें चढाअी करण्याचा बेत आंखण्यांत आला. सूर्य अुगवतांच या हल्ल्याला प्रारंभ झाला. प्रथम काश्मीर बुरुजांत खिंडार पाडून अिंग्रज आंत घुसूं लागले. क्रांतिकारकारांनींहि आपला तोफखाना धडधडत ठेवला. खंदकांमध्यें अिंग्रजांच्या प्रेतांचा अेकावर अेक खच पडला. तरीहि या भयंकर प्रतिकाराला न जुमानतां अिंग्लिश सैन्य आंत घुसलेंच. तिसरा अिंग्रजी सैन्य-

विभाग काश्मीर दरवाज्यावर चालून गेला. तेव्हां तटावरून, खिडक्यांतून प्रत्येक ठिकाणाहून कुलुपी गोळ्यांचा वर्षाव होअूं लागला. अेवढ्यांत अेका शूर अिंग्रज वीरानें काश्मीरद्वाराजवळ अेक मोठा सुरुंग ठेअून बत्ती दिली. तत्काळ मोठा स्फोट होअून तें सर्व प्रवेशद्वारच कोसळून पडलें. तेव्हां कॅंपबेलनें चढाअीची आज्ञा दिली व अिंग्रज सैन्यानें आंत घुसून दिल्लींत प्रवेश केला.

मेजर रीडच्या हाताखालील सैन्यविभाग काबूल प्रवेशद्वारावर चालून गेला. पहिल्याच चकमकींत मेजर रीड ठार झाला. त्यामुळें त्याच्या सैन्यांत अव्यवस्था व गोंधळ माजला. परंतु होप ग्रॅंटनें आपलें घोडदळ मदतीला आणून रीडच्या पडत्या सैन्याला हात दिला. परंतु या ठिकाणीं क्रांतिकारकांनीं अशी झुंज दिली कीं, घोडदळालाहि पुढें सरकणें कठीण होअून बसलें. हल्ल्यामागून हल्ले चढत होते. अिदगाडापाशीं अेक भीषण हल्ला चढवून क्रांतिकारकांनीं अिंग्रजांना रणांतून पळवून लाविलें. क्रांतिकारक वीरांनो! धन्य, धन्य! तुमच्या-पैकीं सर्वजण अशा शौर्यानें लढते तर!

कॅंपबेल, जोन्स आणि निकलसन या तीन सेनाधिकाऱ्यांच्या हातांखालील सैन्याचे विभाग दिल्लीचा समाचार घेण्यासाठीं विजयभरानें आंत घुसले; परंतु क्रांतिकारकांनीं त्याच्यावर गोळयाचा असा वर्षाव केला कीं, निकलसनसारख्या खंद्या वीरालाहि माघार घ्यावी लागली. तितक्यांत कोणा तरी शूर शिपायानें निकलसनलाच खड्यासारखा निवडून काढून त्याच्यावर वार केला आणि तत्काळ निकलसन भूमीवर लोळूं लागला. अिंग्रजांच्या सैन्यांत 'हटो हटो'ची अेकच ओरड सुरू झाली, तर क्रांतिकारक 'छोडो छोडो' म्हणून कापीत सुटले. ज्या गल्लींत ही भयकर झुंज चालली होती तिच्या लांबीचा प्रत्येक तसू न् तसू भाग अिंग्रजांची प्रेतभूमि होअून राहिला!

दिल्लींत चालू असलेल्या या चढाअीच्या पहिल्याच दिवशीं अिंग्रजांचा भयंकरच संहार झाला. त्याचे तीन सेनापति घायाळ झाले. ६६ अधिकारी आणि ११०४ सैनिक मारले गेले; आणि अितकी किंमत देअून विल्सनच्या हातांत दिल्लीचा चौथा भागहि धड पडला नव्हता. त्यामुळें आतां माघार घ्यावी असेंच विल्सनचें मत पडलें. परंतु शिबिरांत मरणोन्मुख होअून पडलेल्या निकलसननें हा विचार जेव्हां अैकला तेव्हां तो चवताळून अुठला; व त्यानें माघार घेण्यास

सांगणाऱ्या विल्सनचें मत फिरविलें. त्यामुळें १४ सप्टेंबरला अिंग्रजांनीं चढाअीला पुनः प्रारंभ केला.

क्रांतिकारक सैन्यांतहि दिल्ली सोडावी कीं झुंजवावी, याविषयीं खल चालू होता. अिंग्रजी सैन्यांत बहुमतानें जें ठरेल तें प्रत्येक जण कसोशीनें पाळी; परंतु क्रांतिकारकांत आपल्याच हेक्यानें चालण्याची फुटीर वृत्ति फार असे. शिपाअी १५ सप्टेंबरपासून २४ पर्यंत दिल्लीकरितां मोठ्या निश्चयानें आणि शौर्यानें झुंजले. जेव्हां दिल्लीचा पाअूण भाग हातचा गेला, तेव्हां सेनापति बख्तखानानें "आतां शरण जाण्यापेक्षां बाहेर पडून शत्रूला सतवावें" असा आपला विचार बादशाहाला कळविला. परंतु पराजयानें खचल्यामुळें बादशाहाला कोणताच ठाम बेत निश्चित करतां आला नाहीं. तो हुमायूँच्या कबरींत लपून बसला. हें कळतांच हॉडसननें त्याला कैद करून राजवाड्यात आणून कैदेंत ठेवलें. बहादुरशहाच्या मुलांनाहि त्यानें गाडींत घालून राजवाड्यापाशीं आणलें व तेथे त्यांना गाडींतून फरफटत बाहेर काढून हॉडसननें तीन गोळ्या घालून तीन राजपुत्रांचा बळी घेतला. राजपुत्रांचीं प्रेतें तेथेंच रस्त्यावर पडलीं होतीं. गिधाडांनीं खाअून तीं विद्रूप केल्यावर त्यांना नदींत फेकून देण्यात आलें.

अकबराच्या वंशांतल्या या वंशजांचा दफनविधीहि होअूं शकला नाहीं. आतां मात्र शीखांना वाटलें कीं त्याच्या ग्रंथांतील भविष्यवाणी खरी ठरली!

अिंग्रजांनीं दिल्लींत अितकी भयंकर लूटमार आणि कापाकापी केली कीं, त्यांनीं नादिरशहालाहि मागें टाकलें. अिंग्लिशांच्या दहा हजार सैन्यापैकीं ४००० ठार किंवा घायाळ झाले. क्रांतिकारकांची हानि पांच-सहा हजारांच्या आंतबाहेर असावी. अिंग्लिशांसारख्या प्रबल शत्रूशीं दिल्लीनें १३४ दिवस आणि रात्री सतत झुंज दिली. नेता नाहीं, संघटना नाहीं, अिंग्रजांसारखा शत्रु आणि आपलेच देशबांधव अिंग्रजाच्या बाजूला आपल्याविरुद्ध लढायला! अशाहि स्थितींत क्रांतिकारकांनीं कौतुक करण्यासारखी झुंज दिली. दिल्लीच्या वेढ्याचा अितिहास फुकट जाणार नाहीं. त्या वीरांचे गुण आणि दोषहि पुढील पिढ्यांनीं आदरानेंच पहावेत असे आहेत.

दन्तभग्नोऽपि नागानां श्लाघ्यो गिरिविदारणे—पर्वताशीं झुंज घेत असतांना तुटलेला दांतच हत्तीला जास्त शोभून दिसतो!!

♣ ♣ ♣

# ३ लखनौ

अयोध्येंतील अिंग्रजी सत्तेचा अंत झाल्यावर क्रांतिकारकांनीं लखनौच्या रिकाम्या पडलेल्या सिंहासनावर पूर्वीच्या नबाबाचा मुलगा बिरजी कादीर यास बसविलें. बिरजी कादीर अज्ञान असल्यामुळें राज्य चालविण्याचें सर्व अधिकार त्याची आअी हजरत महाल हिच्या हातीं सोंपविण्यांत आले. अयोध्येची ही बेगम धाडसी, स्वातंत्र्यप्रेमी आणि माणूसबळ अुभे करणारी अशी कर्तबगार स्त्री होती. छिन्नतच्या विजयानंतर अेक आठवडाभर अंदाधुंदीचें अराजक माजून राहिलें होतें. त्यासाठीं राजकारभाराची नवी घडी स्थापन करून, सर्वच खात्यांतून शिस्त लावून देण्यासाठीं बेगमेनें अतोनात प्रयत्न केला. नवीन अधिकारी नेमण्यांत आले. परंतु या अधिकाऱ्यांच्या आज्ञाच लोक मानीनात. सर्वच खात्यामधून याच प्रकारच्या चुका घडून येतात.

प्रत्येक क्रांतीचा प्रारंभ, त्यावेळीं नको असलेल्या सत्तेचे नियम-निर्बंध तरवारीनें तोडून टाकण्यापासूनच होतो. परंतु अेकदां का ही संवय अंगवळणीं पडली म्हणजे पुढेंसुद्धां सर्व नियम व कायदे धाब्यावर बसविण्याचीच प्रवृत्ति बळावते. परकीय सत्तेला अुलथून टाकण्यासाठीं जे वीर पुढें येतात त्यांना पुढें सर्वच सत्ता, मग ती आपली असली तरी, अुलथून टाकावीशी वाटूं लागते; आणि त्याचमुळें पुढें क्रांतींतून अराजक जन्माला येऊन कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी स्थिति होते. औषधाकरितां दारू घेणाऱ्यास जसें पुढें दारूचेंच व्यसन लागतें, त्याप्रमाणें दुष्ट राजसत्तेचे शासन-निर्बंध तोडूनच क्रांतिकारक थांबत नाहींत; त्यांना कोणत्याच राजसत्तेचें बंधन नको वाटूं लागतें; आणि क्रांतींतील याच घातकी विषामुळें त्या क्रांतीचाच शेवटीं नाश होतो.

म्हणून परकी सत्तेचा द्वेष करण्याअितकेंच, आपली सत्ता शिरसावंद्य मानण्याचें शिक्षणहि पहिल्यापासून लोकांना दिलें गेलें पाहिजे. परकीय सत्ता नष्ट करून टाकल्याक्षणींच, अराजक न माजूं देण्याकरितां बहुजन समाजानें निवडलेली शासनपद्धति राष्ट्रांत ताबडतोब चालू करण्यांत यावी; आणि तशी ती

अेकदां चालू झाली कीं मग प्रत्येकानें तिजपुढें मान लवविलीच पाहिजे. सारांश, बाहेर जरी क्रांतीची धामधूम आणि बजबजपुरी असली तरी आंतून आपणच बनविलेलें व्यवस्थित राज्ययंत्र काम करीत असावें; बाहेर तरवार तर आंत न्याय, हेंच पथ्य सदैव पाळलें गेलें पाहिजे.

या दृष्टीनें ५७ च्या क्रांतीचा पहिला भाग फार यशस्वीपणें पार पाडण्यांत आलेला होता. परंतु परकीय सत्तेच्या शृंखला अेकदां तोडून टाकल्यावर शिपायांना कोणतेंच बंधन नकोसें वाटूं लागलें. आणि त्यामुळें शिस्तीच्या दृष्टीनें सर्वत्र ढिलेपणा आला. अधिकाऱ्यांच्या आज्ञा ते गुंडाळून ठेवूं लागले. अशा वेळीं सर्वांवर आपल्या पराक्रमानें व बुद्धीनें छाप पाडणारा अेखादा वीरपुरुष पुढें येता, तर त्यांचे अनुयायी म्हणून सर्वजण अेकत्र येअूं शकले असते व क्रांति विजयी झाली असती! परंतु असा लोकनायक न लाभल्यानें अयोध्येच्या सैन्यामध्यें हुतात्म्यापेक्षां बाजारबुणगे लोक अधिक भरले. तरीहि या सैन्यांत जे काहीं थोडे पराक्रमी वीरश्रेष्ठ होते त्यांनींच जोर धरल्यामुळें जुलै २० ला लखनौच्या रेसिडेन्सीवर पहिला जोराचा हल्ला करण्याचा निर्णय घेण्यांत आला.

२० जुलैला सकाळीं ८ वाजतां क्रांतिकारकांनीं रेसिडेन्सीच्या तटाखालीं सुरुंग भरून भगदाड पाडलें. शिपायांच्या तुकड्या आंत शिरूं लागल्या. परंतु अिंग्लिशांचा तोफखाना जोरानें धडधडूं लागला. अितक्यात अेका शिपायानें हातीं स्वराज्याचें निशाण घेअून 'चला बहादूरांनो' म्हणून खंदकात अुडी घेतली. अर्थात्, तो अिंग्रजांच्या गोळीला बळी पडला. त्याच वेळीं त्याचा सूड घेण्यासाटीं हजारोंनीं त्याच्या प्रेतावरून घुसून जाऊन तें निशाण फडकविणें अवश्य होतें. परंतु बाजारबुणग्याचा तो जमाव सरळ माघारीं पळून गेला! अेवढयात शिडीवाल्याचें एक पथक खंदकांत उतरून शिड्यांनीं वर चढूं लागलें. अिंग्रजांच्या तोफखान्याला हें सर्व पथक बळी पडलें. परंतु लागलीच त्याच्या मागोमाग दुसरें पथक आलें नाहीं. क्रांतिकारक आणि अिंग्रज यांच्यामधील फरक हाच होता. अेक पडला तर त्याच्या जागीं मागचे दहा लोक पुढें घुसत.

बळी पडलेल्या वीरांनो! तुम्हीं जें आपलें रक्त त्या ठिकाणीं सांडलेंत, त्यामुळेंच खरोखर हें निशाण दैवी तेजानें तळपत राहील! स्वराज्याचें निशाण अशा रक्तबंबाळ हातांमध्येंच जास्त शोभून दिसतें. भ्याड आणि जिवंत

प्रेतांच्या पापी स्पर्शाच्या विटाळानें तें पवित्र निशाण भ्रष्ट होत असतें! असल्या भागूबाअींनी तें हातीं धरण्याचें कारणहि नाहीं!

पहिली चढाअी परतून लावल्यानंतर क्रांतिकारकांच्या आणि अिंग्रजांच्या छोट्या-मोठ्या चकमकी चालूच होत्या. क्रांतिकारकांनीं अेकंदर ३७ वेळा रेसिडेन्सीला सुरुंग लावले. अिंग्रजाच्या रेसिडेन्सींतील निशाणावर गोळयांचें टिपण साधून शिपाअी आपलें मनरंजन करीत; आणि रात्र पडतांच निर्लज्जपणें अिंग्रजहि रेसिडेन्सीवर तत्काळ दुसरें निशाण अुभारीत! अिंग्रजाच्या बाजूनें लढणाऱ्या शीखांना व हिंदी लोकांना क्रातिकारक प्रत्येक रात्रीं लपतछपत जाअून विचारीत कीं, "तुम्ही राष्ट्राशीं 'निमकहराम' कां होतां, नि फिरंग्याची तरवार आपल्याच देशबांधवाचे शरीरात का खुपसतां?" परतु 'राजनिष्ठ' शीख त्यांचीच थट्टा अुडवीत आणि साधलें तर त्यांना अिंग्लिश सोल्जरांच्या स्वाधीन करीत.

याच वेळीं अयोध्येचा चीफ कमिशनर मेजर बँक्स हाहि वेढयामध्यें ठार झाला. परंतु अिंग्लिशांच्या शिस्तीच्या संघटनेमुळें वेढयाच्या धामधुमींतहि, मुख्य सेनापति मरूनहि अेकाद्या साध्या शिपायाच्या मरणापेक्षां काहीं विशेष अुणीव त्यामुळें आली असें कधीं झालें नाहीं. अन्नधान्याची चणचण, क्रांति-कारकांच्या हालचाली व मृत्युसंख्या यामुळें रेसिडेन्सींतील अिंग्रज मात्र चांगलेच वैतागून गेले होते. बाहेरून कांहीं साहाय्य येईल तरच आपला आतां निभाव लागेल असें त्यांना वाटूं लागून त्यांनीं अेका दूताबरोबर सर्व आराखडे आणि तक्ते देअून त्याला कानपूरला हॅवेलॉककडे पाठविलें व त्याला साहाय्याला येण्यासाठीं विनंति केली.

हॅवेलॉक येणार अशा आनदाच्या आशेंत अिंग्लिश आहेत तों क्रांतिकारकांची दुसरी चढाअी चालू झाली. क्रातिकारकांच्या तोफांनीं तटाला भलेंमोठें खिंडार पाडून मोठीच कामगिरी केली. परंतु त्यामधून आंत जाण्यास क्रांतिकारकांची तुकडी कोठें होती? अेवढें खिंडार जर अिंग्लिशानीं शत्रूच्या तटाला पाडलें असतें तर अवघ्या अर्ध्या तासांत त्यांनीं तें स्थळ हस्तगत केलें असतें. अिंग्रजांच्या बाजूच्या हिंदी लोकांनीं शिस्तींत, शौर्यांत आणि मृत्यूविषयींच्या निर्भयपणांत क्रांतिकारकांपेक्षांहि वरचा क्रमांक गांठला! पहा देशद्रोह्यांतलें हें

शौर्य आणि पहा हा देशभक्तांतील भ्याडपणा! अशी स्थिति असूनहि कांहीं लढवय्या क्रांतिवीरांनीं विजय नाहीं तरी अमर कीर्तीकरितां शत्रूच्या तटांवर जाअून झुंज दिली.

तटांवरील अिंग्लिशांच्या संगिनी हिसकावून घेण्याकरितां सिंहाप्रमाणें चवताळून जाअून शरीरांत प्राण असेतोंपर्यंत झुंजलेल्या या क्रांतिकारकांचीं छायाचित्रें स्वतः अिंग्रजांनीं घेतलीं!

हॅवेलॉक येणार या आनंदांत असलेल्या सेनापतीच्या हातीं अचानक हॅवेलॉकचें पत्रच येअून पडलें, व निदान २५ दिवस तरी आपणाला लखनौला येतां येत नसल्याचें त्यानें लिहिलें होतें. हॅवेलॉक आपल्याबरोबर १५०० सैनिक आणि तोफा घेअून कानपुराहून २९ जुलैलाच निघाला होता व तो आणखी पांच-सहा दिवसांत लखनौलाहि येणार होता. परंतु गंगा अुतरून तो जों अयोध्येंत पाअूल ठेवतो तों अयोध्येंतील तसू न तसू जागा प्रतिकार करण्यासाठीं सज्ज असलेली त्याला दिसली. प्रत्येक जमीनदारानें आपले शें पांचशें लोक जमवून स्वातंत्र्याच्या लढाअीला प्रारंभ केला होता. ओनाव आणि बशीरतगंज येथें क्रांतिकारकांशीं त्यास दोन लढाया द्याव्या लागल्या. परंतु या लढायांत त्याचे सहावा हिस्सा सैनिक कामाला आले. क्रांतिकारकांची मात्र कांहींच हानि झाली नाहीं. त्यामुळें ३० जुलैला मंगळवार येथें त्यास माघार घेअून राहावें लागलें.

हॅवेलॉक ४ ऑगस्टपर्यंत मंगळवार येथेंच तळ ठोकून होता. बशीरतगंजच्या लढाईत त्याचे ३०० लोक मेले आणि त्याचें सैन्य अितकें थकून गेलेलें दिसलें कीं, त्यानें लखनौकडे जाण्याचा बेत टाकून देअून गंगेच्या बाजूनें माघार घेतली. आतां त्याच्याबरोबर १५०० पैकीं अवघे ८५० सैनिकच राहिले होते. हॅवेलॉकच्या छावणीभोंवतीं क्रांतिकारक सैन्यें मृत्यूप्रमाणें घिरट्या घालीत होतीं. ११ ऑगस्टला त्यानें पुनः बशीरतगंजवर चढाअी केली. यावेळींहि जय जरी त्याचा झाला तरी हानिसुद्धां त्याचीच जास्त झाली.

अिकडे नानासाहेबानें सागर आणि ग्वाल्हेर येथील क्रांतिकारक व अितर स्वयंसैनिक पथकें जमवून बिठूरकडे चाल केली व कानपूरला धोका निर्माण केला. त्यामुळें नीलच्या साहाय्यासाठीं हॅवेलॉकला माघार घेअून १२ ऑगस्टला

परत गंगा ओलांडून कानपूरला यावें लागलें. याच वेळीं अेकमेकांतील मत्सरामुळें नील आणि हॅवेलॉक यांच्यामध्यें चांगलेंच वितुष्ट माजलें होतें. नील हा हॅवेलॉकच्या हाताखालचा अधिकारी असल्यामुळें नीलनें कांहीं गोष्टींत दाखविलेला शिष्टपणा हॅवेलॉकला मुळींच आवडला नाहीं. तरी पण, केवळ अिंग्रजी राज्याचें आणि राष्ट्राचें कल्याण डोळ्यापुढें ठेवून, हॅवेलॉकनें आपल्या अपमानाची शिक्षा नीलला देण्याचा विचार सोडून दिला. आपल्या दुहीचा फायदा शत्रूला मिळूं नये हाच त्याचा मुख्यतः हेतु होता.

ज्या समाजांत प्रथम समाजाचें कल्याण आणि नंतर व्यक्तीच्या भावनांचा विचार असल्या वृत्तीचे लोक असतात तोच समाज सुखी, स्वतंत्र आणि भर-भराटलेला असतो हें लक्षांत ठेवावें.

हॅवेलॉक कानपूरला येतो तों नानानें ब्रह्मावर्त घेतल्याचें त्यास कळतांच तो ब्रह्मावर्तावर चालून गेला. क्रातिकारकांचा पराभव करून हॅवेलॉक १७ ऑगस्टला कानपूरला परतला. या वेळीं काल्पीलाहि नानाचें काहीं सैन्य होतें. काल्पी, ब्रह्मावर्त, अयोध्या आणि गंगेचीं दोन्ही तीरें याच्या बाजूनें हॅवेलॉकला चांगलेंच हैराण करण्यांत आलें होतें. अेवढ्यामध्यें लखनौवर चालून जाणाऱ्या सैन्याचें सेनापतिपण हॅवेलॉककडून काढून घेअून तें जनरल औट्रॅमकडे देण्यांत आल्याची आज्ञा झाली. त्यामुळें हॅवेलॉकनें हायच खाल्ली. कारण लखनौ स्वतंत्र करण्याचें यश आतां अनायासें अगदीं शेवटच्या घटकेला दुसऱ्याचे हातीं पडणार होतें. तरीहि त्यानें आपली निराशा आणि अपमान हा बाजूला ठेवून आपल्या राष्ट्राच्या कर्तव्यास तो जागला; व पूर्वीप्रमाणेंच धडाडीनें आणि निरलसतेनें तो आपल्या कामांत गुंग झालेला दिसला. याच सुमाराला म्हणजे १६ सप्टेंबरला सर जॉन औट्रॅम कानपूरला आला. लखनौचा वेढा अुठविण्याचें श्रेय हॅवेलॉकलाच मिळावें असें त्याचें प्रामाणिक मत असल्यामुळें त्यानें आपले सर्व अधिकार हॅवेलॉकच्या हातीं सोंपविलें आणि आपण अेक साधा सैनिक म्हणून त्याच्या हाताखाली राहिला.

२० सप्टेंबरला बरोबर २५०० अिंग्लिश सैन्य आणि शीख आणि अितर असे ७५० लोक घेऊन हॅवेलॉक पुन्हा लखनौच्या साहाय्याकरितां चाल करून निघाला. २३ सप्टेंबरला हॅवेलॉक आलम बागेपाशीं आला. या ठिकाणीं

क्रांतिकारक सैन्याचा मोठा तळ होता. त्या ठिकाणीं चकमक झडून शत्रूनें क्रांतिकारकांच्या ५ तोफा जिंकल्या व तेथून तो चार बागेच्या पुलापर्यंत येऊन धडकला. हें ठिकाण विशेष महत्त्वाचें आणि मोक्याचें असल्यानें या ठिकाणीं घनघोर युद्धाला प्रारंभ झाला. पुलावर कॅप्टन मॉडनें जोराची गोळ्यांची वृष्टि करूनहि पूल खुला झाला नाहीं. त्यामुळें अिंग्लिश सैन्य तेथेंच अडकून पडण्याची भीति निर्माण झाली. परंतु हॅवेलॉकच्या तरुण मुलानें २५ अिंग्लिशांचें पथक घेऊन अशा तडफेनें आणि वीरश्रीनें पुलावर चाल केली कीं, क्षणार्धात क्रानिकारकाचा प्रतिकार संपून अिंग्लिश सैन्य पुलावरून पुढें घुसलें. हॅवेलॉक आणि नील मुसंडी मारत लखनौवर चालून येत होते. खास बझारमध्यें मात्र अेका शिपायानें नेम साधून नीलवर गोळी झाडून त्याला ठार केलें.

अुम्या अिंग्लिश सैन्यांत नीलअितका शूर, क्रूर आणि काळीजशून्य असा दुसरा मनुष्य सांपडणें कठीण आहे. परंतु, नीलच्या मृत्यूमुळें येवढासुद्धां घोटाळा अिंग्रजाच्या सैन्यांत निर्माण झाला नाहीं. नीलचें प्रेत खास बाजारांत पडलें होतें, तरी अिंग्रजी सैन्य पूर्वीप्रमाणें चाल करून पुढें चाललेलें होतें. अिंग्लिश सैन्याचें वैशिष्टयच मुळीं हें होतें कीं, अेका व्यक्तीवर त्यांचें काम कधींच तटून राहात नसे!

हॅवेलॉकच्या विजयानें रेसिडेन्सींतील अिंग्रज अत्यानंदानें नाचूं लागले. लखनौच्या रेसिडेन्सीमध्यें ८७ दिवसपर्यंत चाललेल्या या लढ्यांत ७०० माणसें मरण पावलीं. वाचलेल्यांची संख्या ९०० पर्यंत होती. परंतु त्याकरितां लखनौला येअीपर्यंत हॅवेलॉकचेंहि ७२२ लोक ठार झाले होते. इतकी किमत देअून हा लखनौचा विजय पदरांत पडला. परंतु खरी फजिती पुढेंच होती. अिंग्लिशाना असें वाटत होतें कीं, हॅवेलॉकचेहि सैन्य रेसिडेन्सीमध्यें प्रवेश करतांच 'पांड्यां'चें सैन्य पागून पळून जाअील. परंतु हॅवेलॉक आंत शिरतांच क्रांतिकारकांनीं आसपासचीं मान्याचीं ठिकाणें हातीं घेतलीं आणि पुन्हा वेढा पुरा केला. त्यामुळें जुनें आणि नवें अशीं दोन्हीं सैन्यें वेढ्यांत अडकून पडलीं.

अिंग्लिशांचा सरसेनापति कॉलिन कॅंपबेल १३ ऑगस्टला कलकत्त्याला येअून पोंचला. क्रांतिकारकांच्या हातून सबंध हिंदुस्थान सोडविण्यासाठीं त्यानें अेक

भली मोठी योजना आंखली. त्यानें कासीमबझारच्या शस्त्रालयांत नवीन तोफा ओतून घेतल्या, शस्त्रास्त्रें, दारूगोळा, अन्यधान्य अित्यादि व्यवस्था करून सर्व अिंग्लिश सैन्य निरनिराळ्या विभागांत वांटून देअून पाठविलें आणि स्वतः आपण त्या हट्टी लखनौचा समाचार घेण्यासाठीं २७ ऑक्टोबरला तिकडे चालून गेला.

सर कॉलिन कँपबेल अलाहाबादहून कानपूरला जाण्याकरितां गाडींतून जात होता. याच वेळीं क्रांतिकारकांची अेक टोळी १०–१२ हत्तीसह व २५ घोडे-स्वारांसह त्याच रस्त्यावरून चालली होती. क्रांतिकारकांना पाहून अिंग्लिशांचा सरसेनापति चरकला व त्यानें कानपूरला जाण्याचा बेत सोडून देअून गाडी मागें घेण्यास सांगितलें. नाहीं तर क्रांतिकारकांनीं कॉलिनला पकडून कुमारसिंहापुढें तरी अेक अुभें केलें असतें नाहीं तर यमलोकाकडे तरी त्याची पाठवणी केली असती.

या संकटांतून बचावून ३ नोव्हेंबरला सर कॉलिन कानपूरला आला. दिल्लीच्या पाडावामुळें तेथील अिंग्लिश सैन्यहि ग्रेटहेडच्या नेतृत्वाखालीं येथें येअून पोंचलें होतें. खेड्यामागून खेडीं जाळीत, वाटेवर सांपडणाऱ्या कोणाहि धड-धाकट माणसाला फासावर चढवीत, आणि रानांतल्या कावळ्या–चिमण्यांना मारावें तितक्या बेपर्वाअीनें खेडूत जनतेची कत्तल करीत ग्रेटहेडचें सैन्य दिल्लीहून कानपूरला आलें होतें!

सर कॉलिन कानपूरहून निघून गंगापार होअून आला व सर्व सैन्याची सिद्धता करून त्यानें १४ नोव्हेंबरला जोराची चढाअी चालू करण्याची आज्ञा दिली. हॅवेलॉकनें आणि औटरॅमनें रेसिडेन्सींतून बाहेर पडून क्रांतिकारकांवर चढाअी करावयाची आणि बाहेरून कॉलिननें दुसऱ्या बाजूनें त्यांना चेपून टाकावयाचें अशी अेकंदर योजना होती. या वेळीं अिंग्रजांचे प्रख्यात सेनानी या ठिकाणीं जमले होते. हॅवेलॉक, औटरॅम, पील, ग्रेटहेड, दिल्लीचा हॉडसन, होपग्रँट, आयर आणि सरसेनापति कॉलिन असे अेकापेक्षां अेक अतिरथी-महारथी तेथें आले होते.

अशा प्रकारचें हें सैन्य १४ नोव्हेंबरला लखनौवर चालून गेलें. दिलखुष बागेंतून पुढें सरकून १६ नोव्हेंबरला शिकंदर बागेवर तुटून पडण्याची कॉलिननें

आज्ञा दिली. या ठिकाणीं क्रांतिकारकांनीं चांगलाच तिखट प्रतिकार केला. 'जिंकू किंवा मरूं' अशा निर्धारानें त्यांनीं रणांत पाअूल ठेवलें होतें. अिंग्लिश जरी आंत घुसले होते तरी युद्ध कांहीं थांबेना. बुरजाचा प्रत्येक कोपरान् कोपरा लढविला गेला. आणि शेवटीं जेव्हां अिंग्रजांनीं शिकंदर बागेचा भाग संपूर्ण ताब्यांत घेतला तेव्हां त्या स्थळाच्या रक्षणार्थ दोन हजार क्रांतिकारकांच्या प्रेतांचा खच तेथें पडलेला होता. तेथें असलेल्या लोकांपैकीं अवघे चारच लोक वांचले, अितकें भयंकर युद्ध माजून राहिलें होतें!

दोन हजार हुतात्म्यांचें रक्त! क्रांतीचा हा अितिहासहि त्या रक्तालाच अर्पण! विजय जरी हातचा गेला तरी हुतात्म्यांनो, तुम्ही शरण जाअून आपल्या नांवाला काळोखी नाहीं फासलीत! हे वीरांनो! तुम्ही कुठले कोण? तुमचीं नांवें तरी काय? तुमचा नेता कोण? ही तुमची साधी माहिती मिळण्याचेंहि भाग्य आमच्या वांट्याला आलें नाहीं! ठीक, तर तुमच्या त्या अज्ञात स्मृतीलाच हा क्रांतीचा अितिहास समर्पित असो!

दि. १७, १८, १९ ते २३ पर्यंत लखनौला भयंकर रणधुमाळी माजून राहिली होती. लखनौचा विजय जवळ येत चालला असतांच २४ ला हॅवेलॉक लखनौच्या अुष्णतेनें, युद्धाच्या चिंतेनें आणि निराशेनें मरण पावला. अितक्यामध्यें कानपूरलाहि तोफांचा गडगडाट झाला. तात्या टोपे कानपूरवर चालून आला आहे हें कळतांच तात्याचा समाचार घेण्यासाठीं कॉलिन स्वतः कानपूरवर चालून येण्यास निघाला. लखनौवर औटरॅमची नेमणूक जातांना त्यानें केलेली होती.

♣ ♣ ♣

# ४ तात्या टोपे

जुलै १६ ला क्रांतिकारकांचा कानपूरला पराभव झाल्यानंतर श्रीमंत नाना ब्रह्मावर्ताकडे गेले. हॅवेलॉक जेव्हां लखनौवर चालून जाण्याच्या योजना आंखीत होता त्याच वेळीं लखनौ प्रांतांतील फत्तेपूर या गांवीं जाअून श्रीमंत नानाहि पुढील कार्यक्रमाचा विचार करण्यांत मग्न होते. या अवघड परिस्थितींत योग्य ती तोड सुचविणारा अेक असामान्य बुद्धिमत्तेचा पुरुष नानांच्या दरबारांत होता. तो म्हणजे तात्या टोपे. आतांपर्यंत तात्या साधा कारकून होता. परंतु स्वातन्त्र्ययुद्धाची योग्य संधि प्राप्त होतांच तात्याच्या ठिकाणीं असलेली तीव्र बुद्धिमत्ता आपोआपच जागी झाली; आणि खरोखर हें आपल्याला मान्यच केलें पाहिजे कीं, चतुराअीच्या यशस्वी योजना आंखण्यांत तात्या टोपेचा हात धरणारा माणूस सांपडणें त्या वेळीं फार कठीण होतें. कानपूरच्या पराभवामुळें विस्कटून गेलेली आपली सैनिक संघटना पुन्हा अेकदां नीट संघटित करण्यासाठीं तात्यानें हालचाल चालू केली. नवीन सैन्यभरतीचा प्रश्न येअून पडल्यावर तात्या सरळ शिवराजपूरला गेला नि नुकत्याच अुठलेल्या ४२ व्या तुकडीला त्यानें आपल्या कार्याकडे वळवून घेतलें.

हॅवेलॉक लखनौवर चालून जाण्याकरिता निघाला असतां त्याचे पिछाडीवर हल्ले करून तात्यानें त्याला कसें जेरीस आणलें, हॅवेलॉकला फिरून पुन्हा कानपूरकडे कशी माघार घ्यावी लागली ह्याचा वृत्तांत मागें सांगितलाच आहे. १६ ऑगस्टच्या पराभवानतर गंगा पोहून जाअून सर्व सैन्यासह तात्या फत्तेपूरला नानासाहेबांना जाअून मिळाला. यानंतर पुन्हा अिंग्रजाविरुद्ध सर्व बाजूनीं रान अुठवून देण्याकरितां तात्या ग्वाल्हेरीला गेला. थोड्याच अवधींत त्यानें मोरार येथें असलेलें सर्व पायदळ, घोडदळ आणि तोफखाना–दळ फोडलें; आणि त्यासह तो काल्पीपर्यंत येअूनहि पोंचला. काल्पीचा, क्रांतिकारकांना फार अुपयोग होणार होता. कानपूरनंतर काल्पीअितकें दुसरें सुरक्षित ठिकाण मिळणें अशक्य म्हणून तात्यानें काल्पीचा किल्ला हस्तगत केला, व त्या ठिकाणीं श्रीमंत बाळासाहेबांना ठेवून तो अिंग्लिशांवर कशी आणि कोठें झडप घालावी ह्याचे बेत आंखूं लागला.

आपल्याजवळील थोडेंसें सैन्य कानपूरला ठेवून व त्यावर जनरल विंडहॅमला नेमून सर कॉलिन लखनौवर चालून गेला होता. या वेळीं विंडहॅमला घेरून टाकण्यासाठीं, तात्यानें यमुना अुतरून अुघडया रणांत आपल्या हालचाली आरंभिल्या. या वेळीं तात्याजवळ नुकतेच अुठलेले, फाटाफूट झालेले शिपाअी नि आडमुठे खेडवळ शेतकरी यांचेंच बनलेलें सैन्यबळ होतें. पण स्वातंत्र्याची ज्योत अेकदां पेटली कीं प्रतिपक्षाच्या सर्वश्रेष्ठ बळाचेंहि कांहीं वाटेनासें होतें ह्याचें हें अुत्कृष्ट अुदाहरण म्हणून लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यमुना अुतरून सरळ कानपूरवर न जाता मार्गावरील महत्त्वाचीं ठाणीं जिंकीत तात्या शिवराजपुरावर चालून गेला. परंतु याच वेळीं विंडहॅमच्या साहाय्याला कलकत्त्याचें सैन्य आलें. त्याबरोबर काल्पीच्या रस्त्याची नाकेबंदी करण्याकरितां त्यानें कार्थ्यूबरोबर सैन्य पाठवून दिलें, व आपण तात्याचा समाचार घेण्याचा विचार करूं लागला.

आतांपर्यंत अिंग्लिशांची अशी समजूत होती नव्हे, त्यांना–तशी शिकवणच दिलेली होती—कीं, "तुम्ही कितीहि जरी थोडे असलांत तरी पहिल्या धडकीसरशीं जर तुम्ही अशियांतील लोकांच्या सैन्यांत घुसून हल्ला केलात तर ते तत्काळ भिअून पळतात; आणि प्रथमच जर घाबरून कुचराअी केली तर मग मात्र ते आणखी शेफारून चांगलेच वरचढ ठरतात!" तेव्हा या शिकवणींत वाढल्यामुळें प्रथम शत्रूला भेडसावून घाबरें करण्याच्या तंत्राला धरून विंडहॅमनें कानपूर सोडलें व तो काल्पीजवळच्या कालव्यावरून पुढें सरकला.

२५ नोव्हेंबरला तात्या पांडू नदीवर येअून पोचला. २६ ला विंडहॅमनें आपल्या बाणासारख्या सरळ चढाअीला सुरुवात केली. परंतु तात्याच्या भयंकर पाठलागामुळें विंडहॅमला परत कानपूरपर्यंत माघार घ्यावी लागली. तरीहि तात्यानें विंडहॅमचा पिच्छा सोडला नाहीं. आपली सैन्यरचना अर्धवर्तुळाकार करून समोरून आणि बाजूनें अिंग्लिश सैन्याला कैचींत धरून दाबण्याचा तात्याचा डाव होता. विंडहॅमनें वर्तुळ फोडण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु तात्याच्या तोफखान्यानें त्याला बोट शिरकूं दिलें नाहीं. तात्यानें आपलें अर्धवर्तुळ पुरें केलें आणि शत्रूची अुमाप युद्धसामग्री त्याच्या हातीं पडली. निम्में कानपूर आतां तात्याच्या कब्जांत आलें होतें. याच वेळीं

लखनौच्या क्रांतिकारकांचा पराभव कॉलिननें केला होता. विंडहॅमनेंहि फिरून दुसरे दिवशीं चढाअीचा कार्यक्रम आंखला. परंतु त्याची अुजवी बगल ह्या चढाअींत पार कोलमडली. तिसऱ्या दिवशीं तात्याला संपूर्ण विजय मिळाला आणि शेवटीं सबंध कानपूर तात्याच्या हातीं पडलें.

ही बातमी समजतांच सरसेनापति कॉलिन स्वतः कानपुरावर २० नोव्हेंबरपूर्वीच चालून आला. तात्याजवळ या वेळीं दहा हजार सैनिक होते. डिसेंबर १-२ ला त्यानें कॉलिनशीं चांगलाच सामना दिला. अिंग्लिश सेनानी ग्रेटहेडनें मधोमध आणि डाव्या बगलेवर हल्ला करीत असल्याचा बहाणा करून क्रांतिकारकांची अुजवी फळीच अचानकपणें ठोकली, त्यामुळें ग्वाल्हेरच्या सैन्याचा पुरा मोड झाला; व काल्पीकडची बाजू अिंग्रजांनीं पुरी रोखून धरली. डाव्या बाजूनें ब्रह्मावर्तापर्यंतहि क्रांतिकारकांना चेपण्याचा कॉलिनचा डाव होता. परंतु तात्यानें त्या बाजूला असलेल्या सेनानी मॅन्स्फील्डला पुरें घेरलें आणि पार ब्रह्मावर्तापर्यंत हुसकून दिलें. डिसेंबर ९ ला शिवराजपुराजवळ एक चकमक झडली व त्यांत तात्याच्या बत्तीस तोफा अिंग्रजांना मिळाल्या. अशा रीतीनें ६ ते ९ डिसेंबरपर्यंत कॉलिन, विंडहॅमच्या पराभवाची बरीच भरपाअी करून, ब्रह्मावर्तावर चालून गेला. तेथील राजवाड्याची राखरांगोळी करून गांवाचीहि त्यानें भयंकर लुटालूट केली.

कानपूरवरील तात्याची चढाअी हाणून पाडल्यानंतर प्रांतांतील 'बंड' करून अुठलेलीं दुसरीं गांवें परत वठणीवर आणण्याच्या अुद्योगास सर कॉलिन लागला. अलीगड ते कानपूरपर्यंतचा गंगा-यमुनांमधला दुआब परत मिळविण्यासाठीं त्यानें अलीगडहून खालीं सीटनला व कानपूरकडून वर वाल्पोलला सैन्य देअून पाठविलें, व स्वतः फत्तेगडावर चालून गेला.

कानपूरहून निघून वाल्पोल अिटाव्यापर्यंत येअून पोंचला. परंतु अिटाव्यांतल्या २०-२५ हिंदी वीरांनीं वाल्पोलला अिटाव्यांत पाअूल न घालूं देण्याची प्रतिज्ञा करून अेका अिमारतींतून त्याच्या सैन्यावर गोळ्यांचा वर्षाव करण्यास प्रारंभ केला. या मूठभर लोकांशीं लढाअी ती कसली द्यावयाची असें म्हणून अिंग्लिशांनीं त्यांना भिवविण्याकरितां आपला तोफखाना त्या अिमारतीपुढें आणून अुभा केला. परंतु तोफखान्याला भिअून पळ काढणारे ते वीर नव्हते.

स्वातंत्र्याचें ध्येय गांठण्यासाठीं जे मृत्यूला कवटाळण्यास आतुर झालेले असतात त्यांना कोण भिववूं शकणार आहे? आणि म्हणून निसटून जाणें शक्य असूनहि निसटून न जाण्याचेंच त्यांनीं मोठया आनंदानें पत्करलें! त्या जागीं सैन्य आणणें अशक्य असल्यानें वाल्पोलनें ती अिमारत अुडवून देण्याचें ठरविलें. आंतील लोकांना गुदमरून मारून टाकण्यासाठीं अिंग्रजांनीं गवताचा धूर केला. तरीहि अिमारतीच्या भोकांतून आंतील वीरांनीं तीन तास गोळीबार करून शत्रूला जवळ येअूं दिलें नाहीं.

शेवटीं सुरुंगांची माळ पेटवून ती अिमारत अुडवून दिल्यामुळें ते सर्व क्रांतिवीर त्या अुध्वस्त अिमारतीखालीं गाडले गेले. आणि तेव्हांपासून अिटाव्याच्या वीरांचें तें समाधिस्थान ध्येयाकरितां 'मरावें कसें' याचें भयंकर पण मूक प्रवचन देत त्या ठिकाणीं अद्याप अुभें असल्याचें दिसतें!

वाल्पोल आणि सीटन यांची ८ जानेवारी ५८ ला मिनपुरी येथें गांठ पडली. ठरल्याप्रमाणें दुआबांतील यमुनेकांठचा अलाहाबादपर्यंतचा सर्व प्रदेश अिंग्लिशांनीं परत घेतला होता. दुआबमधील सर्व क्रांतिकारक या वेळीं फत्तेगडला गोळा झाले होते. ४ जानेवारीला सर कॉलिननें फत्तेगडांत प्रवेश केला. या वेळपर्यंत दुआब आणि बनारसपासून मीरतपर्यंतचा सर्व टापू ब्रिटिशांच्या हातांत पडलेला होता. परंतु त्यामुळें सर्वत्र पेटून राहिलेल्या क्रांतीच्या ज्वाळा कांहीं विझल्या नाहींत. दिल्लीचा पाडाव झाल्यावर अवघ्या आठ दिवसांत 'बंड' शमेल हा जो ब्रिटिशांचा कयास होता तो खोटा ठरला. अुलट दिल्लीला पराभव पावलेले सहस्रावधि क्रांतिकारक निरनिराळ्या भागांत पांगून पुन्हा त्यांनीं तोच लढा सुरू केला. आतां त्यांना पराभवाचें कांहींच वाटत नव्हतें. आतां कांहीं झालें तरी फिरंग्याचा किंवा आपला शेवट होअीपर्यंत लढत राहाणें अेवढा अेकच विचार त्यांच्या मनांत होता. हे क्रांतिकारक आपापसांत भांडत, स्वार्थाकरितां कांहींहि करीत, परंतु यांपैकीं कोणीहि अिंग्रजाविरुद्धचा लढा थांबवण्यास सिद्ध नव्हता.

दिल्लीच्या पराभवाचा सूड अुगविण्यासाठीं क्रांतिकारकांनीं आतां लखनौ आणि बरेली येथें लढा चालू केला. सबंध दुआब जरी अिंग्लिशांनीं परत घेतला होता तरी अयोध्या आणि रोहिलखंड हे प्रांत संपूर्णपणें क्रांतिकारकांच्या हातीं

होते व तेथें त्यांच्या स्वदेशी राजांची सत्ता चालू होती. म्हणून क्रांतिकारक हालचालींचें मुख्य केंद्र जें लखनौ तेंच धुळीला मिळविलें कीं अितर ठिकाणें आपोआपच शरण येतील असा विचार करून सर कॉलिननें लखनौवर चढाअी करण्याचें ठरविलें. कॉलिनबरोबर या वेळीं पंधरा अिंग्लिश नि दोन हिंदी पायदळी पलटणी, चार युरोपियन आणि चोवीस हिंदी घोडदळी तुकड्या, अेकशें चौतीस लहानमोठ्या तोफा, अितकें प्रचंड आणि सुसज्ज सैन्य होतें.

याच वेळीं आपल्या अिंग्लिश 'मित्रां'ना साहाय्य देण्यासाठीं आपल्या तुकड्यांसह स्वतः जंगबहाद्दुर लखनौवर चालून येत होता. काडतुसाना ज्यांनीं गायीची चरबी फांसली ते ह्या जंगबहाद्दुराचे 'मित्र' झाले; आणि ज्यानीं तीं काडतुसें दांतांनीं तोडण्याचें नाकारलें ते (हिंदी लोक) ह्याला शत्रूसारखे वाटले! कोणी म्हणतात, जगबहाद्दुर अिंग्लंडला जाअून आल्यामुळें आणि अिंग्लिशांचें वैभव आणि सामर्थ्य त्यानें आपल्या डोळयांनीं पाहिलें असल्यामुळें थोड्याफार भीतीनें तो या स्वातंत्र्ययुद्धात अिंग्रजांच्या बाजूनें अुभा राहिला. पण अझीमुल्ला आणि रंगो बापूजी नव्हते का अिंग्लंडला जाअून आले? त्यांनीं तर अुलट घाबरून न जातां अिंग्लिशांविरुद्ध युद्ध करण्याचाच दृढनिश्चय नव्हता का केला?

परंतु आपल्याच मातृभूमीला अिंग्रजांची दासी करण्यांत आपण साहाय्य केलें तर अिंग्रज आपल्या पदरात दोन अधिक तुकडे टाकतील या स्वार्थी आशेनेंच हा जंगबहाद्दुर अिंग्रजांना मिळाला व मायदेशाचा लिलांव करण्यास सरसावला!

अिंग्लिशांना अयोध्येकडे लक्ष देण्यास फुरसत सांपडण्यापूर्वीच नेपाळी तुकड्यांनीं क्रांतिकारकांना रेटीत अयोध्येपर्यंत माघार घ्यावयास लावली होती. २३ डिसेंबर १८५७ ला आपल्या नऊ हजार गुरखा सैन्यासह जंगबहाद्दुरानें व जनरल फ्रॅक्स आणि रोक्रॅफ्ट या अिंग्लिश सेनानींनीं बनारसच्या अुत्तरेला क्रांतिकारकांचा चुराडा अुडवीत अयोध्येंत प्रवेश केला. अंबरपूरचा किल्ला गुरख्यांनीं सर केला व त्यांच्या मागोमाग जनरल फ्रॅंक्सनें सुलतानपूरच्या नझीम महंमदाचा पराभव करून सुलतानपूर घेतलें. दौरारच्या किल्ल्यापाशीं मात्र फ्रॅंक्सला चांगलीच माघार घ्यावी लागली. पण या अेवढ्या अेका लहानशा पराभवामुळेंच, मुख्य सेनाधिकाऱ्यांच्या यादींतून त्याचें नांव काढून टाकण्यांत आलें.

अिंग्लिशांची शिस्त अशी होती! आणि अेकंदरींत यशाच्या दृष्टीनेंच प्रत्येकाची किंमत मोजली जाअी ती अशी!

आतां लखनौवर चालून येत असलेल्या ब्रिटिश सैन्याचे विविध भाग अेकमेकांजवळ येत चालले होते. गेल्या वर्षाच्या नोव्हेंबरपासून, म्हणजे सर कॉलिन तात्याच्या पारिपत्याकरितां कानपूरवर चालून गेला होता तेव्हापासून ते थेट मार्चपर्यंत, लखनौंतील क्रांतिकारकानीं मोठ्या शौर्यानें आणि नेटानें लढा चालू ठेवला होता. राजापासून रंकापर्यंत प्रत्येकजण हातीं शिर घेअून लढत होता. लखनौचे जमीनदार केवळ अिंग्लिशांनीं लादलेल्या शेतसारा पद्धतीमुळें असंतुष्ट होअून अुठले नव्हते तर अिंग्रजांचा पापी स्पर्श आपल्या मातृभूमीला व्हावा हेंच त्यांच्या चिडीचें कारण होतें!

याविषयीं त्या वेळचा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल स्वतः लॉर्ड कॅनिंग यानें औटरॅमला लिहिलेल्या पत्रांत काय म्हटलें आहे तें लक्षात घेण्यासारखे आहे. तो लिहितो: "अयोध्येचे राजे आणि जमीनदार हे केवळ आमच्या शेतसाऱ्याच्या पद्धतीमुळें दुखावले होते हें तितकेंसें खरें नाहीं. कारण असे कित्येक राजे होते कीं ज्यांचें अेकहि खेडें आम्हीं काढून घेतलें नव्हतें, अुलट कांहींची खंडणीहि आम्हीं कमी केलेली होती. परंतु हेच राजे आमच्याविरुद्ध लढाअीला अुभे ठाकले." म्हणून अिंग्लिश अितिहासलेखक होम्स म्हणतो, "ज्या राजांनीं आणि जमीनदारानीं या स्वातंत्र्ययुद्धाला आरंभ करून तें लढविलें, त्यांना 'आपण जित राष्ट्र आहोत' या बोंचक सत्यानेंच खरी चीड येअून त्यांनीं अिंग्रजाशीं युद्ध टाणलें!"

तात्यावर चालून जाताना सर कॉलिननें चार हजार सैन्य देअून औटरॅमला आलम बागेत ठेवलें होतें. लखनौ घेण्यासाठीं अिंग्लिश सैन्यें गंगा अुतरून गेलीं तेव्हां कानपूरवर चढाअी करून नानानीं अिंग्लिश सैन्याला दुआबमध्यें परत फिरणें भाग पाडलें. पण या हुलकावणीचा अुपयोग लखनौनें नीट करून घेतला नाहीं. नाहीं तर याच वेळीं औटरॅमच्या मूठभर सैन्याची केव्हांच धुळधाण अुडाली असती. परंतु याच वेळीं क्रांतिकारकाच्यातच अितकी बजबजपुरी आणि निरुत्साह वाढला होता कीं ते आपल्या अधिकाऱ्यांच्या आज्ञेंत वागण्यासच मुळीं राजी नव्हते.

तरीहि अशा परिस्थितींत फैजाबादचा शूर नेता मौलवी अहमदशहा यानें हिंदी बांधवांच्या अंतःकरणांत देशभक्तीची ज्योत पेटविण्याचा अहर्निश प्रयत्न केला. मौलवीनें तात्याच्या कर्तृत्वामुळें प्राप्त झालेल्या दुसऱ्या संधीचा पुरेपूर लाभ घेण्याचें ठरविलें. परंतु कांहीं अकर्त्या लोकांना मौलवीच्या मोठेपणाचा द्वेष वाटून त्यांनीं त्याला बंदींत ठेवलें. पण पुढें शिपायांनीं बेगमेवर वजन आणून आपल्या आवडत्या पुढाऱ्याची सुटका केली. सुटका झाल्यावर मौलवी मोठ्या कष्टानें अेवढेंच अुद्गारला : "नामी संधि आपण हातची दवडली. सगळीच घडी आतां विस्कटलेली आहे, तेव्हां आतां केवळ लढत लढत समरांगणीं पडणें अेवढेंच कर्तव्य आपल्याला राहिलें आहे."

आलम .बागेंत तळ ठोकून पडलेल्या अिंग्रज सैन्याला सतावण्याचा मौलवीचा अुद्योग सारखा चालूच होता. जानेवारी १५ ला अिंग्रजांची रसद तोडण्यासाठीं त्यानें हल्ला केला त्या वेळीं तो स्वतःच घायाळ होअून पडला. परंतु शिपायांनीं शिताफीनें त्याला अुचलून नेलें. पाठींत लागलेल्या गोळीचा घाव बरा होअून मौलवी फिरून फेब्रुआरी १५ ला रणांत घुसला. याच वेळीं सर कॉलिन आलमबागच्या औटरॅमच्या सैन्याला येऊन मिळाला होता. या वेळीं एकट्या लखनौमध्यें ३० हजार शिपाअी व ५० हजार स्वयंसैनिक अितकें म्हणजे सुमारें ८० हजार मनुष्यबळ गोळा झालें होतें. लखनौच्या रक्षणाची सिद्धताहि ठिकठिकाणीं तट अुभारून, खंदक खणून, तोफांचे मोर्चे बांधून कडेकोट करण्यांत आली होती. अुत्तर भागाचें संरक्षण जरा थोडें कच्चें होतें. परंतु नेमक्या त्याच बाजूनें सर कॉलिननें मार्च ६ ला चढाअीला प्रारंभ केला. मार्च ६ पासून मार्च १५ पर्यंत लखनौनें मोठया नेटानें युद्ध चालविलें. मार्च १० ला क्रांतिकारकांनीं हॉडसनला ठार मारून दिल्लीच्या राजपुत्रांच्या खुनाचा योग्य सूड घेतला. शीखांच्या १० व्या पायदळी तुकडीच्या अपूर्व पराक्रमामुळें शेवटीं १४ मार्चला ब्रिटिश सैन्यें थेट राजवाड्यांत घुसलीं. या धामधुमींत तेथील हजारों क्रांतिवीर शरणहि आले नव्हते किंवा त्यांनीं युद्धहि थांबविलें नव्हतें, तर अिंग्लिश सैन्याचा व्यूह फोडून आपल्या राजासह व बेगमेसह ते केव्हांच बाहेर पडले. अशाहि कठीण परिस्थितींत शहदतगंजच्या विभागांत मौलवी मात्र कडवटपणें झुंजत अुभा होता.

लखनौ हातीं पडल्यावर लखनौवर अिंग्रजांनीं जी सूडाची आग पाखडली तिचा अितिहास लिहावयाचा झाल्यास लेखकाला आपली लेखणी रक्ताच्या शाअींत बुडवूनच तो लिहावा लागेल! अेका गोऱ्या अधिकाऱ्यानें म्हाताऱ्या बापाला घेअून चाललेल्या अेका बालकाला अेकामागून अेक अशा चार गोळ्या झाडून सूडानें ठार केलें. पण हेंहि कृत्य 'सौम्य' होतें असें म्हणावें लागतें. कारण दुसऱ्या एका हिंदी शिपायाचा अिंग्रजांनीं केलेला वध हा याहिपेक्षां भयंकर आहे. त्या शिपायाला संगिनी खुपसून दाबून धरून त्याभोवतीं होळी पेटवून त्याला जाळण्यांत आलें. अर्धवट जळलेल्या त्या शिपायानें अंगावर अर्धेंकच्चें जळकें लोंबतें मांस घेअून बाहेर उडी मारण्याचा प्रयत्न केला. परंतु गोऱ्या सोल्जरांनीं पुन्हा त्याला संगिनींनी भोसकून चितेवर ठेवलें व त्यास पुरा जळेपर्यंत त्या आगीवर भाजून काढलें !

अयोध्येविषयीं बोलायचें झालें तर तें साधें सैनिकांचेंच बंड नव्हतें; बहुसंख्य जनतेनें केलेली ती अेक क्रांतिकारक अुठावणी होती. डॉ. डफ लिहितो: आमचा खरा लढा सर्वस्वीं बंडखोर शिपायांबरोबर होता हें साफ खोटें आहे. शिपाअीच केवळ आमचे शत्रू असते तर देशात शातता स्थापन करण्यास मुळींच वेळ लागला नसता." लखनौ पडलें तरी क्रांतिकारक अयोध्येनें लढा चालू ठेवला होता. 'शरण येअून हत्यारें खालीं ठेवतील त्यांना क्षमा करण्यांत येअील' अशी लॉर्ड कॅनिंगनें घोषणा 'करूनसुद्धां अेकहि क्रांतिकारक शरण आला नाहीं. कांहीं शूर अिंग्रजांनीं लखनौच्या झनान्यावर हल्ला करून कांहीं स्त्रियांना मारलें व काहींना पकडून कैद केलें.

कैदेंत असलेल्या नबाबाच्या राण्यांना अिंग्रज अधिकारी जेव्हां खिजविण्याकरितां "आतां बंडाचा पुरा मोड झाला ना?" असें विचारीत तेव्हां राण्या त्यांना ताडदिशीं अुत्तर देत, "मोड तर राहोच, पण कांहीं झालें तरी शेवटीं तुमचींच हाडें ठेचलीं जाणार आहेत हें खूप समजून राहा !"

♣ ♣ ♣

# ५ कुमारसिंह आणि अमरसिंह

जनरल आयरनें जगदीशपूरची राजधानी हातीं घेतल्यावर कुमारसिंह तेथून निघाला व त्यानें पश्चिम बिहारच्या अरण्याचा आश्रय घेतला. शत्रूला आतां गनिमी काव्याच्या पद्धतीनें लढूनच तोंड द्यावयाचें असाहि निर्धार त्यानें या वेळीं मनाशीं ठरविला. लखनौवर चालून जाण्याकरितां अझिमगडाहून ब्रिटिशांच्या आणि नेपाळ्यांच्या तुकड्या पाठविण्यांत येणार असल्याचें जेव्हां कुमाराला कळलें तेव्हां अरण्यातून बाहेर पडून व आपल्या क्रांतिकारक दलांची जमवाजमव करून त्यानें अझिमगडावर छापा घालण्याची योजना आंखली. १८ मार्चला तो अझिमगडजवळच २५ मैलांवर असलेल्या अत्रोलियाजवळ तळ देऊन बसला. कुमारसिंहाची चाहूल लागतांच बरोबर तीनशें पायदळ, घोडेस्वार व तोफा घेऊन मिल्मन त्याजवर चालून आला.

पहिल्या सपाट्यासरशीं कुमाराच्या थकलेल्या सैन्याचा त्यानें पराजय केला व विजयाच्या आनंदांत त्याचें सैन्य आमराईमध्यें न्याहारी घेण्यास म्हणून थाबलें. परंतु विश्रांति घेत पडलेल्या या असावध सैन्यावर कुमारानें नदीच्या कांठावरून असा जोराचा हल्ला चढविला कीं, ब्रिटिश सैन्य दमांत अुखडून भयभीत होअून माघार घेअूं लागलें. गनिमी काव्याच्या युद्धाला आतां प्रारंभ झाला होता. कुमारानें शत्रूला पिटीत अत्रोलियापासून कोसिल्लापर्यंत माघार घ्यावयास लावली. परंतु कोसिल्लामध्येंहि ब्रिटिश सैन्याला शिधासामग्री अित्यादि कांहींच न मिळाल्यामुळें मोठ्या शहाणपणानें मिल्मननें थेट अझिमगडापर्यंत माघार घेतली.

यानंतर मार्च २८ ला कर्नल डेम्स कुमारावर चालून आला; परंतु मिल्मन-प्रमाणें त्याचीहि फजिती अुडून तोहि रडत अझिमगडास परतला. आतां कुमारावर चढाअी करण्याची भाषा अेकदम बंद पडली. कुमार थेट अझिम-गडांत घुसला. तेथील गढींत त्यानें अिंग्लिशांची कोंडी केली व आपण कांहीं सैनिक घेअून बनारसवर चालून गेला. या वेळीं अलाहाबादला गव्हर्नर जनरल कॅनिंग हा राहात होता. अेक्याअैशीं मैलांचें अंतर कापून अलाहाबाद आणि

कलकत्ता यांचा सांधा पार तोडून टाकण्यासाठीं कुमारानें बनारसवर स्वारी केली. तेव्हां कुमारावर चालून जाण्यासाठीं कॅनिंगनें लॉर्ड मार्क करला आज्ञा दिली.

६ अेप्रिलला बरोबर ५०० सैनिक आणि ८ तोफा घेअून लॉर्ड कर अझिमगडापासून ८ मैलांच्या टप्प्यांत कुमारावर चाल करून आला. कुमारानें शत्रूच्या पिछाडीवर आपलें सैन्य आणून ठेवल्यामुळें शत्रूचे सर्व बेत धुळीस मिळाले. पिछाडीवरून कुमारसिहानें अिंग्लिशांना अशी काहीं स्वारी भरली होती कीं, मार्क करचें सैन्य सैरावैरा धावत सुटलें. त्यांत पुन्हा पिछाडीवर क्रांतिकारकांनीं पेटवून दिलेल्या आगीची भर पडली. त्यामुळें लॉर्ड करला आपलें सैन्य अझिमगडापर्यंत माघारें आणून ठेवावें लागलें. परंतु अझिमगडच्या अिंग्रजांना सोडविण्याचाहि त्याचा डाव फसला. सेनापतीला हवे असलेले गुण कुमाराच्या ठिकाणीं अुत्तम प्रकारें वसत होते. शत्रूचें बल कशात आहे आणि शत्रूची नस कोणती हें जसें तो ओळखी त्याप्रमाणें आपल्या अनुयायामधील गुणदोषहि तो नीट ओळखून होता. क्रातिकारकांमध्यें दोन मनोवृत्तींचे लोक होते. पहिल्या वृत्तीचे लोक आपल्या ध्येयाकरितां रणांगणावर अुभे राहून मृत्यूच्या जबड्यांत घुसण्यासहि कचरत नसत, तर दुसऱ्या वृत्तीचे लोक देशभक्त असूनहि खंबीर नसल्यामुळें अैन वेळीं रणांतून पाय काढून पळत सुटत. म्हणून अगदीं शेवटपर्यंत आपल्या पाठीशीं अुभे राहतील असे वीर निवडून कुमारानें सेनापति ल्यूगार्डचा रस्ता रोखण्यासाठीं त्यांना तानू नदीच्या पुलावर पाठविलें.

अझिमगडची हुलकावणी दाखवून गाझीपूरहून जगदीशपूर फिरून हस्तगत करावयाचें असा कुमाराचा धोरणी डाव होता. कुमाराच्या निवडक वीरांमुळें तानूच्या पुलावरून ल्यूगार्डची अेक अिंचहि प्रगति होअीना. बाजी देशपांड्यानें श्रीशिवराय रांगण्यावर पोचेपर्यंत जशी पावनखिंड लढविली, त्याचप्रमाणें कुमाराच्या सैन्यानें कुमार गाझीपूरच्या रस्त्याला निर्धोकपणें लागेपर्यंत तानूवरचा पूल लढविला. कुमार निसटल्याचें कळतांच ते मोठ्या शिताफीनें मागें हटले व परत कुमारसिहाच्या सैन्याला येअून मिळाले. यानंतर ल्यूगार्डनें कुमाराचा तलास केला. परंतु १२ मैल हिंडूनहि त्याला पत्ता लागला नाहीं; आणि जेव्हां पत्ता लागला तेव्हां पळणारे कोण आणि पाठलाग करणारे कोण याचाच घोटाळा अिंग्रजांना पडला. आतां कुमारानेंच अिंग्रजांचा पाठलाग

करून त्यांना झोडपण्यास सुरुवात केली. कुमाराचा चतुष्कोणव्यूह फोडणें अशक्य होअून अिंग्रज सैन्यें जेव्हां बचावाच्या मार्गाला लागलीं तेव्हां कुमारानें त्यांचा पार गंगेपर्यंत निकरानें पिच्छा पुरवला.

अिंग्रज सैन्याची फजितीची वार्ता जेव्हां अझिमगडला येअून पोंचली तेव्हां कुमारावर चालून जाण्याकरितां बरोबर पांच-सहा तोफा घेअून ब्रिटिश सेनानी डग्लस हा निघाला. ब्रिटिशाचें घोडदळ आणि तोफखाना कुमारामागें धावत होता. तरीहि या वृद्ध वीरानें आपल्या सैन्यासह शिकंदरपुरापर्यंत येअून घोग्रा अुतरून गाझीपूरच्या टापूंत प्रवेश केला. या ठिकाणीं त्यानें आपल्या भुकेलेल्या व थकलेल्या सैन्याला थोडी विश्रांति दिली. यावेळीं पाठलाग करीत डग्लस मनोहरपर्यंत येअून पोचला. या ठिकाणीं झालेल्या चकमकींत कुमाराचा दारू-गोळा, शिधासामुग्री, हत्ती, अित्यादि शत्रूच्या हातीं लागले. तरीहि यावेळीं शत्रूच्या हातांवर तुरी देअून आपल्या सैन्याच्या लहान लहान टोळ्या करून कुमारसिंह निसटला आणि गंगेच्या तीरापर्यंत येअून पोचला.

अिंग्लिशांच्या सैन्यानें त्याचा पिच्छा सोडला नव्हताच. तेव्हां गंगा अुतरण्याकरितां त्यानें अेक निराळीच गप्प सबंध प्रांतभर पसरवून दिली कीं, 'कुमाराजवळ नावा नसल्यानें बालियाजवळ कुठें तरी तो हत्तीवरून गंगापार होणार आहे.' सेनापति डग्लस बालियाजवळ कुमाराच्या सैन्याची वाट पाहात टपून बसला. पण याच वेळीं तेथून सात मैलांवर खालीं शिवापूर घाटावरून कुमार अुतरून पार होत होता. शत्रूला जेव्हा याची चाहूल लागली तेव्हां कुमाराचें जवळ जवळ सर्व सैन्य पलीकडे पोंचलें होतें आणि शेवटच्या नावेंतून कुमारहि पलीकडे गेला असता, परंतु जेव्हा तो प्रवाहाच्या मध्यावर होता तेव्हां शत्रूची अेक गोळी सूं सूं करीत येअून त्याच्या मनगटांत घुसली. त्या गोळीच्या दुखापतीनें आपला प्राण जाअील व आपण आपल्या स्वतंत्र राजधानींत न मरतां येथेंच अिंग्रजांच्या हातीं सांपडून मरूं म्हणून त्या वृद्ध कुमारानें दुखापत झालेला तो सबंध हातच आपल्या तरवारीनें कोपरापर्यंत छाटून गंगामातेला अर्पण केला !

अुठविलेलें सावज हातांतून सुटलेल्या शिकाऱ्याप्रमाणें हात चोळीत अिंग्रज नदीच्या अलीकडेच बसले आणि कुमारसिंह मात्र गंगा अुतरून अेप्रिल २२ ला

आपल्या जगदीशपूरच्या स्वतंत्र राजधानींत येऊन पोंचला. आतां कुमारचा भाऊ अमरसिंह हाहि येऊन कुमाराला मिळाला होता. जगदीशपूरजवळ अऱ्हा येथें तळ देऊन बसलेल्या ली ग्रँडला जेव्हां ही गोष्ट समजली तेव्हां २३ एप्रिलला बरोबर ४०० ब्रिटिश सैनिक आणि दोन तोफा घेऊन तो जगदीशपुरावर चालून गेला.

कुमाराचीं सैन्यें यावेळीं विस्कळित झालेलीं, तोफा व शस्त्रास्त्रें यांची नीट जमवाजमव नसलेलीं अशीं होतीं. त्यांत पुन्हा त्यांचा ८० वर्षांचा वृद्ध सेनापति हाहि तोडलेल्या हाताच्या प्राणांतिक घावामुळें खचला होता. तरीहि कुमाराच्या सैन्यांनीं प्रतिकार चालू केला, आणि काय असेल तें असो एका क्षणार्धांत हें धाडसी ब्रिटिश सैन्य बारगळूं लागलें. अिंग्रज सैन्याला कुमाराच्या सैन्यानें पकडींत आवळल्यामुळें अिंग्रजांना लढत लढत मरण्यावांचून गत्यंतर अुरलें नाहीं. सेनापति ली ग्रँड याच्या छातींत गोळी घुसून तो ठार झाला. अेकशें नव्वद गोऱ्यांपैकीं अवघे ऐशीं लोक वांचले. क्रांतिकारकांनीं अिंग्रजांच्या दोन तोफाहि जिंकल्या. शीख मात्र नऊच मारले गेले. कारण कुमाराचें नेहमींच सांगणें असें कीं, 'गोऱ्यांना मारतांना मागेंपुढें पाहूं नका, पण शक्य तों शत्रूकडील हिंदी लोकांच्या जीवाला अपाय करूं नका!' त्याचप्रमाणें सरकारी कागदपत्राना आगी लावून देण्याच्याहि तो विरुद्ध होता. कारण तो म्हणे कीं, "यामध्यें आपल्याच लोकांच्या देण्याघेण्याच्या व वारसपरंपरेच्या नोंदीचा नाश होणार आहे."

आपल्यावर झालेल्या अन्यायाचा कुमारानें बरोबर सूड अुगविला होता. आपल्या तुटपुंज्या साधनांसह लढून रणांगणावर त्यानें शत्रूला चांगलेंच ठेंचून काढलें. विजयश्रीनें त्याच्या गळयात आज माळ घातली होती. म्हातारपणींच्या रोगांनीं जर्जर होअून नव्हे तर रणांगणावर झालेल्या घावांनीं तो आतां मरणासमीप आला होता. २६ अेप्रिल १८५८ ला स्वतंत्र राष्ट्राच्या विजयी ध्वजाखालीं स्वतःच्या राजधानींत त्याला मरण आलें. खऱ्या रजपुताला दुसरें पुण्यवान् मरण यापरतें कोणतें असूं शकेल?

थोर चारित्र्य आणि थोर कर्तृत्व यांचा अपूर्व संगम कुमारसिंहाच्या ठिकाणीं झाला होता. स्वातंत्र्यासाठीं लढल्या जाणाऱ्या क्रांतियुद्धांत

गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचा अवलंब करणारा, शिवरायाचा खरा शिष्य शोभेल असा तो एकटाच वीर होता. तात्या टोपे याचेंहि नांव १८५७ च्या युद्धांत या गनिमी युद्धतंत्रासंबंधीं बोलतांना प्रामुख्यानें घेतलें पाहिजे. आपल्या सैन्याचा पूर्ण फडशा पाडण्यास तात्या आपल्या शत्रूंना कधींहि संधि देत नसे. परंतु हें करूनहि कुमारसिंह योग्य वेळ येतांच शत्रूचाच पराभव करून त्याच्या सैन्याचा फडशा पाडण्यास चुकत नसे. रणांतून पळून जाणें किंवा शत्रूला समोरून हल्ला करण्यास वावच न देणें हें जरी कांहीं दृष्टीनें लाभाचें असलें तरी त्यामुळें गनिमी सैनिकांचा आत्मविश्वास न वाढतां अुलट खचून जातो. आपलें बळ कमी असेल तर नेत्यानें लढाअी देण्याच्या फंदांत पडू नये हें खरें, परंतु प्रतिपक्षी जर सारख्या बलाचा असेल तर दोन हात अवश्य करावे. आणि अेकदां लढाअीला अुभें राहिलें कीं मग मात्र घाबरेपणानें रणांतून मुळींच पाय काढून अुपयोगीं नाही. त्यामुळें अनुयायांचा धीर खचत नाहीं, शत्रूंचा थरकांप अुडतो आणि हौतात्म्याच्या कथानीं अुलट शौर्याला भरती येते ! गनिमी युद्धतंत्राची मुख्य मख्खी हीच आहे.

तात्यानें बरेचसे पराजय केवळ भीतीनें भेदरून गेलेल्या अनुयायांमुळें ओढवून घेतले होते; परंतु पुढें चाल करून जाताना कुमार आपली फळी अशी दमदार राखी कीं, जेव्हा संधि येअी तेव्हां पाठलाग करणाऱ्या शत्रूला तो चांगलीच थप्पड देत असे. आतां तात्या स्वतः जरी कितीहि निष्णात आणि कसलेला सेनापति असला. तरी त्याचे पराजय त्याच्या घाबरट आणि कचखाअू अनुयायांमुळेंच ओढवलेले होते.

कुमाराच्या मृत्यूनंतर त्याचा भाअू अमरसिंह यानें प्रत्यक्ष अऱ्हावरच धडक मारली. मे ३ ला ल्यूगार्डनें त्याच्यावर चढाअी चालू केली. परंतु अमरसिह त्याला जंगलाचा आश्रय घेअून सतावीत असल्यामुळें असल्या अदृश्य सैन्याशीं कशी झुंज द्यावयाची हाच प्रश्न ब्रिटिशापुढें येअून पडला. अमरसिंहाच्या या युद्धपद्धतीला त्रासून गेलेला ल्यूगार्ड १५ जूनला विश्रांति घेण्यासाटी अिंग्लंडला निघून गेला. शेवटीं कांहींहि करून ही लढाअी संपवावयाचीच असा निर्धार करून वेगवेगळ्या सात सैन्यांनीं जगदीशपूरवर चाल करून तें जिंकून घेण्याचें अिंग्लिशांनीं टरविलें. ऑक्टोबरपर्यंत जगदीशपूरवर स्वातंत्र्याचें निशाण

फडकत होतें. १७ ऑक्टोबरला अिंग्लिशांनीं जगदीशपूर पुरें आवळलें. ठरलेल्या वेळीं इंग्रज सैन्यें जगदीशपुरांत घुसलीं. परंतु अमरसिंह कसलीच अिजा न होतां केव्हांच बाहेर निसटला होता. जगदीशपूरच्या क्रातिकारकांनीं अिंग्लिशांना चुकवून कैमूर टेकड्यांचा आश्रय घेतला. राजा श्रीमंत कुमारसिंहाच्या अंतःपुरांतील दीडशें स्त्रियांनीं स्वतःला तोफांच्या तोंडीं बांधून घेअून नि आपल्या हातांनीं तोफांना बत्ती लावून स्वतःस अुडवून घेतलें व त्या अमर झाल्या.

लखनौच्या पाडावामुळें, क्रांतिकारकांचें अेक प्रबळ असें संघटनाकेंद्रच मोडून पडलें. त्यामुळें त्यांना दुसरें आश्रयस्थानच न राहिल्यानें क्रांतिकारकांना आपलें जुनें युद्धतंत्र सोडून द्यावें लागून गनिमी काव्याच्या युद्धाचा अवलंब करावा लागला. हें जर त्यांनीं आधींपासून केलें असतें तर त्यांना खूपच विजय मिळवतां आले असते. रोहिलखंडांतील क्रांतिकारकांनीं तर आपलें धोरण म्हणून असें प्रसिद्धच केलें होतें कीं, "यापुढें अुघड्या रणांत अिंग्रजाशीं मुळींच लढाअी द्यावयाची नाहीं. कारण त्यांचें सैन्य कसलेलें असून त्यांचेजवळ तोफाहि आहेत. तेव्हां शत्रूला विश्रांति म्हणून लाभूं न देतां त्याला जितकें सतावितां येअील तितकें सतावून सोडा." मौलवी अहमदशहानें हेंच धोरण प्रथमपासून ठेविलें होतें. बेगम हजरत महाल आपल्याबरोबर सहा हजार सैन्य घेअून बितौली येथें डेरे देअून राहिली होती व मौलवी लखनौजवळ तळ देअून होता.

क्रांतिकारकांना अयोध्येपार हुसकून देण्याकरितां होप ग्रँट त्यांना लखनौपासून बितौलीपर्यंत वर दाबीत सुटला. १ अेप्रिल १८५८ च्या सुमारास अिंग्रजांच्या गोऱ्या सैन्याचा आंकडा ९६ हजारापर्यंत पोचला होता. देशी संस्थानिकांचीं आणि राजनिष्ठ शीखांचीं सैन्यें त्यांच्या बाजूनें लढत होतीं हें निराळेंच. सेनानी वाल्पोल हा गंगेच्या तीरानें चढाअी करीत चालला होता. १५ अेप्रिलला लखनौपासून ५१ मैलांवर असलेल्या रुअिया किल्ल्यावर त्यानें हल्ला चढविला. रुअियाचा किल्ला कांहीं फार प्रचंड नव्हता. पण बरोबर अवघे २५० लोकच घेऊन किल्लेदार नरपतिसिंहानें किल्ला लढविण्याचा निर्धार केला होता. नरपतसिंहाचें सैन्य दीड हजारावर असल्याची खोटी जाहिरात अिंग्रजांनीं केली. अिंग्लिशांची चढाअी चालू होतांच आंतील लोकांनींहि गोळ्यांचा भयंकर वर्षाव केला. असा तिखट प्रतिकार पाहून वाल्पोलनें किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूनें चढाअी आरंभिली. परंतु गंमत अशी कीं, त्याचे गोळे

किल्ल्यांतील लोकांवर न पडतां, पलीकडच्या बाजूच्या अिंग्रज सैन्यांतच पडूं लागले. शत्रूबरोबर आणि मित्रांबरोबर एकाच वेळीं लढणाऱ्या या सेनापतीचें कौतुक करावें तेवढें थोडेंच! वाल्पोलच्या साहाय्याला आलेला सेनापति होप हाहि ठार झाला; तेव्हां अिंग्रजांनीं येथून मुकाट्यानें माघार घेतली. होप ग्रँटच्या मृत्यूनें दुःखानें आणि शोकानें अुभें अिंग्लिश राष्ट्र हळहळलें.

आतां सर कॉलिननें आपलीं सर्व सैन्यें अेकवटून रोहिलखंडावर चालून जाण्याची सिद्धता केली. यावेळीं नानासाहेब, मौलवी अहमदशहा अित्यादि क्रांतिकारकांचे मोठमोठे पुढारी शहाजहानपूर येथें गोळा झाले होते. त्यांना पकडण्यासाठीं कॉलिननें सबंध गांवाचीच नाकेबंदी करण्याचें ठरविलें. परंतु दुर्दैव बिचाऱ्याचें! पक्षी पिंजऱ्यांतून केव्हांच अुडून गेले होते. शहाजहानपूरचा छापा फसल्यानें निदान बरेलीला तरी वठणीवर आणावें म्हणून मे १४ ला कॉलिन बरेलीवर चालून आला. दिल्लीचा मिर्झा फेरोजशहा, नानासाहेब, अहमदशहा, बेगम हजरत महाल अित्यादि थोर थोर पुढारी रोहिलखंडांत जमले होते. बरेलीला घेरण्याचे ब्रिटिशांनीं केलेले सर्व प्रयत्न धुळीला मिळवून आपला नेता खान बहाद्दुर खान यासह सर्व क्रांतिकारक बरेलींतून सुखरूपपणें निसटले आणि अशा रीतीनें ओस पडलेल्या रोहिलखंडाच्या राजधानीचा ताबा ब्रिटिश बहाद्दरांनीं घेतला.

कॉलिन बरेलीवर चालून आल्याची संधि पाहून मौलवीनें पुन्हा शहाजहानपूर घेण्याचा धाडसी डाव टाकला. पूर्वीं शहाजहानपुरांतून निसटून जातांना नानानें आणि मौलवीनें शहाजहानपूर पूर्णपणें अुध्वस्त करून टाकलें होतें. त्यामुळें अिंग्लिश सैन्याला आतां अुघड्या माळावरच छावण्या ठोकून राहावें लागलें होतें. मे २२ ला मौलवी अहमदशाह शहाजहानपुरावर चालून गेला. त्यानें गांव आणि किल्ला दोन्ही हस्तगत करून तेथील लोकांकडून आपल्या सैन्याच्या खर्चाकरितां करपट्टी बसवून पैसा गोळा केला; आणि यांत मौलवीनें कांहीं चूकहि केली नव्हती.

स्वदेशाकरितां आपण होअून रक्त सांडण्यास जेव्हां असे वीर महात्मे पुढें येतात तेव्हां वास्तविक लोकांनींच पुढें येअून त्यांना साहाय्य करावयास यावयाला पाहिजे.

ही बातमी समजतांच मौलवीला पुन्हां शहाजहानपूरच्या पिंजऱ्यांत पकड-

ण्याचा बेत करून कॉलिन शहाजहानपूरकडे धावला. परंतु शत्रूबरोबर झुंज देअून आणि त्याला हैराण करून मौलवीनें आपल्याभोंवतींचा व्यूह फोडून शहाजहानपुरांतून सुटका करून घेतली. आपल्या शत्रूच्या आशा त्यानें धुळीस मिळविल्या. सर कॉलिननें अयोध्या घेतली तों मौलवीनें रोहिलखंड व्यापला; आतां कॉलिननें रोहिलखंड परत जिंकलें तों मौलवीनें अयोध्येंत ठाण मांडलें. तेव्हां मौलवीला पकडण्यासाठीं अिंग्रजानीं नवीनच अेक फितुर निर्माण केला.

पोवेनचा राजा जगन्नाथसिंह याजकडे साहाय्य मागण्यास मौलवी गेला असतां या दुष्ट आणि फितुर राजानें त्यास भेटीस बोलवून आपल्या वेशीचीं दारें बंद करून घेतलीं. तेव्हां मौलवीनें आपल्या हत्तीला अिषारा देअून दरवाज्यावर धडक देण्यास सांगितलें. परंतु अितक्यांत तटावर अुभ्या असलेल्या पोवेनच्या राजानें आपल्या भावाकडून मौलवीला गोळी घातली व त्याचें मुंडकें कापून नेअून अिंग्रजांना अर्पण केलें. या सत्कृत्याकरितां अिंग्रजांनीं पोवेनकराला ५० हजार रुपयांचें पारितोषिक दिलें.

अशा रीतीनें या शूर मुसलमानाचा शेवट अेका फितुराकडून झाला. भारत-मातेच्या स्वातंत्र्याकरितां प्राण खर्ची घालणाऱ्या मौलवीच्या या अुदाहरणावरून हेंच सिद्ध होतें कीं, माथेफिरूपणानें नव्हे तर डोळसपणें आपल्या धर्मावर व कुराणावर श्रद्धा ठेवणारा खरा विचारी मुसलमान हा केव्हांहि या राष्ट्राचा श्रेष्ठ प्रतीचा देशभक्त असूं शकतो व हिंदमातेचें स्वातंत्र्य हेंच त्याचें स्वातंत्र्य असल्यानें त्याकरितां तो स्वतःचें रक्त सांडतो!

♣ ♣ ♣

"काय झांशी सोडूं?—मी नाहीं सोडणार! ज्याला धाडस असेल त्यानें पहावाच अेकदां प्रयत्न करून! मेरी झांशी नहीं दूँगी!" असें आव्हान देअून ती झांशीची शूर राणी अिंग्रजांविरुद्ध अुठली. सागर, बादा, बाणापूर, शहागड, काल्पी अित्यादि सर्व भागांतून सूडाच्या आणि क्रांतीच्या ज्वाळा पेटून अुठल्या होत्या. क्रांतिकारकांनीं अिंग्लिश रक्ताचे पाट वाहवून अिंग्लिशांच्या आणि त्यांच्या पदरींच्या सैन्याचा चांगलाच सूड अुगवून घेतला. सबंध बुंदेलखंडांत अिंग्लिशांचें राज्य संपुष्टांत आलेलें होतें. प्रत्येक ठिकाणच्या नागरिक प्रजाजनांनीं राणीच्या सत्तेला राजनिष्ठापूर्वक मान्यता दिली; आणि मोठ्या कर्तबगारीनें राणीनेंहि आपल्या राज्यकारभार चालू केला. राणीच्या स्वदेशी राज्यकारभारामुळें राज्यांत शांतता आणि सुव्यवस्था नांदू लागली.

महाराणी लक्ष्मीबाअी नित्य पांच वाजतां अुठून स्नान करून पूजेला बसत. नंतर पुराणश्रवण झाल्यावर सरदार व आश्रित लोक बाअींना नमस्कार करण्यास येत. भोजनानंतर अेक तासभर विश्राति घेअून दुपारीं तीन वाजतां त्या राजसभेला (दरबारला) जात. यावेळीं त्या पुरुषवेष धारण करीत. राजसभेमध्यें बाअी पडदे सोडलेल्या अेका बाजूच्या खोलींत बसून तेथून त्या राजसभेचें काम चालवीत. बाअींची बुद्धिमत्ता अत्यंत तीक्ष्ण होती. न्यायनिवाड्यांतहि त्या निःपक्षपातीपणानें चौकशी करीत. झांशींत श्रीमहालक्ष्मीचें सुंदर मदिर होतें. त्या ठिकाणीं बाअी प्रत्येक मंगळवारीं दर्शनाला जात. अशा अेका मंगळवारीं बाअी दर्शनाहून येत असतां हजारों भिकारी तेथें गोळा झालेले त्यांनीं पाहिलें. त्यांची विचारपूस करून बाअींनीं त्या सर्वांना थंडीकरितां अेकेक घोंगडी, टोपी आणि कुडतें देण्याची व्यवस्था केली.

लढाअींत दुखापत झालेल्या शिपायांची त्या स्वतः चौकशी करीत व त्याचे घाव स्वतः बांधण्याचा आग्रह धरीत; त्यामुळें शिपायांचें दुःख हलकें होअून त्यांना आपल्या पराक्रमाचें चीज झालेंसें वाटे. आतां विंध्य पर्वतापासून यमुनेपर्यंत ब्रिटिश राजसत्तेची अेवढी म्हणून खूण अुरलेली नव्हती. सगळीकडे

स्वातंत्र्य हा अेकच शब्द अैकूं येअूं लागला. म्हणून राणीनेंहि स्पष्टपणें सांगितलें कीं, "मेरी झांशी नहीं दूँगी!"

अितक्या खसखशीतपणानें दिलेला 'नकार' जगाला यापूर्वी कधीं अैकावयाला मिळत नसेल. आजपर्यंत हिंदुभूमि 'किती देअूं', 'किती घ्याल' हेच बोलत आली. परंतु आज मात्र 'मी देणार नाहीं!', 'माझी झांशी मी देणार नाहीं' हे शब्द प्रथमच आणि अितक्या क्रोधानें तिच्या तोंडून बाहेर पडले! हे मातृभूमि, हे शब्द यापूर्वी तुझ्या प्रत्येक पुत्राच्या आणि कन्येच्या तोंडातून बाहेर पडले असते तर...?

यमुनेच्या अुत्तरेकडून कॉलिन जेव्हां वर हिमालयाकडे सरकत होता तेव्हां त्याच वेळीं यमुना आणि विंध्य यांमधील दक्षिण प्रदेश जिंकून घेण्याकरितां सर ह्यू रोजहि चालून येत होता. कॉलिनच्या साहाय्याला अुत्तरेमध्यें शीख, गुरखे आणि अितर हिंदी संस्थानिक आले होते. तर दक्षिणेकडे सर ह्यू रोजच्या साहाय्याला हैद्राबाद, भोपाळ येथील संस्थानिक आणि मुंबअी, मद्रास येथील अिंग्रजांचीं सैन्यें होतीं. ह्यू रोजनें आपल्या सैन्याचे दोन भाग केले. अेक व्हिट्लॉकच्या हाताखालीं देअून त्याला जबलपूरहून वर सरकत येण्यास सांगितलें होतें व स्वतः ह्यू रोज महूहून निघून व्हिट्लॉकला मिळणार होता. ठरल्याप्रमाणें ६ जानेवारी १८५८ ला ह्यू रोज निघाला. चंदेरी, बाणापूरचे किल्ले हस्तगत करून तो झांशीजवळ चौदा मैलावर तळ देअून राहिला. ह्यू रोज मोठ्या त्वरेनें झांशीवर चालून गेला. परंतु राणीच्या आज्ञेवरून क्रांतिकारकांनीं आसपासचा प्रदेश पार अुध्वस्त करून टाकल्यामुळें अिंग्लिशांना अन्नधान्य किंवा वैरणकाडी मिळण्याची अडचण पडली.

अिकडे अिंग्रजांना तोंड देण्याची सिद्धताहि झांशींत मोठ्या वेगानें चालू होती. सर्व सैन्याचें नेतृत्व राणीनें स्वतः आपल्या हातीं घेतलें. तटांवर व बुरुजांवर हिंडून तोफांचे बांधलेले मोर्चे ती स्वतः पाहात होती. झांशीचे नागरिक तोफखान्यावर काम करीत तर त्यांच्या बरोबरीनें झांशीच्या स्त्रियासुद्धां दारूगोळा वाहून नेण्याचें काम करीत. २५ जानेवारीला झांशीच्या लढाअीला खरें तोंड लागलें. २६ ला अिंग्लिशांनीं दक्षिण दरवाज्यावरचा तोफखाना बंद पाडला. परंतु पश्चिम दरवाज्यावरील गोलंदाज गुलाम घोषखान यानें अिंग्रजाच्या

गोलंदाजालाच ठार करून अिंग्रजांचा तोफखाना बंद पाडला. या पराक्रमाकरितां राणीनें त्याला चांदीचा तोडा देणगी म्हणून दिला. पांचव्या व सहाव्या दिवशीं अशीच घनघोर लढाअी माजून राहिली. आठव्या दिवशीं दुर्बिणींच्या साहाय्यानें अिंग्रजांनीं झांशीच्या किल्ल्यांतील पाण्याच्या टाक्यांवरच गोळे टाकले. त्यामुळें नागरिकांचे पाण्याचे फार हाल झाले. दारू कुटण्याच्या कारखान्यावर गोळा पडून तेथील स्फोटांत बरींच माणसें दगावलीं. अितक्या आपत्तींना तोंड देअूनहि झांशीनें २१ मार्चपर्यंत अिंग्रजांना झांशींत प्रवेश मिळवूं दिला नाहीं.

'झांशीचा वेढा अुठविण्यास यावें' अशा अर्थाचें झांशीच्या राणीचें पत्र हातीं पडतांच तात्या टोपे अिंग्लिशांची पिछाडी झोडीत बरोबर २२ हजार सैन्य काल्पीहून निघून बेट्वा नदीपाशीं येअून पोंचला. झांशीच्या सैन्यानें मागून नि तात्यानें पुढून चढाअी करून जावयाचें ठरलें होतें. अिंग्लिशांनीं मागून दोन्ही सैन्यांशीं मोठ्या निकरानें झुंज घेतली. पण तात्याच्या सैन्यानें झांशीकडून अेकसुद्धां तोफेचा गोळा सुटला नाहीं म्हणून भागूबाअीप्रमाणें पळण्यासच सुरवात केली. अिंग्लिशांनीं केलेल्या पाठलागांत नुसते तात्याचे दीड हजार लोक ठार झाले. अरे! पळण्यापेक्षां तुम्ही निर्धारानें ह्यू रोजवर नुसते चालून गेलां असतात तरी त्याच्या सैन्याचा तुम्हीं फडशा पाडला असतात! तुमच्याविषयीं आदर नाहीं, तरी कींव मात्र वाटते.

तुमच्या मरणापासून तुम्ही आपल्या देशबांधवांना अितका तरी धडा दिलात कीं, जगण्यासाठीं जे पळपुटे पळतात ते मरतात, आणि मरण्याकरितां जे लढतात तेच अमर होअून जगतात!

अेप्रिल ३ ला अिंग्रजांच्या झांशीवरील शेवटच्या चढाअीला प्रारंभ झाला. झांशीच्या सैनिकांनीं आणि गोलंदाजांनीं आपल्या पराक्रमाची खरोखरच शर्थ करून कित्येक ठिकाणीं अिंग्लिशांना माघार घ्यावयास लावली; परंतु फितुरांच्या साहाय्यानें अिंग्रजांनीं दक्षिण बुरुजाचा ताबा मिळवून ते तटावरून झपाझप चालत आंत घुसले गोळ्यांचा वर्षाव करीत आणि कापाकापी करीत अिंग्रज राजवाड्यापर्यंत घुसले. राजवाडा फोडून लक्षावधि रुपयाची त्यांनीं लूट केली व अशा रीतीनें झांशी अिंग्रजांच्या हातीं पडली.

किल्ल्याच्या बुरुजावरून राणीनें जेव्हां हें हृदयद्रावक दृश्य पाहिलें तेव्हां

दुःखानें तिच्या डोळ्यांत पाणी अुभें राहिलें. या प्रसंगीं शत्रूचें कडें फोडून किल्ल्यांतून निसटून जाअून पेशव्यांकडे जावें असा सल्ला राणीच्या लोकांनीं दिला. तेव्हां रात्र पडतांच निवडक घोडेस्वारांनिशीं आपला दत्तक मुलगा पाठीला शेल्यानें बांधून राणी अुत्तर दरवाज्यांतून अिंग्रज पहारेकऱ्यांना चुकवून काल्पीकडे जाण्यास निघाली. अेकसारखी रात्रभर राणी घोड्याच्या पाठीवरून दौडत होती. सकाळीं भांडेर गांवांत थांबून तिनें महालकऱ्याकडे प्रिय दामोदरला थोडें खाअू घातलें; व पुन्हा काल्पीच्या रस्त्यानें प्रवास करण्यास राणीनें प्रारंभ केला. परंतु अिंग्रज सेनानी बोकर तिच्या पाठलागावर येतच होता. बोकर आतां अगदीं तिच्या पाठीशीं येअून भिडला.

राणीबरोबरच्या दहापंधरा घोडेस्वारांची आणि पाठलाग करणाऱ्या अिंग्रजांची भीषण हातघाअीची लढाअी जुंपली. राणीच्या तरवारीच्या अेकाच पल्लेदार वारानें बोकार घोड्यावरून खालीं कोसळला. बोकरच घायाळ झाल्यामुळें त्याच्या मूठभर लोकांनीं पाठलाग टाकून देअून पलायन केलें. राणीने पुढें प्रवास चालू केला. सकाळ संपून दुपार झाली तरीहि राणी थांबली नाहीं. सायंकाळ संपून चांदण्या चमकूं लागल्या; तरीहि कालच्या रात्रीप्रमाणेंच मार्ग कापीत चाललेली लक्ष्मी आजहि रात्रीं त्या चांदण्यांना दिसली. शेवटीं मध्यरात्रीं राणीनें काल्पींत प्रवेश केला. मात्र या प्रवासांत तिला वाहून आणणारा घोडा, लक्ष्मी काल्पीला सुखरूप अुतरतांच जो खालीं कोसळला तो पुन्हा अुठला नाहीं.

खरोखर या माणसापेक्षांहि प्रामाणिक असलेल्या पशूचीच स्मृति चिरंजीव होअून राहील!

राणीनें पहाटेपर्यंत विश्रांति घेतली. सकाळीं राणीची आणि श्रीमंत रावसाहेब पेशव्यांची भेट झाली. या भेटींत त्यांनीं स्वदेशाला भ्रष्ट करणाऱ्या अिंग्रजांशीं शरीरांत प्राण आहे तोंपर्यंत स्वराज्याकरितां आणि जरीपटक्याकरितां झुंजत राहण्याची शपथ घेतली, व त्याप्रमाणें राणी लक्ष्मी आणि तात्या टोपे पुढील युद्धाची जुळणी करण्यांत गुंतले.

झांशी पडल्यानंतर त्या ठिकाणीं अेकच हलकल्लोळ अुडाला. भयंकर लुटालूट मंदिरांचा आणि मूर्तींचा विध्वंस, स्त्रिया नि मुलेंमाणसें यांची सरसकट कत्तल इत्यादि गोष्टींना अतोनात अूत आला! यानंतर ब्रिटिश सैन्य काल्पीला जाअून तेथें

आपली चढाअी चालू करणार होतें. १७ फेब्रुवारीला व्हिट्लॉक जबलपुराहून निघाला. तेथून तो बांद्याच्या नबाबावर चालून गेला. नबाबानें लढाअीला तोंड दिलें. परंतु त्यामध्यें नबाबाला हार खावी लागून तो काल्पीकडे निसटून गेला. १९ अेप्रिलला बांद्यांत अिंग्रज सैन्य शिरलें. तेथून व्हिट्लॉक किर्वीच्या राव माधवावर चढाअी करून गेला.

किर्वी संस्थानांत क्रांतीची कोणतीहि विशेष गडबड अुद्भवणार नाहीं अशा भ्रमांत अिंग्रज होते. परंतु १८५७ चें वर्षच असें होतें कीं, राष्ट्राची खरीखुरी जनशक्ति आतां शतकाचा काळ लोटल्यावर हळूहळू कां होअीना पण झुंजत झुंजत प्रगतिपथावर चाललेली होती. किर्वीच्या जनतेनें, रावाचें मत काय आहे, किंवा दिवाणाची मान्यता आहे किंवा नाहीं याचा अेवढासुद्धां विचार न करतां, स्वातंत्र्याची घोषणा करून परकीय सत्तेचें जोखड झुगारून दिलें. जनतेनें ही स्वातंत्र्याची लाट अुसळून दिली असतां किर्वीचा राव माधव मात्र अिंग्लिशांशींच राजनिष्ठ राहिला आणि व्हिट्लॉकचें सैन्य जेव्हां बुंदेलखंडांत आलें तेव्हां त्यास तो सामोरा गेला. परंतु अिंग्रजांनीं किर्वीत प्रवेश करून रावाला बंदी केलें, व राजवाडा लुटून जाळपोळ केल्यानंतर ते बाहेर पडले; आणि लागलींच किर्वीचें संस्थान खालसा करण्यांत आल्याचें कळलें. यावेळपर्यंत व्हिट्लॉकनें बुंदेलखंडाचा सबंध पूर्वभाग जिंकून घेतला.

पेशव्यांचें सैन्य बरोबर घेअून मोठ्या अुत्साहानें राणी काल्पीपासून ४२ मैलांवर असलेल्या कुंचगांववर चालून गेली. परंतु राणीच्या लढाअू पथकांत अेक अंतःकरण, अेक विचार, अेक कार्यक्रम, अेक नेता या शिस्तीचा अभावच होता. त्यामुळें कुणाचाच पायपोस कुणाच्याच पायांत नव्हता. पण अिकडे अिंग्रजांच्या बाजूला सेनापतीचें जें मत तेंच सर्वांचें मत अशी शिस्त होती. सेनापतीच्या सर्वच आज्ञा बरोबरच असतील असें नाहीं. परंतु शूर आणि संघटित अनुयायांकडून चुकीच्या आज्ञाहि जरी अेका शिस्तीनें पार पाडल्या गेल्या तरीहि यश निश्चित असतें; नाहीं तर कितीहि कुशल सेनापति असला आणि त्याचे अनुयायी हेकांडे आणि आपलेंच खरें करणारे असले तर त्यामुळें मात्र निश्चित पराभव होअून सर्वनाश होतो.

कुंचगांवला सकाळीं दहा वाजल्यानंतरच लढाअी चालू करण्यांत आली.

त्यामुळें दहा नंतरच्या प्रखर अुन्हांत अिंग्रजांचे चांगलेच बारा वाजण्याची पाळी आली. परंतु याहि परिस्थितीला तोंड देअून ह्यू रोजनें क्रातिकारकांचा पराभव केला. पराभव पावून क्रांतिकारकांनीं काल्पीला माघार घेतली. जो तो पराभवाचें खापर दुसऱ्याच्या डोक्यावर फोडून त्यास दोषी ठरवूं लागला. परंतु यावेळीं तात्या अेकाअेकीं गुप्त झाला. कोणी म्हणतात तो आपल्या म्हाताऱ्या पित्याला भेटण्यास जालवणाला गेलेला होता. अिकडे राणीनें काल्पीला पुन्हा आपलें सैन्य संघटित केलें. बांद्याचा नबाबहि नव्या अुत्साहानें लढण्यास सिद्ध झाला. क्रांतिकारकांनीं 'फिरंगी सत्तेचा अंत करून स्वदेशाला स्वतंत्र करूं' अशा, यमुनेवर जाअून शपथा घेतल्या. रावसाहेबानें सर्व सैन्याचें नेतृत्व पत्करलें.

सर ह्यू रोज आपली २५ वी पायदळी तुकडी घेअून चाल करून आला. परंतु राणीनें आपल्या घोडदळासह अिंग्लिशांच्या अुजव्या फळीवर जोरानें प्रहार केला. त्यामुळें आतांपर्यंत विजयी असलेली अिंग्रजांची अुजवी बगल थंडावली. अेकवीस वर्षांच्या शूर कन्यकेनें मारलेली धडक, तिचा भरधाव वेगानें चौखूर अुडणारा घोडा, अुजव्या बाजूला प्रहार करीत शत्रूला सपासप कापीत चाललेली तिची तरवार-या सर्व अुत्साहवर्धक गोष्टी पाहून तिच्या अनुयायांनाहि वीरश्री चढून त्यांनींहि अतुल पराक्रम गाजविला. अिंग्रजांचा तोफखाना क्रांतिकारकांनीं हस्तगत केला. त्यामुळें ह्यू रोजला प्रथम माघार घ्यावी लागली. परंतु नंतर त्यानें आपलें राखीव अुंटदळ रणांगणात सोडलें. त्यामुळें पेशव्यांच्या सैन्याला पुन्हा काल्पीपर्यंत माघार घ्यावी लागली. पेशवे सैन्याशीं आणखी कांहीं लढाया देअून २४ मेला ह्यू रोज काल्पींत शिरला. त्या ठिकाणीं अत्यंत अुपयुक्त असा शस्त्रास्त्रांचा प्रचंड सांठा अिंग्लिश सैन्याच्या हातीं पडला.

अशा रीतीनें सर ह्यू रोज व व्हिट्लॉक या दोघांनीं नर्मदेपासून प्रारंभ करून यमुनेपर्यंतचा सबंध दक्षिण किनारा परत मिळविला. क्रांतिकारकांचा संपूर्ण फडशा पाडल्यामुळें आतां स्वतःची पाठ थोपटून घेण्यास अिंग्लिश सैन्याला पूर्ण अधिकार होता. यावेळीं आपल्या प्रकृतिस्वास्थ्यासाठीं सर ह्यू रोज नोकरींतून मुक्त झाला व विजयी अिंग्लिश सैन्यहि विश्रांति घेण्यासाठीं आतुर झालें. या सुमारास काल्पीहून निसटून सर्व क्रांतिकारक पुढारी गोपालपूर येथें जमा झाले होते.

आपल्या 'पित्याचें दर्शन' घेअून तात्याहि आतां गोपाळपूरला आला होता. तात्याचें 'पितृदर्शन' म्हणजे त्याची ग्वाल्हेरला भेट! काल्पी पडल्यानंतर दुसरें कोणतें तरी सुरक्षित ठाणें किंवा किल्ला क्रांतिकारकांना पाहिजेच होता. म्हणून तात्यानें ग्वाल्हेरला जाअून तेथील जनतेला अुठवून तो गोपाळपूरला आला. मे २८ ला ग्वाल्हेरवर चालून जाण्यासाठीं पेशव्यांचे क्रांतिकारक सैन्य निघालें. पेशव्यांनीं ग्वाल्हेरच्या शिंद्यानें येअून आपणास साहाय्य द्यावें म्हणून त्यास लिहिलें होतें. परंतु कृतघ्न शिंद्यानें आपण पेशव्यांचे साधे नोकर—हुज—रेहोतों हें विसरून १ जूनला पेशव्यांवरच चढाअी चालू केली. राष्ट्रद्रोही शिंद्याला आपणाला चालून येत असलेला पाहून राणी लक्ष्मी दुखावलेल्या नागिणीप्रमाणें त्याच्यावर तुटून पडली. स्वदेशभक्त महादजी! आणि त्याचा वंशज फिरंग्यांचा लाचार कुत्रा! जेव्हां ही क्रोधानें कडकडणारी बिजली शिंद्याच्या आघाडीवर जाअून कोसळली तेव्हां शिंद्याला पळतां भुअी थोडी झाली. जयाजी शिंदे आणि त्याचा दिवाण दिनकरराव राजवाडे दोघेहि ग्वाल्हेरमधून पळून आग्र्याला निघून गेले.

ग्वाल्हेरचा आनंद यावेळीं गगनांत मावत नव्हता. 'राजा आणि प्रजा यांच्यामधलें खरेखुरें नातें आशियांतील लोकांना मुळींच समजत नाहीं' या अिंग्लिशांच्या कुत्सित आरोपाला ग्वाल्हेरनें सणसणीत अुत्तर दिलें. कारण स्वदेशावर आणि स्वधर्मावर अुलटणाऱ्या राजास डोक्यावर घेण्यास प्रजा कांहीं मूर्ख नाहीं! पेशव्यांच्या सिंहासनावरून रावबाजीला खालीं ओढलें नाहीं म्हणून तर १८१८ मध्यें पुणें देशद्रोहाच्या पातकाचें धनी झालें. ग्वाल्हेरनें हें पाप केलें नाहीं. शिंदे जर स्वदेशाच्या बाजूनें अुभा राहणार नसेल तर स्वदेशहि त्याच्याकडे ढुंकून पाहणार नाहीं!

३ जूनच्या शुभ दिवशीं श्रीमंत रावसाहेब पेशवे यांचा राज्यारोहण समारंभ फुलबागेंत घडविण्यांत आला. तात्या टोपे यास सेनापति पदावर नेमण्यांत आलें. सैन्यामध्यें वांटण्यासाठीं पेशव्यांनीं २० लाख रुपये देण्यास काढले. पेशव्यांना राज्यावर बसवून नवीन सिंहासनाची स्थापना करण्यांत तात्याचा अेक फार मोठा अुद्देश होता. रानोमाळ पसरलेल्या क्रांतिकारकांमध्यें अेक नवीन आशा, अुत्साह नि स्फूर्ति संचरविण्याकरितां, तात्यानें या राज्यारोहणाच्या तोफा अुडविल्या होत्या. ग्वाल्हेरला फडफडत असलेला आपला राष्ट्रध्वज पाहून क्रांतिकारकांना अेकत्र

होण्याला अेक मूळ ठिकाणा सांपडेल या अुद्देशानेंच त्यानें या राज्यारोहणाचा डंका अितक्या जोरानें पिटला होता !

परंतु अुत्सव समारंभांतच क्रांतिकारक दंग होअून गेल्यामुळें आपलें सैन्य सदैव सुसज्ज ठेवण्याच्या साध्या गोष्टीकडेहि त्यांनीं डोळेझाक केली. राणी लक्ष्मी त्यांना सारखें बजावीत होती; तरी त्याचा अुपयोग झाला नाहीं. फितूर शिंद्याला पुढें घालून आतां ह्या रोज पुन्हां ग्वाल्हेरवर चालून आला होता. राणीनें आपली तरवार अुपसलेलीच होती. भारतांत आपल्याला स्वातंत्र्याच्या ध्वजा-खालीं हातांत स्वतंत्र खड्ग घेअून मरण यावें अेवढी अेकच अेक आशा आणि अिच्छा तिनें मनाशीं बाळगली होती. कोटकी-सरअीचा भाग राणीच्या रक्षणाखालीं सोंपवून दिलेला होता.

तिनें पुरुषवेष धारण केला होता. बरोबर तिच्या दोन सख्या मंदार आणि काशी या होत्या. पहिले दिवशीं जनरल स्मिथला राणीनें माघार घेण्यास लाविलें. पुन्हा दुसरे दिवशीं १८ जूनला स्मिथ आपलें ताजेतवानें सैन्य घेअून राणीच्या बाजूवर चालून आला. अेक अिंग्लिश लेखक लिहितो, "लागलींच ती सुस्वरूप राणी रणांगणावर आली. आपल्या सैन्यांत अुत्साह आणि संघटना निर्माण करीत आणि अपूर्व पराक्रम गाजवीत ती सारखी रणां-गणावर तळपत होती." पाठीमागें लढत असलेल्या क्रांतिकारकाचा प्रतिकार कोल-मडून पडल्यामुळें पिछाडीवरून अिंग्लिश सैन्यें आपल्यावर चालून बेत असलेलीं राणीनें पाहिलीं. या आणीबाणीचे वेळीं दहा पंधरा स्वार व दोन दासी घेअून शत्रूचें कडें फोडून बाहेर पडण्याकरितां राणीनें घोडा फेंकला. फिरंगी घोडे-स्वारांनीं शिकारी कुत्र्याप्रमाणें तिचा पाठलाग केला. तिची सुकुमार दासी अेका सोल्जराच्या गोळीला बळी पडली. पण तिचा सूड राणीनें त्या फिरंग्यालाच ठार करून घेतला. ती पुढें दौडत होती. परंतु वाटेमध्यें अेक ओहोळ आडवा आला आणि घोडा थबकला.

यावेळीं तिचा पूर्वीचा घोडा असता तर?

अिंग्लिश घोडेस्वार तिच्या पाठीवर येअून भिडले, तरी भीतीची किंवा शरणागतीची भाषा नव्हती. अेकटी अेक तरवार अनेक तरवारींविरुद्ध लढत होती. अितक्यांत कोणींतरी पाठीमागून तिच्या डोक्यावर प्रहार केला. या

जबर वारामुळें तिच्या डोक्याची अुजवी बाजू आणि तिचा अुजवा डोळाहि लोंबूं लागला. प्राण जाण्याच्या शेवटच्या क्षणालाहि तिनें फिरंग्यांना कापून काढलें; आणि आतां ती रणांगणावर मृत्यूच्या घटका मोजीत पडली.

रामचद्रराव देशमुख नावाच्या तिच्या सेवकानें तिला जवळच असलेल्या गंगादासबावाच्या झोंपडींत नेलें. रक्तानें थबथबलेली ती रणदेवता शय्येवर पडते आहे तोंच तिचें प्राणोत्क्रमण झालें. नंतर रामचंद्ररावानें गवताची चिता करून तीवर राणीचा देह ठेवला व पारतंत्र्याचा पापी स्पर्श तिच्या मृत शरीराला होण्यापूर्वीच त्यास अग्नि देअून दहन करून टाकलें!!

सिंहासनावर नाहीं तर चितेवर तरी! पण लक्ष्मी आपल्या प्रिय स्वतंत्रतेसह तेथेंहि मिरवत होती! अशा रीतीनें लक्ष्मी लढली. सर्व सद्गुणांची आटवलेली ती मूर्तीच होती. साधी स्त्री-वयानें बावीस तेवीस वर्षांची. पण आपल्या संघटनाचातुर्यानें तिनें सर्व प्रजेचीं मनें आकर्षित करून घेतलीं. युद्धशास्त्रांत तिचा हात धरणारा कोणी नव्हता.

अशा तऱ्हेची देवतातुल्य स्त्री, कन्या आणि राज्ञी म्हणून लाभण्याचें भाग्य क्वचित् अेखाद्याच राष्ट्राच्या वांट्याला आलें असेल. हें भाग्य अिंग्लंडलाहि अद्याप लाभलें नाहीं! अिटलीची क्रांति कितीहि मोठी असली तरी त्या अुज्ज्वल कालांत अिटली अेकाहि लक्ष्मीला जन्म देअूं शकली नाहीं! अितकेंच काय पण असलें महान् स्वातंत्र्ययुद्ध येथें लढलें गेलें नसतें तर भारतमातेनेंहि असल्या पराक्रमी राणीला क्वचित्च जन्म दिला असता!

१८५७ मध्यें हिंदुभूमीच्या क्रोधानें अक्षरशः पेट घेतला. आणि त्यांतून अुभ्या जगताच्या कानठळ्या बसविणारा भयंकर स्फोट झाला. सगळीकडे अग्नि-ज्वाला आणि रक्तपात याना अूत आला. राज्यें, सिंहासनें, हत्ती, घोडे, वीर सर्व त्या भयानक अग्निप्रलयांत सांपडून जळून गेले.

....आणि गंगादासबाबाच्या झोपडीजवळ धडधडणारी ही राणी लक्ष्मीची चिता सत्तावनच्या स्वातंत्र्य-समराच्या त्या क्रुद्ध ज्वालामुखीच्या अग्निप्रलयांतील शेवटली आणि सर्वांत तेजस्वी ज्वालाच म्हटली पाहिजे!!

♣ ♣ ♣

# ४

# तात्पुरती शांतता

---

"आमच्या या स्वदेशांत, परके फिरंगी तुम्ही या देशाचे राजे, नि आम्ही तेवढे चोर ठरलों काय?"

नानासाहेबांचे एवढेच काय ते शेवटचे शब्द इतिहासानें लिहून ठेवलेले आहेत! दुसऱ्या बाजीच्या नेभळट राजवटीचा पेशव्यांच्या गादीला लागलेला कलंक आतां रक्ताचे पाट वाहवून धुऊन काढण्यांत आल्यामुळें, चितोडच्या त्या रजपुतानींप्रमाणें ती गादी लढतां लढतांच स्वातंत्र्य-यज्ञाच्या ज्वाळांत दग्ध होऊन गेली!

—आणि अशा रीतीनें आतांपर्यंत धडधडत असलेल्या ज्वालामुखीचें मुख पुन्हा मिटलें. हिरवीगार तृणराजी पुन्हा त्या मुखावर उगवली. सगळीकडे शांतता, सुरक्षितता नि निश्चिंतता यांचें साम्राज्य चालू झालें!

—परंतु जरी या ज्वालामुखीचा पृष्ठभाग इतका नयनरम्य भासत आहे तरी याच पृष्ठभागाखालीं अति भयानक ज्वालामुखी निद्रिस्त स्थितींत वसत आहे याची एवढी तरी कल्पना कुणाला आहे का?

# १ विहंगमावलोकन

५७ च्या युद्धाचें मुख्य रणक्षेत्र अुत्तर हिंदुस्थानांतच असल्यामुळें आतांपर्यंत त्या विभागांत घडलेल्या अेकंदर अपूर्व प्रसंगांवरच भर दिला गेला. परंतु या क्रांतीच्या ज्वाला ज्या हिंदुस्थानच्या अितर भागांतहि पसरल्या होत्या त्यांचाहि परामर्श आतां आपणांला घ्यावा लागेल.

राजपुतान्यांतील सर्वसाधारण जनतेची सहानुभूति क्रांतिकारकांनाच होती. जयपूर, जोधपूर, उदेपूर अित्यादि ठिकाणीं क्रांतिकारकांच्या विजयाच्या वार्ता अैकून आनंदप्रदर्शक जयजयकार अुसळत. राजपूत संस्थानिकावर सैन्य पाठविण्यासाठीं जेव्हां अिंग्रजाकडून दडपण येअी तेव्हां त्या संस्थानिकांच्या पदरचीं सैन्यें आपल्या क्रांतिकारक देशबांधवाविरुद्ध लढण्याचें नाकारीत.

आतां दक्षिणेकडे पाहिलें तर प्रथम आपणाला मराठी साम्राज्याचें दर्शन घडतें. याच मराठ्यांचे, अुत्तरेंत गेलेले देशबांधव कानपूर, काल्पी, आणि झांशी येथें भयंकर रणसंग्राम करीत अुभे होते. रायगडच्या मराठ्यांचा जरीपटका आतां तात्या टोपेच्या हातांत डौलानें फडकत होता. अुत्तरेंत ज्याप्रमाणें हा लढा अेकीनें, धडाडीनें आणि निश्चयानें लढविला जात होता तसाच जर तो दक्षिणेंत लढविला गेला असता तर हिंदुस्थानशीं लढण्याला सारें अिंग्लंड जरी अेक होअून आलें असतें तरी मराठ्यांच्या जरीपटक्याला खालीं पहावें लागलें नसतें. म्हैसूरपासून ते थेट विंध्यपर्वतापर्यंत "अुत्तर अुठतांच अिकडेहि अुठावणी करूं" अशा सर्व संस्थानांतून शपथा घेण्यांत आल्या होत्या. परंतु दक्षिण अुठण्याचें जरी विसरली नाहीं तरी अुत्तर अुठल्याबरोबर अुठावयाचें हें ती नेमकें विसरली. अुत्तरेच्या पाठोपाठ न अुठतां केवळ तेथील घटनांकडे नुसतें पाहातच दक्षिण तशीच स्वस्थ राहिली.

क्रांतीसारख्या आणीबाणीच्या कालांत अेक अेक क्षण असा असतो कीं, त्यावर राष्ट्राच्या जीवनमरणाचा प्रश्न अवलंबून असतो. घाअीनें अुठावणी करणें किंवा ती करण्यासाठीं रेंगाळत बसणें या दोन्ही गोष्टी यशाच्या दृष्टीनें

हानिकारकच असतात. परंतु याच वेळीं कुशल नेत्याची खरी गरज असते. आंखलेल्या वेळापत्रकाप्रमाणें क्रांत्या कधींच घडून येत नाहींत. अुठावणी होअीपर्यंत हें सर्व वेळापत्रक आणि कार्यक्रम ठीक असतात. परंतु अेकदां अुठावणीचा तास वाजला कीं, मग मात्र प्रत्येकानें अुठलेंच पाहिजे. यावेळीं जो उडी घेण्यास डळमळतो तो शेवटीं चांगलाच मार खातो. क्रांतीची जुळणी करतांना शांतता आणि संयम, पण अुठावणी झाली कीं मग मात्र जास्तींत जास्त शौर्य आणि साहस हेंच मुख्य सूत्र असावें. 'कडवट युद्ध' हा अेकच निर्धार मनांत धरून प्रत्येकानें 'मारीत मारीत मरण्यास' सिद्ध झालें पाहिजे.

क्रांतीमध्यें यश मिळविण्याचा अेकच मार्ग म्हणजे स्वस्थ न बसतां चढाअी करून जाणें हाच. कारण थांबला तो संपला !

दक्षिणेमध्यें कोल्हापूर, बेळगांव आणि धारवाड या ठिकाणीं तीन महत्त्वाच्या तुकड्या होत्या. १० ऑगस्ट हा अुठावणीचा दिवस म्हणून ठरलेला होता. परंतु कोल्हापूरच्या सैन्याला अिंग्रजांच्या हालचालींचा वास लागून तें आधींच म्हणजे ३१ जुलैला अुठलें. तेथील अिंग्लिशांशीं थोडी चकमक करून शिपाई घाटामध्यें पळून गेले. पुढें सावंतवाडीच्या रामजी शिरसाळच्या नेतृत्वाखालीं या क्रांतिकारकांनीं अिंग्रजांना सतावण्याचा अुद्योग चालू केला. पण पोर्तुगीजांच्या साहाय्यानें अिंग्रजांनीं त्यांचें पारिपत्य केलें. अिकडे शिपाअी अुठले तेव्हां कोल्हापूरची जनता अुठली नाहीं. पुढें छत्रपतींचा धाकटा भाअू चिमणासाहेब यानें पुढाकार घेअून फिरून १५ डिसेंबरला अुठावणी केली. परंतु अिंग्लिश अधिकारी जेकब यानें तेथील सर्व शिपायांना शस्त्रें खालीं ठेवायला लावलीं व प्रमुख क्रांतिकारकांनाहि ठार केलें. बेळगांव येथें १० ऑगस्टला उठावणी होण्याचा रंग दिसत होता. परंतु तेथील प्रमुखांनाच अिंग्रजांनीं अटक केली व सैन्य आणून ठेवलें. त्यामुळें बेळगांव आणि धारवाड येथील अुठावणी थंडावली.

सातारच्या रंगो बापूजीच्या मुलास कोल्हापूरच्या क्रांतीच्या संबंधांत अिंग्रजांनीं पकडून फांशीं दिलें. रंगो बापूजी मात्र त्यांच्या हातीं कधींच लागला नाहीं.

यावेळीं मुंबअीचा गव्हर्नर अेल्फिन्स्टन हा होता; व त्याच्या साहाय्याला प्रमुख पोलिस अधिकारी म्हणून फॉरेस्ट याची नेमणूक झाली होती. मुंबअी हें केवळ आळशी सुखवस्तूंचें आणि राष्ट्रद्रोही भागूबाअींचेंच नगर होतें. तेथें तळ देअून

असलेले सैन्यांतील शिपाअीच कांहीं केलें तर करणारे होते. अुठावणीकरितां दिपवाळीचे दिवस ठरविण्यात आलेले होते. प्रथम मुंबअीला अुठावणी करावयाची नि नंतर पुण्यावर चाल करून पुणें आपल्या ताब्यांत घ्यावयाचें आणि मग त्या ठिकाणीं मराठ्यांचा जरीपटका अुभारून नानासाहेबांची पेशवा म्हणून द्वाही फिरवावयाची, असा शिपायांचा अेकंदर कार्यक्रम होता. परंतु या योजना प्रत्यक्षांत येण्याच्या आधींच फॉरेस्टनें मोठ्या हुषारीनें दोन प्रमुख क्रांतिकारकांना बंडखोर ठरवून फांशीं दिलें; व बाकीच्या सैन्यांतील सहा म्होरक्यांना सीमापारीची शिक्षा दिली आणि अशा प्रकारें मुंबअीची अुठावणी मुळांतच चिरडून टाकण्यांत आली.

नागपूरची १३ जूनची अुठावणी अशीच बारगळली. जबलपूरचा गोंड राजा शंकरसिंह हाहि क्रांतीकरितां जिवापाड प्रयत्न करीत होता. परंतु त्याला आणि त्याच्या मुलाला पकडून १८ सप्टेंबरला अिंग्रजानीं फांशीं दिलें; हा शंकरसिंह चंडीचा भक्त होता. त्यानें देवीच्या प्रार्थनेकरितां लिहिलेलें जें स्तोत्र सांपडलें आहे त्यांतसुद्धां तो म्हणतो कीं, 'हे चंडी, धर्माची करुण हाक अैक, तुझ्या दासाला आशीर्वाद दे आणि ब्रिटिशांचा संहार करून त्यांना येथून नामशेष करून टाक!"

यावेळीं खरें महत्त्व हैद्राबाद संस्थानला आलेलें होतें. हैद्राबादचा निजाम जर यावेळीं अुठला असता तर सारी दक्षिणहि पेटून अुठली असती; आणि अुत्तरेंतील क्रांतीच्या जोरानें आधींच हतबल झालेली ब्रिटिश साम्राज्यशाही दक्षिणेंतील क्रांतीच्या धक्क्यानें सहजासहजीं कोलमडून पडली असती! १२ जून १८५७ ला हैद्राबादनें भयंकर अुग्र स्वरूप धारण केलें. क्रांतिपत्रकें भिंतीवर झळकूं लागलीं. मशिदींतून मुसल्मानांच्या प्रचंड सभा भरून क्रांतीच्या शपथा घेण्यांत आल्या. परंतु हैद्राबादचा दिवाण सालरजंग यानें क्रांतीला सहानुभूति तर दाखविली नाहींच. पण अुलट त्यानें कांहीं क्रांतिनेत्यांना पकडून अिंग्रजांच्या स्वाधीन केलें. परंतु तरीहि निजामाच्या सैन्यांतले रोहिले आणि पांचशें नागरिक यांनीं १७ जूनला अुठावणी केलीच. यावेळीं सालरजंगानें सर्वस्वीं निराशा केली. त्यानें यावेळीं नुसतें तटस्थहि न राहातां ब्रिटिशांना साहाय्य करून हैद्राबादेंतील क्रांतीचा मोड केला, व त्याकरितां अिंग्रज अितिहासकार धोरणी म्हणून त्याची पाठ थोपटतात.

निजामानें जरी क्रांतीला धोका दिला तरी त्याच्या शेजारच्या झोरापूरच्या हिंदी राजानें मात्र चिडीला पेटून अिंग्रज आणि निजाम या दोघांवर चढाअी केली. परंतु या दोघांच्या संयुक्त सैन्यापुढें त्याचा निभाव लागला नाहीं. सालर-जंगानें त्याला पकडून शेवटीं अिंग्रजांच्या ताब्यांत दिलें. तुरुंगांत असतांना त्यानें आपल्या सहकारी क्रांतिकारकांचीं नांवें सांगावीं म्हणून अिंग्रजांनीं मेडोज टेलरला पाठवून प्रयत्न करून पाहिला. कारण मेडोज टेलरची व राजाची लहानपणापासून फार घसट होती. तो टेलरला 'आप्पा' म्हणून हाक मारी. परंतु टेलरला त्यानें कांहींहि माहिती सांगण्याचें स्वच्छ नाकारून त्याला त्यानें अेवढीच विनंती केली कीं, "मी चोर गळेकापू नसल्यानें मला फांशीं न देतां तोफेच्या तोंडीं द्या."

परंतु टेलरनें मध्यस्थी करून राजाला फांशीचे ठिकाणीं काळ्या पाण्याची शिक्षा देवविली. तेव्हां राजा म्हणाला, "माझा क्षुद्र डोंगरी प्रजाजनहि अेक दिवससुद्धां बंदींत राहणार नाहीं मग त्यांचा राजा असलेला जो मी त्याची तर गोष्टच नको!" असें म्हणून त्यानें जवळच्या पहारेकऱ्याचें पिस्तूल घेअून आत्महत्या केली व तो स्वाभिमानी राजा म्हणून मरण पावला!

नरगुंद संस्थानचे भास्करराव बाबासाहेब यांनींहि अिंग्रजांनीं त्यांचा दत्तक घेण्याचा अधिकार नाकारला म्हणून २५ मे १८५८ ला अिंग्लंडविरुद्ध अुठावणी केली. आपल्यावर चालून येणारा अिंग्लिश अधिकारी मॅन्शन यास त्यांनीं जंगलांत गांठून त्याशीं लढाअी देअून त्याचें शिर कापून आणून नरगुंदच्या वेशीवर टांगलें. पुढें अिंग्रजांनीं भास्करराव बाबासाहेबांना पकडून १२ जूनला फांशीं दिलें; तेव्हां त्यांच्या तरुण, सौंदर्यसंपन्न आणि साहसी राणीनें मलप्रभा नदींत आत्महत्या केली.

याचबरोबर कोमलदुर्ग, खानदेश, त्र्यंबकेश्वर अि. ठिकाणींहि लहानश्या अुठावण्या झाल्या. परंतु त्या सर्व अेकाकी, असंघटित असल्यामुळें दक्षिणेमध्यें अिंग्रजांना तसा कोणताच विशेष ताण सहन करावा लागला नाहीं. आणि त्यामुळेंच त्यांना दक्षिणेंतील आपलीं सैन्यें अुत्तरेंतील क्रांतीचा मोड करण्याकरितां निश्चिंतपणें तिकडे नेतां आलीं.

दक्षिणेंतील हालचालींचा असा थोडासा धावता परिचय करून घेतल्यानंतर

आपणाला आतां त्या अद्याप खितपत पडलेल्या मानी अयोध्येकडे वळलें पाहिजे. यावेळीं लॉर्ड कॅनिंगनें अयोध्येकरितां अेक घोषणा प्रसिद्ध केली होती. 'जे आपण होअून हत्यारें खालीं ठेवतील त्यांना बंडखोर न समजतां त्यांना क्षमा दाखविण्यांत येअील व तसे जे न येतील त्यांना मात्र चांगलें प्रायश्चित्त भोगावें लागेल' अशा अर्थाची ती घोषणा होती. परंतु शरण येण्यासाठीं क्षमेची लालूच दाखविलेली असतांनाहि अयोध्या मौलवीच्या विश्वासघातकी वधामुळें शोकानें रडत न बसतां अधिकच चवताळून अुठली. मौलवीचा सूड घेण्यासाठीं निजामअल्ली पिलभिटवर चालून गेला; खान बहादुर-खान बरोबर चार हजार लोक घेअून रणांत अुतरला. फरुखाबादचे हजारों सैनिक आले; आणि नानासाहेब, बाळासाहेब अि. पुढाऱ्यांनीं सबंध अयोध्या प्रांतांत आणि रोहिलखंडांत अेकच घालमेल अुडवून दिली. प्रख्यात मोंगल राजपुत्र फेरोजशहा हाहि अयोध्येंत आला. घोग्रा नदीवर बेगमनें आपला तळ दिला होता.

शेवटीं राजा वेणीमाधव लखनौवर चालून येत आहे असें कळतांच होप ग्रँटनें १३ जून १८५८ ला नबाबगंज येथें क्रांतिकारकांवर अचानकपणें चढाअी केली. क्रांतिकारक असावध असल्यामुळें त्यांची थोडी धांदल अुडाली. तरी त्यांचा प्रतिकार भयंकर प्रखर असाच होता, असें स्वतः होप ग्रँटनें लिहून ठेवलें आहे. तो म्हणतो, "हिंदुस्थानांतील अनेक लढाया मीं पाहिल्या आहेत नि 'मरूं तरी नाहीं तर मारूं तरी' अशा निर्धारानें लढणारे वीरहि मीं पाहिले. परंतु अयोध्ये-च्या या जमीनदारांसारखे अुज्ज्वल वीरव्रत अद्याप मीं कोठें पाहिलें नाहीं!"

१८५८ च्या ऑक्टोबरमध्यें ब्रिटिशांच्या सरसेनापतीनें आपल्या काळ्या गोळ्या पलटणींची पुन्हा जमवाजमव करून त्यांना अयोध्येंतील क्रांतिकारकांवर धाडून दिलें. क्रांतिकारकांना अयोध्येंतून रेटीत रेटीत अुत्तरेकडे पार नेपाळ-पर्यंत हुसकून देण्याची आज्ञा या पलटणींना देण्यांत आली.

याच सुमारास नोव्हेंबरमध्यें अिंग्लंडच्या राणीनें आपली सुप्रसिद्ध राजघोषणा केली; आणि पूर्वीच्या भविष्याप्रमाणें खरोखर शंभर वर्षांनीं कंपनीच्या राजवटीचा अंत झाला! राणीच्या जाहिरनाम्यानें युद्ध थांबवून हत्यारें खालीं ठेवणारांना क्षमा करण्यांत यावयाची होती. त्यांची मालमत्ता जप्त केली जाणार नाहीं असेंहि

आश्वासन त्यांत होतें. राजेमहाराजांचा दत्तकाचा अधिकार पुन्हा मान्य करण्यांत आला, व धार्मिक अधिकारांत आणि रूढींत मुळींच ढवळाढवळ केली जाणार नाहीं असें स्पष्ट अभिवचन या घोषणेनें देण्यात आलें.

परंतु अयोध्येनें या घोषणेकडे ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं. अुलट अयोध्येच्या बेगमेनेंच यावर तोडीस तोड म्हणून अेक प्रतिघोषणा काढली. त्यांत तिनें जाहीर केलें कीं, "अिंग्रजांनीं सर्व हिंदुस्थान बळकावून आतां असंतोष थांबविण्यासाठीं त्यांनीं या खोट्या गप्पा आरंभिलेल्या आहेत. तेव्हां लोकांनीं यावर विश्वास ठेवून फसून जाऊं नये. कारण अिंग्रजानीं आजपर्यंत कधीं कुणाला क्षमा केल्याचें अैकिवांत नाहीं. तेव्हां अिंग्रजांच्या स्वाधीन न होतां १ जानेवारी १८५९ पूर्वी आपल्याकडे येअून अुपस्थित व्हावें."

म्हणून ब्रिटिशांच्या क्षमेला कवडी किंमत देऊन अयोध्येनें युद्ध थांबविलें नाहीं. ती शत्रूला चिरीत होती, स्वतः चिरली जात होती तरीहि ती लढतच होती. अशा रीतीनें जूनपासून १८५८ च्या नोव्हेंबरपर्यंत आणि तेथून पुढें ५९ च्या अेप्रिलपर्यंत अयोध्या लढत असतां सर्व बाजूंनीं तिचा कोंडमारा करण्यांत येअून तिला नेपाळांत हुसकून लावण्यांत आलें. क्रांतिकारक नेपाळांत शिरले तरीहि अिंग्लिशांनीं त्यांचा कसून पाठलाग केला. तरीहि नेपाळचा हिंदु राजा त्यांना आश्रय देअील अशी त्यांना आशा वाटत होती. नेपाळमध्यें शिरलेल्या क्रांतिकारकांची संख्या जवळ जवळ ६० हजार होती. स्वतः नानासाहेबांनीं नेपाळच्या जंगबहाद्दुराला पत्र लिहून ब्रिटिशांविरुद्ध आम्हास साहाय्य देअून मित्रभावानें आपणांस आश्रय द्यावा अशी विनंती केली होती. जंगबहाद्दुरानें आपला कर्नल बलभद्रसिंह हा सरदार क्रांतिकारकांकडे पाठविला.

क्रांतिकारकांनीं त्याला सांगितलें कीं, "आम्ही हिंदु धर्माकरितां लढलों आहों. नेपाळचे महाराजहि हिंदूच असल्यानें त्यांनीं आम्हांला साहाय्य द्यावें." तेव्हां त्यानें ब्रिटिशांनीं घोषित केलेल्या क्षमेचें स्मरण क्रांतिकारकांना देअून ब्रिटिशांना शरण जाण्यास सांगितलें. तेव्हां क्रांतिकारक म्हणाले, "आम्ही नेपाळच्या राजापुढें हत्यारें ठेवतों. पण ब्रिटिश सूडाला आमच्यापैकीं कांहीं बांधवांचा बळी देअून आम्ही अिंग्लिशांना मुळींच शरण जाअूं अिच्छीत नाहीं!"

नेपाळच्या जंगबहाद्दुरानें क्रांतिकारकांना आश्रय दिला नाहींच. परंतु

आपल्या प्रदेशांत शिरून सांपडतील तेथें क्रांतिकारकांची शिकार करण्यास त्यानें ब्रिटिशांना संपूर्ण मोकळीक दिली.

तेव्हां सर्व क्रांतिकारकांच्या आशा धुळीला मिळाल्या. रानावनांत निघून जाणें म्हणजे अुपास तापास कंठून मृत्यु ओढवून घेणें हें जरी त्यांनीं पुरेपूर ओळखलें होतें तरी ते अिंग्लिशांना शरण न जातां रानावनांतच गेले. या वेळचें नानानें अिंग्लिश सेनापति होप ग्रँट यास लिहिलेलें पत्र पाहण्यासारखें आहे.

नाना लिहितो, "हिंदुस्थान बळकावून मला बंडखोर ठरविण्याचा तुम्हांला काय अधिकार आहे? परके फिरंगी तुम्ही या देशाचे राजे आणि या आमच्या देशात आम्ही तेवढे चोर ठरलों काय?"

नानासाहेबाचे अितिहासानें लिहून ठेवलेले अेवढेच काय ते शेवटचे शब्द! छे, छे—शब्द कसले; दुसऱ्या बाजीच्या नेभळट राजवटीचा कलंक लागलेली ही पेशव्यांची गादी चितोडच्या त्या शूर रजपुतानींप्रमाणें यज्ञाच्या ज्वालांत जळून नामशेष झाली तिची शेवटची किंकाळीच होती ती. "हिंदुस्थानामध्यें, परकीय लुटारू हे राजे आणि हिंदुस्थानचे खरे वारस जे आम्ही ते मात्र चोर!"

...खरोखर आपल्या स्वातंत्र्याकरितां अितक्या हटेलपणानें झुंजत राहिलेला दुसरा देश जगाच्या पाठीवर सांपडणें शक्य नाहीं!

♣ ♣ ♣

# २ पूर्णाहुति

तात्या टोपे ग्वाल्हेरहून २० जूनला अदृश्य झाला. त्याचप्रमाणें जौरा, अलिपूर येथूनहि तो २२ जूनला निघून जाअून अिंग्रजांच्या हातांतून निसटला. ग्वाल्हेरच्या रणांत लक्ष्मी पडल्यामुळें तात्याचा अुजवा हातच गळून पडला होता. नानासाहेबांची त्याची कायमचीच ताटातूट झाली होती. अिंग्रजी सत्ताहि आतां हिंदुस्थानांत अजिंक्यपणें मिरवू लागली होती. आतां तात्याजवळ नांव घेण्यासारखें सैन्यहि नव्हतें व तोफाहि नव्हत्या. असें असतांहि त्या निधड्या वीरानें आपला जरीपटका शत्रूच्या पायांवर नमविला नाहीं !

ग्वाल्हेरच्या पराजयानंतर तात्या टोपे नि रावसाहेब सरमथुरा येथें आले. त्यांनीं आतां तीन तत्त्वें डोळ्यासमोर ठेवलीं होतीं. अेक म्हणजे चुकूनसुद्धां अिंग्रजांशीं अुघड्या रणांत लढाअीला अुभें राहावयाचें नाहीं. दुसरें म्हणजे असंरक्षित प्रांतांत गनिमी हल्ले चालू करावयाचे व तिसरें म्हणजे वाटेंत सांपडतील त्या संस्थानांकडून सक्तीनें युद्धसाहित्य, पैसा आणि सैन्य वसूल करावयाचें. या तीन तत्त्वांवर तात्याचा पुढचा लढा आधारलेला होता. नर्मदा ओलांडून अेकदां महाराष्ट्राच्या भूमींत येअून ठाण मांडायचा तात्याचा अुद्देश होता; तर तात्याला नर्मदेपर्यंत सुद्धां येअूं द्यावयाचें नाहीं हें अिंग्लिशांचें ध्येय होतें.

पहिल्यानें तात्याचा डोळा भारतपुरावर होता. अिंग्लिशहि तात्याच्या पाठीवरच होते म्हणून तो जयपुरावर गेला. परंतु कर्नल होम्स जवळ आल्यानें तात्या टोंक संस्थानाकडे गेला. तेथें तात्याच्या हातीं बरीच युद्धसामग्री लागल्यानें तो दक्षिणेच्या रोखानें निघाला. ७ ऑगस्ट १८५८ ला तात्या भिलवाडा येथें विश्रांति घेत असतां रॉबर्ट्सनें त्याच्यावर झडप घातली. तात्याचे सैनिक अतिशय थकले असल्यामुळें तात्याची धुळधाण अुडाली व शत्रूनें त्याचा निकरानें पाठलाग आरंभिला. परंतु कौशल्यानें मजलींवर मजवी मारीत तात्या चंबळपाशीं आला आणि अिंग्रज सैन्याच्या नाकावर टिचून त्यानें शेवटीं चंबळ ओलांडलीच. तेथून तात्या झालरापट्टणला आला. या ठिकाणीं तात्याला ३२ तोफा व १५ लाख रुपये हातीं लागले. तेव्हां त्यानें आपल्या पायदळाला व

घोडदळाला अनुक्रमें २० रु. आणि ३० रु. प्रमाणें पगार वाटला.

तात्यानें आतां अिंदूरवर चालून जाण्याची अेक नवीनच साहसी योजना आंखली. अिदूरचें सैन्यहि त्याला आंतून वश झालें होतें. म्हणून पट्टणहून तो सरळ माळव्यांत घुसला. अिंग्लिश सैन्य तात्यावर चोहीं बाजूंनीं जमा होतच होतें. मिचेलनें शेवटीं तात्याला गांठलेंच. तात्याजवळ जरी यावेळीं ५ हजार सैन्य होतें, तरी थोडी चकमक झडतांच ते माघार घेअून पळूं लागलें. रायगडचें मैदान मागें सोडून तात्याचें सैन्य बेटवा नदीवरील अरण्यांत शिरून सिरंज येथें आलें. अिसागड येथें फिरून तात्याला १८ तोफा मिळाल्या. पण नर्मदा तर दूर राहिली होती.

आतां तात्यानें आपल्या सैन्याचे दोन भाग करून दक्षिणेच्या रोखानें धावण्यास पुन्हा प्रारंभ केला. दक्षिणेकडून मिचेल, पूर्वेकडून लिडेल, अुत्तरे-कडून मीड, पश्चिमेकडून पार्क आणि चंबळकडून रॉबर्ट्स, अशा रीतीनें शत्रूचे पाश तात्याभोंवतीं आवळत येऊन तो पुरा घेरला गेला होता. तात्या आणि राव कधीं अुघड तर कधीं गुप्तपणें सरळ दक्षिणच्या रोखानें मार्ग आक्रमीत चालले. विजेच्या वेगानें घाट अुतरून, नद्या ओलांडून, अरण्यांत घुसून विलक्षण प्रवास करीत तात्या शेवटीं अेकदांचा नर्मदेवर आला व ती ओलांडून त्यानें दक्षिणेंत आपलें पाअूल रोवलें.

तात्या नागपुराजवळ येअून पोंचल्याचें कळतांच प्रत्येकानें 'धन्य! तात्या धन्य!' म्हणून त्याची प्रशंसा केली. परंतु अेवढ्या प्रशंसेपलीकडे लोकांनीं तात्याला पाहिजे होतें तें साहाय्य दिलें नाहीं. ५७ च्या क्रांतीमुळें झालेल्या भयंकर रक्तपातानें सबंध राष्ट्रच दुबळें आणि बावळें बनलें होतें. नागपूरनें जरी चिकाटी दाखविली असती तरी क्रांतीचें स्वरूप पालटलें असतें. या सर्व निराशादायक गोष्टी असतांनाहि तात्यानें आपणाभोंवतीं कोंडी करीत असलेल्या सैन्यांना काबूंत ठेवून नर्मदेच्या अुगमापर्यंत पल्ला ठोकला. कारण त्याला आतां बडोद्याकडे जावयाचें होतें. तात्याच्या चालीविषयीं मॅलिसन लिहितो, "मजली मारीत यशस्वी पलायन करण्यांत जगांतील दुसरें कोणतेंहि सैन्य तात्याच्या या हिंदी सैन्याची बरोबरी करीलसें वाटत नाहीं."

तात्या छोटा अुदेपूर येथें येतो तों पार्क त्याजवर चालून आला. त्यामुळें

बडोदा ५० मैलांवर असूनहि त्याला पूर्वीचा बेत सोडून वासवऱ्याच्या जंगलांत आश्रय घ्यावा लागला. डिसेंबर ११ ला त्यानें जंगलांतून बाहेर पडून अुदेपुरावर चाल केली. परंतु अिंग्लिशांनीं तेथेंहि त्याचें कांहींहि न चालूं दिल्यानें तात्याला पुन्हा जंगलांतच आश्रय घ्यावा लागला. आतां मात्र हा मराठा व्याघ्र ह्या जंगलांत सर्व बाजूंनीं चांगलाच कोंडला गेला. तरीहि अत्यंत निकराचा प्रयत्न करून मेजर रॉकच्या सैन्यावर तुटून पडून तात्या जंगलांतून पुन्हा निसटला हें पाहून अिंग्लिश सेनापतींनीं लाजेनें खालीं मान घातली !

१३ जानेवारी १८५९ ला तात्या अिंद्रगडला येअून पोंचला. या ठिकाणीं फेरोजशहा, रावसाहेब, तात्या व शिंद्याच्या दरबारांतील मानसिंह हे चार पुढारी जमून पुढें काय करावें याचा विचार करीत होते. २१ जानेवारीला अलवारजवळच्या सिरवार गांवीं अिंग्लिशांना झुकांड्या देत तात्या पुन्हा प्रकट झाला. बडोद्याची योजना फिसकटल्यामुळें काहीं नवीन धोरण योजून तो अगदीं मोजके लोक घेअून परणच्या जंगलांत असलेल्या सरदार मानसिंहाकडे राहण्यास गेला. अिंग्रजांना तात्याला अुघड्या रणांत पकडणें सर्वस्वीं अशक्य झाल्यामुळें त्यांनीं आतां लाचलुचपतीनें तात्याला पकडण्याचें ठरवून मानसिंहाला वश करून घेतलें. मानसिंह अिंग्रजांना शरण गेला आहे हें माहीत असूनहि तात्यानें त्याच्यावर विश्वास ठेवला. याचाच अुपयोग करून मानसिंहानें तात्याला पकडून दिलें.

७ अेप्रिल १८५९ ला मध्यरात्रीं तात्याला विश्वासघातानें पकडल्यानंतर त्यास जनरल मीडच्या छावणींत सिप्री येथें नेण्यांत आलें. पुढें न्यायासनासमोर तात्याच्या चौकशीचें नाटक झालें. त्यांत 'जें जें कांहीं मीं केलें तें तें माझे धनी पेशवे यांच्याच आज्ञेवरून मीं केलें आणि या चाललेल्या चौकशींत भाग घेण्याची माझी मुळींच अिच्छा नाहीं!' असें तात्यानें लेखी उत्तर पुढें केलें. क्रांतीची दैनंदिन हालचाल मात्र त्यानें तोंडानें सांगितली व ती मुनशीनें लिहिल्यावर त्या खालीं Tatia Tope अशी अिंग्रजी स्वाक्षरी त्यानें केली. तीन दिवस तात्याची चौकशी चालू होती.

अेप्रिल १८ ला तात्याच्या चौकशीचें नाटक संपलें व दुपारीं ४ वाजतां त्याला फांशीं द्यावयाच्या ठिकाणीं आणण्यांत आलें. सैनिक आणि बघे लोक यांची तेथें अेकच गर्दी अुसळली होती. तात्या न डगमगतां फांशीच्या फळीवर

जाअून अुभा राहिला. फांशी देणारे मांग त्याचे हातपाय बांधूं लागले. तेव्हां 'तसें कांहीं करण्याची मुळींच गरज नाहीं' असें त्यांना हसत हसत सांगून त्यानें आपणच आपली मान गळफांसांत अडकविली. फांस आवळला गेला ठोकळा अुडाला नि अेका हिसक्यासरशीं...!

हा पेशव्यांचा राजनिष्ठ सेवक, १८५७ चा वीर योद्धा, मानी तात्या टोपे अिंग्लिशांच्या फांसावर निष्प्राण स्थितींत लोंबकळूं लागला! स्वदेशाच्या स्वातंत्र्या-करितां त्यानें अमर्याद हालअपेष्टा सोसल्या. परंतु विश्वासघातक्यांचा नीचपणा हेंच फळ त्याच्या वांट्याला आलें!

तात्या, तात्या, असल्या या हतभागी राष्ट्रांत तूं आधीं जन्मलासच कां? आणि या विश्वासघातकी नीच लोकांकरितां आधीं लढलास तरी कशाकरितां? तात्या! आमचे अश्रू तुला दिसत नाहींत का?

तुझ्या रक्ताची भरपाअी या दुबळांच्या अश्रूंनीं! काय किंमत खरोखर तुझ्या ह्या त्यागाची नि हौतात्म्याची!!

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाच्या पेटलेल्या या भव्यभीषण होमकुंडांत ही शेवटची पूर्णाहुति पडली.

आतां हा ज्वालामुखी सध्यां पुरतां कां होअीना पण शांत झाला आहे. तात्या गेल्यानंतर रावसाहेब अेक महिनाभर निकरानें लढला. परंतु २० ऑगस्टला त्याला पकडून कानपूरला फांशीं देण्यांत आलें.

५७ च्या अुठावणींत ज्या योजना आणि जुळण्या करण्यांत आल्या होत्या त्या मोठमोठ्या यशस्वी क्रांत्यांमधूनहि पाहावयास मिळत नाहींत. मग असें असतांना या क्रांतीला शेवटीं अपयश कां आलें? त्याचें उत्तर असें कीं, क्रांतीचा पहिला आकर्षक भाग चांगलाच पार पाडण्यांत आला. पण अिंग्रजी सत्तेचा विध्वंस केल्यावर पुढें काय हा प्रश्न सर्वांपुढें येअून पडला. पूर्वींचीं तींच भांडणें, तेच मोंगल, तेच मराठे, तेच पूर्वीचें अेकठशाचें अंदाधुंदीचें वातावरण जर पुन्हा येथें चालू व्हावयाचें असेल तर त्याकरितां सर्वसाधारण जनतेला आपलें रक्त सांडण्याची तितकी गरज वाटली नसणें साहजिक आहे. विध्वंसनाचा पहिला भाग पार पाडल्यानंतर जेव्हां रचनात्मक म्हणजे विधायक भागाला सुरवात झाली तेव्हां परस्पर मतभेद, परस्पर भीति, अविश्वास यांचें वातावरण माजलें. या वेळीं

सर्वांना आकर्षक होओील असें नवीन ध्येय सुस्पष्टपणें लोकांपुढें मांडण्यांत आलें असतें तर क्रांतीचा शेवटहि तिच्या प्रगतीप्रमाणेंच यशस्वी झाला असता.

क्रांतीच्या अपयशाला मुख्यतः दोनच गोष्टी कारणीभूत झाल्या. अेक म्हणजे पूर्वीच्या कसल्याहि प्रकारच्या ओबडधोबड स्वराज्यापेक्षां, अिंग्रजी राजसत्ता अधिक वाअीट आणि हानिकारक आहे हें समजण्याची अक्कल नसलेल्या लोकांनीं केलेला स्वदेशद्रोह; आणि दुसरी म्हणजे प्रामाणिकपणाचा आणि खऱ्या देशभक्तीचा अभाव; नाहींतर अिंग्रजांच्या बाजूनें शीख, गुरखे, हिंदी संस्थानिक आणि हिंदी प्रजा लढतीच ना!!

५७ ची क्रांति म्हणजे हिंदुस्थानच्या अैक्याच्या, स्वातंत्र्याच्या आणि जनतेच्या जागृतीच्या दिशेनें कितपत प्रगति झाली आहे हें पारखून पाहण्याची कसोटीच होती. अपयशाचा दोष हिंदुस्थानांतील आळशी आणि त्या वरील स्वार्थी नतद्रष्टांवरच येतो. परंतु स्वतःच्या रक्तानें माखलेल्या आपल्या तरवारी घेअून जे वीर प्रत्यक्ष मृत्यूच्या छातीवर थयथय नाचले त्या वीरांना दोष देअून कोणीहि आपल्या जिभा विटाळूं नयेत. ते वेडे नव्हते. ते अुतावळे नव्हते. पराजयाला ते कारणीभूत झाले नाहींत. त्यांनीं तर अन्यायाच्या मस्तकावर पहिला वार केला. परंतु दुसऱ्या मातृद्रोह्यांनींच मातृभूमीच्या हृदयांत खंजीर खुपसला. मग यांपैकीं कोण नीच, आणि कोण विश्वासघातकी?

सम्राट बहाद्दुरशहा अेक मोठा कवि होता. कोणीं तरी त्याला सांगितलें कीं, 'बादशाहा! आतां तूं अिंग्रजाला शरण जाणें हेंच बरें. कारण आतां हिंदुस्थानची समशेर कायमचीच बोंथट नि थंड होअून पडली आहे!' तेव्हां त्या बादशहानें त्यास कवनांत अुत्तर दिलें कीं,

गाझियों में बू रहेगी जबतलक अीमान की।
तब न तो लंडन तक चलेगी तेग हिंदुस्थान की॥

अरे! आमच्या वीरांच्या अंतःकरणांत जोंपर्यंत स्वाभिमानाचा शेवटचा अेक बिंदु जोंपर्यंत आहे तोंपर्यंत हिंदुस्थानची समशेर कधींच बोंथटणार नाहीं; अितकेंच काय पण अेक काळ असा येअील कीं, त्या दिवशीं ती लंडनच्याच प्रवेशद्वारावर प्रहार करीत असलेली दिसेल!!

— वन्दे मातरम् —

# परिशिष्ट

## सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराचा कालपट

| | |
|---|---|
| खि. स. १७५७ जून २३ | प्लासीची लढाऔ—प्लासीच्या लढाऔची शत-सांवत्सरी साजरी करण्यासाठीं व ओिंग्रजी सत्तेचीं पुरीं शंभर वर्षें भरलीं (?) हें सांगण्यासाठीं १८५७ चें युद्ध लढविण्यांत आलें होतें. |
| ,, १८०६ | वेलोरचें स्वातंत्र्ययुद्ध. |
| ,, १८२७ जून ७ | दुसरा बाजीराव नानासाहेबास दत्तक घेतो. |
| ,, १८४२ | झांशीच्या गंगाधररावांशीं राणी लक्ष्मीबाऔचा विवाह. |
| ,, १८४६ | लॉर्ड डलहौसीची हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक. |
| ,, १८४८ | सातारकर छत्रपतींचा मृत्यु व सातारची गादी खालसा. |
| ,, १८५१ | दुसऱ्या बाजीरावाचा मृत्यु. |
| ,, १८५३ | नागपूरकर भोसल्यांचें राज्य खालसा. |
| ,, १८५३ | झांशीच्या गंगाधररावांचा मृत्यु व गादीकरितां राणीनें घेतलेल्या दत्तकाचा समारंभ. |
| ,, १८५३ | गाऔची व डुकराची चरबी माखलेल्या नव्या काडतुसांची लष्करी दारूगोळा कारखान्यांत निर्मिति. |
| ,, १८५४ | ब्रह्मावर्ताच्या गादीसंबंधानें दाद लावून घेण्या-साठीं नानाचा वकील अझीमुल्ला याचें ओिंग्लंडला प्रयाण. |

| | |
|---|---|
| ख्रि. स. १८५६ | अयोध्येच्या नबाबाचें राज्य खालसा. |
| ,, १८५७ मार्च २९ | बराकपूर येथें मंगल पांडे यानें ब्रिटिशांवर क्रांति-युद्धांतील पहिली गोळी अुडविली. ५७ च्या क्रांतिकारकांना अिंग्रज 'पांडे' म्हणतात तें याच वीराच्या बलिदानामुळें. |
| ,, ,, अेप्रिल ८ | हुतात्मा मंगल पांडे यास फांशी. |
| ,, ,, अेप्रिल १८ | नानांची 'तीर्थयात्रा'—लखनौ, दिल्ली आदि क्रांतिकेंद्रांना गुप्त राजकीय भेट. |
| ,, ,, मे ६ | मीरतच्या शिपायांवर 'निषिद्ध' काडतुसांचा प्रयोग आणि तीं नाकारणाऱ्या ८५ शिपायांना अटक. |
| ,, ,, मे १० | मीरतला क्रांतीचा पहिला स्फोट. |
| ,, ,, मे ११ | 'चलो दिल्ली'च्या गर्जना करीत मीरतच्या क्रांतिकारकांचें दिल्लीला आगमन. |
| ,, ,, मे ११ ते १६ | दिल्लीमध्यें क्रांतीची अुठावणी; ब्रिटिश सत्तेचा नाश व दिल्लीच्या स्वातंत्र्याची घोषणा. |
| ,, ,, मे २५ | अम्बाल्याहून सरसेनापति ॲन्सन दिल्लीवर चालून येतो. |
| ,, ,, मे ३१ | बरेली येथें अुठावणी. |
| ,, ,, जून ३ | अझिमगड येथें अुठावणी. |
| ,, ,, ,, ४ | बनारस–झांशी–कानपूरची अुठावणी. |
| ख्रि. स. १८५७ ,, ८ | झांशी स्वतंत्र होते. |
| ,, ,, ,, ९ | फैजाबादचें स्वातंत्र्य. |
| ,, ,, ,, १३ | नागपूरची अुठावणी. |
| ,, ,, ,, १७ | अलाहाबादची अुठावणी. |

| | |
|---|---|
| अि. स. १८५७ जून २० | दिल्लीच्या क्रांतिकारकांची वेढा घालणाऱ्या अिंग्रजांवर चढाअी. |
| ,, ,, ,, २५ | कानपूरच्या किल्ल्यांतील अिंग्रज क्रांतिकारकांना शरण येतात. |
| ,, ,, ,, २७ | कानपूरची 'प्रसिद्ध' कत्तल. |
| ,, ,, ,, २८ | स्वतंत्र कानपूरला नानासाहेबाचा दरबार. |
| ,, ,, जुलै १ | ब्रह्मावर्ताला नानाचा राज्याभिषेक-समारंभ. |
| ,, ,, ,, १५ | बिबीघरची दुसरी कत्तल. |
| ,, ,, ,, १७ | कानपूर घेण्यासाठीं हॅवेलॉकचें आगमन. |
| ,, ,, ,, १७ | हैदराबाद संस्थानांत अुठावणी. |
| ,, ,, ,, ३१ | कोल्हापूर, बेळगांव, धारवाड येथील तुकड्यांची दक्षिणेंत अुठावणी. |
| ,, ,, सप्टेंबर १४ | दिल्लीचा पाडाव व क्रांतिकारकांचा पराभव. |
| ,, ,, नोव्हेंबर ९ | तात्या टोपेचें काल्पीला आगमन. |
| ,, ,, डिसेंबर १ | तात्या टोपे व कॉलिन्स यांचें युद्ध. |
| ,, ,, ,, २३ | नेपाळचा जंगबहादुर ९ हजार गुरख्यांसह अिंग्रजांच्या साहाय्याला येतो. |
| अि. स. १८५८ मार्च १४ | लखनौचा पाडाव, अिंग्रजांचा विजय. |
| ,, ,, ,, २३ | अिंग्लिशांचा झांशीला वेढा. |
| ,, ,, अेप्रिल ३ | झांशीचा पाडाव व राणीचें काल्पीला गमन. |
| ,, ,, ,, २२ | जगदीशपूरचा कुमारसिंह गंगापार होत असतां अिंग्रजांची गोळी लागून जखमी झालेला स्वतःचा हात तोडून गंगेला अर्पण करतो. |
| ,, ,, ,, २५ | दक्षिणेंत नरगुंद येथें अुठावणी. |
| ,, ,, ,, २६ | स्वतःच्या स्वतंत्र राजधानींत कुमारसिंहाचा मृत्यु. |

| | | |
|---|---|---|
| अि. स. १८५८ | जून ५ | मौलवी अहमदशहा या अयोध्येच्या क्रांति-नेत्याचा पोवेनच्या राजाकडून विश्वासघातानें वध. |
| ,, ,, | जून १२ | नरगुंदचे राजे बाबासाहेब यांना क्रांतीसाठीं फांशी. |
| ,, ,, | ,, २० | झांशीची महाराणी लक्ष्मीबाई हिचा अिंग्रजांशीं लढतां लढतां रणांत मृत्यु. |
| ,, ,, | नोव्हेंबर १ | अिंग्लंडच्या राणीचा जाहीरनामा व त्याला लगेच अुत्तर देणारा अयोध्येच्या बेगमेचा प्रति-जाहीरनामा. |
| ,, १८५९ | जानेवारी २१ | तात्या टोपे अलवारजवळ प्रकट होतो. |
| ,, ,, | अेप्रिल ७ | फितुर मानसिंगाच्या साहाय्यानें तात्या टोपेस अिंग्रज विश्वासघातानें पकडतात. |
| ,, ,, | अेप्रिल १८ | पेशव्यांचा शेवटचा सेनापति तात्या टोपे यास अेकतर्फी कोर्टापुढें दोषी ठरवून अिंग्रजांकडून फांशी. |